**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. भास्कर जाधव )**

**पृ.शी.**: कोकणातील आंबा उत्पादकांचे झालेले नुकसान

**मु.शी.**: कोकणातील आंबा उत्पादकांचे झालले नुकसान या विषयावर श्री.विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, संजय केळकर, ॲड. अनिल परब,सर्वश्री रामनाथ मोते, परशुराम उपरकर, जयंत पाटील, प्रा. शरद पाटील, श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**तालिका सभापती** ( श्री. भास्कर जाधव ) : या अल्पकालीन चर्चेसंबंधी अनौपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी अडीच तासांचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे माननीय सदस्य श्री. विनोद तावडे हे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील. चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, या चर्चेला माननीय मंत्रीमहोदयांच्या उत्तरासहीत अडीच तासाचा अवधी देण्यात आलेला असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी स्वत:वरच बंधन घालून ही चर्चा अडीच तासात पूर्ण करावी. चर्चा लांबली तर चर्चेचे हीत साध्य होत नाही त्यामुळे आपल्याला माननीय मंत्रीमहोदयांच्या उत्तरासहीत ही चर्चा अडीच तसातच पूर्ण करावयाची आहे. चर्चेच्या दिवशीच जर त्या चर्चेला उत्तर मिळाले तर त्या प्रश्नाला न्याय मिळू शकतो. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना मी पुन्हा एकदा विनंती करतो की, ही चर्चा आपल्याला अडीच तासातच पूर्ण करावयाची आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मुद्देसूद भाषण करुन या चर्चेला न्याय मिळवून घ्यावा.

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"कोकणातून दरवर्षी हापूस आंब्याचे होणारे 800 कोटी रुपयांचे उत्पादन यावर्षी 25 टक्क्या पेक्षाही कमी होणे, आंब्याचे चांगले उत्पादन येण्यासाठी आंबा उत्पादकांनी खते, फवारणी, पाणी नियोजन यासाठी दरवर्षीपेक्षा यावर्षी जास्त खर्च करणे, परंतु आंब्याचा मोहरच पूर्णपणे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

.....2

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

गळून गेल्यामुळे आंबा उत्पादकांचे अतोनात नुकसान होणे, आंबा उत्पादकांना या नुकसानीपोटी शासनाकडून भरीव आर्थिक मदत देण्यात आलेली नसणे, तसेच खते, फवारणी यासाठी शेतकऱ्यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सेवा सहकारी सोसायट्या यांच्याकडून जी कर्जे घेतलेली आहेत ती माफ करणे वा त्याचे हप्ते पाडून देणे याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नसणे, विदर्भातील संत्रा उत्पादकांना व पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादकांना नुकसानी पोटी जशी भरीव आर्थिक मदत दिली जाते त्या धर्तीवर कोकणातील आंबा उत्पादकांना देण्यात न आल्यामुळे राज्यात प्रादेशिकपणाची भावना वाढीस लागण्याची निर्माण झालेली शक्यता, त्यामुळे याप्रकरणी हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, खरे म्हणजे या चर्चेला अडीच तासाचा अवधी दिलेला असला तरी आम्ही ही चर्चा सव्वा तासातच पूर्ण करण्याचा प्रयत्न करु. आम्हाला या विषयाच्या संदर्भात काहीही फाफटपसारा मांडावयाचा नसून केवळ आंबा उत्पादक शेतक-यांना न्याय मिळावा एवढीच आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, दोन दिवसापूर्वी या विषयाच्या संदर्भात नियम 289 अन्वये आम्ही प्रस्ताव मांडला होता त्यावर माननीय सभापती महोदयांनी आज नियम 97 अन्वयेच्या चर्चेला परवानगी दिलेली असल्यामुळे मी त्यांचे मनापासून आभार मानतो. कोकणातील शेतक-यांना ख-या अर्थाने न्याय मिळवून देण्यासाठी ही चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी परवा म्हटले होते की, "आंबा हा फळांचा राजा आहे." परंतु हा राजा पिकविणारा जो शेतकरी आहे त्याची गेल्या दोन वर्षापासूनची आर्थिक स्थिती फार हलाखीची झालेली आहे. त्यामुळे या विधिमंडळाच्या अधिवेशनात कोकणातील आंबा उत्पादक शेतक-याला आपण न्याय मिळवून देऊ शकलो तर कोकणातील शेतकरी आपल्याला आशिर्वाद दिल्याशिवाय राहणार नाही. आंबा पिकवणारा शेतकरी व त्यावर अवलंबून असलेले उद्योग, आपल्याला शासनाकडून काही तरी मदत मिळेल या अपेक्षेने या अधिवेशनाकडे डोळे लावून बसलेले आहेत. या अधिवेशनात आपल्याला न्याय मिळेल, आंबा उत्पादक शेतक-यांच्या प्रश्नांची, समस्यांची या अधिवेशनात दखल घेतली जाईल या आशेने डोळे लावून बसलेले आहेत. माननीय सभापती महोदय, काल आपल्या भागात

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

देखील भयानक अवेळी पाऊस झालेला असून शेतक-यांना आशा होती की, जे काही पीक आलेले आहे त्यातून आपल्याला काही फायदा होईल. आंब्याला मोहर उशिरा का होईना लागलेला असल्यामुळे आपल्याला काही तरी मिळेल या आशेने कोकणातील शेतकरी बघत होता परंतु काल झ ाालेल्या अवेळी पावसामुळे आंब्याचा सर्व मोहर गळून पडला आहे तसेच ज्या आंब्याच्या झाडांना फळे लागली होती त्या फळांचे कालच्या पावसामुळे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे आज कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी निराश झालेला आहे. आजच्या नियम 97 अन्वयेच्या चर्चेच्या माध्यमातून कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांना आपण काही तरी न्याय देऊ शकलो तर हा आंबा उत्पादक शेतकरी जगू शकेल. कोकणातील आंबा आपल्या राज्याला आणि देशाला परकीय चलन मिळवून देत असतो. आंबा हे डॉलर मिळवून देणारे पीक आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे........

त्यातून आपल्याला परकीय चलन मिळते. आंब्याची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते म्हणून आपल्याकडे आंबा हे डॉलर मिळवून देणारे फळ आहे असे म्हटले जाते. त्यामुळे अर्थकारणामध्ये आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे स्थान महत्वाचे आहे हे आपण जाणून घेतले पाहिजे.

सभापती महोदय, आंबा आणि काजू पीक घ्यावयाचे झाले तर सुरुवातीची चार-पाच वर्षे काहीच उत्पन्न मिळत नाही. परंतु या चार-पाच वर्षामध्ये आंब्याची फार मोठ्या प्रमाणावर जपणूक करावी लागते. त्यामध्ये सुरुवातीस खड्डा खणणे, रोप लावणे, खत-पाणी घालणे, इत्यादी गोष्टींची काळजी घ्यावी लागते. त्यामुळे पाच वर्षे होल्डींग कॅपिसिटी असणारा शेतकरीच हे पीक घेतो. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे गुहागर तालुक्यामध्ये श्री.तात्यासाहेब नातू यांनी प्रत्येक चुलीमागे पाच कलमांची झाडे, पाच काजूची आणि पाच कोकमच्या झाडांची लागवड करण्याचा अभिनव प्रयोग चालविला होता. त्यामुळे आपल्या आजोबा-पणजोबांनी केलेली आंब्याची लागवड 1995-96 पर्यंत होती. आता सरकारने रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मदत देण्यास सुरुवात केल्यानंतर आंबा पिकाचे उत्पन्न दुपटीने वाढलेले आहे. कोकणात जांभा दगड जास्त प्रमाणावर असल्यामुळे खड्डा खणण्यास अतिशय त्रासदायक होते.

सभापती महोदय, कोकणातील लोकांबाबत असे बोलले जाते की, कोकणातील माणसे मुंबईत काम करतात आणि आंब्यांच्या बागा स्वत: न करता त्या व्यापाऱ्यांना देतात. परंतु ही गोष्ट खरी नाही. आता रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मदत मिळत असल्यामुळे कोकणातील तरुण या पिकाचे मोठ्या प्रमाणावर उत्पन्न घेत आहे. एका गुंठ्यामध्ये चार कलमे याप्रमाणे एका हेक्टरमध्ये 40 कलमे लावली जातात. कृषि विद्यापीठाच्या मापदंडानुसार ही लागवड केली जाते. हापूस आंब्याच्या एका झाडाला सुरुवातीच्या पहिल्या वर्षामध्ये 3500 हजार रुपये इतका खर्च येतो. त्यामध्ये कंपाऊंड करणे, दोन मीटरचा खड्डा खणणे, ब्लास्टिंग करणे इत्यादी खर्चाचा त्यामध्ये समावेश असतो. दुसऱ्या वर्षी साधारणत: 450 ते 500 रुपये खर्च येतो. यामध्ये पाणी घालणे, खत, इरिगेशन इत्यादी खर्चांचा समावेश असतो. पहिली पाच वर्षे कलमांना नियमित पाणी द्यावे लागते. त्यानंतर पावसाच्या पाण्यावर त्याची वाढ होते. तीन वर्षात साधारणत: एका झाडाला 4500

श्री.विनोद तावडे........

रुपये खर्च येतो. एका एकरामागे 1 लाख 80 हजार रुपये खर्च येतो. झाडाची पूर्ण वाढ झ ााल्यानंतर मोहर येणे वगैरे नंतरच्या प्रक्रिया होतात. सुरुवातीच्या काही वर्षात लाकडी पेट्यातून आंबा आणला जात असे. आता कागदी बॉक्सेसमधून आणला जातो.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

एवढे नक्की आहे की, काही दलालांनी आंब्याच्या बागा घेतलेल्या आहेत, हे प्रमाण 40 टक्के असेल. 1997-98 मध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत मोठया प्रमाणात तरुण व स्थानिक शेतकरी याकडे वळले व ते स्वत: काम करीत असत. आंब्याचे उत्पादन मिळण्यास फार वेळ लागतो. द्राक्षाचे उत्पादन 1 वर्षामध्ये मिळते, डाळिंबाचे दुसऱ्यावर्षी मिळते. द्राक्षाचे व डाळिंब पिकांच्या बागायती हया लवकर उत्पन्न देणाऱ्या बागायती आहेत. त्या तुलनेत आंबा पिकाच्या बाबतीत वेटींग करावी लागते. एवढा मोठा पिरिअड थांबणे सामान्य शेतकऱ्यांस शक्य नसते. कुठेतरी एखादा कर्मचारी रिटायर झाल्यानंतर थोडयाशा साठवलेल्या पैशातून जमीन घेऊन आंब्याची लागवड करीत असतो. आंब्याच्या पिकातून 3-4 वर्षामध्ये 80 किलोंचे उत्पादन मिळते. अशाप्रकारे एकराला 3 हजार किलोंचे 160 आंब्यांच्या पेटयांचे उत्पन्न मिळते. हेक्टरी 400 पेटया व 8 हजार किलो आंब्याचे उत्पादन होते. यातील उत्पन्न वर्क आऊट केलेतर 1 लाख 60 हजार रुपये त्यातून मिळवता येऊ शकते. देवगड तालुक्याचे वर्किंग केले असता, 25 हजार कुटुंबामागे 18 हजार हेक्टर जमिनींवर 18 लाख हापूस आंब्याची कलमे या एकटया देवगड तालुक्यामध्ये आहेत. परंतु यावर्षी प्रतिकूल हवामानामुळे तीनवेळा औषधांची फवारणी त्याठिकाणी आंब्यावर करावी लागली. कारण हवामान बदलले की, तुडतुडयासारखे रोग आंबा पिकांवर पडतात. त्यामुळे यावर्षी जवळपास 30 हजार रुपयांचा तोटा प्रत्यक्षात शेतकऱ्यांना झालेला आहे. मी परवा उल्लेख केला की, कोकणामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मागील वर्षी आंब्याचे व काजूचे पीक आले नाही. परंतु यावर्षी आंब्याचे व काजूचे पीक चांगले येत होते व त्यातून आपण काहीतरी मिळवू शकू, याकडे शेतकरी आस लावून व डोळे लावून बसले होते. परंतु यावर्षी पुन्हा पाऊस लांबल्यामुळे व थंडी कमी झाल्यामुळे तसेच हवामानातील बदलामुळे शेतक-यांच्या आंबा पिकांचे फार मोठयाप्रमाणात नुकसान झाले. अशाप्रकारे निसर्गाच्या उलटया चक्रामुळे शेतकऱ्यांना काहीच मिळालेले नाही. माननीय सभापती महोदय, आपल्याला माहितीच आहे की, जितक्या लवकर आंब्याचे पीक येईल तितके जास्त उत्पन्न शेतकऱ्यांना मिळते. मार्च महिन्यांमध्ये आंब्याचे पीक आलेतर शेतकऱ्यांना चांगला फायदा होतो. परंतु मे महिन्यानंतर आंब्याचे पीक आलेतर

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

आंब्याचा रेट कमी होऊन शेतकऱ्यांचे फार मोठयाप्रमाणात नुकसान होते. त्यामुळे कॅनिंगवर भर जास्त येतो. परंतु यावर्षी आंब्यांच्या झाडांना उशिरा मोहर आला, याबाबतीत शेतकऱ्यांना अपेक्षा होती की, त्यांना यावर्षी तरी नक्कीच चांगल्या प्रमाणात उत्पन्न मिळेल, परंतु काल पुन्हा पाऊस झाल्यामुळे त्यांच्या उरल्यासुरल्या आशाही मावळल्या आहेत.

(नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

अवेळी पाऊस आल्यामुळे झाडावर जे फळ होते तेही खाली पडू लागले. या वर्षीच्या पिकावर शेतकऱ्यांचे बँकेचे दोन वर्षाचे कर्ज अवलंबून होते. सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने एक गोष्ट मला आवर्जून सांगावयाची आहे की, गेल्या काही वर्षापासून वातावरणात प्रतिकूल बदल झाला आहे त्यामुळे शेतकऱ्यांना किटकनाशकांची फवारणी करावी लागते. किटकनाशके जी जिल्हा परिषदेच्या मार्फत शेतकऱ्यांना दिली जातात ती शेतकऱ्यांना उशिरा मिळाली त्यामुळे त्यांना किटकनाशके बाजारामधून खरेदी करावी लागली. परंतु ही किटकनाशके परिणामकारक नव्हती.खरे म्हणजे या किटकनाशकांवर जितके संशोधन, अभ्यास कृषी विद्यापीठाकडून व्हावयास पाहिजे होते तितके संशोधन झाले नाही. कृषी विद्यापीठांनी या संदर्भात संशोधन करण्यास जितका भर देण्याची आवश्यकता आहे तितका भर या कृषी विद्यापीठाकडून दिला जात नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु यासाठी शासनाकडून जितका पैसा देण्याची आवश्यकता आहे तितका पैसा दिला जात नाही त्यामुळे ही किटकनाशके पुरेशी परिणामकारक ठरत नाही. त्यामुळे पिकाचे नुकसान होते व त्याचा फटका शेतकऱ्याला सहन करावा लागतो.

सभापती महोदय पूर्वी मुंबईमध्ये जितक्या आंब्याची मागणी होती तितक्या आंब्याचें उत्पादन आंबा उत्पादक शेतकऱ्यांकडून घेतले जात असे व उर्वरित आंब्याची निर्यात होत असे. 1997-98 साला नंतर मोठया प्रमाणात आंब्याची कोकणात लागवड करण्यात आली. त्याचा परिणाम असा झ ाला की, कोकणातील आंब्याचे उत्पादन वाढू लागले. यामुळे आंब्याचे मार्केट करण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारे आंब्याचे योग्य प्रकारे मार्केटींग करुन कोकणातील आंबा केवळ मुंबईपुरताच नव्हे तर देशाच्या राजधानी दिल्लीपर्यंत व बँगलोर, चेन्न्ईपर्यंत आपल्याला पोहचवता आला पाहिजे. आंब्याचे मार्केटींग करण्यासाठी अनेक संस्था पुणे, मुंबईमध्ये आंबा महोत्सव सुरु करीत असतात. कोकणातील आंबा केवळ 10 -15 मोठया शहरातच उपलब्ध न होता देशात सर्वत्र उपलब्ध व्हावा या करीता मार्केटींग इंन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्याची आवश्यकता आहे. असे इंन्फ्रास्ट्रक्चर तयार करताना सुरुवातीला शासनाकडून पुढाकार घेतला गेला तर त्यानंतर अनेक पब्लिक व प्रायव्हेट संस्था देखील यामध्ये सहभागी होतील.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

त्यामुळे असा पुढाकार प्रथम शासनाने घेणे आवश्यक आहे असे मला आग्रहाने येथे सांगावयाचे आहे. सभापती महोदय, दिवसेंदिपस रोजगाराच्या संधी कमी होत चालल्या आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त तरुण कृषी व हॉर्टीकल्चर विभागाकडे वळू लागले आहेत. आपण कृषी उत्पादनास चांगला भाव मिळवून दिला तर अनेक तरुणांना रोजगाराची चांगली संधी मिळू शकेल. जळगाव जिल्हयामध्ये केळीचे उत्पादन खूप मोठया प्रमाणात आले. केळीच्या पिकास भाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्याना ही केळी शेतातील मातीत पुरावी लागली. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या आंब्याला योग्य भाव मिळवून देण्यासाठी मार्केटीग इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्याचा प्रयत्न शासनाने करणे आवश्यक आहे. कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्याचे 2 -4 प्रश्न नेहमी असतात. शासनाकडून नुकसान भरपाई जाहीर केली जाते. परंतु नुकसानभरपाईच्या रकमा शेतकऱ्यांना मिळत नाही. स्वाभाविकपणे एखाद्या त्रयस्थ माणासाला याबाबत नवल वाटते. नुकसानभरपाई धेण्यासाठी शेतकरी पुढे का येत नाही याचे उत्तर शासनाने शोधणे आवश्यक आहे. सात बाराच्या उताऱ्यावर 30 ते 40 नावांची नोंद असते. शासनाच्या जी.आर. मध्ये असे म्हटले आहे की,शेतकऱ्यांनी हमीपत्र लिहून द्यावी व त्यानंतर रक्कम उचलावी. अधिकारी असे म्हणतात की, आज पैसे दिले आणि कोणी ऑब्जेक्शन घेतले तर आम्हाला स्वत:च्या खिशातून ही रक्कम भरावी लागेल. त्यामुळे शासनाने या संदर्भात शासनाने व्यावहारिक सोल्युशन काढावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...........

अनेक वेळा असे म्हटले जाते की, इन्व्हेस्टमेंट म्हणून बागा घेतल्या जातात व सर्वसाधारणपणे प्रत्यक्षात लागवड करणारा, बागा करणारा बाजूचा शेतकरी असतो. बाजूचाच शेतकरी आपल्या बागेबरोबरच शेजारची बाग कसण्यासाठी घेतो. मात्र या शेतक-याला नुकसान भरपाई मिळत नाही. हा थोडा क्लिष्ट विषय आहे पण त्यातून मार्ग काढावा लागेल. जो शेतकरी करारावर बागा करण्यासाठी घेतो तो बँकेकडून फवारणीसाठी, खतांसाठी कर्ज मिळवतो आणि नुकसान झाले तर मात्र नुकसान भरपाई मूळ मालकाला दिली जाते. खरे म्हणजे, या मालकाने तसा खर्च केलेला नसतो, खर्च केलेला असतो करारान्वये बाग करण्यासाठी घेतलेल्या शेतक-याने. सभापती महोदय, दूरदूरचे लोक असे म्हणतात की, आंबा लागवडीमध्ये तेथील राहणा-या माणसाला कष्ट नाहीत. परंतु झाडांसाठी पावसामध्ये खत करावे लागते, वणवा लागू नये म्हणून गवत काढावे लागते. द्राक्ष बागायतदारांना केवळ तीन महिने पिकाकडे प्रचंड बारकाव्याने बघावे लागते मात्र आंब्यासाठी राऊंड दि इयर जागरुकता दाखवावी लागते. म्हणून करारान्वये घेतलेल्या बागेसाठी बँकेकडून कर्ज काढून जो शेतकरी बाग वाढवतो त्या शेतक-याच्या पिकाचे नुकसान होते व नुकसान भरपाई देण्याची वेळ येते त्यावेळी 7/12 उता-यावर नाव असलेल्या मालकाचा विचार होतो. यामधून मार्ग काढण्यासाठी यामधील नियमांमध्ये सर्वसंबंधितांशी बोलून प्रावधान करावे लागेल. असे करारपत्र एखाद्या शेतक-याने सादर केले तर स्वाभाविकपणे नुकसान भरपाईतील वाटा त्याला देण्याचा विचार व्हावा, असे प्रावधान करावे लागेल. करारावर बाग घेऊन प्रामाणिकपणे कष्ट करणा-या शेतक-याचे ज्यावेळी नुकसान होते व ज्यावेळी अशी बाब निदर्शनास आणली जाते त्यावेळी कॉन्ट्रॅव्हर्सी निर्माण होऊ शकते पण त्यातून मार्ग काढावा लागेल व ज्येन्यूईन माणसाला कसा न्याय मिळेल याकडे बघावे लागेल. आंबा उत्पादक शेतक-याला डायरेक्ट मदत करतांना त्याच्या बागेमध्ये आंबा चांगला येईल, अधिक येईल याकडेही बघितले गेले पाहिजे. नेहमी आपण असे करतो की, नुकसान भरपाई सरसकट उचलून दिली जाते, बँकेतील कर्जाचे व्याज माफ केले जाते, कर्जाचे सुलभ हप्ते करुन दिले जातात,. अशा प्रकारे शेतक-याला प्रत्यक्ष नुकसान भरपाई देत असतांना आंबा लागवड अधिक चांगल्या पद्धतीने कशी येईल, पीक चांगले कसे होऊ शकते यासाठी एखादी योजना तयार करुन या योजनेला अधिक पैसे कसे देता येतील याचा विचार केला

..2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे............

तर नुकसान कमी होऊ शकते, अधिक उत्पादन मिळू शकते व नुकसान भरपाई जास्त द्यावी लागत नाही. या योजनेच्या माध्यमातून झाडांसाठी, खतांसाठी, रसायनांसाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत होण्यासाठी म्हणून अतिरिक्त निधी दिला पाहिजे, यातून त्याला अधिक संधी उपलब्ध करुन देता येईल.

सभापती महोदय, आंबा उत्पादक शेतक-यांना मदत देण्याच्या संदर्भात विचार करीत असतांना आंब्यावर अवलंबून असलेले वाहतूक व्यावसायिक, पॅकेजिंग करणारे व्यावसायिक, मजूर यांचाही विचार केला गेला पाहिजे. हे सर्व व्यावसायिक आंबा उत्पादनावरच अवलंबून असतात व आंब्याचे नुकसान झाले तर त्याचा परिणाम या व्यावसायिकांवरही होतो. या सर्व अवलंबून असणा-या घटकांवर परिणाम होत असतांना आंबा उत्पादक शेतक-यांना दिलासा मिळतो तसा त्यावर अवलंबून असलेल्या घटकांना दिलासा मिळत नाही. हे घटक छोटे आहेत, जसे पॅकेजिंग करणा-या मोठया कंपन्या आहेत, असे नाही, परंतु हे घटक पूर्णपणे आंबा उत्पादनावर अवलंबून आहेत आणि जर आंबा उत्पादन कमी आले तर त्यांच्यावर परिणाम होतो, त्यामुळे या सर्व घटकांचा विचार मदत करतांना झाला पाहिजे. म्हणून आम्ही विचारपूर्वक मागणी केली आहे की, हेक्टरी 50 हजार रुपयांची नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. हेक्टरी मदत देत असतांना व फळांचा विचार करीत असतांना ही मदत प्रती झाडामागे दिली तर अधिक योग्य होईल.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.......

कोकणातील शेतक-याच्या संघटीतपणे आंदोलन करणे किंवा आवाज उठविणे हे स्वभावातच नाही, येईल त्या परिस्थिमधून आपले नशीब असेच आहे, असे समजून त्यातून मार्ग काढण्याचा तो प्रयत्न करतो. सभापती महोदय, आपण सर्वजण जर संवेदनशील असलो आणि जर जनकल्याणाचे राज्य म्हणून राज्य चालविणारे लोकप्रतिनिधी असलो तर आपण या आंबा उत्पादक शेतक-याला आपण न्याय दिला पाहिजे, मला या चर्चेच्या निमित्ताने या शासनाला असे सांगावेसे वाटते की, कोकणातील आंबा उत्पादक शेतक-याला हेक्टरी नुकसान भरपाई मिळालीच पाहिजे. आमच्या कोकणातील शेतक-याला नेहमी असे वाटते की, कापसाला हमी भाव आहे, ऊसाला हमी भाव आहे, ऊस जास्त पिकला तर त्याला सबसिडी सरकार देते, इथे तर आम्ही उपाशी आहोत, आंबा उत्पादक शेतक-याचे नुकसान होऊन पीकच कमी आलेले आहे आम्हाला सबसिडी ही मिळालीच पाहिजे, कापसालाही मिळाली पाहिजे, त्याबद्दल आमचे दूमत नाही. कापसाला हमी भाव मिळतो, कापसाकरिता एकाधिकार खरेदी योजनाही आहे, कांद्याला नाफेड आहे, ऊसालाही संरक्षण आहे, माननीय पणन मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील साहेबांनी आताच कॅनिंगसाठी लागणारे भागभांडवल काजूला देऊ अशी घोषणा केली, मी यावर असे सांगू इच्छितो की, काजूपुरताच हा विचार का ? आंबा उत्पादक शेतक-यालाही ही सवलत मिळाली पाहजे किंबहूना कोकणातील सर्व फुड प्रोसेसिंग युनिट्सनाही कॅनिंगसाठी लागणारे भाग भांडवल सरकारने पुरविले पाहिजे. फक्त एकटया काजूपुरते सरकारचे धोरण मर्यादित न ठेवता सर्वार्थाने लागू केले पाहिजे. कोकणातील शेतक-याची अशी मागणी होती की, मुंबईप्रमाणे ए.पी.एम.सी.मार्केट हे रत्नागिरीमध्येही शासनाने उपलब्ध करुन दिले तर प्रत्यक्ष शेतक-याला त्याचा जास्त लाभ मिळू शकतो व शेतकरीच डायरेक्ट निगोशिएट करु शकतो व तसे करुन त्याला यातून अधिक लाभ मिळू शकतो. कोकण विकास प्रतिष्ठानतर्फे जो आंबा महोत्सव आम्ही दरवर्षी भरवतो, या महोत्सवामध्ये आपला आंबा विकणा-या एका राजापूरच्या काझी नावाच्या शेतक-याची मुलाखत प्रतिष्ठित वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती त्यामध्ये त्याने असे म्हटले होते की, बाजारपेठेतील विक्रीच्या तुलनेने या आंबा महोत्सावामध्ये आमच्या आंब्याला तिप्पट उत्पन्न तर मिळतेच व विक्रीही मोठया प्रमाणात घडून येते. या आंबा महोत्सवामध्ये फलोद्यान मंत्रालय,पणन मंत्रालयाचाही सहभाग असतो. अशा या आंबा महोत्सवामध्ये आपला आंबा विकणा-या शेतक-याचा हा तिप्पट

F 3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

नफा कमाविण्याचा अनुभव आहे. आंबा हे पीक आपल्या देशाला डॉलर मिळवून देणारे पीक आहे. या आंबा उत्पादक शेतक-याला आपण बाजारपेठ उपलब्ध करुन दिली पाहिजे, ही बाजारपेठ आपण आंबा उत्पादक शेतक-यांना मुंबईच्याच बाहेर नाही तर महाराष्ट्राच्याही बाहेर उपलब्ध करुन दिली पाहिजे, अशी मला या प्रस्तावाच्या निमित्ताने या सरकारने अशी आग्रहाची विनंती करावयाची आहे की, या देशाला डॉलर मिळवून देण्याची क्षमता ठेवणारा शेतकरी आज अडचणीत आहे, त्याच्या सर्व अडचणींचा विचार करुन या शासनाने जी नुकसान भरपाई दिली पाहिजे ती लवकरात लवकर आंबा उत्पादक शेतक-याला देण्यात यावी, अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.भास्कर जाधव )** : यानंतर या प्रस्तावावर कोण कोण बोलणार आहेत ?

डॉ.दीपक सावंत : मी, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर,ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.

**तालिका सभापती** : प्रत्येक सन्माननीय सदस्यांची वेळ ठरवून द्यावी लागेल. नाहीतर मग शेवटी सदस्यांना बोलण्यासाठी वेळ कमी मिळतो, असे होऊ नये, आता कोणते सन्माननीय सदस्य बोलणार आहेत? सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी आपण बोलावे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त ) : सभापती महोदय, कोकणाच्या विकासाच्या संदर्भात मागच्या आठवडयामध्ये या सभागृहामध्ये सहा तास चर्चा झाली आणि त्या चर्चेला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले. कोकणाच्या विकासाच्या चर्चेला माननीय सभापती महोदयांनी, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी पाठिंबा दिला होता. मागील कामकाज बघितले असता मला असे आढून आले की, कोकणाच्या विकासाच्या संदर्भात सभागृहामध्ये एवढी प्रदीर्घ चर्चा कधीही झालेली नाही. कोकणातील सर्वांगीण प्रश्नांवर मागच्या आठवडयात सभागृहामध्ये प्रदीर्घ अशी चर्चा झालेली आहे. मुंबईपासून कोकणातील सर्व वर्तमानपत्रांनी कोकण विकासाच्या संदर्भातील चर्चेला अत्यंत महत्व दिलेले आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.

सभागृहातील राज्याच्या इतर भागातील सन्माननीय सदस्यांनी आणि कोकणातील सन्माननीय सदस्यांनी पक्षभेद विसरुन कोकणातील सामान्यातील सामान्य माणसाची बाजू सभागृहामध्ये मांडण्याचे काम केलेले आहे. तसाच एक महत्वाचा प्रस्ताव आज सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे व अन्य सन्माननीय सदस्यांनी कोकणातील आंब्याला नुकसान भरपाई देण्यासंदर्भातील प्रस्ताव आज सभागृहामध्ये मांडलेला आहे. मी गोव्याला गेलो असल्यामुळे मागचे दोन-तीन दिवस सभागृहामध्ये उपस्थित नव्हतो. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी मला फोन करुन सांगितले की, कोकणातील आंब्याला नुकसान भरपाई देण्यासंदर्भात सभागृहामध्ये चर्चा होणार आहे, त्या चर्चेला आपण उपस्थित राहीले पाहिजे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. कोकणातील आंब्याला नुकसान भरपाई देण्याबाबतचा प्रस्ताव कोणी मांडला यापेक्षा विधानपरिषद नियम 97 अन्वये या प्रस्तावावर सभागृहामध्ये चर्चा होत आहे, याला मी जास्त महत्व देतो. माननीय फलोत्पादन मंत्री श्री.विनय कोरे सभागृहामध्ये उपस्थित आहेत.

सभापती महोदय, 31 मे पर्यंत राज्यातील अतिरिक्त ऊसाचे गाळप झाले नाही तर ऊस उत्पादक शेतक-याला हेक्टरी 25 हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचे शासनाने जाहीर केलेले आहे, याचा मला आनंद आहे. ऊस उत्पादक शेतक-यांचे नुकसान होता कामा नये, अशी भूमिका राज्य शासनाने घेतलेली आहे.

..2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी ........

सभापती महोदय, परवा टी.व्ही. चॅनेलवर अशी बातमी आली होती की, विदर्भ, नागपूर भागामध्ये यावर्षी संत्र्याचे अमाप पीक आलेले आहे. विदर्भातील संत्र्याचे पीक नष्ट झाले तर संत्रा उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त होतो. संत्रा पिकावर हवामानाचा दुष्परिणाम होत असतो. विदर्भामध्ये यावर्षी संत्र्याचे अमाप पीक आल्यामुळे संत्रा उत्पादक शेतक-याला या हंगामामध्ये दोन पैसे जास्त मिळतील, असे चित्र आपल्याला बघावयास मिळते.

सभापती महोदय, यावर्षी कोकणातील आंब्यांना चांगला मोहर आला होता. परंतु जो फळधारणा करणारा मोहर असतो तो गळून पडल्यामुळे फळधारणा झाली नाही. फुलामध्ये फक्त केसरच दिसू लागली. यावर्षी आंब्याचे चांगले पीक येईल अशी कोकणातील शेतक-यांना अपेक्षा होती. परंतु यावर्षी आंब्याचे पीक वाया गेलेले आहे.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी .....

सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, यावर्षी हापूस आंब्याला 25 टक्केसुध्दा मोहर राहिलेला नाही, यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले आहे, ही गोष्ट खरी आहे. कोकणच्या बाबतीत बघितले तर आंबा निश्चित उत्पन्न देणारे फळ आहे असे म्हटले जाते. कोकणातील कोणत्या भागात आंब्याचे जास्त पीक होते, कोणत्या भागात कमी होते किंवा होत नाही हे मी सांगू इच्छितो. सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडीमध्ये आंबा होत नाही, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत कणकवली भागातील आहेत, त्यांच्या सहयाद्रीच्या पट्टयात आंबा होत नाही, सिंधुदुर्ग जिल्हयात देवगडला आंबा होतो परंतु फणसवाडीपासून वरच्या भागात आंबा होत नाही, देवगडमध्येही खाडीलगतच्या भूप्रदेशात चांगला आंबा होतो, तसेच मालवणमध्येही आंबा होतो, म्हणजे समुद्राकाठ किंवा खाडीच्या किनाऱ्यावर मोठया प्रमाणावर आंब्याचे पीक येते. राजापूरच्या खाडीमध्येही आंब्याचे मोठया प्रमाणात उत्पन्न होते, तसेच जैतापूरलाही आंब्याचे मोठया प्रमाणावर उत्पन्न होते. मंडणगड, दापोली येथे आंबा होतो. परंतु चिपळूण व खेडला आंबा होत नाही. जेथे समुद्रकिनारा आहे तेथे मोठया प्रमाणावर आंबा होतो. याचा अर्थ तेथील हवामानावर आंब्याचे यश किंवा अपशय अवलंबून आहे.

सभापती महोदय, शासन शेतकऱ्यांना काय देते ? शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यानंतर शासनाने 1997-98 च्या कालावधीमध्ये 10 हजार रुपये हेक्टरी नुकसान भरपाई जाहीर केलेली होती, परंतु प्रत्यक्षात किती नुकसान भरपाई मिळाली आहे, हे त्यावेळी दिसून आले आहे. आंब्याला नुकसान भरपाई देण्याचे प्रमाण 2004 मध्ये किती होते याच्या खोलात मी जाणार नाही. तरीही मी सांगू इच्छितो की, 2004 मध्ये हे शासन सत्तेवर आल्यानंतर आंब्याची नुकसान भरपाई 1000 रुपये प्रतिहेक्टर भावानुसार जाहीर केली होती. परंतु कोकणातील शेतकऱ्यांच्या बाबतीत नुकसान भरपाई वाटपाच्या प्रत्यक्ष आकडेवारीचे चित्र आपण पाहिले तर त्यांची परिस्थिती आपल्याला लक्षात येईल. 100 टक्के नुकसान भरपाई वाटप झालेले आहे की नाही हे शासनाने तपासावे. शासनाने जाहीर केलेली नुकसान भरपाई मिळाली आहे की, नाही याबाबत फक्त सिंधुदुर्ग किंवा रत्नागिरी जिल्हयात पाहिले तर असे दिसून येईल की, प्रमाणिकपणे 100 टक्के वाटप शासनाच्या माध्यमातून झालेले

PNG/ KGS/ MHM/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी .....

नाही. ही वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही. शासनातर्फे देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईबाबत मला विचारले तर मी सांगेन की, सिंधुदुर्ग, देवगड व मालवण तेथील शेतकऱ्यांना 2004 ची सबसिडी व नुकसान भरभाई मिळाली नाही. याचे कारण शोधले तर असे लक्षात येईल की, कोकणात शेतकऱ्यांच्या 7/12 उताऱ्यावर 5-10 लोकांची नावे असतात. त्यातील काही लोक मुंबईला राहतात, त्यांच्या ना हरकत म्हणून सहया घेतल्याशिवाय कोकणातील शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळत नाही. नुकसान भरपाई मंजूर झाली तर कोकणातील खेडयात राहणाऱ्या लोकांना रक्कम मिळण्यासाठी यातून काही मार्ग शासन शासनाने काढला पाहिजे. माझी सूचना अशी आहे की, जे प्रत्यक्ष शेती करीत आहेत, त्यांच्याकडे जमिनीचे भोगवटादार म्हणून पाहिले पाहिजे. जर 7/12 उताऱ्यावर 7-8 लोकांची नावे असतील परंतु जो प्रत्यक्ष शेती करतो त्याला तुम्ही नुकसान भरपाई का देत नाही ? कारण 7-8 लोकांच्या सहया घेईपर्यंत त्याला फार कालावधी लागतो, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच 2004 मध्ये सबसिडी जाहीर झालेली असून ती मिळत नाही.

सभापती महोदय, माझी विनंती आहे की, राज्यातील ऊस उत्पादक किंवा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना शासन मदत करते तसेच निरनिराळया पिकाचे व फळाचे नुकसान झाले तर त्यावेळी शासनाच्या वतीने त्यांना नुकसान भरपाई देण्यात येते.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कुलकर्णी ....

म्हणून आंब्याला देखील आपण नाममात्र मदत देऊ नका. अन्यथा कोकणातील आंबा उत्पादकाला काही दिले पण राजा उदार झाला आणि हाती भोपळा आला असे होता कामा नये. तेव्हा आंबा उत्पादक शेतकऱ्यांना खरोखरी काही द्यायचे असेल तर आपण त्यासाठी प्रामाणिकपणे तरतूद करून भरघोस मदत द्यावी, भरपाई द्यावी अशी विनंती आहे. अन्यथा 500, 1000, 2000, 10 हजार रूपये हेक्टरी मदत देऊन काही तरी दिले आहे असे होता कामा नये. किमान 30-35 हजार रूपये हेक्टरी भरपाई देण्याची .... या ठिकाणी सर्वच सन्माननीय सदस्यांची मागणी आहे की, किमान 50 हजार रूपये हेक्टरी मदत शासनाकडून या आंबा उत्पादक शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे. सभापती महोदय, माझ्या मागणीमध्ये चूक झाली असेल, माझ्याकडून ती कमी मागितली गेली असेल तर मी सभागृहाची, सन्माननीय सदस्यांची माफी मागतो. परंतु कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना किमान 50 हजार रूपये हेक्टरी भरपाई शासनाने द्यावी आणि कोकणाकडे राज्य सरकारचे तेवढेच लक्ष आहे, जेवढे राज्यातील इतर भागांकडे आहे. राज्यातील विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र या भागामधील मुख्य पिके जेव्हा अडचणीमध्ये येतात त्यावेळी जी भूमिका राज्य सरकार घेते तशीच भूमिका कोकणाच्या बाबतीत देखील राज्य सरकार घेत आहे आणि हे राज्य एकच आहे असा संदेश कोकणातील लोकांपर्यंत जाण्यासाठी तरी राज्य शासनाने कोकणातील हा प्रश्नदेखील तेवढ्याच गांभीर्याने सोडविला असा चांगला मेसेज कोकणात जायला पाहिजे. म्हणून मी या प्रस्तावाचे समर्थन करतो आणि कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्याला हेक्टरी 50 हजार रूपये मदत वा भरपाई द्यावी अशी मागणी करून माझे भाषण संपवितो.

***

....... आय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई पदवीधर ) : सभापती महोदय, मुंबईतील प्रत्येक चाकरमान्याची नाळ कोकणाला जोडलेली असते आणि या सदनातील जवळपास 16-17 सदस्यांची नाळ देखील कोकणाला जोडली गेलेली आहे. सभापती महोदय, कोकणच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा या प्रदीर्घ चर्चा प्रथमत: सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी कोकणच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून येथे केली होती आणि आज सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी कोकणातील मुख्य पीक असलेल्या आंबा आणि आंबा उत्पादकांबाबत ही चर्चा उपस्थित केलेली आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, आंबा हा मुख्यत्वे करून सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड या जिल्ह्यातील प्रमुख फळ मानले जाते. फळांचा रजा असे या आंब्याला म्हटले जाते पण तो आंबा पिकविणारा शेतकरी मात्र आजवर नेहमीच भिकारी राहिलेला आहे. 'किंग मेकर' असूनही त्या शेतकऱ्याच्या पदरात काहीही पडलेले नाही. दरवर्षी 800 कोटी रूपये उत्पादन आंब्याच्या माध्यमातून होते. अवेळी पडणारा पाऊस, हवामान आणि अशाच अनेक गोष्टीं यामुळे आंब्याचे पीक या वर्षी केवळ 25 टक्के झालेले आहे. महाराष्ट्रातील एकंदर 1 लाख 65 हजार हेक्टरपैकी सुमारे 1.23 लाख हेक्टरवर आंब्याची लागवड रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात होते. सभापती महोदय, हा आंबा जरी तुमचा आमचा असला तरी तो मुंबईमध्ये विकताना मात्र उत्तर प्रदेशवाल्यांच्या हाती गेलेला आहे आणि तो उत्तर प्रदेशी भय्या 'यह देवगढ़ का फल है, यह रत्नागिरी का फल है' असे आपल्याला सांगत असतो. मात्र मराठी माणूस आंबा विकत नाही त्यामुळे देवगडचा आंबा कसा आहे याचे वर्णन आम्हाला उत्तर प्रदेशी भय्याकडून ऐकावे लागते आहे. सभापती महोदय, कोकणातील शेतकऱ्यावर नेहमीच अन्याय होत गेलेला आहे. ज्या ज्यावेळी या सभागृहामध्ये विविध विषयांवर, पिकांवर चर्चा झाल्या त्यावेळी प्रत्येकाला काही तरी संरक्षण आहे. उदा. कांद्याला नाफेडचे संरक्षण आहे. पण आंब्याला मात्र कोठलेही संरक्षण नाही. आता तर आंबा उत्पादकांच्या नाकाला कांदा लावण्याचीच वेळ आली आहे. आंबा हे अत्यंत नाजूक फळ आहे आणि त्याच्यावर हवामानाचा लगेचच परिणाम होत असतो. आंब्याच्या मोहरावर परिणाम होतो. आता कालच पाऊस पडला आहे आणि त्यामुळे त्याचा देखील या आंब्यावर अनिष्ट परिणाम होणार आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... जे 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

त्यामुळे सर्व पीक हातामधून निघून गेल्यामुळे शेतकऱ्याच्या हातामध्ये धुपाटणे आले आहे. आंबा पिक असे आहे की, त्यावर शेतकऱ्याचे उद्याचे सर्व ठोकताळे अवलंबून असतात. त्यामध्ये मुलीचे लग्न करावयाचे असेल, पुढील वर्षाकरिता पिकाची मशागत करावयाची असेल, वर्षभरामध्ये येणाऱ्या सणांकरिता खर्च करावयाचा असेल या सर्व गोष्टी आंब्याच्या पिकावर अवलंबून असतात. आपण जर गेल्या चार-पाच वर्षाचा आढावा घेतला तर गेल्या लागोपाठ तीन वर्षामध्ये शेतकऱ्याच्या आंब्याच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. हीच परिस्थिती रायगड जिल्हयामध्ये देखील आहे. रायगड जिल्हयामध्ये आंब्याच्या झाडावर केवळ 30 टक्के मोहर आला. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर आंब्याच्या बागा आहेत. मघाशी माननीय सदस्य श्री. विनोद तावडे असे म्हणाले की, काही लोक आपल्या आंब्याच्या बागा लोकांना करावयास देतात. त्यामुळे त्यामध्ये बागायतदार शेतकऱ्याचे नुकसान होते त्याचबरोबर ती बाग कसणाऱ्या शेतकऱ्याचेही नुकसान होते. म्हणून या नुकसानीमध्ये दोघांनाही केंद्रबिंदू मानले गेले पाहिजे. 60 टक्के नुकसान हे शेतकऱ्याच्या पिकाचे होते तर 40 टक्के नुकसान ज्याने गुंतवणूक त्या बागेमध्ये केली आहे त्याचे होते. त्याला पुढील वर्षी येणारे पीक साहजिकच कमी मिळते. मघाशी माननीय सदस्य श्री. विनोद तावडे म्हणाल्याप्रमाणे सतत पाच वर्षे या कलमांची मशागत करावी लागते. आंब्याच्या झाडाची लागवड करण्यापूर्वी खड्डे खणण्यापासून त्याला पाणी देईपर्यंत खर्च करावा लागतो. त्याचप्रमाणे प्रत्येक झाडामध्ये खत टाकावे लागते. टाकले जाणारे खत सुध्दा चांगल्या दर्जाचे आहे की नाही हे पहावे लागते. त्याचप्रमाणे त्या बागेमध्ये काम करणाऱ्या मजुरांना 100 ते 200 रुपये मजूरी प्रत्येक झाडामागे द्यावी लागते. एवढे सर्व केल्यानंतर एका झाडामागे चार ते पाच पेटया इतका माल निघतो. मध्यम आकाराचे आंब्याचे कलम असेल तर त्याला 800 ते 1000 रुपये खर्च येतो. त्या झाडावरील 4 ते 5 पेटया इतका आंबा उतरविल्यानंतर साधारणपणे त्यामधून शेतकऱ्याला 1200 रुपये मिळतात. म्हणजे निव्वळ 400 ते 500 रुपये प्रत्येक झाडामागे त्याला मिळतात. नियमाप्रमाणे एका हेक्टरमध्ये 40 आंब्याची कलमे असतात. तेथील व्यवस्थापकीय खर्च 28 ते 30 हजार रुपये करावा लागतो. त्या उलट त्याच्या पदरामध्ये 48 ते 50 हजार रुपये पडतात. म्हणजे प्रत्येक हेक्टरमागे निव्वळ 12 हजार रुपये त्याला मिळतात. तसेच, या आंबा पिकाची निश्चिती नसते. व्यवस्थितपणे पीक आले तर त्याला हेक्टरी 12 हजार रुपये मिळून त्यामध्ये तो काय करणार?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ KGS/

डॉ. दीपक सावंत...

एखाद्याचे 1 हेक्टरमध्ये पीक असेल तर त्याला 12 हजार रुपये वर्षाला मिळणार. त्यामध्ये आंब्याच्या पेटयांचा पॅकींग खर्च करावा लागतो, वहातुकीचा खर्च करावा लागतो, झाडावरील आंबा उतरविण्याची मजूरी द्यावी लागते.देवगड तालुक्याचा विचार केला तर 40 हजार टन आंबा मार्केटमध्ये येतो. बाकीचे सर्व विषय चर्चिले गेले असल्यामुळे त्या विषयांमध्ये मी जाणार नाही. याठिकाणी आंबा पिकाची हेक्टरी 50 हजार रुपये नुकसान भरपाईची मागणी केली आहे ती रास्त आहे. आज आंब्याला इंटरनॅशनल मार्केटमध्ये म्हणजेच अमेरिका, जपान इत्यादी देशांमध्ये प्रचंड मागणी आहे. अरब कंट्रीमध्ये आंब्याची निर्यात थेट होते, त्याकरिता आंब्यावर प्रक्रिया केली जात नाही. परंतु युरोपियन कंट्रीमध्ये आंबा पाठवावयाचा असेल तर त्याकरिता युरो गॅप हे प्रमाणपत्र मिळवावे लागते. हे प्रमाणपत्र मिळविण्याकरिता आंब्याला विविध प्रकारच्या 49 चाचण्यांमधून जावे लागते. त्याकरिता आपल्याला विविध निकषांचे पालन करावे लागते. त्या आंब्याच्या झाडाला कोणत्या प्रकारचे खत वापरले आहे, किटकनाशके कोणती वापरली आहेत, त्या खताचे रुण कसे असावे, आंब्याचे स्टोअरेज कसे असावे, आंबा बागायतीमध्ये मजुरांकरिता स्वच्छतागृहे असली पाहिजेत, त्या आंब्याच्या झाडाचा संपूर्ण इतिहास लिहून द्यावा लागतो. त्यानंतर युरो गॅप हे प्रमाणपत्र मिळते. त्यानंतर एक कोड नंबर दिला जातो तो प्रत्येक पेटीवर लावावा लागतो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरू...

हापूस आंब्याचा उगम ज्या देवगड येथे झालेला आहे, त्या ठिकाणच्या 30 शेतकऱ्यांना हापूस आंबा युरोपयन देशामध्ये निर्यात करण्याचे प्रमाणपत्र मिळालेले आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांना अशाप्रकारचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी शासन काय करणार आहे ? हा खरा प्रश्न आहे. आज त्या ठिकाणच्या आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिकदृष्टया सक्षम करणे महत्वाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकणी यांनी सांगितल्याप्रमाणे आज 50 हजार रुपयाची मदत मिळवायची असेल तर सातबाराच्या उताऱ्यावर जेवढ्या लोकांची नावे आहेत त्यांची एनओसी मिळवावी लागते. असे जरी असले तरी तो शेतकरी कायमचा सक्षम कसा होईल, हे पाहिले पाहिजे. जो पर्यन्त शेतकऱ्याचा आंबा निर्यातदारामार्फत निर्यात होत नाही तो पर्यन्त तो सक्षम होणार नाही.

दुसरी गोष्ट अशी की, वाशी येथे व्हेपर सिस्टीम यंत्र आहे. त्या ठिकाणी माल पाठवायचा असेल तर दलालामार्फत पाठवावा लागतो. माझ्या माहितीप्रमाणे वाशी येथील व्हेपर सिस्टीम यंत्र मध्यंतरी बंद होते ते चालू झाले असेल. त्याबाबत मंत्री महोदय आपल्या उत्तामध्ये सांगतील. अफेडा मार्फत हे व्हेपर सिस्टीम यंत्र बसविलेले आहे. हे यंत्र वाशीमध्ये असण्यापेक्षा देवगड या ठिकाणी असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सिंगल विंडो सिस्टीम सुरू केली पाहिजे. हा डिपेडीग बिझनेस आहे. यामध्ये मधले जे दलाल असतात ते फायदा घेऊन जातात.

सभापती महोदय,दापोली येथे कृषी विद्यापीठ आहे त्या ठिकाणी आंब्यावर रोग आला तर काय करावे या संदर्भात मोठयाप्रमाणात संशोधन झालेले नाही. संशोधनासाठी आंबा वेंगुर्ल्याला पाठवावा लागतो. वेंगुर्ला येथे एका लहानशा खोलीमध्ये संशोधन केले जाते. आंब्यावर कोणती प्रक्रिया केल्यावर चांगले पीक येईल याबाबतचे संशोधन करण्यासाठी दापोली कृषी विद्यापीठाला सूचना द्याव्यात. कोणत्या प्रकारच्या आंब्यावर रोग येतो, अवेळी पाऊस असेल, किंवा दव पडणे ,अतिशय उष्णतेने मोहर जळणे, असे रोग येतात.यामध्ये पराग कण गळणे, हे कसे सक्षम होईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे किटकांची प्रतिकार शक्ती वाढलेली आहे त्यांच्यावर औषधाचा परिणाम होत नाही. त्यावर नवीननवीन संशोधन करून औषधे तयार करणे आवश्यक आहे. म्हणून आपल्यामार्फत विनंती आहे की, एक सेंटर निर्माण केले पाहिजे. ते सेंटर अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. लोकजागृती करणे आवश्यक आहे. आणखी एक मागणी आहे की, त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरू....

ठिकाणी मुले आहेत त्यांच्यासाठी आंब्यावर किंवा काजूवर फळप्रक्रिया करण्याचे कोणतेही फूड टेक्नॉलॉजिचे कोर्सेस उपलब्ध नाहीत. त्यासाठी त्यांना लोणेरे येथे जावे लागते. त्या ठिकाणीही फूड टेक्नॉलिजिचा एकही कोर्स उपलब्ध नाही. कॅनिंग इंडस्ट्रीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. जर फळ खराब झाले तर ते कॅनिंगला पाठवून त्या शेतकऱ्यांना वेगळयाप्रकारे फायदा उपलब्ध करून देता येईल. तिसरी गोष्ट अशी की, आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या एका पेक्षा जास्त बागा असतात. त्या शेतकऱ्याच्या एका बागेकरिताच मदत दिली जाते, बाकीच्या त्याच्या बागांना मदत दिली जात नाही. युतीच्या काळामध्ये आंबा उत्पादक शेतकऱ्यांना 10 हजार रुपयाची मदत दिलेली आहे. पण त्याच शेतकऱ्याच्या अनेक बागा असल्या तर त्या बागांनाही मदत देणे आश्यक आहे. त्यानंतर आणखी दोन मागण्या आपल्या समोर ठेवून माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, आता आंबा उत्पादन क्षेत्रामध्ये हिरानंदानी, ‍ऐअरटेल, रिलायन्स हे तीन मोठे प्लेअर्स येत आहेत.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना माहीत असेल की, माझ्या गावाच्या बाजूला तुळसुळे या ठिकाणी हिरानंदानी यांनी आंबा उत्पादनासाठी 3 हजार एकर जमीन घेतलेली आहे. त्या ठिकाणी ते मोठ्या प्रमाणावर आंब्याची लागवड करणार आहेत. त्या ठिकाणी हिरानंदानी, रिलायंस तसेच एअर टेल येत आहेत. माझी माहिती चुकीची असेल तर माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. जर तेथील आंबा उत्पादक शेतकरी या लोकांच्या हातातील खेळणे बनून राहणार असतील तर त्यांची परिस्थिती याहीपेक्षा बिकट होणार आहे. कोकणामध्ये प्रचंड गरिबी आहे. हे मोठमोठे प्लेयर्स त्या ठिकाणी येऊन त्यांना आपला आंबा बंगलोरला पाठवावयाचा आहे. त्यांना मोठमोठ्या मॉल्समध्ये आंबा ठेवावयाचा आहे. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकरी बरबाद होणार आहेत. यासंदर्भात राज्य शासनाने पावले उचलली पाहिजेत. त्या ठिकाणी अशा प्रकारे जे लोक तीन - चार हजार एकर जमीन घेतात त्यावर कायद्याने बंधन घालणे आवश्यक आहे. कसेल त्याची जमीन हे सूत्र धरले तर अशा प्रकारे धनाड्य लोक त्या ठिकाणी येऊन, जशी त्यांनी मुंबईमध्ये मॉल संस्कृती आणली तशी मॉल संस्कृती कोकणात आणून तेथील शेतकऱ्यांना बरबाद करणार असतील तर कोकणातील सर्व आमदारांनी एकत्र येऊन त्याचा विरोध करणे आवश्यक आहे. कोकणासाठी शासनाने आंबा दुष्काळ जाहीर करावा. हेक्टरी 50 हजार रुपये द्यावेत तसेच 2006-07 मध्ये शेतकऱ्यांनी बँकेकडून जे कर्ज घेतले असेल त्या कर्जाला स्थगिती द्यावी आणि शक्य असेल तर व्याज माफ करुन कर्ज माफी देखील व्हावी अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या ठिकाणी आतापर्यंत कोकणातील विषयांवर दोन वेळा चर्चा झालेली आहे. आज सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नियम 97 अन्वये कोकणातील आंबा पिकाच्या बाबतीत महत्वाची चर्चा उपस्थित केलेली आहे. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. त्याचबरोबर माननीय फलोद्यान मंत्री आणि माननीय पणन मंत्री खासकरुन या चर्चेला उपस्थित आहेत त्याबद्दल मी त्यांनाही धन्यवाद देतो. ते उपस्थित आहेत हे आमच्या कोकणाचे भाग्य आहे. सध्या कोकणातील आंबा पिकाची परिस्थिती अतिशय बिकट झालेली आहे. शेतकरी हवालदिल झालेले आहेत. गेल्या 47 वर्षात फक्त दोन वेळा आंब्याला नुकसानभरपाई मिळालेली आहे. सन 1998-99 मध्ये नुकसान भरपाई मिळाली. त्यानंतर 2004 मध्ये जी नुकसान भरपाई मिळाली त्याचे पैसे 2007 मध्ये अजूनही मिळतच आहे. आता मार्चमध्ये शेवटच्या चौथ्या टप्प्याचे पैसे आले. मार्च महिन्यामध्ये आलेली रक्कम सुध्दा पुरेशी नाही. ही सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आकडेवारी आहे. रत्नागिरी आणि रायगड मधील आकडेवारी लक्षात घेतली तर अजूनही 7 कोटी रुपयांच्या जवळपास रक्कम शासनाकडून मिळावयाची बाकी आहे. एखादी नुकसान भरपाई देण्याचे मान्य केल्यानंतर ती नुकसान भरपाई जर आपण शेतकऱ्यांना तीन चार वर्षे देत असू तर त्याचा उपयोग काय ? जर शासनाने नुकसान भरपाई देण्याचे ठरविले तर ती नुकसान भरपाई कशी देणार याचे धोरण शासनाने निश्चित करावयास पाहिजे.

सभापती महोदय, आंब्याच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे. फेब्रुवारी, 2006 मध्ये कोकणातून आंब्याचे 232 ट्रक मुंबईत आले होते. फेब्रुवारी, 2007 मध्ये आंब्याचे 157 ट्रक मुंबईत आले. मार्च, 2006 मध्ये आंब्याचे 3084 ट्रक मुंबईत आले होते तर मार्च, 2007 मध्ये आंब्याचे 1748 ट्रक आलेले आहेत. तेथील जे प्रगतिशील शेतकरी आहेत त्यांच्या म्हणण्यानुसार सन 2006-07 ची परिस्थिती पाहिली तर सरासरी 40 ते 50 टक्के पर्यंत आंब्याचे उत्पादन निघेल असा अंदाज आहे. नैसगिक आपत्तीमध्ये सापडलेल्या राज्यातील विविध पिकांसाठी मग द्राक्षे असतील, कांदा असेल, संत्री असेल, कापूस असेल, ऊस असेल या सगळ्या पिकांच्या बाबतीत सातत्याने शासन चांगला विचार करते.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 11:00

(श्री. राजन तेली...)

कोकणातील आंबा उत्पादक शेतक-याला नुकसान भरपाई मिळावी ही कोकणातील सर्व आमदारांची प्रामाणिक इच्छा आहे. परंतु आता पर्यन्त पाहिले तर या कोकणातील शेतक-याला नुकसान भरपाई देण्याच्या बाबतीत सातत्याने सापत्नभावाची वागणूक मिळालेली आहे. सभापती महोदय, मागील 47 वर्षामध्ये कोकणातील आंबा उत्पादक शेतक-याला केवळ दोन वेळा नुकसान भरपाई मिळालेली आहे. मग राज्यातील इतर भागातील पिकांसाठी शेतक-यांना दिलेल्या नुकसान भरपाईचा विचार केला तर ही तफावत किती मोठी आहे हे आपल्याला दिसून येते. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे आणि सन्मानीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे राज्यामध्ये ऊसाचे उत्पादन जास्त झाल्यामुळे शेतक-यांना हेक्टरी 25 हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. मग या पध्दतीने कोकणातील आंबा, काजू, कोकम आणि अन्य विविध फळफळावळ यांच्या बाबतीत शासन का विचार करीत नाही ? शासन केवळ घोषणा करीत असते. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये 18 डिसेंबर 1996 रोजी शेतमालाचे उत्पादन, साठवणूक, प्रक्रिया उद्योग, पणन या विषयाच्या संदर्भातील प्रस्तावावर माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, राज्यातील महत्वाच्या पिकांकरिता त्या त्या भागामध्ये कृषी पार्क उभारण्यात येणार आहेत जेणे करुन ते भाग हे विकासाची केन्द्र बनून राहतील. या महत्वाच्या पिकांमध्ये आंबा पिकाचाही समावेश असून आंबा पिकाच्या दृष्टीने एक सर्वांगीण विकास योजना तयार करण्यात येणार आहे असेही माननीय मंत्री महोदयांनी 18 डिसेंबर 1996 रोजीच्या प्रस्तावाला उत्तर देताना सांगितले होते. परंतु अद्यापपर्यन्त अशा प्रकारचा पार्क माझ्या पाहाण्यात आणि ऐकण्यातही आलेला नाही. 1997मध्ये कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला. त्यासंदर्भात शासनाने जी.आर. देखील काढला. परंतु त्या जी.आर.मध्ये ज्या ज्या गोष्टींचा अंतर्भाव केलेला आहे त्या त्या गोष्टी शासनाने अद्यापपर्यन्त केलेल्या नाहीत. पयायाभूत सुविधांसाठी दरवर्षीच्या बजेटमध्ये तरतूद उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले असतानाही तशी तरतूद होताना दिसत नाही. 18 डिसेंबर 1996 रोजी जेव्हा विधिमंडळामध्ये आंब्याच्या प्रश्नावर चर्चा झाली त्यावेळी आंब्यासाठी कृषी पार्क उभे करणार आहोत, आंब्यासाठी वेगळे नियोजन करणार आहोत, अशी मंत्री महोदयांनी घोषणा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजन तेली...)

केली होती. परंतु त्यादृष्टीने शासनाने कोणतीच पावले उचललेली दिसत नाहीत. कोकणामध्ये दरवर्षी आंब्यापोटी जवळपास 800 कोटी रुपयांची उलाढाल होते. कोकणामध्ये आंबा, काजू, कोकम, जांभूळ ही महत्वाची पिके आहेत. राज्याच्या तिजोरीमध्ये भर घालणारी आणि शेतक-यांची आर्थिक उन्नती करणारी ही पिके आहेत. सभापती महोदय, कोकणात विविध फलोत्पादनाच्या संदर्भात आज पर्यन्त कृषी विद्यापीठांनी कोणतेही संशोधन केल्याचे दिसत नाही. दापोली कृषी विद्यापीठामध्ये शेतक-यांना न्यायचे आणि वर्तमानपत्रातून काही तरी छापून आणायचे एवढेच कृषी विद्यापीठाने काम केलेले आहे. आज आंब्याची साठवणूक करण्याच्या दृष्टीने कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी कोणतेही संशोधन केलेले नाही. परिणाम असा झालेला आहे की, जागतिक बाजारपेठेमध्ये आंब्याची पत कमी कमी होत आहे. आंब्याची एक पेटी उघडली तर त्यातील 15-20 आंबे खराब निघतात. बंगलोर मधील शास्त्रज्ञ राजा रामण्णा यांनी याबाबतीत काही संशोधन केले होते. परंतु त्याचे पुढे काय झाले हे समजले नाही. कोकणामध्ये एकूण दीड लाख टन आंब्याचे उत्पादन होते. त्यापैकी एकट्या सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 60 हजार टन आंब्याचे उत्पादन होते. या आंबा पिकावर प्रक्रिया करणारे उद्योग शासन कोकणामध्ये सुरु करणार आहे की नाही ? या पिकाचे शासन काही नियोजन करणार आहे की नाही ? बाजूच्या केरळ राज्यामध्ये केन्द्र शासनाच्या मदतीने नारळाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. केरळ सरकार हे नारळ उत्पादक शेतक-यांकडून नारळ विकत घेते आणि एक ऑईल फॅक्टरी चालविते. त्या फक्टरीमध्ये 5 हजार लोक काम करीत आहे. त्या फक्टरीला मी स्वत: भेट देखील दिलेली आहे. नारळाच्या झाडाला कल्पवृक्ष म्हणतात त्याप्रमाणे नारळाच्या प्रत्येक भागाचा उपयोग तेथे केला जातो. साधा काथ्या हा देखील दीड रुपये किलो प्रमाणे विकला जातो. केरळमध्ये केन्द्र शासनाच्या माध्यमातून 100 कोटी रुपये खर्च करुन एक चांगल्या प्रकारचे संशोधन केन्द्र उभारण्यात आलेले आहे. केरळ सारखे छोटे राज्य ह्या गोष्टी करु शकते तर मग प्रगतिशील असणा-या या महाराष्ट्रामध्ये प्रक्रिया उद्योग, संशोधन केन्द्रे काढण्याचा विचार हे शासन कधी करणार आहे की नाही ?

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ 11:05

श्री.राजन तेली.........

100 कोटी रुपये केरळसारखे राज्य संशोधनासाठी उभे करु शकते, शेतकऱ्यांना वेगवेगळया मार्गाने दिलासा देऊ शकते, कोणती लागवड केली पाहिजे, कशा प्रकारची शेती केली पाहिजे, कशा प्रकारचे मार्गदर्शन मिळाले पाहिजे हा विचार केरळ राज्यामध्ये होतो, मग महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यामध्ये तो का होऊ शकत नाही? आज केरळ राज्यामध्ये नारळावर प्रक्रिया करणारे कारखाने काढले आहेत. नारळपासून बायप्रॉडक्ट तयार केले जात आहेत.

सभापती महोदय, मी उदाहरण म्हणून सांगू इच्छितो. सन्माननीय महसूल मंत्री यांच्या सहकार्याने आमच्या पक्ष कार्यकर्त्यांना घेऊन आम्ही केरळ राज्यातील विविध फळप्रक्रिया उद्योगांना भेटी दिल्या. शेवटच्या दिवशी कोची येथे वनौषधी प्रकल्पाला भेट दिली. त्यांनी आम्हाला अशी माहिती दिली की, आमच्या उद्योगाची वार्षिक उलाढाल 62 कोटी रुपयांची आहे. त्यांनी पुढे अशीही माहिती दिली की, आमच्या कारखान्यात तयार होणारी औषधे युरोपमध्ये पाठविली जातात. याठिकाणी कोणत्याही प्रकारची विक्री केली जात नाही. या उद्योगासाठी लागणारा कच्चा माल सिंधुदुर्ग जिल्हयातून आणला जातो. कोकम हे सिंधुदुर्ग जिल्हयातून मिळविले जाते. हळद सांगली व सातारा जिल्हयातून आणली जाते. परंतु या उद्योगाची वार्षिक उलाढाल 62 कोटी रुपयांची आहे. त्यांचा दुसरा कारखाना तामीळनाडू राज्यात आहे. कोकमाचे उत्पादन मोठया प्रमाणात सिंधुदुर्ग जिल्हयात होते आणि त्यावर प्रक्रिया करणारा कारखाना मात्र केरळ राज्यात आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात काजू उत्पादन मोठया प्रमाणात असताना काजूवर प्रक्रिया करणारे उद्योग मात्र गोवा व केरळ राज्यात आहेत. शासनाने महामँगोला परवानगी दिली. परंतु महामँगोचे दिवाळे निघाले आहे. इतका गलथान कारभार त्यांच्याकडून केला जातो की, आंब्यावर प्रक्रिया करण्यासाठी आंबा फळ गुजराथमध्ये पाठविले जाते. याचा शासन कधी विचार करणार आहे की नाही? शासनाने अशा ज्या काही एजन्सी आहेत त्यांच्या कारभारावर नियंत्रण ठेवले पाहिजे अशी मी या निमित्ताने विनंती करतो. सर्वसामान्य शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळाली पाहिजे.

सभापती महोदय, एका हेक्टरमध्ये आंब्याची 100 कलमे लावली जातात. त्यासाठी मोठया प्रमाणात फवारणीचा, मजुरीचा व कल्टारचा खर्च करावा लागतो. कल्टार वापरल्यामुळे दुष्परिणाम होतात व आंबा पिकाला योग्य तो भाव मिळत नाही. कृषि विद्यापीठाचे म्हणणे आहे की, कल्टारचा वापर करावा. कल्टार वापरण्यासाठी हेक्टरी 960 रुपये खर्च येतो. 100 कलमांची लागवड केली

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.........

तरी 50 टक्के कलमांना फळधारणा होत नाही. एक वर्ष आड करुन 50 टक्के झाडांना फळधारणा होते. आज जिल्हा पातळीवर व जिल्हा परिषद पातळीवर वेगवेगळया एजन्सीमध्ये कृषि अधिकारी कार्यरत आहेत. त्या सर्वांना एकत्रित करुन यंत्रणा उभारली पाहिजे. आज या अधिकाऱ्यांकडे कोणतेही काम नाही. त्यांच्या वेतनावर किती खर्च होतो याचा विचार या प्रश्नाच्या निमित्ताने झाला पाहिजे.

सभापती महोदय, जिल्हा परिषदेमध्ये काम करीत असताना आमच्या असे लक्षात आले होते की, लघुपाटबंधारे अंतर्गत भूमिगत बंधारे वेगळे, कृषि विभागाचे भूमिगत बंधारे वेगळे असतात. हे सर्व विभाग एकत्रित करुन अधिकाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण देऊन योजना राबविली गेली पाहिजे. या योजनांसाठी केंद्र व राज्य पातळीवर जो निधी उपलब्ध होतो त्याचा योग्य प्रकारे विनियोग झ ाला तर येत्या 5 वर्षात सिंधुदुर्ग जिल्हयातील कोणत्याही शेतकऱ्यांचा प्रश्न उरणार नाही. परंतु आज जो निधी उपलब्ध होतो तो सर्व पैसा वाया जात आहे. ज्याप्रमाणे केरळ राज्यात नारळावर प्रक्रिया केली जाते, 13 ते 14 रुपये किंमतीने नारळ विकत घेतला जातो, तशा प्रकारची योजना काजू आणि आंब्याच्या पिकाबाबत राबविण्याचा निर्णय घेतला जावा. सिंधुदुर्ग जिल्हयात मोठया प्रमाणात पडीक जमीन आहे. सन्माननीय केंद्रीय कृषि मंत्री श्री.शरद पवार यांनी फलोद्यान योजना अंमलात आणली. तशा प्रकारचे धोरण राज्य शासनाने राबवावे. सिंधुदुर्ग जिल्हयातील पडिक जमिनीवर प्लॅन्टेशन केले तर मला खात्री आहे, कोकणातील शेतकऱ्यांना चांगल्याप्रकारे आर्थिक पाठबळ लाभेल. आज हवामानातील बदलामुळे आंबा पिकाच्या उत्पादनात घट झाली आहे. सभागृहामध्ये कोकणातील अनेक सन्माननीय सदस्य आहेत, विशेषकरुन मंत्रीमहोदय देखील कोकणातील आहेत, सभापती महोदय, आपण देखील कोकणातील आहात. आपण सगळयांनी एकत्र येऊन शासनाला या प्रश्नावर जागे करण्याची वेळ आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुळकर्णी यांनी सांगितले की, गेल्या वेळी 10 हजार रुपये हेक्टरी मदत दिली होती. खरे म्हणजे ही कोकणातील शेतकऱ्यांची चेष्टा आहे. मागील वेळी एकूण रु. 6, 57, 84, 000/- जी आर्थिक मदत जाहीर केली तिचे अद्यापही वाटप पूर्ण झालेले नाही.

(नंतर श्री.जुन्नरे....

अप्रकाशित प्रत / ग्राह्य धरता नाही

श्री. राजन तेली ....

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितले आहे की, कोकणातील शेतकरी आपल्या शेतात घाम गाळतो परंतु त्याला काही सुध्दा आर्थिक फायदा होत नाही. अजून सुध्दा आंब्याच्या संदर्भातील 6.5 कोटी रुपये तसेच पडून आहेत. अतिवृष्टीमुळे कोकणातील आंबा उत्पादक शेतक-याचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. सभापती महोदय, आता आंबोली येथे सुध्दा मोठया प्रमाणात ऊसाची लागवड केली जात आहे. मागील वर्षी कोल्हापूर आणि इतर ठिकाणी जे ऊस उत्पादक शेतकरी आहेत त्यांना शासनाकडून नुकसान भरपाई मिळाली परंतु आंबोली येथील ऊस उत्पादक शेतक-यांना अद्यापपावेतो काहीही नुकसान भरपाई मिळालेली नाही त्यामुळे आंबाली येथील ऊस उत्पादक शेतक-यांना शासनाने त्वरित नुकसान भरपाई द्यावी ही विनंती. शेतक-यांच्या संदर्भात काही अधिका-यांचे निगेटीव्ह धोरण असल्यामुळे शेतक-याना फायदा होत नाही, नुकसान भरपाई मिळत नाही.

सभापती महोदय, ज्या शेतक-यांच्या पिकाचे नुकसान झालेले असते त्याचे पंचनामे कृषी विभागाने करावयाचे की, महसूल विभागाने करावयाचे यामध्ये वाद होतो व त्यामध्ये शेतक-यांचा बळी जातो, शेतक-यांचेच नुकसान होत असते. त्यामुळे पंचनामे कोणी करावयाचे यासंदर्भात शासनाने डायरेक्शन देण्याची आवश्यकता आहे. आज कोकणातील शेतक-यांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे जे मॉडेल तयार झालेले आहे त्याला शासनाने त्वरित मंजुरी देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, हे शासन दलाल धार्जिणे आहे की, काय अशी शंका येत आहे. अजूनही व्यापारी हातावर रुमाल टाकून शेतक-यांचा मालाची लूट करीत आहेत. रुमाल पध्दतीमुळे शेतक-यांची फार मोठया प्रमाणात लूट होत आहे. रुमाल टाकून जो व्यवहार होत आहे तो बंद होण्याची आवश्यकता आहे. कोल्ड स्टोरेज आणि पॅक हाऊस कुडाळ आणि जामसंडे येथे आहे. कोल्ड स्टोरेज आणि पॅक हाऊस कोकणातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी होण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी कोल्ड स्टोरेज आणि पॅक हाऊस निर्माण झाले तरच शेतक-यांना न्याय मिळू शकेल. तसेच कोल्ड स्टोरेज आणि पॅक हाऊसची प्रसिद्धी आणि प्रसार तसेच यासंदर्भात कोकणातील शेतक-यांना, अधिका-यांनी मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. असे जर झाले तर कोकणातील शेतक-यांना न्याय मिळू शकेल,

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ....

कोकणातील शेतक-यांना चांगले दिवस येऊ शकतील. आज आमच्या कृषी उत्पन्न बाजार समितीवर गेल्या दोन वर्षापासून प्रशासक नेमलेला नाही त्यामुळे यासंदर्भात देखील विचार होण्याची आवश्यकता आहे. सिंधुदुर्ग येथे सुध्दा मार्केट यार्ड नाही. या ठिकाणी केवळ दलालच मालाची निर्यात करतात. या ठिकाणच्या मालाची निर्यात शेतक-यांनी केली तर शेतक-यांना दोन पैसे पदरात पडू शकतील. जशी द्राक्ष पिकाची निर्यात शेतकरी करतात तशीच आंब्याची निर्यात शेतक-यांनी केली तर येथील शेतक-यांना फायदा होऊ शकेल. या ठिकाणची निर्यात दलालाऐवजी शेतक-यांकडून झाली पाहिजे. आंबा महोत्सवात 700 रुपये डझन आंबा विकला गेला परंतु असे असतांनाही शेतक-याच्या पदरात काहीही पडले नाही. अडीच तीन हजार या दराने आंब्याची पेटी विकली जाते असे सर्वत्र बोलले जाते परंतु प्रत्यक्षात आंबा उत्पादक शेतक-याच्या खिशात काही सुध्दा पैसे पडत नाहीत. आंब्याच्या संदर्भातील सगळा खर्च वजा केला तर आंबा उत्पादक शेतक-यांच्या खिशात पेटी मागे 100 रुपये सुध्दा पडत नाहीत. त्यामुळे रायगडमध्ये आंब्यासाठी मार्केट यार्ड होण्याची आवश्यकता आहे. आंब्यावर जो साका पडतो त्यावर कृषी विद्यापीठाने संशोधन करण्याची आवश्यकता आहे. आंब्याच्या संदर्भात कृषी विद्यापीठे काही सुध्दा संशोधन करीत नाहीत. काही कृषी विद्यापीठात आंब्यावर संशोधने झालेली आहेत परंतु दापोली आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील कृषी विद्यापीठांनी आंब्यावर अजून संशोधन करण्याची आवश्यकता आहे. दापोली आणि सिंधुदुर्ग येथे कृषी विद्यापीठाचे उपकेंद्र होण्याची आवश्यकता आहे. आंब्याच्या संदर्भात तसेच सगळया फळावंर प्रक्रिया करणारे कारखाने तसेच शेती मालावर अवलंबून असणारे उद्योग कोकणातील प्रत्येक तालुकयात होण्याची आवश्यकता आहे. आंब्याची हेक्टरी 100 झाडे लावली तर त्यातील 50 टक्के झ ाडे सुध्दा जिवंत राहत नाही. त्यामुळे शासनाने आंबा उत्पादक शेतक-यांना हेक्टरी 50 हजार रुपये नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता आहे. तसेच कोकणातील शेतक-यांनी घेतलेले कर्ज व त्यावरील व्याज पूर्णपणे माफ करण्याची आवश्यकता आहे. तसेच शासनाने आंब्याच्या संदर्भात एक वेगळे धोरण जाहीर करण्याची आवश्यकता आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथे शासनाने मार्केट यार्ड निर्माण करुन दिले पाहिजे. सभापती महोदय, 11 तारखेला

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ....

महसूल मंत्री श्री. नारायण राणे कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांच्या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना भेटणार होते परंतु योगायोगाने आज माननीय विनोद तावडे यांनी आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी नियम 97 खाली प्रस्ताव मांडलेला आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली........

आंबा पिकाचा दुष्काळ जाहीर करुन आंबा उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये मदत द्यावी. याठिकाणी आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीत चर्चा सुरु आहे. उद्या अधिवेशनाचा शेवटच्या दिवस आहे आणि याठिकाणी माशांच्या दुष्काळाच्या संदर्भात चर्चा झालेली नाही. तेव्हा माझी या निमित्ताने मागणी आहे की, सरकारने आंब्याचा दुष्काळ जाहीर करावा तसेच माशांचा दुष्काळ जाहीर करावा. तेव्हा या संदर्भात मंत्रिमहोदयांनी ठोस निर्णय घेऊन आंबा उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये मदत द्यावी अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भात अतिशय गंभीर प्रश्न अल्पकालीन चर्चेद्वारे उपस्थित केलेला आहे. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याने या अल्पकालीन चर्चेचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी आंबा उत्पादक शेतकरी नसलो तरी, आंबा उत्पादक शेतकऱ्यांशी संबंधित आहे. म्हणून मी आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करीत आहे. आमचे काही शिक्षक सुध्दा आंबा उत्पादक शेतकरी आहेत. त्यामुळे मला त्यांचा व्यथा माहीत आहेत. त्याच व्यथा मी येथे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, दरवर्षी कोकणातील हापूस आंब्याची 700 ते 800 कोटी रुपयांची उलाढाल होते. परंतु या वर्षी आंब्याचा मोहर गळून पडल्यामुळे ही उलाढाल 200 ते 250 कोटी रुपयांनी खाली आलेली आहे. त्यामुळे कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत याची आपणास सुध्दा कल्पना आहे. कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी हे अतिशय कष्टाळू, मेहनती आहेत. ही सर्व मंडळी जीवापाड मेहनत करुन, प्रसंगी पोटाला चिमटे काढून, बँकाचे कर्ज घेऊन आंबा पिकाच्या माध्यमातून आपल्याला काही तरी उत्पन्न मिळेल या आशेतून आंब्याची लागवड करतात. आंबा हे कोकणातील अतिशय महत्वाचे पीक आहे. हे पीक संपूर्णत: निसर्गाच्या कृपेवर अवलंबून आहे. त्यामुळे अवचित पडणाऱ्या पावसामुळे आंबा पिकाचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. वातावरणात अचानक निर्माण होणारी थंडी, आंबा पिकावर पडणारे निरनिराळ्या प्रकारचे रोग, अति उष्म्यामुळे आंबा करपणे इत्यादींमुळे आब्यांचे उत्पन्न कमी होत आहे. विदर्भातील शेतकरी कापूस पिकापासून त्रस्त झालेले आहेत, मराठवाड्यातील शेतकरी काळी ज्वारीपासून त्रस्त झालेले आहेत, खानदेशातील शेतकरी केळी पिकापासून त्रस्त झालेले आहेत, त्याप्रमाणे कोकणातील शेतकरीसुध्दा आंबा पिकापासून त्रस्त झालेले आहेत. आंबा उत्पादक शेतकऱ्यांची अशीच अवस्था होणार असेल तर उद्या कोकणात आंबा पीक राहील की नाही, आंबा उत्पादक शेतकरी राहतील की नाही अशाप्रकारची गंभीर परिस्थिती निर्माण होईल. तेव्हा आंबा उत्पादक

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..........

शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी सरकारने भरीव मदत करणे आवश्यक आहे. यापूर्वी सुध्दा आंबा उत्पादक शेतकऱ्यांना मदत जाहीर झालेली आहे. परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे ती शेतकऱ्यांपर्यंत पोहाचलेली नाही. तेव्हा मागील वर्षातील मदत आणि आता जाहीर होणारी मदत अशी दोन्ही स्वरुपातील मदत शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते......

सभापती महोदय, ज्याप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमुळे आंबा उत्पादक शेतकरी संकटात सापडलेला आहे, त्याचप्रमाणे आंब्याच्या फळबागांना लागलेले वणवे हाही चिंतेचा विषय होऊन बसलेला आहे, त्यामुळे याचीही शासनाने दखल घेणे आवश्यक आहे. या देशातील किंवा या विभागातील नारळ विकासाच्या संदर्भात ज्याप्रमाणे राष्ट्रीय नारळ विकास बोर्ड स्थापन झाले, त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदयांनी देशस्तरावर आंबा विकास बोर्डाची स्थापना करण्याच्या संदर्भात पहावे व आंबा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे याठिकाणी माननीय सभापतींमार्फत मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, या प्रस्तावाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या ज्या व्यथा मांडलेल्या आहेत, त्याबाबतीत जसे ऊस उत्पादक शेतक-यांना मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने धोरण जाहीर केले त्याचप्रमाणे कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांनाही भरघोस मदत मिळण्याच्या दृष्टीने धोरण जाहीर करावे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद !

--------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आंबा पिकाच्या नुकसानीबाबतची जी चर्चा याठिकाणी उपस्थित करण्यात आलेली आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, लहानपणी शिकत असताना शाळेमध्ये शिक्षक आंबा फळांचा राजा आहे असे शिकवायचे. परंतु असे असतानाही या फळांच्या राजाकडे शासनाने सातत्याने दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे खरोखरच फळांचा राजा हा आंबा राहिलेला आहे की नाही याबाबत आमच्या मनात याठिकाणी विचार येतो. आज आमच्या आंब्याची चव सातासमुद्रापलिकडे गेलेली असून परदेशी लोकांना या आंब्याची गोडी लागलेली आहे. एवढी चव टीकवून ठेवणारा हा आमचा फळांचा राजा आहे. परंतु या फळाच्या राजाकडे शासनकर्त्यांचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. आंब्याचे पीक टीकविण्यासाठी आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी फार मोठयाप्रमाणात काबाडकष्ट केलेले आहे. यासाठी त्यांनी बँकाकाडून कर्ज घेतलेले आहे. अशाप्रकारे कर्ज घेऊन आंब्याचे उत्पादन करीत असताना प्रामुख्याने याबाबतीत शासनाकडून दुर्लक्ष होत आहे. आंब्याचे संशोधन होण्याच्या दृष्टीने, त्यावर प्रक्रिया होण्याच्या दृष्टीने ज्या योजना कृषि विभागाने सांगितल्या, त्या फक्त कागदावरच असून त्याची कुठल्याही प्रकारची अंमलबजावणी होत नाही.

**( सभापतीस्थानी : तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

आमच्या भागातील कृषि अधिकाऱ्यांचेही आंबा पिकांकडे लक्ष नाही. आज आपण म्हणतो की, आंब्याचे 25 टक्के उत्पादन झाले. परंतु प्रत्यक्षात आंब्याचे किती उत्पादन झाले याबाबतची नोंद आपल्या विभागाकडे आहे काय ? याबाबतची विचारणा मी काल आमच्या विभागातील कृषि अधिकाऱ्यांकडे केली असता, आमच्या विभागाकडे तशाप्रकारची नोंद नसल्याचे त्यांनी सांगितले. अशाप्रकारे आज शासकीय यंत्रणाकडेही माहिती नाही वा शासकीय अधिकाऱ्यांचेही आंब्याच्या उत्पादनाकडे पूर्णपणे दुर्लक्ष आहे. आम्हाला फक्त लोकांच्या चर्चेतूनच अशी माहिती मिळते की, आंब्याचे उत्पादन कमी झालेले आहे. आज सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जवळपास 24 हजार हेक्टरांवर आंबा उत्पादनाची लागवड झालेली आहे. असे असतानाही आमच्या आंब्याकडे शासनाचे दुर्लक्ष

..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

झालेले आहे. गेल्या 2-3 वर्षापासून सातत्याने आंबा उत्पादक शेतकरी अडचणीत येत आहे. प्रत्येक वर्षी आंबा उत्पादक शेतकरी म्हणतो की, यावर्षी आंब्याचे उत्पादन चांगले येईल व त्यानंतर घरातील शुभकार्य करता येईल, अशी आशा बाळगून ते असतात, परंतु यावर्षीही त्यांच्या पिकांचे फार मोठयाप्रमाणात नुकसान झालेले आहे. आज त्यांच्या कुटुंबाची उपजिवीका पूर्णपणे आंब्याच्या बागांवरच असून त्यांवर एवढया मोठयाप्रमाणात खर्च करीत असताना आज आंब्यात फार मोठी घट झालेली आहे, त्यामुळे शेतकरी फारच हवालदिल झालेले आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळेच आज शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे.. जुलै महिन्यांत पाऊस पडला तर नोव्हेंबर महिन्यांमध्ये आंब्याच्या झाडांना मोहर लागण्यास सुरुवात होते.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

डिसेंबर, जानेवारी या महिन्यात थंडी जास्त पडल्यामुळे मोहोराचे प्रमाण वाढले. फळधारणा करण्यासाठी 16 डिग्री तापमानाची आवश्यकता असते. परंतु याठिकाणी 16 डिग्रीपेक्षा जास्त तापमान असल्यामुळे फळ धारणा कमी झाली. नर आणि मादी अशी संयुक्तीक फळधारणेचे प्रमाण अडीच ते तीन टक्के असण्याऐवजी एक ते दीड टक्के इतके संयुक्तीक फळधारणेचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे सिंधुदूर्ग जिल्हयात साधारण 75 टक्के आंब्याचे उत्पादन कमी आले.आंब्याच्या प्रत्येक झाडासाठी अंगमेहनत जी करावी लागते, प्रत्येक झाडावर जो एक ते दीड हजार रुपयांचा खर्च होतो हा सर्व खर्च वाया जाऊन शेतकऱ्याचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यावर कर्जाचे प्रमाण वाढले आहे. अशा प्रकारे आंब्याचे उत्पादन कमी आल्यामुळे शेतकरी अडचणीत आलेला आहे. 1997-98 मध्ये युती शासनाच्या काळात शासनाने आंबा बागायतदारांना नुकसान भरपाई देण्याचा धाडसी निर्णय घेतला. 10 हजार रुपये इतकी नुकसानभरपाई आंबा उत्पादकांना दिली गेली. त्यावेळी ही रक्कम हेक्टरी दिली होती. त्याचे अनुकरण करुन शासनाने मालाचा विचार न करता तशाच प्रकारचे अनुदान देण्याचे काम शासनाने दोन वेळा केले होते. या अनुदानासंदर्भात सर्वसामान्यपणे सन्माननीय सदस्यांनी अनेक वेळा प्रश्न उपस्थित केले होते. अनुदानाचे वाटप होंत असताना शेतकऱ्यांना यासंदर्भात काहीही माहिती मिळत नाही. हे अनुदान मिळविण्यासाठी प्रत्येक शेतकरी तहसिल कार्यालय किंवा कृषी अधिकारी यांच्याकडे जाऊन सर्व भागधारकांच्या सहया घेऊन जेवढा खर्च करतो, तेवढा खर्चही या अनुदानामधून शेतकऱ्यांस मिळत नाही. त्यामुळे बरेचसे शेतकरी शासनाकडून मदत मिळाली नाही तरी चालेल, आपण उपाशीपोटी राहू मात्र शासनाच्या दारात हाजीहाजी करणार नाही अशा प्रकारची एकप्रकारची उदासिनतेची भावना शेतेकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे. शासनाने शेतकऱ्यासाठी मदत जाहीर केल्यानंतर त्यांना कार्यालयामध्ये खेपा घालाव्या लागतात. ही मदत कोठून मिळेल याची माहिती शेंतकऱ्यांना मिळत नाही. यासाठी शासनाने मदत जाहीर केल्यानंतर कृशी अधिकारी, ग्रामसेवक , तलाठी यांच्या माध्यमातून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना इंटिमेशन पत्र देण्याची उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आंबा उत्पादक शेतकऱ्याच्या प्रश्नावर चर्चा होत असताना सन्माननीय सदस्यांनी विविध विषय मांडले. शेतकऱ्याच्या कर्जावरील जे व्याज आहे ते माफ करण्यात यावे अशी माझी शासनास विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

गेल्या वर्षी शासनाने घोषणा केली होती की, शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज माफ केले जाईल. त्याप्रमाणे जिल्हा बँकेने कर्जा वरील व्याज माफ केले. परंतु नॅशनल बँकेने केवळ 2 टक्के इतकेच कर्ज माफ केलेले आहे. शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जावरील व्याज माफ करण्यासाठी या कर्जाचे रुपांतर टर्म लोनमध्ये करण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी. सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये अवेळी पडलेल्या पावसामुळे काजूच्या उत्पादनामध्ये साधारणपणे 60 टक्के इतकी घट झाली. आता जांभूळ या फळाचे उत्पादन येण्यास सुरुवात होणार आहे. परंतु हे उत्पादन येण्याअगोदरच काल अवेळी पाऊस पडला. त्यामुळे या फळाच्या उत्पादनात घट येण्याची शक्यता आहे. युती शासनाच्या काळात आंबा उत्पादकांना नुकसानभरपाई देण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला होता . तशाच प्रकारे काजू, कोकम, जांभूळ या पिकांसाठी नुकसान भरपाई देण्याचा निर्णय शासनाने घेण्याची गरज आहे असे मला वाटते. सभापती महोदय, या ठिकाणी बऱ्याच वेळी कुळाच्या जमिनीवर अनुदान दिले जात नाही. अशी अनुदान न दिलेली सुमारे 4 हजार हेक्टर जमीन आहे.

यानंतर श्री. रोझेकर..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर........

ज्या कुळांचे प्रश्न न्यायप्रविष्ट आहेत अशांचे अनुदान थांबवून बाकीचे अनुदान देण्यास हरकत नसल्याने याबाबत शासनाने विचार करावा, अशी माझी विनंती आहे. कर्ज माफ करतांना किंवा कर्जाचे सुलभ हप्ते पाडतांना नॅशनलाईज बँका, अर्बन बँका आणि जिल्हा सहकारी बँका यांनाही तशाच प्रकारच्या सूचना शासनाने द्याव्यात. सभागृहात या चर्चेच्या निमित्ताने सर्वच सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे आंबा या फळराजाला आता तरी ख-या अर्थाने राजा बनवा आणि अन्य पिकांपेक्षा जास्त अनुदान म्हणजे हेक्टरी 50 हजार रुपये महागाईचा विचार करुन मदत द्यावी, अशी माझी आग्रहाची मागणी आहे. तसेच, शेतक-यांना मदत जाहीर झाल्याचे कळेल, ही मदत सुलभरित्या मिळेल, मदतीसाठी ज्या तारखा ठरविण्यात येतील त्याची माहिती शेतक-यांपर्यन्त पोहोचेल, त्या तारखांना अधिकारी उपस्थित राहतील याकडेही शासनाने लक्ष दिले पाहिजे. गाव पातळीवर अनुदान वाटप करता येईल काय ? याचाही विचार शासनाने करावा व या शेतक-यांना ख-या अर्थाने दिलासा द्यावा, अशा प्रकारची विनंती मी शासनाला करतो. सभागृहात सर्वच सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्याची जाणीव ठेवून आंबा या फळराजाला मदत करावी. कोकणातील अन्य योजनांबाबत जरी आबादीआबाद असले तरी याबाबतीत मात्र योजना केवळ कागदावर न राहता ती अंमलात आणून शेतक-यांना दिलासा द्यावा, अशी विनंती करतो आणि थांबतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आणि माझे मित्र, श्री.विनोद तावडे यांनी कोकणातील हापूस आंब्याच्या झालेल्या नुकसानीसाठी शेतक-यांना नुकसान भरपाईच्या रुपाने मदत करावी, यासाठी नियम 97 अन्वये प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सन्माननीय सभापती महोदयांना मनापासून धन्यवाद देतो की, गेल्या दोन आठवडयांपूर्वी महाराष्ट्र विधान परिषदेच्या इतिहासामध्ये किंबहुना संपूर्ण विधिमंडळाच्या इतिहासामध्ये कोकणच्या विषयाकरिता स्वतंत्र चर्चा घडवून आणण्याकरिता त्यांनी आम्हाला पूर्ण वेळ दिला आणि तो वेळ दिलेला असतांनाच दुस-या आठवडयामध्ये आंबा पिकाकरिता स्वतंत्र चर्चा या सभागृहामध्ये नियम 289 अन्वये आणलेली असतांना 33 मिनिटे आमच्या सर्वांच्या भावना सभापती महोदयांनी ऐकून घेतल्या आणि आज नियम 97 अन्वये चर्चेला त्यांनी परवानगी दिली याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांना मनापासून धन्यवाद देतो. तसेच यासाठी मनापासून आनंद व्यक्त करतो की, या चर्चेकरिता खासकरुन या राज्याचे फलोत्पादन मंत्री, सन्माननीय श्री.विनय कोरे जातीनिशी सभागृहात उपस्थित आहेत. त्यांची काम करण्याची पद्धत, निर्णय घेण्याची निर्णय क्षमता आणि त्याच बरोबर एखादा विषय समजून घेऊन त्यावर अंमलबजावणी करण्याची पद्धत ही माझ्यासारख्या माणसाला, आमदाराला निश्चितपणे भावलेली आहे. ते आजच्या या चर्चेसाठी जातीने हजर आहेत, मी त्यांनासुध्दा मनापासून धन्यवाद देतो. निश्चितपणे कोकणचा त्यांच्यावर असलेला विश्वास अधिक दृढ करण्याचा प्रयत्न ते करतील, अशी भावना त्यांनी चर्चेला उत्तर देण्यापूर्वी मी व्यक्त करतो.

सभापती महोदय, माझ्यापूर्वी सर्वच वक्त्यांनी प्रामाणिकपणे अशा भावना व्यक्त केल्या की, कोकणामध्ये आंबा उत्पादन कमी आले आहे, उत्पादन कमी आल्यामुळे शेतक-यांचे नुकसान होणार आहे, या नुकसानीसाठी शेतक-यांना हेक्टरी 50 हजार रुपयांची मदत शासनाने जाहीर करावी. अशा ज्या भावना त्यांनी व्यक्त केल्या आहे त्या भावनांशी मी शंभर टक्के सहमत आहे. या भावना व्यक्त करीत असतांना आणि सहमती दर्शवित असतांना आंबा पीक कमी आले या विषयापुरती मर्यादित चर्चा मी करणार नाही तर मंत्री महोदयांचे एका गोष्टीकडे जाणीवपूर्वक लक्ष वेधू

..3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.............

इच्छिणार आहे की, आंबा पीक येण्याकरिता या शेतक-याला आंब्याचे झाड कसे तयार करावे लागते, कशी मेहनत, कष्ट करावे लागतात, स्वत:च्या पोटच्या मुलाची जेवढी जपणूक करावी लागत नाही त्यापेक्षा आंबा झाडाची किती जपणूक करावी लागते, या बाबी सर्वप्रथम लक्षात घेण्याची गरज आहे. मला वाटते की, हे असे एकमेव फळझाड असेल की ज्याची 5/6 वर्षे जपणूक करावी लागते.

यानंतर कुमारी जयश्री.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव......

आणि पाच ते सहा वर्ष जपणूक केल्यानंतर कुठेतरी ते झाड फळे देण्यास सुरुवात करते तेही पूर्ण क्षमतेने नाही. आंब्याच्या झाडाने वयाची 10 ते 11 वर्ष पूर्ण केल्यानंतर ख-या अर्थाने त्या झाडाला पूर्ण क्षमतेने फळे येण्यास सुरुवात होते. सभापती महोदय, इतर पिकांप्रमाणे आंब्याचे पिक हे बी - बियाणे पेरले व खतपाणी घालून काही कालावधीतच चांगले पीक देणारे किंवा फळ देणा-या पिकांप्रमाणे नाही किंवा बी पेरली व लगेच त्याचे रोपटे उगवून ते फळास आले, असेही हे आंब्याचे पीक नाही, त्याचे स्वरुपच संपूर्णत: वेगळे आहे. यापूर्वी आमच्या पूर्वजांनी कधीतरी कुठेतरी अशा बाठा टाकून दिल्या व त्या जमिनीमध्ये पेरल्यांनतर त्याला मुबलक पाणी घातल्यानंतर त्याला जे पिक आले त्याप्रमाणे आता आंब्याच्या पिकाची सोपी पध्दती राहिलेली नाही. आंब्याचे झाड येण्यासाठी प्रथम आंब्याच्या बाठा रुजत घालाव्या लागतात, अशा या रायवळ आंब्याच्या बाठा रुजल्यानंतर त्यांना चांगल्या प्रकारचे कलम करण्याकरिता रानावनात हिंडून, डोंगरद-या पालथ्या घालून चांगल्या अशा प्रकारच्या, चांगल्या जातीच्या आंब्याची काठी, फांदी शोधावी लागते व ही स्टि शोधल्यानंतर ती या रुजलेल्या बाठयाला लावून किंवा बांधून एकजीव करावी लागते, अशा प्रकारे आंब्याच्या झाडाला कलम बसवावा लागतो. रायवळ आंब्याच्या बाठा रुजत घालून मग या आंब्याच्या पिकाच्या कलमाची फक्त सुरुवातच होते. कलमाची फांदी शोधण्यासाठी रानोमाळ वणवण भटकावे लागते, डोंगरद-यांमध्ये हिंडून चांगली अशी फांदी शोधावी लागते व ही फांदी रुजत घातलेल्या बाठयावर कलम करावी लागते. आंब्याचे हे कलम केल्यानंतर किमान दोन - तीन वर्षे या कलमाचे ऊन,पाऊस,वारा,वादळ या सर्वांपासून संरक्षण करावे लागते, जपणूक करावी लागते. ज्याप्रकारे एखादे लहान मूल आपल्या आईच्या गर्भामध्ये संरक्षित राहते व गर्भातून बाहेर आल्यानंतरही त्याची जशी काळजी घ्यावी लागते, त्याप्रकारे या आंब्याच्या कलमाची देखील काळजी घ्यावी लागते. बाठा रुजल्या आणि खतपाणी घातल्यावर त्याला भरघोस पिक आले, अशा प्रकारचे आंबा हे सोपे पीक नाही. रायवळ आंब्याच्या बाठा हया रुजत घातल्यानंतर त्याला चांगल्या प्रकारची फांदी बांधून एकजीव होईपर्यंत एक आंब्याचे चांगले कलम व्हावयाला दोन - तीन वर्षाचा कालावधी जावाच लागतो. वरील सर्व प्रक्रिया ही नर्सरीतच केली जाते, ज्याप्रमाणे एखादे मूल आपल्या आईच्या गर्भामध्ये संरक्षित राहते, व त्याची योग्य वाढ आईच्या गर्भामध्ये होते त्याप्रकारे हे आंब्याचे कलम सावलीमध्ये म्हणजे नर्सरीमध्येच चांगल्या प्रकारे तयार होऊ शकते. दोन ते तीन

T - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव......

वर्षांनी नर्सरीमधून बाहेर आलेले हे कलम शेतामध्ये लावल्यावर किमान चार वर्ष तरी त्याची ऊन,पाऊस,वारा,वादळ यापासून फार काळजी घ्यावी लागते. ज्याप्रमाणे एखादे मूल आपल्या आईच्या गर्भातून बाहेर आल्यावर पहिले चार वर्ष त्याला बाहेरच्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी किंवा समरस होण्यासाठी लागतात त्याप्रमाणेच या आंब्याच्या पिकालाही शेतामध्ये लावल्यानंतर तेथे रुजून फळे देण्याकरिता भरपूर कालावधी जावा लागतो. आंब्याच्या झाडाला चार ते सहा महिन्यानंतर पाणी देण्याची गरज नाही, असे काही ठिकाणी म्हटले जाते, परंतु सभापती महोदय, हा समज अतिशय चूकीचा आहे. या झाडाला किमान चार वर्ष तरी पाणी घालावे लागते. सुरुवातीला नियमित आवश्यक तेवढे पाणी घातल्यानंतर जेव्हा त्याला पालवी फुटते तेव्हा त्या आंब्याच्या झाडाने जीव धरला आहे, असे म्हटले जाते. तरीदेखील पुढील चार वर्ष त्याला पाणी घालावे लागते. आंबा चांगला लागावा किंवा रुजावा याकरिता त्या आंब्यांच्या मुळांचा परीघ लक्षात घेऊन व त्या आंब्याची मूळे किती प्रमाणात जमीनीतून आवश्यक जीवनरस शोषून घेऊ शकतात, त्यांची क्षमता बघून त्यांना पाणी घालावे लागते. कधी कधी तर 15 वर्षानंतरही एखाद्या झाडाला पाणी घालावे लागते. काही वेळेला तर आंब्याच्या झाडांना एक विशिष्ट प्रकारची अळी करुन पाणी घातले जाते. कधी कधी कोकणात पाऊस जास्त पडतो हे सर्वांना दिसते परंतु कधी कधी कोकणातही पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष आढळून येते. ज्या वेळेला पाण्याची टंचाई असते त्यावेळेला ज्याप्रमाणे आपण आपला जीव वाचविण्याकरिता पाण्याची व्यवस्था करतो त्याप्रमाणे आंब्याच्या झाडाचाही जीव वाचविण्याकरिता डोंगर - द-या,रानावनातून पाणी डोक्यावरुन आणून झांडांवर शिंपण करावी लागते. यानंतर या आंब्याच्या झाडांना दहा ते बारा वर्षानंतर संपूर्ण क्षमतेने फळे येण्यास सुरुवात होते. महाराष्ट्रामध्ये ज्याप्रमाणे इतर पिकांचे उत्पादन पाहून त्याची किंमत किती मिळेल याचे भाकित केले जाऊ शकते त्याप्रमाणे आंब्याच्या पिकाचे केले जाऊ शकत नाही उदा. ऊस,द्राक्ष,केळी,कापूस,ज्वारी व इतर. कोकणामध्ये एवढया आंब्याच्या बाठा लावल्या तर एवढे पिक येऊन एवढे उत्पन्न व पैसे मिळतील अशा प्रकारे अंदाज लावता येणे अत्यंत कठीण बाब आहे. मघाशी या सभागृहामध्ये कोणीतरी असे म्हणाले की, अति थंडीमुळे आंब्याचा मोहर करपला परंतु ख-या अर्थाने आंब्याला मोहर येण्याकरिता थंडीचीच जास्त गरज असते.

यानंतर श्री.बोरले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ........

थंडी जास्त असेल तर आंब्याला जास्त मोहर येतो. यावर्षी थंडी चांगली होती. त्यामुळे आंब्याला चांगला मोहर आला होता. परंतु दुर्दैवाने हवामानामध्ये, आभाळामध्ये मळभ आल्यामुळे आंब्याचा मोहर गळून पडला. ज्याप्रमाणे डांबराचे ठिपके पडतात, त्याप्रमाणे झाडाच्या अवती-भोवती मोहर गळून पडला. महाराष्ट्रातील उष्णतेचे प्रमाण आपण पाहतो. विदर्भ, मराठवाडयामध्ये उष्णतेचे प्रमाण जास्त आहे, असे आपण म्हणतो. कोकणामध्ये देखील उष्णतेचे प्रमाण जास्त आहे. आंब्याचा जो थोडा फार मोहर शिल्लक राहिलेला होता तो उष्णतेमुळे गळून पडला. कोकण विकासाच्या प्रस्तावावर भाषण करतांना मी असे सांगितले होते की, 19 एप्रिल दरम्यान कोकणामध्ये पाऊस पडेल. त्याप्रमाणे काल 15 तारखेला कोकणामध्ये पाऊस पडला. आभाळामध्ये मळभ आल्यामुळे आंब्याचा मोहर गळून पडला. जो काही मोहर शिल्लक राहिलेला होता तो उष्णतेमुळे गळून पडला आणि त्यातूनही शिल्लक राहिलेल्या मोहोरामुळे झाडाला जे फळ आले ते पावसामुळे गळून पडलेले आहे. झाडाला जर चार फळे आली तर ती फळे पूर्णपणे तयार होऊन मार्केटमध्ये विकली जाऊन त्यातून शेतक-यांना चार पैसे मिळतील किंवा नाही, हे निसर्गाच्या लहरीवर आणि दलालांच्या इच्छेवर अवलंबून असते. आंब्याची विक्री केल्यानंतर त्यातून किती शेतकऱ्यांना चार पैसे मिळतात ?

सभापती महोदय, शेतक-यांचे कर्ज माफ करण्याची मागणी केली जाते. मागच्या वर्षी शासनाने कृषी संजीवनी योजना लागू केली. कृषी संजीवनी योजनेची आकडेवारी मी आता आणलेली नाही. शासनाने कृषी संजीवनी योजनेची माहिती काढावी. कोकणातील शेतक-यांना कृषी संजीवनी योजनेचा किती लाभ मिळाला ? शासनाने राज्यातील सर्व शेतक-यांसाठी कृषी संजीवनी योजना जाहीर केली होती. कोकणातील शेतक-यांना या योजनेचा लाभ मिळाला नाही. कारण कोकणातील शेतक-यांची कर्ज घेण्याची इच्छा नसते. कोकणातील शेतकरी इभ्रत जपतात. त्यामुळे ते कर्ज घेत नाहीत. आंब्याची झाडे जुनी असल्यामुळे त्या झाडांसाठी कर्ज घेण्याची आवश्यकता नाही, असे कोकणातील शेतक-यांना वाटते. कोकणामध्ये रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शंभर टक्के फळ झाडांची लागवड झालेली आहे. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून लावण्यात आलेल्या फळ झ ाडांना पीक येईपर्यंत कर्ज दिले जात नाही. म्हणून कोकणातील शेतकरी कर्ज घेत नाही.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ........

शासनाने जाहीर केलेल्या कृषी संजीवनी योजनेचा कोकणातील शेतक-यांना लाभ मिळालेला नाही. कोकणातील शेतक-यांना दीर्घ मुदतीचे कर्ज देण्याची आवश्यकता आहे. कोकणातील शेतक-यांना किमान 11 वर्षाकरिता बिन व्याजी कर्ज सुलभ हप्याने दिले पाहिजे. सहा वर्षानंतर कर्जाचे हप्ते पाडून त्यांवर व्याजाची आकारणी करुन कर्जाचा हप्ता वसूल केला जातो. शासनाच्या डोक्यामध्ये असे आहे की, 5-6 वर्षानंतर शेतक-याला उत्पन्न मिळण्यास सुरुवात होते. म्हणून ताबडतोब कर्जाची वसुली सुरु करण्यात येते. परंतु हे चुकीचे आहे. शेतक-यांना आब्याच्या झाडापासून उत्पन्न मिळण्यासाठी किमान 10 वर्षे वाट बघावी लागते. 10 वर्षाच्या कालावधीमध्ये शेतक-याला त्या झ ाडची जपणूक, खत, पाणी, फवारणी करावी लागते. त्यानंतर 10 ते 11 वर्षांनी आब्याचे फळ मिळते. म्हणून माझी अशी विनंती आहे की,  कोकणातील शेतक-याला दीर्घ मुदतीचे कर्ज देण्याची आवश्यकता आहे. हा पहिला टप्पा आहे. आंब्याचे पीक येण्यासाठी शेतक-यांना कशा प्रकारची मेहनत करावी लागते, हे शासनाने पाहिले पाहिजे. बाठा शोधण्यापासून, कलमाची फांदी गोळा करण्यापासून आंब्याचे झाड तयार होऊन त्याला फळ येईपर्यंत शेतक-यांना मोठया प्रमाणावर मेहनत करावी लागते. त्यासाठी शेतक-यांना कोणत्या प्रकारची मदत करण्याची आवश्यकता आहे, याचा शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, मी आज बोलण्यासाठी थोडासा जास्त वेळ घेणार आहे.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव .....

आंब्याची पहिली पेटी बाजारात येते त्यावेळी भाव ठरविण्याबाबत फार चढाओढ होते. प्रतिष्ठेचा विषय केला जातो व अशा प्रकारे आंबा दामदुप्पटीने विकला जातो. त्यामुळे बऱ्याचदा असे वाटते की, कोकणातील शेतकरी गर्भश्रीमंत आहे, त्याला कोणाच्याही मदतीची गरज नाही. परंतु प्रत्यक्षात अशी परिस्थिती नसते, याचा गांभीर्याने विचार करावयास पाहिजे. शेवटी हा आंबा केनिंगकरीता जातो तेव्हा त्याला किलोला 10 ते 15 रुपये भाव मिळतो. यावरुन आपल्याला कल्पना येईल की, आंबा कोणत्या भावाने विकला जातो. प्रत्यक्षात शेतकऱ्यांना मिळणारा भाव व फायदा याची तुलना आपण करणार की नाही ? माझा प्रश्न असा आहे की, आंबा पिकाला तुम्ही चालना देणार आहे किंवा नाही ? शासन आंबा परदेशामध्ये पाठविण्याच्या गोष्टी करते परंतु आजही भारतातील सर्व राज्यात कोकणचा आंबा पोहचत नाही, एवढेच नव्हेतर महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातही आंबा पोहचत नाही. सरकार असा का विचार करीत नाही की परदेशात पाठविण्यापेक्षा देशातील सर्व राज्यात आंबा गेला पाहिजे. याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे हे सांगितले पाहिजे, तसेच सरकारकडे योजना नसेल तर कोणत्या योजना आखणार आहे हे सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, आंबा, काजू, फणस, जांभूळ अशा पिकांसाठी शासन एकाधिकार खरेदी योजना का लागू करीत नाही ? या फळांची खरेदी केंद्रे शासन का उभे करु शकत नाही ? शासनाच्या वतीने का खरेदी करु शकत नाही ? कापसाकरीता कापूस एकाधिकार खरेदी योजना शासनाने आणलेली आहे, ती चांगली आहे त्याबद्दल आमचा आक्षेप नाही परंतु त्याचप्रमाणे आंबा, काजू, फणस, जांभूळ अशा फळांसाठीही खरेदी केंद्रे शासनाने उभी केली पाहिजे. आंबा परदेशामध्ये पाठविण्यापेक्षा आपल्या देशातील प्रत्येक राज्यात कसा पोहचविता येईल याचा विचार आपण केला पाहिजे.

सभापती महोदय, रोजगार हमी योजना व पणनमंत्री माननीय श्री.हर्षवर्धन पाटील यांनी मागच्या अधिवेशनात आश्वासन दिले होते की, कोकणामध्ये 35 कोटी रुपये खर्च करुन एक्सपोर्ट झोन आणण्यात येईल. यासाठी 35 कोटीच्या योजनेसाठी केंद्र शासनातर्फे 26 कोटी, राज्य सरकारतर्फे 9 कोटी रुपये देण्यात येणार होते, परंतु आम्हाला अशी माहिती मिळाली की, हा एक्सपोर्ट झोन नाशिक येथे होणार आहे. असा प्रकार घडत असेल तर हा कोकणावर अन्याय आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MHM/

श्री.भास्कर जाधव .....

सभापती महोदय, कोकणातील शेतकरी आतापर्यंत आक्रमक नव्हते, तेथील लोकप्रतिनिधींचा शासनावर दबाब नव्हता, परंतु आता शेतकरी जागरुक झालेले आहेत. त्याला आता कळायला लागले आहे की, सरकार महाराष्ट्रातील इतर भागांतील शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाल्यावर मदत करते, मात्र कोकणातील पिकाचे नुकसान झाले तर मदत करीत नाही. कोकणातील लोक आम्हा लोकप्रतिनिधींना म्हणतात की, तुम्ही विधानसभेत जाऊन काय करता ? इतर भागातील लोकांना मदत मिळते आम्हाला का मदत मिळत नाही ? आमचे प्रश्न व अडचणी तुम्ही तेथे मांडता की नाही ? एक्सपोर्ट झोन नासिकला नेऊन शासनाने कोकणावर मोठा अन्याय केलेला आहे. हे आपण का केले ? हे सांगितले पाहिजे. कोकणातही एक्सपोर्ट झोन झाला पाहिजे अशी आमची विनंती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, कृषी उत्पन्न बाजार समितीची शाखा रत्नागिरी येथे व्हावी. त्यांच्या या मागणीला माझा माझा पाठींबा आहे. शिल्लक राहिलेला आंबा केनिंगला पाठविला जातो. आमची अशी मागणी आहे की, आंब्याला हमीभाव दिला पाहिजे. आंबा पिकाचे नुकसान झाल्यावर मदत झाडानुसार नव्हेतर हेक्टरनुसार दिली पाहिजे. काही सदस्यांनी अशी मागणी केली आहे की, झाडानुसार मदत दिली पाहिजे पण मी त्याच्याशी सहमत नाही. मदत ही हेक्टरीच मिळाली पाहिजे, याचे मागे कारण असे आहे की, संत्रा, द्राक्ष, कापूस उत्पादक शेतकरीसुध्दा झाडामागे मदत मागतील आणि त्यातून एक नवीन वाद निर्माण होईल. पूर्वी एका हेक्टरमध्ये आंब्याची 40 झाडे लावली जायची आता 60 झाडांची लागवड होऊ लागली आहे, म्हणून हेक्टरी 50 हजार रुपये मदत दिली पाहिजे अशी माझी मागणी आहे. तसेच कोकणातील .....

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

वणव्याचा देखील विचार येथे केला गेला पाहिजे. परवा माननीय महसूल राज्यमंत्र्यांनी फलोत्पादनाच्याबाबतीत वणवा लागून नुकसान झाले तर त्या संदर्भात नुकसान भरपाई शासनाकडून आपण देत नाही असे सांगितले त्याचबरोबर पुढे असेही सांगितले की, असे असले तरी शासनाच्या या निर्णयामध्ये बदल करून याबाबतीत देखील नुकसान भरपाई देण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. तेव्हा याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी तसेच वणवासदृश्य आगी लावण्याचे जे प्रकार घडतात त्याच्याबाबतीत अजामीनपात्र गुन्हा दाखल करावा आणि त्या दृष्टीने तात्काळ तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो. सभापती महोदय, वणव्याने बागायत जळून खाक झाल्यास त्याला विमा संरक्षण मिळावे म्हणून विमा योजना लागू करण्याचेही येथे सांगण्यात आले. तेव्हा त्याबाबत देखील मी आपल्याला सांगू इच्छितो की, अशी विमा योजना आपण तात्काळ या बागायतदार शेतकऱ्यांच्यासाठी सुरू करावी. सभापती महोदय, आंबा, काजू ही फळ-फळावळ खरेदी करण्यासाठी शासनाने स्वत: केंद्रे उघडावित. तसेच आंब्याची निर्यात करण्याबरोबरच देशाच्या कानाकोपऱ्यामध्ये आंबा कसा जाईल हेही पहावे आणि विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमामध्ये फूड टॅक्नॉलॉजीचा कोर्स समाविष्ट करावा अशीही मागणी मी या निमित्ताने शासनाकडे करीत आहे. सभापती महोदय, कोकणामध्ये कोल्ड स्टोरेजेस प्रत्येक तालुक्यामध्ये व्हावीत अशीही मागणी मी करतो आणि दुसरी महत्त्वाची मागणी अशी आहे की, हापूस आंब्याबरोबरच कोकणामध्ये निसर्गाने दिलेला रायवळ आंबा देखील मोठ्या प्रमाणात पिकतो. पण त्याकडे संपूर्णत: दुर्लक्ष झालेले आहे. तेही कोकणातील एक प्रमुख पीक होऊ शकते. त्या रायवळ आंब्यावरील प्रोसेसिंग युनिटस् कोकणामध्ये काढली जावीत. इतकेच नव्हे तर रायवळ बरोबरच पायरी आंबा देखील दुर्लक्षित आहे त्यावरील प्रोसेसिंग युनिटस्ही शासनाने आणावीत अशी विनंती मी या निमित्ताने करतो. सभापती महोदय, या चर्चेच्या माध्यमातून मी कोकणातील आंबा पिकाच्याबाबतीत सांगितलेल्या साऱ्या सूचनांचा, अगदी नर्सरीपासून विक्रीपर्यंतच्या, आपण विचार करावा अशी विनंती करतो आणि या आंबा उत्पादकांसाठी शासनाने आज ठोस अशा पद्धतीची हेक्टरी 50 हजार रूपये भरपाई वा मदत देऊन या शेतकऱ्यांना दिलासा द्यावा आणि हे शासन शेतकऱ्यांच्या बरोबर राहणारे आहे, शेतकऱ्यांना मदत करणारे आहे हे सिद्ध करावे असे सांगतो आणि भाषण संपवितो.

...... डब्ल्यू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या चर्चेसाठी आपल्याला 12.30 वाजेपर्यंत वेळ आहे आणि आता अजून 2 सदस्य बोलणार आहेत. शिवाय मंत्री महोदयांना उत्तरासाठी अर्धा तास द्यावयाचा आहे. तेव्हा सदस्यांनी दोन-दोन मिनिटांमध्ये आपले विचार येथे मांडावेत अशी माझी त्यांना विनंती राहील. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर हे भाषण करतील.

....... डब्ल्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, अतिशय महत्त्वाच्या विषयावर सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी आणि कोकणातील सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव येथे आणला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावरील चर्चेत सहभागी होऊन माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी निरनिराळे विषय मांडलेले आहेत त्यामुळे नेमक्या आपल्या मागण्या काय आहेत, कोकणातील लोकांच्या भावना काय आहेत एवढेच मी मला दिलेल्या मर्यादित वेळेमध्ये मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. सभापती महोदय, कोकणातील माणसाची एक भावना कशी आहे हे दोन ओळीमध्ये मी आपल्याला सांगतो.

" कापूस एकाधिकारामध्ये, मात्र आंबा दलालाधिकारामध्ये,
जसा कापूस हमी भावाने विकला जातो, घेतला जातो,
मात्र हापूस आंबा कमी भावाने खपतो आणि खपविला जातो."

म्हणजे कापूस हा एकाधिकार योजनेतून खरेदी केला जातो, मात्र आंबा हा दलाला कडूनच खरेदी-विक्री केला जातो. कापूसाला हमी भाव दिला जातो आणि हापूस आंबा मात्र कमी भावात खपतो आणि खपविला जातो अशी कोकणातील सर्वसामान्य आंबा उत्पादक माणसाची भावना आहे. त्यामुळे आंबा हा फळांचा राजा मानला जात असला तरी या राजाकडे आणि त्याचे उत्पादन करणाऱ्याकडे शासन नेहमीच दुर्लक्ष का करते हा कोकणातील माणसाला पडलेला प्रश्न आहे. या वेळी या आंब्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, दोन टप्प्यांमध्ये हे नुकसान झाले आहे, प्रथम मोहोर गळून गेला, छोटी फळे लागून ती पडली. तेव्हा अधिक विस्तारात न जातो मी एवढेच सांगतो की, आज आंबा उत्पादक शेतकरी हा संकटात आहे आणि त्यासाठी शासनाने काय करायला पाहिजे हे त्या आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने मी या ठिकाणी सांगणार आहे, त्यांच्यासाठी काही मागण्या येथे मांडणार आहे. सभापती महोदय, आज आंबा अुत्पादकच नाही तर कोकणातील नारळ आणि सुपारी उत्पादक शेतकरी देखील संकटात आलेला आहे. झाडांवर रोग पडल्यामुळे हे सारे शेतकरी संकटात आलेले आहेत. त्यांना देखील आपल्याला तातडीने वर काढावे लागणार आहे. त्यासाठी प्रथमत: आंबा दुष्काळ जाहीर करून शासनाने या उत्पादकांना हेक्टरी 50 हजार रूपयांची मदत वा भरपाई दिली पाहिजे तरच हा आंबा उत्पादक शेतकरी या संकटातून बाहेर येईल. ....

( यानंतर श्री. सरफरे .... एक्स 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

जेवढी हेक्टर आंब्याची बाग असेल त्या प्रत्येक हेक्टरमागे 50 हजार रुपये नुकसान भरपाई दिली पाहिजे अशी मी मागणी करतो. त्याचप्रमाणे आंब्याच्या झाडांच्या मशागतीकरिता, झाडांना खत घालण्याकरिता, त्यावर निरनिराळी प्रक्रिया करण्याकरिता शेतकऱ्याने बँकाकडून घेतलेले कर्ज माफ केले पाहिजे. मागील वर्षी सन 2005 मध्ये सहकारी बँकांची कर्जे माफ करण्यात आली, परंतु राष्ट्रीयीकृत बँकांनी कर्जमाफी दिली नाही. त्यामुळे सर्व आंबा उत्पादक अडचणीत आले. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना नवीन पिकांकरिता कर्ज देण्यात आले पाहिजे. शेतकऱ्याच्या अंगावर अगोदरचे कर्ज शिल्लक असल्यामुळे त्याला नवीन कर्ज दिले जात नाही. त्यामुळे त्याला जर नवीन पिक घेण्याकरिता कर्ज मिळाले नाही तर तो आर्थिकदृष्टया दबला जाईल. त्याकरिता आपण त्यांच्या अंगावरील अगोदरचे कर्ज माफ केले पाहिजे अशी मागणी करतो.

सभापती महोदय, देवगड तालुक्यामध्ये आंबा उत्पादक बागायतदार हा रजिस्टर्ड संघ आहे. त्याला शासनाने अनुदान दिले पाहिजे. संघाच्या प्रचाराकरिता आणि संशोधनाकरिता शासनाने आर्थिक मदत केली पाहिजे. त्याचा फायदा कोकणामधील आंबा उत्पादकांना निश्चितपणे होईल. म्हणून आपण आंबा उत्पादक बागायतदार संघाला अनुदान द्यावे अशी मागणी करतो. आंबा फळावरील प्रक्रियेकरिता सहकारी तत्वावर कोकणामध्ये कारखाने निघाले पाहिजेत. इतर जिल्हयांमध्ये पीक उत्पादन प्रक्रिया उद्योग काढण्याकरिता 1:9 अशाप्रकारे भागभांडवल दिले जाते, परंतु कोकणामध्ये अशाप्रकारचा उद्योग काढण्याकरिता 1:3 अशाप्रकारे भागभांडवल दिले जाते. तेव्हा इतर जिल्हयांप्रमाणे कोकणामध्ये देखील आंबा फळ प्रक्रिया उद्योग काढण्याकरिता 1:3 असे भागभांडवल दिले तर त्यामधून आंबा उत्पादक तरला जाईल. आजच्या वर्तमानपत्रामध्ये अमेरिका आणि युरोप मध्ये आंबा निर्यात करण्यास परवानगी मिळाल्याची बातमी वाचली. या देशांमध्ये आंबा निर्यात करुन त्या देशातील डॉलर आपल्याला मिळाले पाहिजेत असे आपण म्हणतो. कोकणामधील आंबा परदेशामध्ये निर्यात करण्यापूर्वी कराव्या लागणाऱ्या निर्जंतुकीकरणाचा प्लँट महाराष्ट्रामध्ये एकाच ठिकाणी आहे. तेव्हा आपल्याला यापुढील काळात मोठया प्रमाणावर अमेरिकेमध्ये आंबा निर्यात करावयाचा असेल तर त्याच्या निर्जंतुकीकरणाकरिता कोकणामध्ये प्लँट सुरु केला पाहिजे अशी मी मागणी करतो. त्याचप्रमाणे पॉवर स्प्रे, ट्रॅक्टर, पाय पंप अशा विविध प्रकारच्या अवजारांना 25 टक्के अनुदान दिले जाते. त्याऐवजी जर 50 टक्के अनुदान मिळाले तर आंबा उत्पादकाला मदत मिळेल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/

श्री. संजय केळकर...

सभापती महोदय, पणन महामंडळातर्फे आंबा उत्पादकांना युरो गॅप हे प्रमाणपत्र दिले जाते. अशाप्रकारचे प्रमाणपत्र 30 आंबा उत्पादकांना मिळाले. परंतु एकाही आंबा उत्पादकाकडून पणन महामंडळाने फळ घेतले नाही. त्या शेतकऱ्याला मूळ प्रमाणपत्र सुध्दा मिळाले नाही. त्यामुळे पणन महामंडळाने आंबा उत्पादकांना प्रमाणपत्र न देता त्यांच्याकडील आंबा फळाच्या खरेदीची व्यवस्था केली पाहिजे. प्रमाणपत्राची मुदत मे महिन्याच्या अखेरीस संपते. प्रमाणपत्राच्या नूतनीकरणाकरिता पुन्हा 15 हजार रुपये खर्च करावे लागतात याची सुध्दा शासनाने नोंद घेतली पाहिजे. सभापती महोदय, शेवटचा मुद्दा सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. देवगड तालुक्यामध्ये आय.टी.आय. केंद्र स्थापन करण्यात आले. त्या केंद्रामध्ये फळ प्रक्रियेची व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु फळ प्रक्रियेकरिता ट्रेनिंग देणाऱ्या शिक्षकाची नेमणूक केलेली नाही. शासनातर्फे कागदोपत्री व्यवस्था केल्याचे दाखविले जाते, परंतु प्रत्यक्षात त्याठिकाणी कोणतीही सुविधा नसते. अशी परिस्थिती असता कामा नये याकरिता त्या केंद्रामध्ये तातडीने शिक्षकांची नेमणूक केली पाहिजे. वेळेचे बंधन पाळून मी माझे महत्वाचे आठ मुद्दे भाषणामध्ये मांडले आहेत ते शासनाने मान्य करावेत आणि आंबा उत्पादक शेतकऱ्यांना संकटामधून बाहेर काढावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्यादृष्टीने जो प्रस्ताव आणलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कोकणाच्याच आंबा उत्पादक शेतकऱ्यांचा विचार न करता संपूर्ण महाराष्ट्रातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांचा विचार केला पाहिजे. कृषी आणि फलोद्यान विभागाने फळबागांची योजना राबविलेली आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी आंब्याच्या बागा निर्माण झालेल्या अहेत. आमच्या क्षेत्रामध्ये 23 आंब्याच्या बागा आहेत. डॉ.श्रीराम भुसकुटे यांनी 3 एकर जमिनीमध्ये दसेरी आंब्याची लागवड केलेली आहे. त्या ठिकाणी 20 टक्क्यापेक्षा जास्त आंब्याचे उत्पादन येणार नाही. रासायनिक खत आणि किटक नाशक यांचा त्यांनी वापर केलेला नाही, अशाप्रकारे आंब्याची बाग बनविलेली आहे. त्यांचा आंबा आज 20 रुपये किलोने विकला जात नाही. या आंब्याला हापूस आंब्यापेक्षाही चांगली चव आहे. कोणतेही फर्टिलायझर न वापरता वर्षभर ती बाग जोपासलेली आहे. त्या ठिकाणच्या आंब्याला बाजारपेठ उपलब्ध नाही. श्री.रहांगडाळे आणि डॉ. डोळस यांच्याही चांगल्या आंब्याच्या बागा आहेत. ते दसेरी आंब्याचे पीक घेतात. फलोद्यान विभागाने बट्टयाबोळ केलेला आहे. आमची अशी मागणी आहे की, दसेरी आंबा हा पुण्यामध्ये विकला गेला पाहिजे आणि पुण्याकडील हापूस आंबा पूर्व विदर्भात विकला पाहिजे. हापूस आंब्याची कलमे तयार करून विदर्भामध्ये आणि इतरत्र दिली तर मोठयाप्रमाणात हाऊस आंब्याचे उत्पादन होऊ शकेल आणि हापूस आंब्याची चणचण भासणार नाही. आपल्याला पर्यावरण जपायचे असेल तर आंब्याचे पीक जगविणे आवश्यक आहे. आमच्याकडे अशी म्हणण आहे की, आजोबांनी लावलेल्या आंब्याच्या झ ाडाची फळे नातू खातो. तशी गावरान आंब्याची झाडे आहेत. गावरान आंब्याची फळे तोडण्यासाठी खूप कष्ट पडतात, असे असून देखील त्याला काही किंमत मिळत नाही. नागपूर स्टेशनवर 6 संत्रे 20 रूपयाला विकली जातात परंतु आज तेथील आंबा 30 ते 40 पैसे किलोच्यावर विकला जात नाही. त्या आंब्याला बाजारपेठ उपलब्ध नाही. या गावरान आंब्याला बाजारपेठ मिळवून देणे आवश्यक आहे. गावरान आंब्याच्या पिकाला संरक्षण देण्याची गरज आहे. त्यांना वर्षाकाठी 1 हजार रूपयाचे अनुदान उपलब्ध करून दिले पाहिजे. उन्हाळ्यामध्ये त्या झाडाची सावली मिळते, जनावरे त्या ठिकाणी बसतात, पाणी पितात. पर्यावरणाच्या दृष्टीने ती झाडे वाचविणे आवयक आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आंबा पिकाची नवीन कलमे तयार झालेली

श्री.केशवराव मानकर (पुढे सुरू...

आहेत. तेव्हा वन विभागाने आंब्यांच्या झाडांसाठी बांबू फुकटात उपलब्ध करून देऊन मदत केली पाहिजे.कारण ती झाडे वाकतात, फांद्या तुटतात. सर्व आंबा उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये मदत  उपलब्ध करून द्यावी अशी विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3....

SKK/ SBT/ MHM/ KGS/ MHM/

**(तालिका सभापती श्री.भास्कर जाधव)**

श्री.पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे आणि सन्मानीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्यादृटीने जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्यास समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पाऊस, थंडी, उष्णताया तीन गोष्टींचे नियोजन निसर्गाप्रमाणे झालेले नाही, त्याचा हा परिणाम आहे. या निमित्ताने मी सूचना करणार आहे. कोकणामध्ये आंबा आहे त्याचबरोर उर्वरित महाराट्रातील भागामध्येही आंब्याची लागवड झालेली आहे. जो न्याय कोकणातील आंबा उत्पादकांना मिळेल, तोच न्याय इतर विभागातील आंबा उत्पादकांना मिळाला पाहिजे. दुसरी सूचना अशी आहे की, शासनाच्या नियमानुसार आंबा लागवड करण्याची पध्दत सोडून ज्या लोकांनी एका ऐवजी तीन-तीन झाडे लावली त्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने अनुदान नाकारलेले आहे. जास्त झाडे लावली म्हणून अनुदान नाकारण्याचे कारण नाही, मंत्री महोदयांनी याची दखल घेऊन संबंधीत अधिकाऱ्यांना तशा सूचना द्याव्यात आणि आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे जे आंब्याचे नुकसान झालेले आहे त्यांना हेक्टरी 50 हजार रुपयाची मदत द्यावी, अशी विनंती करून माझे दोन शब्द संपवितो.

----

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे ( फलोत्पादन मंत्री ) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. विनोदजी तावडे, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत तसेच त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी महाराष्ट्राच्या आंबा उत्पादकाला कोकणातील ज्या हापूस आंब्याने जागाच्या बाजारपेठेत नवीन ओळख निर्माण करुन दिली त्या हापूस आंब्याच्या संदर्भात नियम 97 अन्वये या सभागृहामध्ये सविस्तर चर्चा घडवून आणलेली आहे. महाराष्ट्राच्या कोणत्याही फळ पिकाच्या बाबतीत नियम 97 अन्वये अडीच तासाची चर्चा होणारा या महाराष्ट्राच्या फलोत्पादनाच्या इतिहासातील कदाचित हा पहिला दिवस असेल असे मला वाटते. म्हणून मी या सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

फळांचे उत्पादन घेणारे शेतकरी आणि त्यांच्याबद्दल लोकप्रतिनिधींच्या मनामध्ये असणारी भावना यातून संशोधनाच्या क्षेत्रात , विक्रीच्या क्षेत्रात, उत्पादनात येणाऱ्या अडचणीच्या क्षेत्रात काही तरी घडावे याबाबत शासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे चांगले काम या चर्चेतून साध्य होऊ शकेल असे मला वाटते. खरे तर या चर्चेत भाग घेत असताना कोकणातील आणि कोकणाच्या बाहेरच्या सुध्दा सन्माननीय सदस्यांनी या पिकाबाबतची इत्यंभूत माहिती या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाला दिलेली आहे. मलाही माहीत नसणाऱ्या अनेक नवीन गोष्टी, या विषयाशी निगडित नवीन ध्येयधोरणे ठरविण्यासाठी उपयोगी असणारी माहिती या चर्चेव्दारे शासनासमोर आली आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. आंबा उत्पादनाच्या बाबतीत काही वेगळे धोरण ठरवावे, आंबा उत्पादनाच्या क्षेत्रात नवीन क्रांती करावी, या क्षेत्रातील सर्व अडचणी एकत्रितपणे दूर कराव्यात आणि आंबा उत्पादकाला न्याय द्यावा या भूमिकेशी शासन सहमत आहे असे मी पहिल्यांदाच या चर्चेला उत्तर देत असताना सांगतो. मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, आज आंब्याच्या बाबतीत अनेक नवीन गोष्टी सभागृहासमोर आलेल्या आहेत. त्याहीपुढे जाऊन काही गोष्टीची माहिती सभागृहाला असणे आवश्यक आहे असे माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटते. त्यात प्रामुख्याने आंबा उत्पादनासाठी आवश्यक असणारे वातावरण, मोहोर येत असताना वातावरणाचे तपमान 15 डिग्रीपेक्षा कमी असावे, मोहोर आल्यानंतर तो टिकण्यासाठी 20 ते 22 डिग्री एवढे तपमान असावे, हवामानातील आर्द्रता 50 टक्क्यापेक्षा खाली जाऊ नये, धुके असू नये, वादळ, वारा आणि पाऊस आला तर त्याचे परिणाम आणि दुष्परिणाम काय होतात, या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS

श्री. विनय कोरे .....

सगळ्या चक्रात त्या ठिकाणी आंब्याचे उत्पादन तयार होत असते. निसर्गावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असणारे हे पीक आहे. निसर्गाच्या या बदलांना सामोरे जात असताना आंबा पिकाच्या बाबतीत सखोल विचार करावा लागणार आहे. या ठिकाणी मदतीच्या संदर्भात काही भावना व्यक्त करण्यात आल्या. पूर्वी दिल्या गेलेल्या मदतीच्या बाबतीत आणि उद्याचे नवीन धोरण ठरवित असताना मदत कशी द्यावयाची व किती द्यावयाची याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या. मला सन्माननीय सदस्यांना सांगितले पाहिजे की, महाराष्ट्र राज्यात ज्यावेळी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फलोद्यानाचा कार्यक्रम सुरु झाला त्यावेळी महाराष्ट्रात असणारी आंब्याची लागवड आणि कोकण विभागात असणारी आंबाची लागवड याची आकडेवारी डोळ्यासमोर घेत असताना असे दिसून येते की, कोकण परिसरात साधारणतः 28 ते 30 हजार हेक्टर इतक्या क्षेत्रात आंब्याची लागवड होती अशी आकडेवारी समोर येत आहे. गेल्या 14-15 वर्षात या योजनेच्या माध्यमातून त्या ठिकाणी जे काम करण्यात आले त्याची आकडेवारी घेत असताना असे दिसून येते की, 100 टक्के अनुदानाची जी योजना महाराष्ट्र शासनाने हाती घेतली त्या योजनेच्या माध्यमातून जवळजवळ 1 लाख 41 हजार हेक्टरपर्यंत नवीन लागवड त्या परिसरात केली. आज त्या ठिकाणी जवळजवळ 75 ते 76 हजार हेक्टर उत्पादनक्षम क्षेत्र निर्माण करु शकलो. अशा प्रकारची अवस्था या क्षेत्रात निर्माण करता आली. खरे तर रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जी मदत दिली जाते ती अपुरी आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 12:10

(श्री. विनय कोरे...

त्या मदतीपेक्षा उत्पादनासाठी जास्त खर्च येतो अशा प्रकारची भावना सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी व्यक्त केली. या अनुषंगाने मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, जर या पेक्षा जास्त खर्च येत असेल तर शासनाच्या ई.जी.एस.च्या खर्चाच्या मर्यादेचा कॉम्पोनन्ट बदलण्याची आणि काही नवीन कॉम्पोनन्ट ॲड करण्याची आवश्यकता असेल तर त्या दृष्टीने ज्या काही गोष्टी सुचवावयाच्या असतील त्या निश्चितपणे सन्माननीय सदस्यांनी सुचवाव्यात. आंब्याच्या बाबतीत खर्चाच्या दृष्टीने ई.जी.एस.चे एक नवीन धोरण महाराष्ट्र शासन तयार करील असे मी सरकारच्या वतीने या ठिकाणी सांगू इच्छितो. प्रत्यक्ष बांधावर काम करणारे शेतकरी, सन्माननीय सदस्य या सर्वांना एकत्र घेऊन धोरण आखले तर ते निश्चितपणे चांगल्या प्रकारचे धोरण असेल. म्हणून सर्वांच्या सहकार्याने उद्याचे नवे धोरण आपल्याला आखता येईल. आंब्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या काही अडीअडचणी सांगितल्या त्या सोडविण्याच्या दृष्टीने कोकण कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून खास प्रयत्न करण्यात आलेले आहेत. आंबा पिकामध्ये हापूस आंब्याने जागतिक बाजारपेठेमध्ये एक वेगळे स्थान निर्माण केलेले आहे. या हापूस आंब्यामध्ये शुगर टू ॲसिड रेशिओ हे प्रमाण अतिशय चांगले आहे.शुगर आणि ॲसिडचे प्रमाण ज्या फळामध्ये चांगले असते ते फळ चवीला आणि गोडीला चांगले असते आणि हे प्रमाण हापूस आंब्यामध्ये चांगले असल्यामुळे हा हापूस आंबा जागतिक स्तरावर लोकप्रिय झालेला आहे.म्हणून हापूस ही जात कशी संवर्धन करता येईल या दृष्टीनेही प्रयत्न झाले आणि "हापूस 900" ही नवी जात संवर्धन करण्याचा प्रयत्न विद्यापीठाच्या माध्यमातून झाला. हापूस जातीच्या आंब्यामध्ये दोन दोष आढळतात. पहिला दोष म्हणजे हापूस आंब्याचे उत्पादन एक वर्षाआड येते.म्हणजे अल्टरनेट बेअरिंग क्रॉप अशा प्रकारचे हे उत्पादन आहे. या हापूस आंब्याचे उत्पादन दरवर्षी घेता येईल का यादृष्टीनेही संशोधनाचे प्रयत्न चालू आहेत. दुसरा दोष म्हणजे कोकणामध्ये ज्याला साका म्हणतात- स्फॉन्जीस टिश्यू - याचे प्रमाण अलिकडेच्या काळामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर वाढायला लागले आहे. जागतिक बाजारपेठेचा विचार करता हापूस आंब्याच्या बाबतीत हे दोन दोष प्रामुख्याने आढळून येतात. हे दोष दूर करण्याच्या दृष्टीने कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन प्रयत्न करीत आहे. हे दोन दोष दूर व्हावेत म्हणून "नीलम" आणि

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनय कोरे...

"हापूस" या जातींचा संकर करुन "रत्ना" ही जात निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यामध्ये आपण 65 टक्क्या पर्यन्तच यशस्वी ठरलो. म्हणजे या प्रयत्नामध्ये आपण पूर्ण यशस्वी झालो नाही. त्यानंतर रत्नाच्या फिमेल आणि हापूसच्या मेल यांचा संकर करुन "सिंधू" ही जात निर्माण केली. हापूस आंब्यामध्ये कोय आणि गर यांचे प्रमाण 1:5 आहे. हे प्रमाण "सिंधू" जातीच्या आंब्यामध्ये 1:25 असे आहे. आंबा पिकावर पडणारे रोग, या परिसरामध्ये होणारे वातावरणातील बदल व घ्यावयाची दक्षता याबाबतीत तसेच वनस्पतींचे आरोग्यशास्त्र सुधारण्यासाठी नवे एन्झाइम वापर वापरता येईल का, नवीन हापूस जात निर्माण करता येईल का या दृष्टीने विद्यापीठाच्या माध्यमातून अनेक संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आलेले आहेत.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे...........

सभापती महोदय, मला याठिकाणी अभिमानाने सांगितले पाहिजे की, कल्टारचा उपयोग जीव वनस्पतीशास्त्र सुधारण्यासाठी करण्याची शिफारस जगात आंबा म्हणून पहिल्यांदा कोणी केली असेल तर कोकण कृषि विद्यापीठाने या क्षेत्रातील संशोधनाचे काम त्याठिकाणी केले गेले आहे. म्हणून अशा या पिकावर सातत्याने काही चांगले घडवायचा आपण जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, आज निर्यातीच्या क्षेत्रात काही चांगले काम या माध्यमातून निर्माण करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. म्हणून निर्यातीची जाणीवपूर्वक माहिती सभागृहासमोर यानिमित्ताने ठेवली पाहिजे असे मला वाटते. सन 2000-01 या सालात निर्यातीमध्ये देशाचा वाटा 44 हजार टन असताना महाराष्ट्रातील निर्यातीचा वाटा 48 हजार टन होता. सन 2004-05 मध्ये देशाचा वाटा 92 हजार टन असताना महाराष्ट्राचा वाटा 33 हजार टनावर राहिला. सन 2005-06 मध्ये देशाचा वाटा 69 हजार टनापर्यंत खाली गेला असतानाही महाराष्ट्राचा वाटा मात्र 33 हजार टनावरुन 45 हजार टनापर्यंत वाढला. सन 2006-07 ची आकडेवारी आज माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु शासनाकडून निर्यातीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले. निर्यातीच्या माध्यमातून आंबा पिकाला जादा भाव शेतकऱ्यांना मिळवून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे अशी या सदनातील अनेक सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केली. म्हणून मला सांगितले पाहिजे की, ॲग्रो एक्स्पोर्ट झ ोनच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्हयात ग्रेडिंग आणि पॅकिंगसाठी एक केंद्र रत्नागिरी जिल्हयात उघडण्यात आले. आंब्याला एक्स्पोर्ट झोनचा दर्जा देण्याचे सांगितले, त्या आंब्याचे एक्स्पोर्ट झोन स्वतंत्ररित्या कार्यान्वित करण्याची योजना महाराष्ट्र शासनाने त्याठिकाणी आखली आहे. ही जागा अद्याप निश्चित केलेली नाही. नाशिकमधील ज्या झोनची चर्चा केली त्या झोनपेक्षा सुध्दा टर्मिनल मार्केट म्हणतो, अशा प्रकारचे टर्मिनल मार्केट नाशिकमध्ये करीत आहोत. आंब्यासाठी कोकणामध्ये मुंबईच्या माध्यमातून प्रामुख्याने एक्स्पोर्टची सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न त्याठिकाणी करायचा आहे. मला याठिकाणी सांगितले पाहिजे की, ज्या व्हेपोरायझेनच्या युनिटचा उल्लेख करण्यात आला, अशा प्रकारचे युनिट नवी मुंबई येथे आहे. तसे युनिट कोकणामध्ये निर्माण करण्यासाठी मंजूरी मिळालेली आहे. फक्त या युनिटची जागा कोकणामध्ये कोणत्या ठिकाणी असावी यासाठी सगळयांच्या एकत्रित बैठकीच्या माध्यमातून जागा निश्चित करुन

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे...........

त्या युनिटचे काम आपल्याला तातडीने सुरु करायचे आहे.

सभापती महोदय, मध्यंतरी आपण वृत्तपत्रात वाचले असेल की, अमेरिकेच्या बाजारात हापूस आंबा नेण्याच्या अनुषंगाने राज्य सरकार जाणीवपूर्वक काही प्रयत्न करीत आहे. हे प्रयत्न करीत असताना तेथील तज्ज्ञांनी याठिकाणी येऊन आपल्याकडे असणाऱ्या निर्यातीच्या व्यवस्थेबाबतचा अभ्यास केला. आपल्याकडील व्यवस्थेच्या माध्यमातून त्यांचे असणारे निर्यातीच्या गुणवत्तेचे निकष आपल्याला कसे राखता येतील याचा विचार केला. या माध्यमातून हा विचार करीत असताना कांद्यासाठी लासलगाव येथे जो इरायझेशन प्रकल्प आहे, त्या प्रकल्पामध्ये आंबा यावर्षी ट्रायल म्हणून घ्यायचा आणि लासलगाव युनिटमध्ये हा प्रयोग करुन यावर्षी आंबा अमेरिकेला पाठविण्याचा प्रयत्न करायचे ठरविले आहे. म्हणून निर्यातीच्या क्षेत्रात मग तो आंबा प्रोसेस केलेला असेल किंवा फ्रेश फ्रूट म्हणून जाणारा आंबा असेल या दोन्ही प्रकारच्या आंब्याला चांगले स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी सांगितले की, मॉडेल ॲक्टमध्ये सुधारणा झाली पाहिजे. रत्नागिरी येथे एपीएमसी मार्केट सुरु करावे अशीही मागणी करण्यात आली. स्वतंत्र मार्केट कमिटी असावी अशीही भावना व्यक्त केली गेली. मला सन्माननीय सदस्यांना सांगितले पाहिजे की, मुंबईच्या बाजारात माल येत असताना नवी मुंबई येथे मार्केट कमिटी आपण निर्माण केली. वेगळी मार्केट कमिटी निर्माण करुन मुंबईची मार्केट कमिटी आपण टाळू शकलो तर त्याचा उपयोग होईल. म्हणून केंद्र सरकारने एक तर मार्केट कमिटीच्या दलालांना कमी करायचे आणि प्रत्यक्ष शेतकरी व ग्राहक यांच्यात एक नवे नाते निर्माण करण्यासाठी म्हणून खाजगी मार्केट कमिटी ॲक्ट नावाचा नवा कायदा त्याठिकाणी मंजूर केला.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे.....

महाराष्ट्र सरकारने तो कायदा लागू करावा अशा प्रकारची शिफारस केलेली आहे. हा कायदा महाराष्ट्रात सुध्दा लागू व्हावा यासाठी दोन्ही सभागृहात यासंदर्भात चर्चा झालेली आहे. त्यामुळे लवकरच मार्केट कमिटी ॲक्ट महाराष्ट्रात लागू होणार आहे. नवीन मुंबई येथील मार्केट यार्डमध्ये काम करणारे व्यापारी आहेत त्यांचे जे काही प्रश्न असतील ते सोडविण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. मॉडेल ॲक्टच्या माध्यमातून मार्केट कमिटीला नव्याने न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न शासन करणार आहे. आंब्याच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी चर्चा घडवून आणल्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्यांनी आंब्याला प्रतिष्ठा तसेच आंबा उत्पादक शेतक-यांना न्याय मिळवून देण्यासाठी बरेच काम केलेले आहे. तसेच त्यांनी गेल्या दोन वर्षापासून आंबा महोत्सव भरवण्यास सुरुवात केलेली आहे. आंबा महोत्सवात देशातील मोठमोठया सेलिब्रेटीजना आणले जात आहे. तसेच त्यांनी आता आंबा महोत्सवासाठी पणन मंत्र्यांना सुध्दा आंमत्रित केलेले आहे. आंबा महोत्सवाच्या चांगल्या कल्पना त्यांनी मला सांगितलेल्या आहेत. तसेच त्यांनी क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर, अमिताभ बच्च्न यांना सुध्दा महोत्सवाठी आमंत्रित केले असून मिडीयाच्या माध्यमातून आंब्याची प्रसिध्दी केली जात आहे. सन्माननीय सदस्यांनी आंब्यासाठी एक स्वतंत्र व्यासपीठ तयार केलेले आहे. आंबा विक्रीच्या दृष्टीने नवे इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न आपल्याला करावे लागणार आहेत. आंब्याच्या संदर्भात विचार करीत असतांना कोकणात आंब्यावर प्रक्रिया करणारे उद्योग कसे निर्माण होतील यासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी स्वत: वारणा नगर येथे 250 टन आंब्यावर प्रक्रिया करता येईल यासंदर्भात एक उद्योग सुरु केलेला आहे. कोकणामध्ये आंब्याचे कॅनिंग करण्याचे उद्योग मोठया प्रमाणात निर्माण होण्याची आवश्यकता आहे. जळगाव येथे आंब्याचे कॅनिंग करण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे कोकणात सुध्दा आंब्याचे कॅनिंग करण्याचा उद्योग सुरु करण्याच्या संदर्भात शासन निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल. कोकणातील सन्माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घेण्याची आवश्यकता आहे की, इतर ठिकाणी आंब्याचे कॅनिंग होऊ शकते तर कोकणात आंब्याचे कॅनिंग करण्याचे काम यशस्वी का होऊ शकत नाही याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. प्रोसेसिंगच्या क्षेत्रात

.....2

श्री. विनय कोरे.....

मार्केटींगला चांगले स्थान देण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे. सहकाराच्या माध्यमातून विश्वासार्हता निर्माण करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्यांना आवडणार नाही अशी एक गोष्ट मला या ठिकाणी सांगावयाची आहे. ही गोष्ट सांगत असतांना आंबा उत्पादकाच्या संदर्भात माझी वेगळी अशी कोणतीही भावना नाही हे प्रथम आपण समजून घ्यावे. मार्केटींग कमिट्यांच्या संदर्भात या चर्चेच्या निमित्ताने सुध्दा आपल्याला आढावा घेण्याची आवश्यकता आहे. या वर्षी आंबा पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. खराब वातावरणामुळे, धुक्यामुळे, अवेळी पावसामुळे आंब्याचे उत्पादन कमी झालेले आहे हे जरी खरे असले तरीही, कोकणात सुध्दा चांगल्या प्रकारे आंब्याचे उत्पादन काढणारे शेतकरी आहेत. यावर्षी खराब हवामान असतांना सुध्दा त्यांच्या आंब्याच्या उत्पादनात 10-15 टक्क्यापेक्षा कमी घट झालेली नाही. असे चांगले आंबा उत्पादक शेतकरी मला बघावयास मिळाले आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे.....

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, बाग शेतकऱ्यांची असते परंतु ते करार करुन कसण्यासाठी दुसऱ्याला दिली जाते. म्हणजे त्याठिकाणी कष्ट करणारी व्यक्ती वेगळी असते. या बागा पाच-दहा वर्षांसाठी दुसऱ्यांना विकलेल्या आहेत अशी सर्वसाधारण आकडेवारी आहे. 65 ते 70 टक्के बागा या व्यापाऱ्यांना विकलेल्या असल्यामुळे होणारे नुकसान हे व्यापाऱ्यांचे आहे. प्रत्यक्षात शेतकऱ्यांचे नुकसान होत नाही अशी सर्वसाधारण परिस्थिती आहे......

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी सांगू इच्छितो की, मी माझ्या भाषणात 1997 पूर्वीची परिस्थिती आणि त्यानंतरची परिस्थिती याची माहिती सांगितली. तेव्हा त्याबाबत मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा. 1997 पूर्वीच्या बागा या पणजोबा-आजोबांच्या काळातील आहेत. 1997 नंतर रोजगार हमीच्या माध्यमातून मदत मिळण्यास सुरुवात झाल्यापासून कोकणातील तरुणांनी मोठ्या प्रमाणावर आंब्याच्या बागा केलेल्या आहेत. ते स्वत: कष्ट करीत आहेत. फक्त त्यांचे मार्केटींग इन्फ्रास्ट्रचर वीकनेस आहे. म्हणून काहीजण त्यांच्या बागा व्यापाऱ्यांना विकत असतील, परंतु सरसकट आंबा उत्पादक शेतकरी व्यापाऱ्यांना बागा विकतो अशी वस्तुस्थिती नाही हे मान्य केले पाहिजे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी माझ्या भाषणात, " कोकणातील 60-70 टक्के आंब्याच्या बागा दुसऱ्यांना दिल्या जातात असे म्हटले जाते" असा उल्लेख केला होता. चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी हे सांगत आहे. काही शेतकरी आपल्या बागा व्यापाऱ्यांना विकत आहेत, परंतु सरसरकट अशी परिस्थिती नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी जो उल्लेख केला तो पूर्णत: चुकीचा आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस तोडणी पासून लागवडीपर्यंतचा सर्व खर्च साखर कारखान्यांमार्फत केला जातो. असे असताना सुध्दा नुकसानीपोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाच मदत दिली जाते. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, कोकणातील आंब्याच्या बागा व्यापाऱ्यांना विकल्या जातात हे पूर्णत: चुकीचे आहे. काही शेतकरी त्यांच्या बागा विकतात. परंतु सरसकट बागा विकल्या जातात अशी परिस्थिती नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी माननीय मंत्रिमहोदयांनी विनंती आहे की, त्यांनी पार्श्वभूमी तयार करु नये. विदर्भात सुध्दा संत्र्यांच्या बागा विकल्या जातात. तेव्हा जी काही मदत दिली जाईल ती शेतकऱ्यांना मिळेल, व्यापाऱ्यांना मिळणार नाही असे माननीय मंत्रिमहोदयांनी येथे सांगावे. त्यांनी अन्य लॉजिकमध्ये जाण्याचे कारण नाही.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, फळ पिकांच्या बाबतीत एवढी विस्तृत चर्चा होणारा हा पहिलाच दिवस आहे.

**तालिका सभापती** : कृपया माननीय मंत्री महोदयांनी मुद्दावर बोलावे.

श्री.मधुकर चव्हाण : माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, हातात धुपटणे देण्याचा हा पहिला दिवस ठरु नये.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, आंब्याच्याबद्दलची भावना मी अगोदरच व्यक्त केली की, ज्यातून चांगले घडावे, शेतकऱ्यांपर्यंत चांगले जावे, राजकीय निर्णयापेक्षा, गोड घोषणेपेक्षाही प्रत्यक्षात शेतकऱ्यांना त्या क्षेत्रात काही चांगले करण्याची उमदे कुठेतरी घडावी अशाप्रकारची चार पाऊल पुढे जाऊन काहीतरी मदत शासनाला देता यावी, अशाप्रकारची भावना मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. म्हणून नुसती मर्यादित अपेक्षा ठरु नये, यातून चांगले काहीतरी निष्पन्न करण्याची माझी भावना आहे. म्हणून मी सांगितले की, व्यापाऱ्यांना ज्या बागा दिल्यात, त्याबाबत मला काही म्हणावयाचे नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आंब्याच्या बागा कॉन्ट्रॅक्टरला दिल्या जातात, असे माननीय मंत्री महोदय म्हणाले. काही बागा कॉन्ट्रॅक्टरला दिल्या जात असतील परंतु त्यावर प्रत्यक्षात काम हे शेतकरीच करीत असतो. त्या बागांची सगळी जबाबदारीही शेवटी शेतकऱ्यांचीच असते. याठिकाणी मूळ विषयास माननीय मंत्री महोदयांनी बगल देऊ नये, अशी माझी त्यांना विनंती आहे.

**तालिका सभापती** : 50 हजार रुपये हेक्टरी मदत देण्याच्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी बोलावे.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, शासन याबाबतीत मागे राहणार नाही. परंतु याठिकाणी काही गोष्टी समजून घेणे आवश्यक आहे. यामध्ये कोणाच्या भावना दुखवण्याचा हेतू नाही. परंतु या सगळया गोष्टी डोळयासमोर ठेवत असताना, त्याठिकाणी बागा नेमक्या कोणाच्या आहेत ? त्यामध्ये नेमके किती नुकसान झाले ? प्रत्यक्षात किती नुकसान भरपाई द्यावे लागेल ? याबाबतीत मला वाटते, माननीय मुख्यमंत्र्यांनी कोकण विकासाच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना याबाबतीत सर्व्हे करण्याचे आदेश दिलेले आहेत. याबाबतीतील नुकसान भरपाईचे काम

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे....

सुरु आहे. फलोत्पादन मंत्री म्हणून यावर्षी आंब्याचे उत्पादन कमी झालेले आहे, हे रेकॉर्डवरच आहे व ते आपण मान्यही करीत आहोत. म्हणून मदत ही दिली जाणार आहे, यात कोणीही शंका काढण्याचे कारण नाही. परंतु याठिकाणी मला सांगितले पाहिजे की, आवक आणि मिळालेला दर हेसुध्दा कुठेतरी रेकॉर्डवर असले पाहिजेत. सन 2006-07 च्या फेब्रुवारी महिन्यांत आंब्याचे 232 ट्रक आले होते, यावर्षी 170 ट्रक आले. आंब्याचे उत्पादन कमी झाले आहे, तसे रेकॉर्डवरही आहे. कारण, फेब्रुवारी महिन्यातील हा दर एक हजार होता, तो दोन हजार होणार, त्यामुळे 232 ट्रकमधून 10 कोटी रुपयांचे उत्पादन आले होते, त्याऐवजी यावर्षी साडे 15 कोटी रुपयांचे उत्पादन आले, हे रेकॉर्डवर असले पाहिजे.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकदम बोलतात. )

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय याठिकाणी जे उत्तर देत आहेत, ते सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. आंब्याचे जे ट्रक येतात, ते काही मुंबईमध्येच येतात अशातला भाग नाही, ते अहमदाबादला, पुण्याला, नाशिकला किंवा इतर ठिकाणीही बाहेर जातात.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकदम बोलतात. )

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, याठिकाणी अतिशय सिंपल प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदय, हे रचनात्मक विचार करणारे आहेत, ते शेतकऱ्यांचा विचार करणारे मंत्री आहेत. त्यांचा या क्षेत्रातील अनुभव दांडगा आहे. याठिकाणी अधिकारी काय लिहून देतात त्याकडे ते लक्ष देणार नाहीत. याठिकाणी प्रश्न एवढाच आहे की, आपण आंब्याचे नुकसान झाल्याचे मान्य केलेले आहे. मग, याबाबतीत आपण हेक्टरी किती मदत देणार आहात ? याचे त्यांनी चांगले उत्तर द्यावे व शेवट गोड करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे. त्यांनी आंबे खाऊन कोया आमच्या हातात देऊ नये. याठिकाणी सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे आपण जर मदत दिली तर आम्हीही आपले बाके वाजवून स्वागत करु. माननीय मंत्री महोदय जरी जनसुराज्य पक्षाचे असले तरी याठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार त्यांना समर्थन देणार आहेत. सगळे आपणांस समर्थन करीत आहेत.

नंतर कु.गायकवाड....

अप्रधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

सन्माननीय मंत्रीश्री. विनय कोरे साहेब आपण फलोत्पादन खात्याचे मंत्री आहात. आपण घोषणा केली पाहिजे. आपले चार जणांचे सरकार आहे म्हणून घोषणा करावयाची नाही असे काही आपण ठरविलेले आहे का ? घोषणा करण्याचा आपल्याला अधिकार आहे. त्यामुळे सरकारकडून किती मदत दिली जाईल या संदर्भात आपण घोषणा करावी.

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, चर्चेत व्यत्यय आणला जात आहे. शासनाकडून आंबा उत्पादकांस मदत दिली जाणार आहे. सन्माननीय सदस्यांना आंबा उत्पादक शेतकऱ्यांबाबत साहानुभूति आहे की, केवळ प्रसिद्धी मिळविण्यासाठी अशी विधाने सभागृहात केली जात आहे....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मला अशा प्रकारे प्रसिध्दि मिळविण्याची काहीही गरज नाही. आम्ही सभगृहाबाहेर जी वक्तव्ये करतो ती माननीय मंत्री महोदयांची विधाने एक वेळ वृत्तपत्रात छापून येत नाही परंतु आमची विधाने छापून येतात. मंत्री महोदय येथे जी पार्श्वभूमी तयार करीत आहे ती बरोबर नाही. ते या खात्याचे मंत्री आहेत. नुकसानभरपाईच्या संदर्भात घोषणा करण्याचा त्यांना अधिकार आहे. " केला जाईल,बघितले जाईल " अशा प्रकारे भविष्य काळाची घोषणा आपण कशासाठी करीत आहात ? आपल्याकडे या खात्याची पॉवर नाही आहे का ? घोषणा करु नका असे आपल्याला सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे का? त्याचप्रमाणे सभपती महोदय, प्रसिद्धीच्या संदर्भात हेत्वारोप कामकाजातून काढून टाकण्यात यावेत, अशी आपल्याला विनंती आहे.

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, माझी सभागृहाला विनंती आहे की, . सन 1999 मध्ये शासनाने आंबा उत्पादक शेतकऱ्यास सरसकट मदत दिली होती. त्यानंतर 2004-05मध्ये मदत देण्यात आली होती. त्यावेळी शेतकऱ्याना शासनाने दिलेले साडे सहा कोटी रुपये आजही तहसिल कार्यालयात पडून आहेत. हे पैसे न्यावयास शेतकरी आलेच नाहीत. सात बाराच्या उताऱ्यावरील अडचणीमुळे त्यांना हे पैसे नेता आले नाहीत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, शासनाने दिलेली मदत घ्यावयास शेतकरी आले नाहीत अशी माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेली माहिती बरोबर नाही.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (भास्कर जाधव)** : सातबाऱ्याच्या उताऱ्यामधील अडचणीमुळे असे वाक्य ते पुढे बोलले आहेत.

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, शासनाने 2004-05 मध्ये मंजूर केलेले साडेसहा कोटी रुपये आजही शेतकऱ्यांना देण्याचे बाकी आहे. या वेळी आंबा उत्पादक शेतकऱ्यांना मदत देताना ती कशी द्यावी, वेगवेगळया कामासाठी द्यावी का या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्री घोषणा करणार आहेत. कोकण विकासाच्या चर्चेच्या वेळी " सर्व्हे करण्याचे आदेश देण्यात येतील " असे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्याप्रमाणे सर्व्हे करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. या सर्व्हेचा रिपोर्ट आल्यानंतर कोकण विभागातील लोकप्रतिनिधींना एकत्रित घेऊन दापोली कृषिविद्यापीठात बैठक घेण्यात येईल. त्यावेळी सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांना देखील बैठकीसाठी निमंत्रित केले जाईल. रो.ह.यो.च्या अंतर्गत करावयाच्या नवीन आंबा झाडांच्या लागवडीबाबत सात - बाराच्या उताऱ्यामधील नोंदीची अडचण आहे.जमिनीची विक्री करण्याबाबत अडचण आहे याबाबत नवीन धोरण स्वीकारण्याची आवश्यकता आहे. वातावरणात साततत्याने होणारे बदल, ग्लोबल वॉर्मिंग यामुळे आंबा उत्पादक अडचणीत येणार आहे. याचा गंभीर विचार शासनास करणे आवश्यक आहे. कंट्रोल्ड क्लायमेट मध्ये पिकाचे उत्पादन घेता येईल का याचा विचार शासन करीत आहे. ग्रीन हाऊस मध्ये मोहोर येऊन फळाची धारणा होताना नियंत्रित तापमान ठेवून उत्पादन करता येईल का तसेच शासनाकडून जी मदत दिली जाणार आहे त्या मदतीमुळे आंबा उत्पादनाच्या क्षेत्रात नवीन क्रांती घडविता येईल का या संदर्भात शासन विचार करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. रोझेकर ...

श्री.विनय कोरे.........

या अनुषंगाने त्यासाठीचे धोरण ठरवावे आणि प्रत्यक्षपणे 50 हजार रुपयांपेक्षा जास्त मदत द्यावी लागली तरी या क्षेत्राला चांगले घडविण्यासाठी ती देण्याचा निर्णय घेता येईल काय, यासाठी शासनाचा प्रयत्न आहे. या परिस्थितीत सर्व सन्माननीय सदस्यांनी शासनाला सहकार्य करावे, एवढी भूमिका मांडतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, शेतक-यांच्या हातात मंत्री महोदयांनी धुपाटने दिले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला असे वाटते की, मंत्री महोदयांचा हेतू कितीही चांगला असला तरी लॉंग टर्म उपाययोजना करायच्या असतील त्या करा पण आत्ता काही तरी शॉर्ट टर्म मदत घोषित करा. सर्व्हे करणे, अधिक उत्पादन येण्यासाठी उपाययोजना करणे हे फलोत्पादन मंत्रालयाचे कामच आहे, त्याची सांगड नुकसान भरपाईशी घालू नका. फलोत्पादन मंत्रालयाचे काम हे निरंतर चालणारे आहे, ते त्यांनी केले पाहिजे. तसेच, सन्माननीय मंत्री महोदयांनी असे वक्तव्य केले की, कोकणातील शेतक-यांना यापूर्वी दिलेल्या मदतीपैकी 6.50 कोटी रुपये पडून आहेत, शेतक-यांनी ही मदत उचलली नाही, शेतकरी मदत घेण्यासाठी आला नाही. शेतकरी आला नाही, हे वाक्य असत्य आहे, ते कामकाजातून काढून टाकावे, अशी माझी विनंती आहे. शेतकरी एकदा नाही तर दहादा कार्यालयात गेले परंतु तेथील अधिकारी जबाबदारी उचलण्यास तयार नाहीत. 7/12 उता-यावर अनेक भावांची नावे असल्यामुळे मदत दिल्यानंतर दुसरा कोणी हक्क सांगण्यासाठी येणार नाही म्हणून हमी लिहून द्यावी, असे अधिका-यांनी सांगितल्यानंतर शेतक-यांनी हमी पत्र लिहून दिले तरीही तालुक्याचे अधिकारी जबाबदारी घेण्यास तयार नाहीत, त्यामुळे मदतीचे पैसे पडून राहिले. 7/12 उता-यावर नावे असलेल्या भावांच्या सहया घेण्यासाठी शेतक-याला 10 हजार रुपये खर्च आला असतांना आणि त्यासाठी दहादा चकरा मारल्या असतांना त्यांना मदत मिळालेली नाही. यावर उत्तर शोधले पाहिजे, हे खरे असले तरी ही बाब लॉग टर्म पॉलिसी ठरवितांना विचारात घ्यावी. आज या शेतक-यांना शासन कोणता दिलासा देणार आहे ? ऊसाला मदत दिली जाते, वाहतुकीसाठी प्रति किलोमीटर 2 रुपये

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे............

वाहतूक सबसिडी दिली जाते, ही मदत सर्व्हे केल्यानंतर दिली का ? हा निर्णय घेण्यापूर्वी बैठक घेतली का ? एकाला वेगळा न्याय आणि दुस-याला वेगळा न्याय, असे करुन चालणार नाही. आत्ता शेतक-याला किती देणार ते घोषित करा. उद्या अधिवेशन गुंडाळले की, कोकणवासियांना हे सरकार गुंडाळणार. मग सन्माननीय सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी, श्री.राजन तेली, सन्माननीय मंत्री, श्री.सुनील तटकरे यांचे काही चालणार नाही. म्हणून सभापती महोदय आपण निदेश द्या की, आजच या ठिकाणी शेतक-याला मदत घोषित करावी.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, सभागृहात चर्चा होत असतांना ऊसाची, कापसाची, संत्र्याची तुलना करण्याचे कारण नाही. ऊसाला जी मदत दिली आहे त्यानुसार 31 मे नंतर शिल्लक राहिलेल्या ऊसाचा सर्व्हे झाल्यानंतर जो ऊस शिल्लक दिसेल त्यासाठीच्या वाहतूक खर्चासाठी प्रति किलोमीटर 2 रुपये या प्रमाणे मदत देण्यात येणार आहे. साखर आयुक्त एका कारखान्यातील शिल्लक राहिलेला ऊस दुस-या कारखान्याला ॲलॉट करणार आहेत, एका कारखान्यातून दुस-या कारखान्यात हा ऊस न्यावा लागणार आहे, त्यासाठी ही मदत आहे. सरसकट मदत घोषित केलेली नाही. कापसाच्या बाबतीत, संत्र्याच्या बाबतीत सर्व्हे झाल्याशिवाय आजपर्यन्त मदत दिली गेलेली नाही. मी जाहीर करीत असलेल्या मदतीचे स्वरुप सन्माननीय सदस्यांना मान्य नसेल तर............

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आकस्मिक मदत किती देणार ? हे मंत्री महोदयांनी सांगावे.

डॉ.दीपक सावंत : सर्व्हे करुन वर्षभरानंतर शेतक-यांना मदत मिळणार असेल तर ते शेतकरी मरतील, या शेतक-यांच्या आत्महत्या तुम्हाला पाहिजेत का ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. सरप्लस ऊसाच्या बाबतीत सरकारने कोणताही सर्व्हे न करता मदत जाहीर केली आहे. साखरेचा उतारा कमी होत आहे त्यासाठी शासनाने मदत जाहीर केली, याकरिता कोणताही सर्व्हे केलेला नाही. कोकणातील शेतक-यांचे नुकसान झाले आहे. ऊसाच्या बाबतीत सर्व्हे न करता घोषणा केली. सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांचे असे म्हणणे आहे की, ऊसाला मदत दिली तर आम्हालाही नाराज करु नका, आम्हालाही द्या. कोकण हा मागासलेला भाग आहे, त्यांना

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...........

मदत दिली पाहिजे. अशा प्रकारे डिसक्रिमिनेशन का करता ? सन्माननीय मंत्री, श्री.विनय कोरे हे साखर कारखानदार आहेत. मी त्यांना एक प्रश्न विचारतो. ट्रान्स्पोर्ट सबसिडी, ऊस उतारा सबसिडी सर्व्हे करुन दिली की सर्व्हेच्या आधी दिली ? ही मदत सर्व्हे करण्याच्या आधी दिलेली आहे. 31 मे नंतर ऊस उरला तर अशी अशी मदत देण्यात येईल, हेच जाहीर केले आहे.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी हे असत्य माहिती सांगत आहेत, तेही साखर कारखानदार आहेत. ऊस वेळेत संपला नाही तर ट्रान्स्पोर्ट सबसिडी.....................

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : मंत्री महोदयांनी धोरणात्मक निर्णय जाहीर करावा.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

यानंतर कु.जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे : ट्रान्सपोर्ट सबसिडी निर्णय दिला त्यावेळीही सर्व्हे घेण्यात आला होता.

श्री.विनोद तावडे : हे नुकसान भरपाई धोरण आपण सर्व्हे न करता घोषित करावे.

श्री.मधुकर चव्हाण : आपण आता या सभागृहामध्ये हे धोरण घोषित करावे.

श्री.विनय कोरे : कापसाच्या आणि ऊसाच्या बाबतीत देखील सर्व सन्माननीय सदस्यांच्या मौलिक सूचनांचा विचार करुनच धोरण घोषित करण्यात आले होते.

( गोंधळ )

श्री.विनोद तावडे : आपण सर्व लोकप्रतिनिधींची आज संध्याकाळी आपल्या दालनामध्ये एक बैठक बोलावून धोरण घोषित करावे, आम्ही सर्व त्याकरिताही तयार आहोत.

डॉ.दीपक सावंत : अन्यथा हे सभागृह चालणार नाही, आम्ही ते चालू देणार नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आतापर्यंत नेहमी कोकणातील शेतक-यावर अन्यायच होत आलेला आहे.

श्री.राजन तेली : माननीय मंत्रिमहोदय, आपण मघाशी मान्य केले की, कोकणातील आंबा उत्पादक शेतक-याचे 50 टक्के व त्यापेक्षाही अधिक प्रमाणात नुकसान झालेले आहे.

श्री.विनय कोरे : ज्या शेतक-यांचे 50 टक्क्याहूनही जास्त नुकसान झालेले आहे, त्यांच्याकरिता मला नुकसान भरपाईचे प्रभावी धोरण डिक्लेअर करावयाला काही हरकत नाही. परंतु ज्या शेतक-यांचे नुकसान 50 टक्क्यांपेक्षा जास्त झालेले आहे त्यांच्याकरिता वेगळे धोरण आखावे लागेल.

( गोंधळ )

श्री.राजन तेली : परंतु ज्या शेतक-यांचे नुकसान 50 टक्क्यांपेक्षाही जास्त झालेले आहे, त्यांच्याबाबत तरी धोरण लवकरात लवकर जाहीर करणे गरजेचे आहे.

श्री.विनय कोरे : सदर धोरण जाहीर करतांना लार्जर इंटरेस्ट तपासले जावेत,कोणाचेही नुकसान होता कामा नये, हीच माझी इच्छा आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, शासन आंबा उत्पादक शेतक-यांना हेक्टरी किती नुकसान भरपाई देणार ? ते जाहीर करावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हेक्टरमागील नुकसानभरपाईची आकडेवारी लवकरात लवकर घोषित करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे : गेल्या वर्षी आंबा उत्पादक शेतक-यांना हेक्टरी 10 हजार रुपये नुकसान भरपाई म्हणून दिले गेले होते.

**तालिका सभापती ( श्री.भास्कर जाधव )** : माननीय मंत्रिमहोदय, ते धोरण आता जुने झालेले आहे, तेही परिस्थितीजन्य होते.

श्री.विनय कोरे : या निर्णयाकरिता मला हा विषय कॅबिनेटसमोर मांडावा लागेल.

( गोंधळ )

श्री.विनोद तावडे : आंबा उत्पादक शेतक-यांच्या नुकसानभरपाईच्या धोरणाविषयी आपण कॅबिनेट मिटींग बोलावू असे सांगता परंतु ऊस,कापूस याबाबतही कॅबिनेटसमोर विषय मांडण्यात आला होता.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आंबा उत्पादक शेतक-यांना देण्यात येणा-या नुकसान भरपाईच्या रकमेची घोषणा आज संध्याकाळी कॅबिनेटची बैठक घेऊन उद्या अधिवेशन संपण्याच्या आत करण्यात यावी.

श्री.राजन तेली : सदर घोषणा लवकरात लवकर करावी, या वर्षाची नुकसान भरपाईची रक्कम शेतक-यांना याच वर्षी मिळाली पाहिजे कारण सन 2004 ची नुकसान भरपाईची रक्कम आतापर्यंतही काही शेतक-यांना प्राप्त झालेली नाही, म्हणजे ही रक्कम मिळावयाला तीन वर्षाचाही कालावधी लोटतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कोकणाच्या चर्चेमध्ये बोलतांना सर्व सन्माननीय सदस्यांनी हा मुद्दा मांडला होता की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी कॅबिनेटमध्ये ज्यावेळी ऊसाच्या अतिरिक्त पिकाबाबत घोषणा केली त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांना आंब्याच्या पिकाच्या नुकसानीबाबत कल्पना होती मग त्याचवेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आंब्याच्या नुकसानीविषयी का धोरण निश्चित नाही केले ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, यातून मी दोन पर्याय सांगतो पहिला असा की, येत्या आठ दिवसांमध्ये कॅबिनेटमध्ये आंबा उत्पादक शेतक-यांच्या नुकसानीचा मुद्दा मांडून लवकरात लवकर निर्णय जाहीर करतो, अशी सभागृहामध्ये घोषण माननीय मंत्रिमहोदयांनी करावी अन्यथा दुसरा पर्याय असा की, आज संध्याकाळी सर्व सन्माननीय सदस्यांची बैठक बोलावून आंबा उत्पादक

HH - 3



JPK/ MHM/ KGS/ 12:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

शेतक-यांच्या नुकसानीविषयीयी ठोस असा निर्णय घेऊन तो उद्या सभागृहामध्ये जाहीर करावा.

श्री.विनय कोरे : सन्माननीय सदस्यांची बैठक आज संध्याकाळी घेता येईल, त्याबाबत काही अडचण असण्याचे कारण नाही परंतु सदर विषय कॅबिनेटसमोर मांडल्यानंतरच योग्य तो निर्णय घेता येणे शक्य आहे.

**तालिका सभापती** : आंबा

उत्पादक शेतक-यांना किती रक्कम द्यावयाची व किती नाही आणि हे धोरण कसे व कधी जाहीर करावे, हे दोन्ही विषय वेगवेगळे आहेत.

श्री.विनय कोरे : ऊसाच्या पिकाच्याबाबत हा विषय प्रथम कॅबिनेटसमोर आणून मगच योग्य तो निर्णय घेण्यात आला होता त्याप्रमाणेच आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबतचा निर्णय देखील कॅबिनेटसमोर आणून मला यातून काहीतरी चांगलेच घडवून आणावयाचे आहे, अशीच माझी यामागे भावना आहे.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय मंत्रिमहोदयांच्या भावनांचा आम्ही सर्व नितांत आदर करतो.

श्री.नितीन गडकरी : उद्या सकाळी कॅबिनेटची मिटींग बोलवा त्यामध्ये योग्य असा निर्णय घेऊन त्या निर्णयाची उद्या सभागृह संपण्याच्या आत घोषणा करावी.

श्री.विनय कोरे : सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी मघाशी सांगितलेल्या दोन पर्यायांपैकी पहिला अतिशय चांगला आहे.

श्री. नितीन गडकरी : आता आपण पहिला पर्याय का निवडला ?

( गोंधळ )

श्री.सुनील तटकरे : मी कोकणातीलच आहे,म्हणूनच मी या ठिकाणी असे सांगू इच्छितो की, सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.विनय कोरे जे सांगत आहेत, ते कोकणाच्या दृष्टीने योग्यच असेल.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांना योग्य ती नुसान भरपाई मिळाली पाहिजे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय फलोत्पादन मंत्री श्री.विनय कोरे जे सांगत आहेत ते सन्माननीय सदस्यांनी समजून घेणे आवश्यक आहे. आम्ही दोघेही कोकणातील मंत्री आहोत. मागच्या वेळी आंब्याला जी नुकसान भरपाई देण्यात आली होती त्यापेक्षा जास्त नुकसान भरपाई दिली जाईल, असे माननीय फलोत्पादन मंत्री सांगत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी कॅबिनेटसमोर जाऊन निर्णय घेण्यासंदर्भात सूचविलेले आहे, ते योग्य आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय श्री.सुनील तटकरे आणि माननीय श्री.विनय कोरे हे दोघेही कॅबिनेट मंत्री आहेत. उद्या सकाळी कॅबिनेटसमोर जाऊन आंबा उत्पादक शेतक-याला नुकसान भरपाई देण्यासंदर्भात हे अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेण्यात यावा.

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, मागच्या वेळी आंबा उत्पादक शेतक-यांना जी नुकसान भरपाई देण्यात आली होती, त्यापेक्षा जास्त नुकसान भरपाई देण्याची भूमिका शासन घेईल. नुकसान भरपाई किती देणार ? हे आजच सांगा, उद्या सांगा, असे म्हणणे बरोबर नाही.

**तालिका सभापती** : आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे, हे माननीय मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्यासंदर्भात सभागृहामध्ये चर्चा होणार आहे, याची माननीय मंत्री महोदयांना आधीच कल्पना होती.

**तालिका सभापती** : मागच्या कित्येक वर्षानंतर सभागृहामध्ये हळूहळू कोकणाचे विषय येत आहेत. सन्माननीय सदस्यांचे शासनावर जसा दबाव वाढेल, त्याप्रमाणे शासन कोकणाकडे जास्त लक्ष देईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय फलोत्पादन मंत्र्यांचे लाँग टर्मचे विचार चांगले आहेत, हे मला मान्य आहे. यू.एल.सी. ॲक्ट संदर्भात कॅबिनेटची तातडीची बैठक बोलाविली जाते. बिल्डरांसाठी, ऊसाला मदत देण्यासाठी कॅबिनेटची तातडीची बैठक बोलाविली जाते. माननीय श्री.सुनील तटकरे यांच्यासारखे कोकणातील कॅबिनेट मंत्री असतांना कोकणातील

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..........

गरीब आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात कॅबिनेटची बैठक का बोलाविली जात नाही ? अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सकाळी कॅबिनेटची बैठक होत असते. उद्या सकाळी होणा-या कॅबिनेटच्या बैठकीमध्ये आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबतचा निर्णय घेऊन सभागृहामध्ये घोषणा करावी, अशी आमची विनंती आहे.

**तालिका सभापती** : कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे. चर्चेला न्याय मिळालेला आहे. उद्या होणा-या कॅबिनेट बैठकीमध्ये माननीय फलोत्पादन मंत्र्यांनी हा विषय मांडावा आणि कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात हे अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहामध्ये घोषणा करावी, अशी सर्व सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे. माननीय फलोत्पादन मंत्र्यांनी कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांना लवकरात लवकर मदत देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा. तसेच, कोकण कृषी विद्यापीठाची जी बैठक बोलाविली जाणार आहे त्या बैठकीला माननीय श्री.सुनील तटकरे, माननीय श्री.रवीशेठ पाटील या दोन्ही मंत्री महोदयांना बोलवावे.

अल्पकालीन चर्चा आता संपलेली आहे. आता मी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 54 मिनिटांनी दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**<u>नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करणेबाबत</u>**

**सभापती** : आज सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, सय्यद पाशा पटेल, मधुकर चव्हाण, केशवराव मानकर, प्रकाश शेंडगे, यांनी "राज्यात सुरु असलेले अतिरिक्त भारनियमन, त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र संताप, राज्यात विविध विद्युत कार्यालयांवर होत असलेली दगडफेक व तोडफोड, भारनियमनामुळे राज्यातील उद्योग घटक इतर राज्यात स्थलांतरीत होत असणे, गेल्या सात आठ वर्षापासून अतिरिक्त मे.वॅट वीज उत्पादन करण्यास आलेले अपयश, भारनियमनामुळे पाणीपुरवठयावर होत असलेला विपरीत परिणाम, याबाबत राज्य शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता " याबाबत चर्चा करण्यासाठी नियम 289 अन्वये सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करण्याची सूचना दिली आहे. याबाबत सन्माननीय सदस्य श्री पांडुरंग फुंडकर यांना बोलण्यास परवानगी देत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वीज नियामक आयोगाने वाढीव भारनियमनाबाबत प्रस्ताव दाखल केला असून त्यांची आज सुनावणी आहे. आज राज्यामध्ये विजेचा तुटवडा साडेपाच हजार मेगावॅटवरुन साडेसहा हजार मेगावॅटपर्यंत गेलेला आहे. ग्रामीण भागामध्ये मी कालच पाहून आलो, तेथे 18 तास व तालुक्याच्या ठिकाणी 12 तास लोडशेडींग केले जात आहे. भारनियमन होत असताना आज विदर्भातील तापमान 45 अंशावर गेलेले आहे. इतके भयानक तापमान असताना 18 तास लोडशेडींग सुरु आहे. याचा परिणाम असा होत आहे, जनतेमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होत आहे. बऱ्याच ठिकाणी वीज कार्यालयावर हल्ला होत असून जनतेमध्ये उद्रेक सुरु झाला आहे. अमरावती, उमरेड, काटोल येथे असे प्रकार घडलेले आहे. खामगाव येथे वीज मंडळाच्या एक्सीक्युटीव्ह इंजिनियर व अधिकाऱ्यांना मारहान करण्यात आली. वीज कार्यालयाची मोडतोड झाली. लोडशेडींगमध्ये राज्यातील उद्योगधंदे बंद असलेल्या अवस्थेत आहेत, उत्पादनक्षमता कमी झालेली आहे, कामगार बेकार होत आहेत. शेतकऱ्याला विजेचे कनेक्शन मिळत नाही. आता तर शेतकरी म्हणत आहे की, वीज नसेल तर कनेक्शन घ्यायचे कशाला. शेतकरी हवालदिल झालेला आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, लोडशेडींगमुळे राज्यामध्ये गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. अधिवेशन दोन दिवस चालणार आहे. पुढील 2-3 महिने महाराष्ट्रातील जनतेसाठी अतिशय कठीण जाणार आहेत. अशा अवस्थेत इतर कामकाज बाजूला सारुन आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा व या विषयावर चर्चा घडवून आणावी, अशा प्रकारची विनंती मी करीत आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते माननीय पांडुरंग फुंडकर यांनी महाराष्ट्रातील लोडशेडींग व त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या प्रश्नावर 289 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, लोडशेडींगमुळे अमरावती व वरुड कार्यालयावर हल्ले झाले, गोळीबार झाला, बंद पुकारण्यात आला. अशाच प्रकारे राज्यात अनेक ठिकाणी जनतेमध्ये असंतोष निर्माण होत आहे. लोडशेडींगचा कालावधी अजून वाढविण्यासाठी वीज नियामक आयोगासमोर आज सुनावणी आहे. आज महाराष्ट्रामध्ये 18-18 तास लोडशेडींग असताना 24 तास लोडशेडींग करावयाची आहे काय ? सध्या फक्त मुंबईमध्ये लोडशेडींग नाही, महाराष्ट्रात सर्वत्र लोडशेडींग आहे, शेतकऱ्यांना वीज नाही, विद्यार्थ्यांना अभ्यासात अडचणी येत आहे, उद्योग बंद पडत आहेत. 48 अंश तापमानामध्ये लोक तडफडत आहेत, अशा प्रकारची गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे, त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन लोडशेडींग बाबत काय उपाययोजना करावी या प्रस्तावावर चर्चेची अनुमती द्यावी अशी माझी विनंती आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अतिशय तातडीच्या आणि महत्त्वाच्या विषयावर आम्ही नियम 289 चा प्रस्ताव दिलेला आहे. प्रश्नोत्तराचा तास रद्द करावा आणि या तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या गंभीर विषयावर तातडीने चर्चा करावी यासाठी आम्ही हा प्रस्ताव दिलेला आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये सध्या सगळीकडे अंधार पसरलेला आहे आणि तो दूर होऊन प्रकाश आणावा या उद्देशाने ही चर्चा आम्ही येथे मागितली आहे. सभापती महोदय, आज परिस्थिती इतकी भयानक झालेली आहे की, जवळ जवळ पावणेसात हजार मे.वॅ. वीजेची कमतरता जाणवते आहे आणि वीज निर्मिती मात्र केवळ साडेतीन हजार मे.वॅ. इतकीच होत आहे. आपल्याकडील वीज निर्माण करणारी जनित्रे बंद पडलेली आहेत किंवा काय ? आपली वीज निर्मिती करणारी आणि वीज वितरण करणारी कंपनी काय करते आहे हाही प्रश्न पडतो आह. राज्यातील जनता उन्हाळ्यामध्ये तडफडत आहे, पंखा नाही, पाणी नाही, वीज नसल्याने पंप चालवू शकत नाही, विजेची सारी उपकरणे बंद पडली आहेत, मोठमोठ्या शहरांमध्ये भारनियम यावे अशी मागणी लोकांकडून विशेषत: ग्रामीण भागांतून होऊ लागली आहे. त्यातच आता एमइआरसी नावाची संघटना उभी राहिली आहे आणि तिच्याकडे वीज निर्मिती नाही, वीज वितरण नाही, विजेचा पुरवठा नाही आणि तरीही वीज दरवाढ करून द्या अशी मागणी केली जात आहे. लोकांना अंधारात ठेवून वीज निर्मिती आणि वीज वितरण करणाऱ्या कंपन्या चालविल्या जात आहेत. त्यामुळे वीज नियामक आयोग कोणाची बटिक आहे काय असा संभ्रम लोकांच्या मनात निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, या साऱ्या पार्श्वभूमीवर आम्ही तातडीने ही चर्चा मागितली आहे, ती आपण त्यामागील गांभीर्य लक्षात घेऊन मंजूर करावी आणि या चर्चेच्या अनुषंगाने आम्हाला येथे मांडावयाच्या आहेत. सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील आता कंदील मंत्री झालेले आहेत, त्यामुळे त्यांचा राजीनामा देखील आम्हाला येथे नाईलाजाने मागावा लागणार आहे. तेव्हा ही चर्चा आम्हाला येथे मिळालीच पाहिजे म्हणून आम्ही आग्रह धरलेला आहे, तो आपण मान्य करावा ही विनंती.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या चर्चेचे गांभीर्य एवढे वाढलेले आहे की, हे अधिवेशन चालू असतानाच सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री.वळसे-पाटील सातत्याने दूरदर्शनच्या माध्यमातून लोकांपुढे येताहेत आणि विविध प्रकारे लोकांना सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत की, भारनियमनाला शांतपणे सामोरे जा. या संदर्भात विविध अधिकाऱ्यांच्या बैठका बोलाविल्या जातात

...... केके 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

आणि काल तर असे दाखविले आहे की, आणखी एक दिवस कारखाने बंद ठेवावा लागणार आहे. अशी परिस्थिती सर्वत्र निर्माण झालेली आहे आणि वर्तमानपत्रातून असे छापून आलेले आहे की, त्यांच्याच पक्षाचे एक ज्येष्ठ मंत्री श्री.अजितदादा पवार हे मंत्रिमंडळ बैठकीमध्ये विजेएवढे गरम झाले होते आणि त्यांनी या संपूर्ण प्रकाराबद्दल चिंता व्यक्त केली. मला आनंद या गोष्टीचा झाला आहे की, आता मंत्र्यांना देखील जनतेची, जनतेकडून मिळणाऱ्या प्रतिसादाबद्दलची चिंता वाटू लागली आहे. असे असतानाच वरूड येथे लोकांनी 20 तासाच्या भारनियमनाबद्दल आंदोलन केले, दुसरीकडे अमरावती देखील या कारणामुळे बंद आहे. हे लोण महाराष्ट्रभर आता पसरणार आहे. अशा परिस्थितीत आमचे ऊर्जा मंत्री सांगत आहेत की, लोकांनी शांत रहावे, भारनियमनाला सामोरे जावे. भार नियमन आवश्यक आहे. राज्यात 6 हजार मे.वॅ. विजेचा तुटवडा आहे. त्यामुळे मिळणारे पाणी, साठविलेले पाणी देखील मिळू शकत नाही, लोकांना शेतीलाच नाही तर पिण्यासाठी देखील पाणी मिळू शकणार नाही अशी परिस्थिती निर्माण झालली आहे. मुंबईमध्ये देखील आता 15 टक्के भारनियमन असावे असाही सूर सर्वांकडून येऊ लागला आहे. एक प्रकारचा गोंधळ लोकांमध्ये निर्माण झालेला आहे. आज ही परिस्थिती आहे तर यापुढील दोन महिन्यामध्ये आणखी काय होणार आहे हाही प्रश्न लोकांपुढे आहे. राज्यात वीज निर्मिती होणारच नाही का ? होणार असेल तर केव्हा पासून होणार आहे ? हेही जनतेला समजले पाहिजे. राज्यात याबाबत सर्वत्र गोंधळाचे आणि संतापाचे वातावरण आहे आणि त्यामुळेच हे अधिवेशन संपण्यापूर्वी, आजच या विषयी येथे चर्चा घेणे आवश्यक आहे. तेव्हा आजचे सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला सारून आपण ही चर्चा घडवून आणण्यासाठी आमचा प्रस्ताव मंजूर करावा अशी आपल्याला कळकळीची विनंती आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी, सन्माननीय श्री.मधुकर सरपोतदार, सन्माननीय श्री. रावते यांनी राज्यात वाढत जाणाऱ्या भारनियमनाबद्दल, सभागृहाचे सर्व कामकाज रद्द करून चर्चा करावी यासाठी जो प्रस्ताव येथे मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभी आहे. सभापती महोदय, उद्या हे अधिवेशन संपते आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील गावागावातील लोकांचे डोळ या अधिवेशनाकडे लागलेले असतात की, आपल्याला काही न्याय येथून मिळेल. असे असताना पुढील

....... केके 3 ...



KBS/ SBT/ MHM/ श्री. गागरे नंतर --- 13:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे .....

अधिवेशन होईपर्यंत 40 ते 44 डिग्री तापमान झालेले असताना, अंगाची लाही-लाही होत असताना, मी नुकताच रामटेक येथे गेले असता हा अनुभव घेतलेला आहे, सर्वत्र जे भारनियमन होत आहे आणि ते वाढत चालले आहे त्याबद्दल आता पक्षाच्या पलिकडे जाऊन, शिवसेना-भारतीय जनता पक्षाच्या बरोबरीने सत्तारूढ पक्षाचे लोक देखील आंदोलनामध्ये उतरू लागले आहेत आणि आता तर ही आंदोलने हिंसक स्वरूप धारण करीत आहेत. याची अनेक उदाहरणे आपल्या समोर आली आहेत. या साऱ्या पार्श्वभूमीवर जनतेला दिलासा मिळण्यासाठी काय करावे लागेल याचा विचार करण्यासाठी म्हणून तरी ही चर्चा आपण तातडीने, सर्व कामकाज बाजूला सारून, घडवून आणावी अशी मी आपल्याला विनंती करते.

( यानंतर श्री. सरफरे ..... एलएल 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी मांडलेल्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. आज अमरावतीची अशी परिस्थिती आहे की, चौका चौकामध्ये हजारो लोक उभे आहेत. संपूर्ण अमरावती आज पूर्णपणे बंद आहे. मागील 15 दिवसापासून सातत्याने रात्रीच्यावेळी एम.एस.ई.बी. च्या कार्यालयांवर हल्ले होत आहेत. हायवेवरुन जाणाऱ्या वाहनांची मोडतोड होत आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर आम्ही लोकप्रतिनिधी आमच्या मतदारसंघामध्ये जाणार आहोत. त्यावेळी आम्हाला लोकांनी विचारल्यास त्यांना काय उत्तर द्यावयाचे हा आमच्यासमोर प्रश्न आहे? त्याकरिता आज याठिकाणी चर्चा होण्याची आवश्यकता आहे. तिला आपण मान्यता द्यावी अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांचा आज वाढदिवस असल्यामुळे हे सभागृह त्यांचे अभिनंदन करीत आहे. आपल्या जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी हे सभागृह सदैव आपल्या पाठीशी राहील अशी वाढदिवसानिमित्त आपणास शुभेच्छा देतो.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सभागृहाच्या वतीने आपण मला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या त्याबद्दल आपणास धन्यवाद देतो. यानिमित्ताने एक मुद्दा मांडू इच्छितो की, आज माझ या वाढदिवशी अमरावतीमध्ये कडकडीत बंद आहे. या महाराष्ट्रामध्ये जन्माला आलो त्याचा निषेध म्हणून हा बंद आहे काय असे मला वाटू लागले आहे.

**सभापती** : त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत "अहमदनगर जिल्हयातील राहता शहरातील राजेंद्र पठारे यांचे दिनांक 4 एप्रिल 1007 रोजी तेथील एका राजकीय कार्यकर्त्यांनी राहते घर जाळून खाक केले असून या गंभीर प्रकरणी तेथील पोलिसांत तक्रार करुनही आज 10-12 दिवस होऊनही आरोपीला पोलिसांनी अटक न करणे, पोलिसांची पक्षपाती वागणूक व आरोपींना संरक्षण देत असल्याने तेथील जनतेत निर्माण झालेले दहशतीचे व भीतीचे वातावरण लक्षात घेता या तातडीच्या विषयाबाबत" चर्चा करण्यासाठी म.वि.प. नियम 289 अन्वये सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करण्याची सूचना दिलेली आहे. या अनुषंगाने माननीय सदस्यांनी एक मिनिटामध्ये आपले म्हणणे मांडावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, 3 एप्रिल रोजी नगर जिल्हयातील राहता या शहरामध्ये वीरभद्र देवतेची यात्रा होती. त्यावेळी त्याठिकाणी थोडीशी बाचाबाची होऊन शिवसेनेचे शहर प्रमुख श्री. राजेंद्र पठारे यांना मारहाण करण्यात आली. त्यानंतर श्री. राजेंद्र पठारे यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

लोकांनी "आपसात भांडू नका" असे समजावून सांगितल्यावर ते शांत राहिले. दुसऱ्या दिवशी दिनांक 4 एप्रिल रोजी श्री. पठारे यांच्या घरी जाऊन तेथील गुंडांनी त्यांना धमक्या दिल्या व त्यांच्या घरावर हल्ला करण्यात आला. त्यांचे रहाते घर जाळण्यात आले. मी स्वत: त्याठिकाणी जाऊन आलो. त्या घराचे छायाचित्र आणि सी.डी. मी आणली आहे. घटना 4 एप्रिल रोजी घडल्यानंतर आज 16 एप्रिल आहे. फिर्यादीने सर्व आरोपींची नावे पोलिसांना दिली आहेत . सशस्त्र असलेला मॉब त्याठिकाणी पोलीस स्टेशनवर चालून गेला. त्यांनी पोलीस स्टेशनच्या खिडक्यांच्या काचा फोडल्या. तरीसुध्दा पोलीस इन्सपेक्टर श्री. सांडभोर यांनी एकाही आरोपीला अटक केली नाही. त्यामुळे तेथील वातावरण अत्यंत भयभीत आहे. मी त्या गावातील लोकांना भेटलो. श्री. राजेंद्र पठारे यांच्या आईला भेटलो, ती ओक्साबोक्षी रडत होती. या घटनेबाबत मी दिनांक 5 एप्रिल रोजी नियम 93 अन्वये सूचना दिली होती.त्यावर अजूनपर्यंत निवेदन आले नाही. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपण प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन या विषयावर नियम 289 अन्वये चर्चा घडवून आणावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रामधील हे अत्यंत गंभीर असे प्रकरण आहे. एका राजकीय कार्यकर्त्यांच्या घरामध्ये गुंड बेधडक घुसून त्याचे घर पेटवून देतो. आणि हे होत असतांना पोलीस त्या गुंडांना अटक करीत नाहीत. हे अधिवेशन चालू असतांना लोकांनी काय अपेक्षा करावयाची? कोणत्याही परिस्थितीत आज या विषयावर सभागृहामध्ये चर्चा होऊन शासनातर्फे निवेदन झाले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडक र यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावासंबंधी सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी स्पष्टीकरण करावे.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये विजेच्या टंचाईचा प्रश्न निर्माण झाला आहे. या विजेच्या प्रश्नासंदर्भात नक्की वस्तुस्थिती काय आहे? अशाप्रकारच्या अडचणींना जनतेला सामोरे कां जावे लागत आहे हे या सभागृहाच्या माध्यमातून जनतेला माहिती होणे अभिप्रेत आहे. विधानसभेमध्ये पहिल्या आठवडयात विजेच्या प्रश्नासंबंधी चर्चा करण्यात आली. त्यानंतर देखील विजेबाबत परिस्थिती बिघडली आहे, .त्याची काही कारणे आहेत. त्या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा करावयाची असेल तर त्याला माझी हरकत नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे..... 13:15

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरू...

माझी एवढीच विनंती आहे की,आज विजेच्या अचानकपणे होणाऱ्या भारनियमना संदर्भात लोकत्रस्त आहेत. वेळापत्रकाप्रमाणे लोडशेडींगच्याबाबतीत लोकांची मानसिकता तयार झालेली आहे. आज आपल्याला कंटीन्यअस प्रोसेस इंडस्ट्रीज, एक्स्प्रेस मिटर आणि एमआयडीसी या इंडस्ट्रींनी यामधील काही ना काही भार उचलला नाही तर याज्यातील भार नियमनाच्या परिस्थितीमध्ये आणखी एक वेगळी परिस्थिती निर्माण होऊ शकते. म्हणून आज दुपारी 3-00 वाजता उद्योग मंत्री, मी असे दोघे मिळून राज्यातील इंडस्ट्रीसजमधील लोकांबरोबर चर्चा करण्यासाठी बैठक बोलाविलेली आहे. या संदर्भाने एमईआरसी आणि मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कोणता प्रस्ताव केला आहे, याची कल्पना नाही. इंडस्ट्रीज यामध्ये सहकार्य करायला तयार आहे काय ? हे जाणून घेण्यासाठी बैठक बोलावलेली आहे. त्यांचे प्रश्न समजून घेऊन मार्ग काढता येऊ शकेल. या विषयावर चर्चा करावयची असेल तर माझी तयारी आहे, काही अडचण नाही.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचा 289 अन्वये प्रस्ताव आहे. राज्यामध्ये ऊर्जेच्या संबंधात निर्माण झालेली तीव्र टंचाई यामुळे शेतकरी असो, उद्योजक असो, सर्वसामान्य जनता असो या सर्वांचेच जीवन असह्य झालेले आहे. या अनुषंगाने कामकाज संपण्याच्या अगोदर विशेषत: उद्या अधिवेशन संपण्याच्या अगोदर या विषयावर चर्चा व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. सन्माननीय ऊर्जा मंत्री महोदयांची या विषयावर चर्चा घेण्याची तयारी दर्शविलेली आहे. या संबंधात मी तांत्रिक उत्तर देणार नाही. नियम 289 च्या अनुषंगाने दिलेला प्रस्ताव हा तांत्रिक दृष्ट्या तारांकित प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून चर्चा करावी, ही मागणी मी स्वीकारणार नाही. परंतु या विषयावर चर्चा घ्यावयाची आहे, या अनुषंगाने मी सदनाला विनंती करतो. आजचे कामकाज पाहिले तर आपल्यासमोर दोन विषयावर चर्चा अपूर्ण आहेत त्या पूर्ण करायच्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांचा घनकचरा विषयाच्या प्रस्तावावर चर्चा झालेली आहे, त्यावर मंत्री महोदयांचे उत्तर थोडे राहिलेले आहे. मंत्री महोदयांचे उत्तर संपल्यानंतर उत्तरादाखल सन्माननीय सदस्यांचे भाषण होणार आहे यासाठी अर्धातासाच्या वेळेमध्ये ही चर्चा संपेल, अशी परिस्थिती आहे. त्यानंतर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव चर्चेसाठी आहे. जर ऊर्जेच्या संबंधातील चर्चा घ्यायची ठरली तर ती चर्चा दुपारी 4-00 वाजता सुरू करण्याच्यादृष्टीने आपण विचार करतो,त्यावेळेस सदनातील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

सभापती (पुढे सुरू....

सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, ही सगळी चर्चा होईपर्यन्त या ठिकाणी उपस्थित रहाणें गरजेचे आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आज आमच्यासमोर जी कार्यक्रम पत्रिका दिलेली आहे त्याप्रमाणे आजचे कामकाज हे चार-पाच तासात संपणारे नसून त्यासाठी पंधरा तासाचाही वेळ लागेल. आपण एकीकडे अधिवेशनाचा कालावधी कमी करतो आणि सदनामध्ये दहा-पंधरा तासामध्ये कामकाज संपेल अशी कामकाजपत्रिका बनवितो. चर्चेसाठी वेळ अपुरा पडला तर ती चर्चा गुंडाळण्याची पध्दती सुरू झालेली आहे. या संदर्भात आम्ही निषेध करतो. असे होता कामा नये. या प्रश्नाची चर्चा होणे आवश्यक आहे. माझी विनंती आहे की, कामकाजपत्रिका कोणी बनविलेली आहे ? कामकाजपत्रिकेवरील कामकाज संपण्याकरिता किती वेळ लागेल ? हे सांगावे.

**सभापती** : कामकाजपत्रिकेवर अंतिम सही माझी आहे. ही कामकाजपत्रिका बनविण्याचा उद्देश असा आहे की, सन्माननीय सदस्यांचे या माध्यमातून जे प्रश्न आहेत, ते मांडण्याची त्यांना जास्तीत जास्त संधी उपलब्ध होईल. हा समज जर तांत्रिकदृष्ट्या चुकीचा असेल तर या अनुषंगाने काटेकोर रहाणे गरजेचे होईल. दुसरे असे की, काही वेळेला अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा असतात त्यावेळेला आपणस 8,9,10 तासाचा देखील चर्चेकरिता वेळ दिलेला आहे.

यानंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

एखाद्या अतिमहत्वाच्या चर्चेला असा वेळ देण्यामध्ये गैर काही नाही. हे अधिवेशन दोन दिवसात संपणार आहे. अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून सुध्दा अनेक प्रश्न मार्गी लागतात असा पूर्वीचा अनुभव आहे. समजा आज आणि उद्या जर या अनुषंगाने आणखी थोडा जास्त वेळ कामकाज करता आले तर करावे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, आपण राहिलेल्या चर्चा पुढच्या अधिवेशनात करतो. मी या सदनात तसेच विधान सभेमध्ये असताना अनेक वेळा चर्चा लॅप्स झालेल्या आहेत. पण मी चर्चा लॅप्स केलेली नाही. एखादी चर्चा लॅप्स करणे हे सगळ्यात सोपे काम आहे. एखाद्या दिवशी एखादे कामकाज झाले नाही, मग प्रश्नोत्तराचा तास असेल, लक्षवेधी सूचना असतील, अर्धा-तास चर्चा असेल, त्यावर चर्चा झाली नाही तर ते विषय लॅप्स होतात. मी एकही चर्चा लॅप्स केलेली नाही. तसे करावे असे मला वाटत नाही. कारण मी आमदार म्हणून काम करीत असताना या ठिकाणी चर्चा मान्य होऊन सभागृहात येणे किती अवघड असते हे मला माहीत आहे. असे असताना ते लॅप्स होणे बरोबर होणार नाही याकरिता मी ते लॅप्स केलेले नाही. मला असे वाटते की, जर ही चर्चा दुपारी 4.00 वाजता सुरु करावयाची असेल तर आधी सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांच्या नियम 260 अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावावर माननीय मंत्रिमहोदयांचे राहिलेले उत्तर पूर्ण करु आणि त्यानंतर आपण ही चर्चा घेऊ. त्यानंतर आज शेतीच्या अनुषंगाने महत्वाची चर्चा आहे ती चर्चा आपण घेऊ आणि त्यानंतर मग आपण अर्धा-तास चर्चा आज घेऊ. नाही तर त्या चर्चा लॅप्स होणार आहेत. त्या चर्चा आज झाल्या नाहीत तर उद्या त्या चर्चा घेण्यास वेळ नाही. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांना विचारु इच्छितो की, या पुढच्या काळात काही कारणासाठी त्या दिवशीचे कामकाज जर झाले नाही तर मग ते कामकाज किंवा लक्षवेधी सूचना लॅप्स करावयाच्या काय ? तसा निर्णय आपण घेऊ या.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हे अधिवेशन कमीतकमी दीड महिना चालावयास पाहिजे. आपण अधिवेशनाचा कालावधी कमी करतो.

**सभापती** : याबाबत आपण कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा करतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : मी त्या ठिकाणी विषय मांडला. आपण अधिवेशनाचा कालखंड कमी का करतो ? त्याला काही कारणे आहेत काय ?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण आम्हाला न्याय देता त्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपण आम्हाला न्याय देता हे बरोबर आहे. परवा अशासकीय ठरावावर चर्चा सुरु असताना तालिका सभापती श्री. भास्कर जाधव या ठिकाणी पीठासीन अधिकारी होते. त्यावेळी आम्ही त्या ठरावावर पाच पाच मिनिटे बोललो. आपण न्याय देता हा आपला मोठेपणा आहे. त्या दिवशी माननीय मंत्रिमहोदय म्हणाले की, मला गाडी पकडावयाची आहे, मला विमान पकडावयाचे आहे. आम्ही म्हणालो की, आम्ही बसण्यास तयार आहोत. सभापती महोदय, यामध्ये आपला दोष नाही. अधिवेशन अक्षरश: गुंडाळले जाते. अधिवेशन दोन दिवस वाढवावे अशी माझी विनंती आहे. आपण आम्हाला अतिशय न्याय देता. आपण विषय लॅप्स होऊ देत नाही. दोन दिवस अधिवेशन वाढवावे अशी माझी विनंती आहे. आम्ही बसण्यास तयार आहोत.

श्री. दिवाकर रावते : मराठवाड्याच्या पाण्याच्या संदर्भातील चर्चा अर्धवट राहिलेली आहे.

**सभापती** : ती चर्चा उद्या पूर्ण करणार आहोत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी अधिवेशन वाढविण्यासंबंधी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. परंतु अधिवेशनासंबंधीचा निर्णय कामकाज सल्लागार समितीमध्ये झालेला आहे. माझी अशी विनंती आहे की, कामकाज सल्लागार समितीशिवाय सभागृहात असा निर्णय करु शकत नाही. दरवेळी अर्धा-तास चर्चा पुढे ढकलली जाते ही सन्माननीय सदस्यांवर अन्याय करणारी बाब आहे. त्यांच्यावर अन्याय करण्याची माझी इच्छा नाही. माझी अशी विनंती आहे की, आम्ही नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्या विषयावर चर्चा करण्याचे माननीय मंत्रिमहोदयांनी मान्य केलेले आहे. आपण दुपारी 4.00 वाजेपर्यंत लक्षवेधी सूचना आणि बिलासंबंधीचे कामकाज पूर्ण करु. प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याऐवजी आम्ही जो नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे तो कन्व्हर्ट करुन त्या विषयावर चर्चा घ्यावी. विजेच्या प्रश्नाच्या संदर्भात अमरावती बंद आहे. सभापती महोदय, आपण जास्तीत जास्त कामकाज करण्याचा प्रयत्न करु.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आपण सर्वांना न्याय देण्याच्या भूमिकेतून काम करता. आमच्या ज्या अर्धा-तास चर्चा लागलेल्या आहेत त्या आपण लॅप्स न करता कॅरी फॉरवर्ड केलेल्या आहेत.

**सभापती** : आपला प्रश्न माझ्या लक्षात आलेला आहे.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामराथ मोते : सभापती महोदय, मागील अधिवेशनातील अर्धा-तास चर्चा कॅरीफॉर्वड केल्या..

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी कृपा करुन खाली बसावे. त्यांचा मुद्दा माझ्या लक्षात आलेला आहे.

आता मी माझा निर्णय देतो. याठिकाणी नियम 289 अन्वये विजेच्या प्रश्नावर चर्चा घ्यावी अशी सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली असली तरी या प्रश्नावर नियम 97 अंतर्गत चर्चा करण्यास मी परवानगी देत आहे. या चर्चेला दुपारी 4.00वाजता सुरुवात होईल. त्या आधी लक्षवेधी आणि नियम 93ची निवेदने लवकरात लवकर संपविण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करु. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी "राहाता" येथील घटनेच्या संदर्भात नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. तांत्रिकदृष्ट्या सन्माननीय सदस्यांची सूचना नियम 289मध्ये बसत नाही. याच विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी 5 एप्रिल 2007 रोजी 93ची सूचना दिलेली आहे. सदर निवेदनाच्या वेळी सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची मुभा आहे. या चर्चेमध्ये तारांकित प्रश्नोत्तराचा 26 मिनिटे वेळ गेलेला आहे. ही 26 मी प्रश्नोत्तराच्या तासासाठी देईन.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**बोऱ्या व बुधल (जि.रत्नागिरी) येथील सागरी लाटांपासून वीजनिर्मितीचा प्रकल्प उभारण्याबाबत**

**(१) * २४५०२ श्री. प्रकाश शेंडगे , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा)मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात बोऱ्या, बुधल या गावी सागरी लाटांपासून २२० किलो वॅट विज निर्मितीचा प्रकल्प अपारंपारिक ऊर्जा या संस्थेमार्फत उभारला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सागरी लाटांपासून प्रदूषण मुक्त आणि पर्यावरण संवर्धनास अनुकुल अशा प्रकारची विद्युत निर्मिती करण्याचे प्रकल्प महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर १५ ठिकाणी उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, खाजगी गुंतवणूक दारांमार्फत असे प्रकल्प उभारण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री.विनय कोरे** : (१) होय, तथापि प्रकल्पाची क्षमता २२० कि.वॅट नसून तो १५ ते २० कि.वॅट आहे. प्रकल्प संशोधनात्मक आहे.

(२) व (३) शासनाने उपरोक्त प्रकल्प यशस्वी झाल्यास, २५० किलो वॅट क्षमतेचा पथदर्शी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाच्या यशस्वीतेवर अशा स्वरुपाच्या प्रकल्पांच्या उभारणी बाबतचे धोरण ठरविण्यात येणार आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : महाराष्ट्राला 750 कि.मी.चा सागरी किनारा लाभलेला आहे. सागरी लाटांपासून वीज निर्मिती करणारे प्रकल्प उभारण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय ? बुधल या गावी सागरी लाटांपासून 220 किलो वॅट वीज निर्मितीचा प्रकल्प उभारला जात आहे, हे खरे आहे काय ? असा प्रश्न मी विचारलेला असून त्यास माननीय मंत्री महोदयांनी "तथापि, प्रकल्पाची क्षमता 220 कि.वॅट नसून तो 15 ते 20 कि.वॅट आहे" असे उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, सागरी लाटांपासून वीज निर्मिती करण्याच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने काही संशोधन केलेले आहे काय ? जगामध्ये कुठे सागरी लाटांपासून एक-दोन मेगावॅटचे प्रकल्प तयार झालेले आहेत काय ? असल्यास, तशा प्रकारचे तंत्रज्ञान महाराष्ट्र शासन तयार करील काय ?

श्री. विनय कोरे : सागरी लांटापासून वीज निर्मिती करण्याचा अभिनव उपक्रम अपारंपरिक ऊर्जा मंत्रालय राबवित आहे. या आधी जगामध्ये जेथे जेथे प्रयोग झाले ते आपल्या राज्यामध्ये





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करता येतील का याचाही विचार मंत्रालयाने केलेल आहे. 1996-97 च्या दरम्यान इंग्लडमधील एका कंपनीकडून आपल्याकडील लाटांच्या वेगावर काय होऊ शकते याचा अभ्यास केलेला आहे. आतापर्यन्त जगामध्ये ज्या तंत्रज्ञानाच्या अवलंब झालेला आहे तो पाहता आपल्याकडे फार मोठे काही करता येईल असे वाटत नव्हते. म्हणून त्या क्षेत्रात मोठे काम झाले नव्हते. परंतु वालचंद कॉलेजचे प्राचार्य आणि त्यांच्या सहका-यांनी अपारंपरिक ऊर्जा खात्याकडे लाटांपासून वीज निर्मिती करता येऊ शकेल अशा प्रकारचा प्रस्ताव दिला होता आणि त्यासंदर्भातील एक मॉडेल त्यांनी यशस्वी करुन दाखविले होते. म्हणून रत्नागिरी जिल्हयातील बो-या, बुधल या गावी एक पायलट प्रोजेक्ट कोकण किनारपट्टीवर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

श्री. विनोद तावडे : सागरी लाटांपासून वीज निर्मितीचा प्रयोग आपण करीत आहोत. परंतु शासकीय कार्यपध्दती पाहिली तर हा प्रयोग लवकर यशस्वी होईल असे वाटत नाही. या प्रकल्पासाठी जागा संपादन करण्यामध्ये कोणती अडचण आहे ? तसेच त्या जागेपर्यन्त जाण्यासाठी रस्ता करण्याकरिता किती दिवसात परवानगी मिळेल ? हा प्रयोग वालचंद महाविद्यालयातील प्राचार्य आणि त्यांचे सहकरी करीत आहेत. सदरहू संशोधन पैसे देऊन करावे अशी मेढामध्ये प्रोव्हीजन नाही काय ? मेढाची कल्पना अशी आहे की, यांनी आधी पैसे द्यावेत,

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24502............. श्री.विनोद तावडे.....

मग बिले देणे, मग पाठपुरावा करणे, मग लक्ष्मीदर्शन घडविणे, मग त्यांना परवानगी मिळणार आहे. जर केंद्राची योजना असेल तर संशोधक म्हणून त्यांना ॲडव्हान्स पैसे दिले तर हे काम होईल. हा प्रयत्न शासन करणार आहे का? सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव व श्री.गरुनाथ कुळकर्णी हे कोकणातील आहेत. तेथील ग्रामपंचायत राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या ताब्यात आहे. तेथे अडचणी उत्पन्न होतात म्हणून ते पुढाकार घेऊन हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मदत करणार असतील तर त्यांना मध्यस्थ म्हणून घेतले जाईल का?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 3-4 प्रश्न उपस्थित केले आहेत. आतापर्यंत संशोधनाचे धोरण आपल्याकडे नव्हते ही वस्तुस्थिती खरी आहे. हे धोरण निश्चित करण्याचे शासनाने ठरविले आहे. येणाऱ्या महिनाभराच्या काळात निश्चित शासनाचे धोरण येईल. यापुढच्या प्रकल्पांना कोणती अडचण येणार नाही. या प्रकल्पाला पैसे देत असताना ज्या काही अडचणी शासनासमोर आहेत, त्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांच्याबरोबर मेडामधील एक अधिकारी देऊन तिघांनी मिळून प्रत्यक्ष काम बघून पेमेंट करायचे अशा प्रकारचा मार्ग हे मंत्रालय स्वीकारणार आहे. तिसरा महत्वाचा प्रश्न म्हणजे ऊर्जेच्या बाबतीत जी अडचण निर्माण झाली होती, त्याबाबत ग्रामपंचायत राष्ट्रवादी कॉंग्रेसची आहे, भारतीय जनता पक्षाचे त्या गावातील काही कार्यकर्ते यांच्या मतभेदातून हा प्रकार तयार झाला होता. तो प्रकार पूर्णपणे बाजूला पडला आहे. रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. खाजगी शेतकऱ्याची जी जमीन जाते त्यांनीही त्या जमिनीवर काम करण्यास परवानगी दिली आहे. म्हणून प्रत्यक्ष खरेदीपत्र झाले नसले तरी या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प आणि धोरण आहे. शासनाने जाहीर केले की, 15 ते 20 कि.वॅट वीज निर्मिती पहिल्यांदा ट्रायल म्हणून करणार आहोत. या 15 ते 20 कि.वॅट वीज निर्मितीसाठी खर्च किती येईल? 1 मे, 2007 रोजी या प्रकल्पाचे प्रात्यक्षित दाखविणार अशी शासनाने घोषणा केली. ही तारीख निश्चित आहे का?

श्री.विनय कोरे : महाराष्ट्र दिनाच्या दिवशी या प्रकल्पाचे उद्घाटन करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, ही वस्तुस्थिती खरी आहे. जर काही तांत्रिक अडचण उद्भवली तरच हे लांबू शकते. आतापर्यंतच्या नियोजनाप्रमाणे 1 मे रोजीच उद्घाटन करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. आता जे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15 ते 25 कि.वॅटच्या प्रकल्पाचे काम सुरु आहे त्यासाठी साधारणपणे 40 लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. याच प्रकल्पात 13 हजार लिटर क्षमतेचा फ्लोटर समुद्रात बसवावा लागणार आहे. हे काम यशस्वी झाल्यानंतर तसेच आणखी 10 फ्लोटर बसविणार आहोत. हा 25 कि.वॅटचा प्रकल्प 250 कि.वॅटपर्यंत वाढविणार आहोत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, अतिशय स्वागतार्ह प्रकल्प आहे. फक्त एकच विनंती आहे, जगामध्ये नॉर्वे, नेदरलॅण्ड, ॲमस्टरडम किंवा हॉलण्ड हे देश या संदर्भातील संशोधनात बरेच पुढे गेलेले आहेत. महाराष्ट्रामध्ये ऊर्जेची अडचण आहे ती लक्षात घेता जगात सगळ्यात अत्याधुनिक टेक्नॉलॉजी जी यशस्वी झाली ती टेक्नॉलॉजी महाराष्ट्रात आणण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे का? काही लोकांनी पवनचक्की आणि सोलर एनर्जी एकत्रित करुन वीज मिळणारे हायब्रीड मॉडेल तयार केले आहे. तसा प्रयत्न शासन करणार आहे का? मंत्रीमहोदयांचा साखर कारखाना इथेनॉल तयार करतो. माझा कारखाना देखील इथेनॉल तयार करतो. किर्लोस्कर कंपनीने 85 टक्के इथेनॉल व 15 टक्के डिझेलवर चालणारे जनरेटर तयार केले आहे. कमीत कमी इथेनॉल बेस जनरेटर तयार केला तर शेतकऱ्यांचा प्रश्न सुटेल. आज महाराष्ट्रात 70 साखर कारखाने आहेत, त्यातील काही बंद पडले आहेत. परंतु शासनाकडून याबाबत प्रत्यक्ष काही प्रयत्न होताना दिसत नाही. या 3-4 पर्यायांवर आम्ही काहीतरी करुन दाखवू असे जनतेला सांगितले पाहिजे. मेडाकडून सांगितले जाते, सरकारी अधिकारी उत्तरे लिहून देतात. आमची मंत्रीमहोदयांकडून अपेक्षा आहे, टाईम बाऊंड प्रोग्रॅम देऊन बेस्ट टेक्नॉलॉजी महाराष्ट्रात आणली पाहिजे. मंत्रीमहोदय जर्मनीला गेले होते. तेथे शेणावर प्रक्रिया करुन वीज निर्मिती केली जाते का? मंत्रीमहोदय या प्रश्नाबाबत गंभीरपणे काही प्रयत्न करणार आहेत का?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अपारंपारिक ऊर्जा ही प्रत्येक ठिकाणची जशास तशी टेक्नॉलॉजी आणून राबविता येईल अशी अवस्था नाही. आज हॉलण्डमध्ये असणाऱ्या समुद्राच्या लाटांचा वेग आणि घनता व महाराष्ट्रातील समुद्राच्या लाटांचा वेग आणि घनता यात फरक असू शकतो. आपल्या वातावरणाशी निगडित असे तंत्रज्ञान निर्माण करण्याचा प्रयत्न आपल्याला करावा लागेल.

(नंतर श्री.जुन्नरे...

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :24502** .........

श्री. विनय कोरे.....

म्हणून पहिल्यांदा महाराष्ट्र सरकारने निर्णय घेतला आहे की, अशा प्रकारच्या कामासाठी संशोधन करण्यासाठी दरवर्षी किमान 5 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. यामधून जे यशस्वी तंत्रज्ञान आहे, इन्फ्रास्ट्रक्चर आहे ते आण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. पेट्रोल कंपन्या 21.50 पैसे या दराने इथेनॉल खरेदी करीत असतात. आज महाराष्ट्रात विजेची टंचाई असल्यामुळे शेतक-यांना वीज मिळत नाही. शेतक-यांना वीज मिळावी यासाठी इथेनॉलचा वापर करुन जनरेटर सेट सुरु करुन वीज तयार करावी व ती शेतक-यांना द्यावी अशा प्रकारचे विचार सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या ठिकाणी व्यक्त केलेले आहेत परंतु मला आपल्याला सांगावयाचे आहे की, शेतक-यांना शासन 30 पैसे युनिट या दराने वीज उपलब्ध करुन देत असते आणि जर इथेनॉल पासून वीज जनरेट करुन ती शेतक-यांना दिली तर तिचा दर साधारणत: 5.50 रुपये प्रती युनीट पडेल. इतक्या महागडया दराने वीज शेतक-यांना परवडणार नाही. त्यामुळे सरसकट शेतकरी इथेनॉलपासूनची वीज स्विकारतील असे वाटत नाही. तरी सुध्दा या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा शासन जरुर विचार करेल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, अपारंपारीक उर्जेच्या संशोधनाच्या संदर्भात शासन दर वर्षी 5 कोटी रुपये खर्च करेल अशी माहिती आताच माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेली आहे. परंतु मला या ठिकाणी आपल्याला सांगावयाचे आहे की, मेडातील झारीतील शुक्राचार्य काहीतरी खोडा काढून हे काम करु देणार नाहीत. ते लक्ष्मीदर्शन किंवा पार्टनरशिपचाच विचार करीत असतात. मी यासंदर्भात मागे एक लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. कोकणातील काही पट्टयावर संशोधन करुन भूगर्भातील जी गरम वाफ आहे ती बाहेर आणून त्यावर टर्बाईन चालवून त्यातून वीज तयार होणार आहे. या संशोधनाच्या 3 प्रकल्पातून आपल्याला वीज मिळू शकणार आहे. परंतु मेडातील अधिकारी अशा प्रकारचे प्रकल्प होऊ देत नाहीत. मी ज्यावेळेस लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती त्यावेळस माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, एक महिन्याच्या आत यासंदर्भातील निर्णय घेऊ त्यामुळे यासंदर्भातील निर्णय काय झालेला आहे?

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :24502** .........

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, एक महिन्यात जिओ थर्मल एजनर्जीचा निर्णय दिला जाईल हे मी सभागृहाला सांगू इच्छितो. मेडामधील अधिकारी यासंदर्भात काही अडचणी निर्माण करीत आहेत अशी भावना सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केलेली आहे. मला आपल्याला सांगावयाचे आहे की, संपूर्ण देशात फक्त महाराष्ट्रातच अशा प्रकारचे काम करणारे एकमेव मंत्रालय आहे. नवीन एस्टॅब्लीशमेंटचे काम करीत असतांना मॅनपॉवर, एस्टाब्लीशमेंट याचा विचार करुन मागे जो प्रकार घडला तो प्रकार पुढे होणार नाही याची योग्य काळजी हा विभाग घेईल हे मी येथे सांगू इच्छितो.

---------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**डोंबिवली औद्योगिक विभागासाठी टाऊनशिप निर्माण करण्याबाबत**

**(२) * २५३२५ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **उद्योगमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली औद्योगिक विभागासाठी स्वतंत्र टाऊनशीप निर्माण करण्यासाठी उद्योजकांनी उद्योगमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने टाऊनशीप निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोक चव्हाण** : (१) होय.

(२) व (३) औद्योगिक क्षेत्रासाठी औद्योगिक नगरी (टाऊनशीप) निर्माण करण्याच्या प्रस्तावाशी विविध विभागांचा संबंध येत असल्याने त्या विभागांशी समन्वय साधून औद्योगिक नगरी स्थापन करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, यासंदर्भात डोंबिवली आणि कल्याण भागात अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. सन्माननीय उद्योग मंत्र्यांनी या प्रश्नाच्या संदर्भात पुढाकार घेऊन हे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. टाऊनशिपचा प्रश्न नागरीकांमध्ये उत्सुकता निर्माण करतो त्यामुळे यासंदर्भात स्पष्टता होत नाही. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न आहे की, या ठिकाणच्या टाऊनशीपचे स्वरुप काय राहणार आहे ? तसेच या ठिकाणी टाऊनशीप कोणत्या ठिकाणी करण्याचा प्रस्ताव आहे, यासाठी एकूण किती जागा उपलब्ध करुन दिली जाणार आहे तसेच यासंदर्भात शासन कोणत्या सुविधा पुरविणार आहेत ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी सनमाननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी औद्योगिक वसाहतीत टाऊनशीप निर्माण करण्याचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. राज्यामध्ये ज्या औद्योगिक वसाहती आहेत त्या भागात वसाहतीचे मॅनेजमेंट करण्यासाठी त्यांची वेगळी बॉडी निर्माण करावी अशी शासनाची भूमिका आहे. एमआयडीसीमध्ये ज्या काही औद्योगिक वसाहती आहेत त्याची पूर्ण देखरेख, नियोजन व त्यासाठी जी काही मॅनेजमेंट आहे त्यासाठी वेगळया बॉडीचा निर्णय करण्यात येणार आहे. आज राज्यामध्ये महानगरपालिका, नगरपालिका तसेच ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात ज्या काही औद्योगिक वसाहती आहेत त्या ठिकाणी काम करीत असतांना काही ठिकाणी एमआयडीसीकडून वेगवेगळे कर आकारण्यात येतात यासंदर्भात तक्रारी आलेल्या आहेत. काही ठिकाणी एमआयडीसी कडून महानगरपालिका नगरपालिका तसेच ग्रामपंचायती हया वेगवेगळे कर आकारीत असतात. यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25325.....

श्री.अशोक चव्हाण...............

एकाच ठिकाणी दुहेरी टॅक्सेशन झालेले आहे अशाप्रकारच्या तक्रारी आलेल्या आहेत. तेव्हा यातील अडचणी दूर करण्यासाठी टाऊनशीप निर्माण करुन त्या माध्यमातून औद्योागिक वसाहतींचे नियोजन असेल, विकासांची कामे असतील इत्यादीसबंधींचा आराखडा तयार करुन दैनंदिन स्वरुपाच्या ज्या अडचणाी आहेत त्या दूर करण्याची तरतूद आहे. यासाठी सहा लोकांची बॉडी नियुक्त करण्यात यावी. यामध्ये औद्योगिक वसाहतींचे प्रतिनिधी असतील, शासनाने एम.आय.डी.सी.वर नियुक्त केलेले प्रतिनिधी असतील, अशी ती संकल्पना आहे. या बॉडीमध्ये जलद गतीने निर्णय घेणे, दुहेरी टॅक्सेशन होऊ नये इत्यादी कामे सुलभपणे व्हावीत अशी भूमिका आहे. येथे नवीन जागेचा प्रश्न उद्‌भवत नाही. अस्तित्वात असलेल्या औद्योगिक क्षेत्रासाठी नवीन टाऊनशीप करण्याची भूमिका आहे. जागेवर हे करायचे आहे. सध्या राज्यात 66 ठिकाणी औद्योगिक क्षेत्रासाठी टाऊनशीप निर्माण करण्याचे प्रस्ताव नगर विकास विभागाकडे सादर करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये 17 विभागांची कार्यवाही जवळपास पूर्ण होऊन प्राथमिक उद्‌घोषणा जाहीर करण्यात आलेली आहे.या संबंधात ज्या तक्रारी आहेत त्याबाबत सुनावणी घेऊन निर्णय घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, खरे म्हणजे गेल्या काही वर्षापासूनचे महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण चुकीचे आहे. जेव्हा इंडस्ट्री एरिया डेव्हलप करतात तेव्हा टाऊनशीप डेव्हलप करण्याचे काम म्हाडाचे आहे, असे अधिकाऱ्यांचे उत्तर असते. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.अशोक चव्हाण यांच्यावर मी आरोप करतो की, चुकीच्या धोरणामुळे नागपूरातील एम.आय.डी.सी.च्या जागेवर झोपडपट्टी वसलेली आहे.आपण इंडस्ट्री डेव्हलप करता त्याचबरोबर टाऊनशीप निर्माण केली पाहिजे. परंतु त्याठिकाणी एम.आय.डी.सी.च्या जागेवर इंजिनिअरींग कॉलेजसाठी, हॉटेलसाठी जागा ठेवल्या. एम.आय.डी.सी. आणि संबंधित विभागाने एकत्र बसून धोरण ठरविले पाहिजे. परंतु असे होत नाही त्यामुळे त्रुटी राहतात. मी या संदर्भात वारंवार मागणी करीत आहे, परंतु त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्याठिकाणी दोन लाख लोक झोपडपट्टयांमध्ये राहत आहेत. टाऊनशीप हा एम.आय.डी.सी.च्या धोरणाचा भाग झाला पाहिजे, तेव्हा या बाबत शासन विचार करणार आहे काय ?

ता.प्र.क्र.25325.....

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, औद्योगिक धोरणाच्या बाबतीत शासनाचे धोरण चुकीचे आहे. त्यांच्या या वक्तव्याशी मी असहमत आहे. या संदर्भात शासनाने निश्चितपणे योग्य भूमिका घेतलेली आहे. सन 2007 मध्ये शासनाने नवीन औद्योगिक धोरण जाहीर केलेले आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी औद्योगिक टाऊनशीपच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. औद्योगिक विभागासाठी टाऊनशीप निर्माण करणे, तेथे मॅनेजमेंट करणे,संपूर्ण नियोजन करणे या संदर्भातील हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, औद्योगिक वसाहतीमध्ये निवासी संकुलासाठी जागा ठेवण्याची गरज आहे. शैक्षणिक सुविधा देण्याची गरज आहे. औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणाऱ्या कामगारांना राहण्यासाठी सोय, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय या सर्व गोष्टींचा अंतर्भाव नियोजनामध्ये असला पाहिजे ही भूमिका एम.आय.डी.सी.ची आहे. त्यानुसार नियोजन केले जाते आणि यासर्व गोष्टींचा अंतर्भाव त्यामध्ये आहे. तेथील कामगारांना राहण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत, अनेक शिक्षक संस्थांना बऱ्याच ठिकाणी जागा दिलेल्या आहेत.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भिवंडी (जि. ठाणे) येथील टेक्सटाइल क्लस्टर चे अंतर्गत**
**भिवंडी शहरास मिळणाऱ्या अनुदानाच्या विनियोगाबाबत**

**(3) * 24533 श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. गोविंदराव आदिक , श्री.सय्यद जामा , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप , डॉ. वसंत पवार , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री. राजेंद्र जैन , श्री.भास्कर जाधव , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. सदाशिवराव पोळ** : सन्माननीय **उद्योगमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) भिवंडी (जि. ठाणे) येथील टेक्सटाइल क्लस्टर चे अंतर्गत भिवंडी शहरास मिळणाऱ्या अनुदानाच्या विनियोगाबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी दिनांक 9 जानेवारी, 2007 रोजी वा त्या सुमारास आयुक्त, भिवंडी महानगरपालिका यांना दिले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, भिवंडी शहरासाठी टेक्टाईल क्लस्टरचे अंतर्गत केंद्राकडून आजमितीस किती निधी उपलब्ध झाला व उपलब्ध निधीचा वापर केला जात नसल्याने निधी परत जात आहे हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर निधीतुन करण्यात येणारी प्रस्तावीत कामे कोणती आहेत या बाबतचा तपशील काय आहे.

(4) तसेच ठाणे जिल्हयातील भिवंडीतील यंत्रमाग व्यवसायाचे आधुनिकीकरण करण्यासाठी केंद्र शासनाकडून विशेष पॅकेज मिळण्यासाठी अभ्यासगट स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे हे खरे आहे काय,

(5) असल्यास, या एकंदर प्रकरणीची सद्य:स्थिती काय आहे व या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**श्री.अशोक चव्हाण** : (1) होय,

(2) टेक्सटाईल क्लस्टर योजनेअंतर्गत भिवंडी महापालिकेस आजमितीस एकूण रक्कम रुपये 9.81 कोटी इतका निधी उपलब्ध झालेला आहे. त्यापैकी सर्वच्या सर्व निधी रुपये 9.81 कोटीचा विनियोग झाला आहे.

(3) या प्रकल्पांतर्गत भिवंडी शहराच्या नागांव व चाविंद्रा क्लस्टरमध्ये 1) विद्युत पुरवठा सुधारणे व पथदिवे व्यवस्था 2) भुयारी गटार योजनेत सुधारणा करणे, 3) रस्ते रुंदीकरण करणे व सुधारणा करणे 4) पाणीपुरवठा सुधारणे इत्यादी कामे करण्यात येत आहेत,

(4) नाही,

(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, भिवंडी शहरात वीज टंचाई भेडसावत असताना भिवंडी येथील टेक्सटाईल क्लस्टर योजना अंतर्गत 15 कोटी रुपयांचे निधी प्राप्त झालेला असताना एम.एस.ई.बी.ने कोणतीही उपाययोजना केलेली नाही हे खरे आहे काय ?

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24533....

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, भिवंडी शहरामध्ये केंद्र शासनाकडून नागाव आणि चाविन्द्रा येथे टेक्सटाईल क्लस्टर मंजूर झालेले आहेत. टेक्सटाईल व्यवसाय चांगल्या पध्दतीने चालावा ही या मागील भूमिका आहे.

यानंतर श्री.पुरी..........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24533...

श्री.अशोक चव्हाण...

या दोन्ही क्लस्टर्ससाठी 40 कोटी 84 लाख रुपयांची ही योजना केंद्र शासनाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामध्ये 50 टक्के खर्च हा केंद्र शासनाच्या निधीतून होईल व उर्वरित 50 टक्के खर्च स्थानिक महापालिकेने करण्यासंबंधीचा प्रश्न आहे. परंतु याठिकाणी किमान एक 22 केव्हीचे स्विचिंग स्टेशन एमएसईबीच्या माध्यमातून व्हावे व त्यातून वीज पुरवठा व्यवस्थित व्हावा, अशी सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे. यासाठी साधारणत: 12 कोटी 95 लाख रुपये मिळाले असून सर्वच पैसे खर्च झालेले आहेत. उर्वरित 27 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. त्यातील 13 कोटी रुपयांची कामे एमएसईबीच्या माध्यमातून स्विचिंग स्टेशन तातडीने व्हावी अशी भावना आहे. यासाठी जागा उपलब्ध असून जागेच्या भू-संपादनाची कार्यवाही प्रलंबित आहे. याबाबतीत एमएसईबीने लक्ष न घातल्यामुळे भू-संपादनाच्या कार्यवाहीस विलंब झाला. त्यामुळे जागा संपादित करण्यासंबंधी एमएसईबीला ताबडतोबीने सांगितले जाईल. यासाठी पैसा उपलब्ध असून पैशाचा विनियोग होणे आवश्यक आहे. या योजनेचा संपूर्ण फायदा दोन्ही कल्स्टर्सला होणार आहे व त्यामाध्यमातून उद्योगालाही फायदा होणार आहे. त्यामुळे याठिकाणी एमएसईबीला तातडीने जागा संपादित करण्याची कार्यवाही करण्यासंबंधी सांगितले जाईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, "पाणीपुरवठा सुधारणे इत्यादी कामे करण्यात येत आहेत" तसेच, भूयारी गटार योजनेत सुधारणा करणे" असे उत्तरात म्हटले आहे. याठिकाणी माझ ा प्रश्न आहे की, भूयारी गटाराची सुधारण्यासाठी आत्तापर्यंत किती खर्च करण्यात आला ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, याबाबतची कामनिहाय माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही, ती माहिती मी पटलावर ठेवतो. परंतु याठिकाणी ट्रेनेजच्या, पाणी पुरवठयाच्या, पाईपलाईनच्या, पाण्याच्या टाकीच्या कामाचे नियोजन असून पाण्याचे काम व्हायचे आहे. रस्त्यांची व ट्रेनेजची बरीचशी कामे मार्गी लागलेली आहेत.

------

**सोलापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य खात्यातील**
**कर्मचारी भरतीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४) * २९०५८ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद सोलापूर आरोग्य खात्यात झालेल्या कर्मचारी भरतीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याची बाब दिनांक २० फेब्रुवारी, २००७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, झालेल्या गैरप्रकाराबाबत चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, डॉ. विमल मुंदडा यांच्याकरिता** : (१) जिल्हा परिषद सोलापूर आरोग्य खात्यात झालेल्या कर्मचारी भरतीबाबत तक्रार अथवा लेखी निवेदन प्राप्त झालेले नाही. दि. १८,१९ व २० फेब्रुवारी, २००७ च्या दैनिक लोकमतमध्ये याबाबतची बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२) दैनिक लोकमतमध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार ही भरती जिल्हास्तरावर झालेली असल्याने याबाबत योग्य ती चौकशी होणेबाबत मा. विभागीय आयुक्त, पुणे यांना कळविण्यात आलेले आहे.
(३) चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, याबाबत विभागीय आयुक्तांना कधी कळविण्यात आले ? याबाबतचा चौकशी अहवाल कधीपर्यंत प्राप्त होईल ? व त्यासाठी टाईम लिमिट सेट करण्यात आली आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, याबाबतीत दिनांक 21.3.2007 ला विभागीय आयुक्तांना कळविण्यात आले आहे. याबाबतची पूर्ण चौकशी एक महिन्यांच्या आतमध्ये पूर्ण करणार असे लेखी स्वरुपात विभागीय आयुक्तांनी कळविले आहे.

-------

...3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अंबरनाथ (जि. ठाणे) येथील सर्वसामान्य नागरिकांना येत असलेल्या वाढत्या वीज बिलाबाबत**

**(५) * २४६९४ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्रीमती सुधा जोशी** : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून)मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि. ठाणे) येथे सर्वसामान्य मध्यमवर्गीय व झोपडपट्टीवासियांना मोठ्या प्रमाणात वाढती वीजेची बीले येत असल्याने तेथील नागरीक फारच त्रस्त झाले असल्याचे माहे डिसेंबर, २००६ रोजी वा दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वीज बिलात होत असलेली वाढ रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१) व (२) हे खरे नाही. दिनांक १ ऑक्टोबर, २००६ पासून सुधारीत वीज दर अंमलात आले आहेत. मात्र सदर सुधारीत वीज दराबाबत मा.विद्युत नियामक आयोगाने तपशिलवार आदेश दिनांक २० ऑक्टोबर, २००६ रोजी निर्गमित केला आहे. या तपशिलवार आदेशाचे विश्लेषण करुन त्याप्रमाणे देयकाची संगणक प्रणाली (बिलिंग सॉफ्टवेअर) तयार करुन ग्राहकांना सुधारीत दराने आकारणी करण्यास काही अंशी विलंब झाला होता. परिणामस्वरुप ऑक्टोबर, २००६ व नोव्हेंबर, २००६ या महिन्यासाठी सुधारीत दराप्रमाणे होणाऱ्या आकारणीची फरकाची रक्कम डिसेंबर, २००६ या महिन्याच्या देयकात समाविष्ट करण्यात आली होती. यामुळे डिसेंबर, २००६ या महिन्याच्या वीज देयकाच्या रकमेत अधिक वाढ झाली होती. मात्र याबाबत वितरण कंपनीतर्फे आवश्यकतेनुसार ग्राहकांना स्पष्टीकरण करण्यात येऊन ग्राहकांचा गैरसमज दूर करण्यात आला आहे.
(३) व (४) वितरण कंपनीतर्फे नियमानुसार कारवाई करण्यात आली असल्यामुळे व मा.आयोगाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे आकारणी करण्यात आली असल्यामुळे कारवाई करण्याची आवश्यकता नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, याठिकाणी पहिला प्रश्न असा निर्माण होतो की, 5-8 तास लोडशेडींग करुनही एवढी भरमसाठ बिले येण्याची कारणे काय ? याबाबतीत जेव्हा जनतेकडून तक्रारी केल्या जातात, तेव्हा त्या खऱ्या समजल्या जातात. परंतु तक्रारी समजून घेण्यापेक्षा जनतेला धमकाविण्याचे प्रकार घडत आहेत, त्यामुळे याबाबतचा खुलासा माननीय मंत्री महोदय करीतील का ? व याबाबतीत एमएसईबीच्या अधिकाऱ्यांना सूचना देतील का ?

..4.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24694....

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कुठल्या भरमसाठ बिलाच्या बाबतीत चर्चा करीत आहेत, याची मला माहिती नाही. ग्राहक कोणते आहेत, कोणत्या महिन्यांचे बिल आहे ? हे सन्माननीय सदस्यांनी स्पष्टपणे सांगितलेले नाही. यासंदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, एमईआरसीने वीज टॅरिफसाठी दिनांक 20.10.2006 रोजी सॉफ्टवेअरमध्ये रिलेव्हेंट चेजेंस करण्याच्या दृष्टीने आदेश काढला. त्यासाठी ऑक्टोबर,2006 ते नोव्हेंबर,2006 पर्यंतचा कालावधी गेल्यामुळे डिसेंबरच्या बिलामध्ये रक्कम समाविष्ट करण्यात आली.

नंतर कु.गायकवाड...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिलीप वळसे पाटील ...

त्यामुळे आताच्या दोन महिन्यापेक्षा डिसेंबर महिन्यामध्ये बिलाची रक्कम वाढली आहे अशा प्रकारची भावना सामान्य ग्राहकांच्या मनामध्ये तयार झाली आहे. परंतु ही बाब ग्राहकांना पटवून दिल्या नंतर त्यांचे समाधान झालेले आहे. तरी देखील अशा प्रकारच्या काही विशेष तक्रारी असतील व त्या सन्माननीय सदस्यांनी तक्रारी मांडल्या तर तपासून पाहून त्याबाबत दुरुस्तीचे आदेश देण्यात येतील. ग्राहकांनी त्यांच्या अडचणी वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांसमोर सांगितल्या नंतर त्या तक्रारींची सोडवणूक करुन घेतली जाईल अशा प्रकारचे आदेश दिलेले आहेत. अशा प्रकारच्या घटना घडल्यावर ग्राहकांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर त्या संदर्भात शासनाकडून कारवाई केली जाईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, वाढत्या वीज बिलामुळे अंबरनाथमधील नागरिक हैराण झालेले आहेत. अशा प्रकारच्या तक्रारी रिलायन्स या कंपनीबाबतही नागरिक करीत आहेत. अंबरनाथ येथील जनतेचा असा समज झाला आहे की, महावीज वितरण कंपनीने जुने मिटर काढून इलेक्ट्रॉनिक मिटर बसवलेले आहेत. ते जलद गतीने फिरत असल्यामुळें विजेचे बिल दुप्पट येत आहे. ग्राहकांच्या या समजामध्ये तथ्य आहे का ? माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, यामध्ये तथ्य नाही .मग ही जी नवीन इलेक्टॉनिक मिटर्स बसवलेली आहेत त्यांचा तपास शासनाने केलेला आहे का ? हा तपास केव्हा केला गेला ? त्या तपासाचे निष्कर्ष काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, वाढत्या वीजबिलासंदर्भात मी आपणास सांगू इच्छितो की, 20.10.2006 मध्ये जी ऑर्डर जाहीर केली होती, त्यामध्ये 300 युनिट पर्यंत वीज वापरणारे जे ग्राहक होते त्यांचे दर 80 टक्कयाने कमी केलेले आहेत, त्यानंतर जे कृषी ग्राहक होते त्यांच्या दरात कोठलीही वाढ करण्यात आली नाही. कृषी क्षेत्र असलेल्या ग्रामीण भागात 100 युनिट पर्यंत वीज वापर करणारे जे व्यावसायिक ग्राहक आहेत त्यांचा दर 18 टक्कयाने कमी केलेला आहे.100 युनिट पर्यंत विजेचा वापर करणाऱ्या वाणिज्यिक ग्राहकांचा दर 4 टक्कयाने कमी झालेला आहे. राज्यामध्ये वीजेची टंचाई आहे हे आपणा सर्वांना माहीत आहेच औद्योगिक विजेची दरवाढ करीत असताना कृषी क्षेत्र ,

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील.....

दारिद्र रेषेखाली राहणारे लोक आणि कमी वीज वापरणारे ग्राहक यांच्या बिलात दरवाढ न करता, दिलासा देण्याचा प्रयत्न वीज मंडळाने M.E.R.C.च्या माध्यमातून केलेला आहे. तरी देखील आजही वीज बिल वसूलीच्या संदर्भात पूर्वी जे मिटर वापरले जात होते त्या ऐवजी इलेक्ट्रॅानिक मिटर वापरण्यास सुरुवात केलेली आहे.निश्चितप्रकारे हे इलेक्ट्रॉनिक मिटर, जुन्या मिटरपेक्षा अधिक कार्यक्षमतेने कार्य करीत आहे. या मिटरमधील टेक्नॉलॉजी ग्राहकांना नवीन मिटर बसवताना तपासली जाते. जुन्या मिटरपेक्षा इलेक्टॉनिक मिटर अधिक कार्यक्षमतेने मिटर रिडींग दाखवत असल्यामुळे बिलात वाढ होते असा ग्राहकांचा समज झालेला आहे तो साहजिक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..................

..2..



**चंद्रपूर जिल्ह्याचा औद्योगिक यादीमध्ये समाविष्ट करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(६) * २७८७९ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून)मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात ८५ टक्के औद्योगिक वापर १५ टक्के इतर वापर असून २५०० मेगावॅटचे थर्मल स्टेशन आहे, हे खरे आहे काय,

(२) हा जिल्हा औद्योगिक व नक्षलग्रस्त असल्याने ह्या जिल्ह्याला औद्योगिक यादीमध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) अद्याप सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१) हे खरे आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीच्या औष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्पाची स्थापित क्षमता २,३४० मेगावॅट असून या जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या ग्राहकांच्या एकूण वीज वापरापैकी सरासरी सुमारे ८३ टक्के वीज वापर औद्योगिक ग्राहकांचा आहे.

(२) अशा प्रकारचा प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेला नाही. तसेच शासनातर्फे औद्योगिक जिल्ह्याची यादी तयार करण्यात येत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयामध्ये औद्योगिक वापर १५ टक्के इतर वापर असून २५०० मेगावॅटचे उत्पादन होत आहे असे सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात म्हटले आहे.

यानंतर श्री. रोझेकर...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 27879 पुढे सुरु.............**

श्री.जैनुद्दीन जव्हेरी...........

प्रश्नाच्या भाग दोनला मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले आहे की, "अशा प्रकारचा प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेला नाही, तसेच शासनातर्फे औद्योगिक जिल्हयाची यादी तयार करण्यात येत नाही." मी मंत्री महोदयांना असे विचारु इच्छितो की, तीन महिन्यापूर्वीच काँग्रेसतर्फे, विरोधी पक्षातर्फे, जिल्हा नियोजन व विकास मंडळातर्फे प्रस्ताव तयार करुन पाठविण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्हयाला औद्योगिक जिल्हा घोषित करावा आणि 85 टक्के औद्योगिक वापर होत असल्यामुळे भार नियमनामधून सूट द्यावी, अशा प्रकारचा हा प्रस्ताव आहे. महाराष्ट्रामध्ये एखाद्या जिल्हयाचा 85 टक्के औद्योगिक वापर होतो आहे आणि त्या जिल्हयाला लोडशेडिंग नाही, असे उत्तर मंत्री महोदय देऊ शकतात काय ? 15 टक्क्यापेक्षा टी.ॲण्ड डी.लॉसेस कमी आहेत अशा अनेक जिल्हयांना लोड शेडिंग नाही. त्यामुळे चंद्रपूर जिल्हयाचा जो प्रस्ताव आलेला आहे त्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाचा भाग दोन बघितला तर त्यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "हा जिल्हा औद्योगिक व नक्षलग्रस्त असल्याने हया जिल्हयाला औद्योगिक यादीमध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय ?" या प्रश्नामधून हे स्पष्ट होत नाही की, या जिल्हयाला औद्योगिक जिल्हयांच्या यादीत जायचे आहे की भारनियमनाच्या दृष्टीकोनातून एमईआरसीने जो प्रोटोकॉल नेमून दिला आहे त्यात समाविष्ट करावयाचे आहे. दिनांक 5/2/2007 रोजी जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या बैठकीमध्ये माननीय पालकमंत्र्यांनी जिल्हयातील विजेचा वापर लक्षात घेऊन या जिल्हयाला भारनियमनामधून वगळावे, असा प्रस्ताव मांडला. या बैठकीचे इतिवृत्त आजपर्यन्त मंजूर झालेले नाही त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून वीज मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही. उर्जा विभागाने उद्योग विभागाकडे यासंदर्भातील चौकशी केली त्यावेळी उद्योग विभागाने सांगितले की, जिल्हयाला औद्योगिक जिल्हयांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही या विभागाकडून करण्यात येत नाही. तरी सुध्दा सांगितले पाहिजे की, एमईआरसीने लोड शेडिंगबाबतचा प्रोटोकॉल ठरवून दिलेला आहे. एखादा कुठल्याही जिल्हाला किंवा भागाला एका वर्गातून दुस-या वर्गात जावयाचे असेल तर त्या जिल्हयातील विजेचा वापर, टी. ॲण्ड डी. लॉसेस, रिकव्हरी या

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र. 27879 पुढे सुरु</u>**..............

श्री.दिलीप वळसे-पाटील..........

बाबी विचारात घेऊन निर्णय घेतला जात असतो. केवळ एखाद्या विभागामध्ये वीज निर्मिती होते म्हणून सगळाच्या सगळा जिल्हा भारनियमनातून वगळावा, अशा प्रकारची मागणी पुढे आली तर ती मागणी मान्य करणे शक्य होणार नाही. परंतु, नक्षलग्रस्त भाग असल्यामुळे व तेथील नक्षलवाद्यांच्या ॲक्टिव्हिटीज् लक्षात घेऊन रात्रीच्या वेळी भारनियमन करु नये, अशा सूचना विभागीय स्तरावरील अधिका-यांना देण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य जी बाब सांगतात त्याप्रमाणे त्यांनी जरुर त्यांचे काय म्हणणे आहे ते मला समक्ष येऊन सांगितले, मागणी केली तर चर्चा करुन काय मार्ग काढता येईल, याचा विचार करता येईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, औद्योगिक जिल्हा घोषित करण्यासाठी त्या जिल्हयाचा किती टक्के वापर औद्योगिक असला पाहिजे, असे काही नियम आहेत का, असल्यास ते काय आहेत. तसेच, चंद्रपूर सारख्या जिल्हयाचा औद्योगिक जिल्हयांच्या यादीत समावेश केला जाईल का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, वीज वापरावर कुठल्याही जिल्हयाची वर्गवारी ठरविण्यात येत नाही. वसूली, वितरण हानी या दृष्टीकोनातून एमईआरसीने शहरी विभाग, शहरी आणि औद्योगिक वसाहती विभाग आणि इतर विभाग असे गट तयार केलेले आहेत. 0 ते 25 टक्के टी.ॲण्ड डी.लॉसेस असतील तर तो विभाग 'अ' गटात मोडतो, 25 ते 35 टक्के टी.ॲण्ड डी.लॉसेस असतील तर तो विभाग 'ब' गटात मोडतो, 35 ते 50 टक्के टी.ॲण्ड डी.लॉसेस असतील तर तो विभाग 'क' गटात मोडतो आणि 50 टक्क्यांच्या वर टी.ॲण्ड डी.लॉसेस असतील तर तो विभाग 'ड' गटात मोडतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कुमारी जयश्री............

JPK/ MHM/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर..... 14:00

ता.प्र.क्र. 27879.....

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : महाराष्ट्रामध्ये एकूण 85 टक्के विजेचा औद्योगिकरणाकरिता वापर व इतर 15 टक्के असलेले भारनियमनामध्ये सूट दिलेले असे किती जिल्हे आहेत ?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, मी आताच सांगितल्याप्रमाणे भारनियमनात कुठल्याही जिल्हयाला सूट दिलेली नाही. एक्सप्रेस फीडिंग इंडस्ट्रीज व कंटिन्यूस प्रोसेसिंग इंडस्ट्रीज यांनाच भारनियमनातून रिलीफ देण्यात आलेला आहे. एखाद्या जिल्हयामध्ये विजेचा 85 टक्के वापर हा औद्योगिकरणाकरिता केला जातो, या आधारावर त्या जिल्हयाला भार नियमनातून सूट देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. भारनियमनाच्या प्रोटोकॉलमध्ये टी ॲण्ड डी लॉसेस व त्या शहराचे स्टेटस बघून भारनियमनातून सूट देण्याचा नियम आहे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

V V - 2

**अभियांत्रिकी महाविद्यालयातील ग्रंथपालांना शिक्षकीय पदाचा दर्जा देणेबाबत**

**(७) * २४८९५ प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ अन्वये शिक्षकांच्या व्याख्येमध्ये ग्रंथपालांची पदे बिगर सुट्टीची शैक्षणिक पदे म्हणून घोषीत करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील ग्रंथपालांना शिक्षकीय पदांचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) होय,
(२) होय,
(३) व (४) ग्रंथपाल या पदास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार जरी शिक्षकीय पदांची वेतनश्रेणी देण्यात आलेली असली तरी सदर पदांचा समावेश अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांमध्ये शिक्षकीय पदांमध्ये समाविष्ठ केल्याचे सकृत दर्शनी दिसून येते नाही. म्हणून सदर प्रस्तावाबाबत वित्त विभागामध्ये सल्ला मसलत करुन अंतिम निर्णय घेण्यात येत आहे.

प्रा.शरद पाटील : माननीय मंत्रिमहोदयांनी प्रश्न क्रमांक ३ आणि ४ च्या उत्तरामध्ये ग्रंथपाल या पदास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार जरी शिक्षकीय पदांची वेतनश्रेणी देण्यात आलेली असली तरी सदर पदांचा समावेश अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांमध्ये शिक्षकीय पदांमध्ये समाविष्ट केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. म्हणून सदर प्रस्तावाबाबत वित्त विभागामध्ये सल्ला मसलत करुन अंतिम निर्णय घेण्यात येत आहे. सभापती महोदय, ही विसंगती नाही काय ? महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ हा अभियांत्रिकी महाविद्यालयांना लागू असल्यामुळे अभियांत्रिकी महाविद्यालय देखील या कायद्यानुसार चालत असल्यामुळे या कायद्यामध्ये ग्रंथपालांचे पद हे शिक्षकीय पदांमध्ये मानले गेले आणि या पदाला अशिक्षकीय पद म्हणून मानावे असे निदेश देण्याचा अधिकार तंत्र शिक्षण संचालनालयाला कोणी दिला ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते खरे आहे. ग्रंथपाल या पदास ए.आय.सी.टी.ने इतर शिक्षकीय पदांची वेतनश्रेणी दिली पण त्यांनी नॉर्म्समध्ये आतापर्यंत त्यांनी या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पदाचा शिक्षकीय पदामध्ये समावेश केलेला नाही, यामध्ये आम्ही महाराष्ट्र शासन म्हणून काहीही करु शकत नाही पण एक गोष्ट करु शकतो, ती अशी की, ए.आय.सी.टी.ला पत्र लिहून व त्यांच्याशी चर्चा करुन त्यांना त्यांच्या नॉर्म्समध्ये चेंज करण्यास सांगण्याबाबत प्रयत्न करु शकतो.

श्री.जी.एल.अैनापूरे : ग्रंथपाल हे पद शिक्षकीय पद आहे, असा यु.जी.सी.चा नॉर्म आहे मग ए.आय.सी.टी. स्वतंत्रपणे ग्रंथपाल हे शिक्षकीय पद नाही असा नॉर्म ठरविणारी कोण ? यु.जी.सी.ने यास संमती दिलेली आहे काय ? सदर तारांकित प्रश्नाच्या छापील उत्तरात म्हटल्याप्रमाणे सदर प्रस्तावाबाबत वित्त विभागाचा सल्ला घेऊन अंतिम निर्णय घेण्याचा काहीही संबंध नाही कारण ग्रंथपालांना वेतनश्रेणी तर इतर शिक्षकीय पदांप्रमाणे दिलेलीच आहे. याबाबत आपण आपल्य उच्चशिक्षण विभागाशी सल्लामसलत करुन अंतिम निर्णय घेणार आहात का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, याबाबत ए.आय.सी.टी.ने जे नॉर्म्स ठरविलेले आहेत ते सेंट्रल गव्हर्नमेंटच्या बॉडीने ठरविल्याप्रमाणे आहेत, यामध्ये महाराष्ट्र शासन जी काही शिफारशी अगर विनंती करु शकतो, ती शासन करणार आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सन १९९४ पूर्वी काही तांत्रिक विद्यापीठांमध्ये ग्रंथपाल हे पद शिक्षकीय पदांपैकीच एक समजले जात होते. काही एक दोन ठिकाणी नॉन ॲकॅडमिक स्टाफ म्हणून ग्रंथपालांना समजण्यात येत होते. उच्च न्यायालयाने निर्णय दिला की, ग्रंथपाल जर नॉन ॲकॅडमिक स्टाफ असेल तर नॉन ॲकॅडमिक स्टाफ समजावा अन्यथा तो ॲकॅडमिक स्टाफमध्येच गणला जावा. त्यावेळी हे प्रकरण संयुक्त समितीकडेही चर्चेला येऊन गेले होते. यु.जी.सी. आणि सबंध विद्यापीठांमध्ये सदर पदाबाबत तपासणी करुन एक निर्णय घेण्यात आला होता व या निर्णयावरुन जो कायदा बनविण्यात आला होता, तो कायदाही चांगला आहे. परंतु या कायद्यामध्ये स्पष्टपणाने असे सांगितले आहे की, इंजिनियर्स कॉलेजच्या ग्रंथपालांना ॲकॅडमिक स्टाफच्या वगळण्यात का आले ? ए.आय.सी.टी.ने शिफारस केल्याप्रमाणे ग्रंथपाल या पदाला शिक्षकीय पदाएवढी वेतनश्रेणी प्रदान करण्यात आली आहे, असे यात म्हटलेले आहे. याबाबत यु.जी.सी.ने जी स्पष्टपणाने शिफारस दिली त्या आधारावर महाराष्ट्राने कायदा केला. ग्रंथपाल हा तर नॉन व्हॅकेशन ॲकॅडमिक स्टाफ आहे कारण लायब्ररी ही उन्हाळयात देखील सुरु असते. सभापती महोदय, या प्रस्तावाबाबत वित्त विभागाला विचारण्याचे किंवा त्यांच्याशी सल्लामसलत करुन निर्णय

V V -



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेण्याचे काहीच कारण नाही, कारण ग्रंथपाल या पदाला वेतनश्रेणी तर ॲकॅडमिक स्टाफप्रमाणेच दिलेली आहे. कायद्याच्या विरोधात निर्णय घेणे बरोबर नाही. कायद्यामधील प्रिस्क्रिप्शनप्रमाणेच ग्रंथपाल या पदाला योग्य असे ॲकॅडमिक स्टेटस देणे गरजेचे आहे, अशी सक्ती शासन ए.आय.सी.टी.वर करणार का ?

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.24895**.......

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आधीच सांगितले आहे की, शासनाचा याला काही विरोध नाही. ए.आय.सी.टी.चे नॉर्म्स बदलण्यासंदर्भात शिफारस करण्यात येईल, असे मी आधीच सांगितलेले आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, दोन महिन्याच्या आत नॉर्म्स बदलण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला असे वाटते की, माननीय उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. या विषयासंदर्भात महाराष्ट्र शासनाने जो कायदा केलेला आहे त्या कायद्याप्रमाणे शासन ग्रंथपालांना वेतन देत आहे. यामध्ये फायनान्शिअल लायबिलिटी एक रुपयाची सुध्दा नाही. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने शिफारस केलेली आहे. त्यामुळे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकांप्रमाणे नाही, असे कारण काढणे योग्य नाही. शासन कायद्याप्रमाणे ग्रंथपालांना वेतन देत आहे, शिफारस केलेली आहे. हे सर्व रेकॉर्डवर आलेले आहे. त्यांना म्हणण्यामध्ये काय अर्थ आहे ? एक रुपयाची देखील लायबिलीटी वाढली असती तर वित्त विभागाकडे जाण्याची आवश्यकता होती. परंतु यामध्ये लायबिलिटी वाढत नाही. परंतु मानकामध्ये बसत नाही, असे कारण सांगून टाळाटाळ करण्याचा प्रयत्न केला जात आहे, हे योग्य नाही. शासनाने मंजूर केलेल्या कायद्याप्रमाणे जर याला मंजुरी दिलेली असेल तर ग्रंथपालांना कायदेशीर पदवी लागू होते. शासनाने मंजूर केलेल्या कायद्याप्रमाणे असेल तर ग्रंथपालांना हे लागू होईल काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आधीच सांगितले की, महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ॲक्ट प्रमाणे ग्रंथपालांना शिक्षकांचा दर्जा देण्याची तरतूद आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, ए.आय.सी.टी. ने जे नॉर्म्स ठरविलेले आहेत त्या टिचींग कोर्सच्या कॅटॅगरीमध्ये पहिला नंबर लेक्चरर, दुसरा नंबर सिनिअर लेक्चरर, तिसरा नंतर हेड ऑफ दी डिपार्टमेंट आणि चौथा नंबर प्रिंसिपॉलचा आहे. लायब्ररियन यांना लायब्ररी स्टाफमध्ये टाकण्यात आलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, शासने मंजूर केलेल्या कायद्यानुसार त्यांना वेतन दिले जाते. कारण ऑल इंडिया कौन्सिलने तशी शिफारस केलेली आहे. मानकाची अट न टाकता कायद्यामध्ये तसे नमूद केलेले असेल तर ते शासनावर बंधनकारक आहे आणि असेल तर शासन ते मान्य करेल काय ?

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.24895**.......

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आधीच सांगितले की, शासनाचा याला काहीही विरोध नाही. शासनाचा एकच प्रयत्न राहील की, ए.आय.सी.टी.चे जे एक्झिस्टींग नॉर्म्स आहेत त्यामध्ये बदल करावा लागेल. त्यांना लवकरात लवकर नॉर्म्स बदलण्यासंदर्भात विनंती केली जाईल.

**सभापती** : माननीय राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, प्रश्न क्लिअर आहे. ए.आय.सी.टी.चे नॉर्म्स आल्यानंतर राज्य शासनाने जो कायदा केला त्या कायद्यातील तरतुदी असे सांगतात की, ग्रंथपालांची पदे शैक्षणिक पदे समजावीत. शासनाने कायदा केल्यावर नंतरच्या काळात ए.आय.सी.टी.मध्ये काहीही फरक असला तरी जोपर्यंत राज्य शासनाचा कायदा आहे तोपर्यंत आपण त्यांना संरक्षण दिले पाहिजे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, इंजिनिअरिंग कॉलेजसंबंधीचा प्रश्न आहे. कारण .....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण सांगितल्यानंतर देखील माननीय राज्यमंत्री समजून घेत नाहीत. महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयातील ग्रंथपालांना शिक्षकीय पद समजले जाते याचे कारण कायद्यामध्ये तशी तरतूद आहे. या कायद्यातून इंजिनिअरिंगच्या लोकांना वगळा अशी कायद्यामध्ये तरतूद नाही. कायद्याची अंमलबजावणी करण्याची गोष्ट आहे. सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, कायद्यातून इंजिनिअरिंगच्या ग्रंथपालांना वगळलेले नाही. ही Well defined definition आहे. तेव्हा याबाबतीत आपल्याच कायद्याचे आपण पालन न करणे ही गोष्ट अनुचित आहे, म्हणून तसे आपण त्या महाविद्यालयाला कळवाल काय ?

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.बोरले 14:10

ता.प्र.क्र.24895

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या सभागृहात मंजूर केलेला कायदा पाळणे बंधनकारक आहे किंवा नाही ? हा कायदा मंजूर केला असेल आणि त्या कायद्यामध्ये तशी तरतूद असेल तर ते तुमच्यावर बंधनकारक आहे. माननीय मंत्री महोदयांनी एक तर मान्य करावे किंवा अमान्य करावे कारण पुन्हा पुन्हा हा प्रश्न उपस्थित होत आहे. माननीय मंत्री महोदयांनी याचे उत्तर होय किंवा नाही असे दिले पाहिजे.

**सभापती** : विधानमंडळ म्हणजे कायदेमंडळ आहे, सर्वोच्च सभागृह आहे. या सभागृहात आपण जे कायदे मंजूर करतो त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री माननीय श्री.दिलीप वळसे पाटील हे उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्र्यांना थोडी मदत करतील असे मला वाटते.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एक गोष्ट समजून घेतली पाहिजे की, आपण ज्या कायद्याचा उल्लेख सभागृहात करीत आहात तो 1994 चा महाराष्ट्र विद्यापीठ कायदा हा अस्तित्वात आहे. या कायद्यामध्ये टीचर व ग्रंथालयाची डेफिनेशन दिलेली आहे. हा कायदा अस्तित्वात असला तरी राष्ट्रीय स्तरावर ए.आय.सी.टी.आय. व मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया यांचे कायदे आहेत. यामध्ये ग्रंथपालांना शिक्षकीय पदाचा दर्जा देण्याबाबत पाचव्या वेतन आयोगाच्या वेळी निर्णय झाला आहे, त्यावेळी राज्य सरकारने योग्य ती भूमिका स्वीकारलेली आहे. ए.आय.सी.टी.आय.ने त्यांच्या निकषामध्ये ही गोष्ट नमूद केलेली नाही, हा फक्त क्लेअरीफिकेशनचा मुद्दा आहे. राज्य सरकारने याबाबत अंमलबजावणी करण्यासाठी सुरुवात केलेली आहे. दोन महिन्याच्या आत हा प्रश्न निश्चित निकाली काढण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्री महोदय म्हणत आहे की, दोन महिन्यात हा प्रश्न निकाली काढू. माझे म्हणणे आहे की, जी गोष्टीची अगोदरच कायद्यामध्ये तरतूद आहे, ती गोष्ट आपण कशी काय निकाली काढणार ?. मंत्री महोदयांना मी सांगतो की, ते म्हणत आहेत त्या सर्व प्रश्नांची चर्चा झाली आहे, सर्व नार्मस त्यावेळी तपासले गेले असून त्याचे कायद्यात रुपांतर झ ालेले आहे. त्यामुळे सभागृहाबाहेर चुकीचा मेसेज जात आहे की, कायदयामध्ये असले तरी माननीय मंत्र्यांना येथे नाही म्हणण्याचा अधिकार आहे. "असेल कायद्यात तरी आम्ही करत नाही" असे मंत्री महोदयांना वाटत असेल तर ते चुकीचे आहे. विधानमंडळामध्ये अशा प्रकारची चर्चा होणे अप्रतिष्ठीतपणाचे आहे, यापेक्षा जास्त प्रतिष्ठीतपणे मला बोलता येत नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24895

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपणास प्रश्न विचारु इच्छितो की, याबाबतचा कायदा काय आहे ? याची आपण शहानिशा करावी. विधीमंडळातील कायद्याचे ज्ञान असलेले अधिकारी येथे उपस्थित आहेत, त्यांच्याकडून हे तपासून घ्यावे. आमचे म्हणणे खरे असेल तर शासनाला अंमलबजावणी करण्याचे आदेश त्वरीत देण्यात यावेत. कारण कायदा मंजूर झालेला आहे, त्यावरील अंमलबजावणी करण्यासाठी एवढा विचार कशाला करता.

**सभापती** : या प्रश्नावर सन्माननीय सदस्यांनी जी चर्चा केलेली आहे, या अनुषंगाने मी संबंधितांबरोबर चर्चा करुन उद्या निर्णय देईन.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

**भिवंडी येथील वीज मीटर गैरव्यवहाराबाबत**

**(८) * २४९२८ श्री. धनाजी साठे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून)मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी येथे वीज मीटर आणि वसूलीमध्ये करोडो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची घटना दिनांक २२ जानेवारी, २००७ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराची उच्चस्तरीय समिती नेमून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे तद्नुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.धनाजी साठे :सभापती महोदय, भिवंडी येथील वीज मीटर आणि वसूलीबाबत गैरव्यवहार झाल्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला आहे. प्रश्नाला लेखी उत्तर देताना माननीय मंत्री महोदयांनी हे खरे नाही असे म्हटलेले आहे. मला याबाबत प्रश्न विचारावयाचा आहे की, भिवंडीमध्ये येथे वीज बील वसूलीचे प्रमाण किती आहे ? वसूलीमध्ये गैरव्यवहार झाला आहे हे खरे आहे का ?.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धनाजी साठे यांनी भिवंडी येथे वीज मीटर आणि वसूलीमध्ये करोडो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची घटना दिनांक 22 जानेवारी, 2007 वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारला आहे. परंतु या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, भिवंडी येथे वीज मीटर व वसूलीमध्ये करोडो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याच्या संदर्भात कोणतीही घटना माझ्यासमोर आजपर्यंत आलेली नाही. याबाबत सन्माननीय सदस्यांकडे काही वस्तुनिष्ठ माहिती असेल व त्यांनी ती मला दिली तर त्याच्या आधारे चौकशी करण्यात येईल.

----------

.....4





**मोरबे (ता.पनवेल) येथील विशेष पर्यटन क्षेत्राबाबत**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(९) * २५२०७ श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. चंद्रकांत रघुवंशी** **:** सन्माननीय **पर्यटनमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल येथील मोरबे येथे १४० एकर क्षेत्रात विशेष पर्यटन क्षेत्र विकसित करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पर्यटन क्षेत्राबाबत नवी मुंबई महापालिकेने प्रारुप आराखडा व प्रस्ताव तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) सदरहू प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांचेकरिता** : (१) मोरबे, तालुका पनवेल या ठिकाणास क वर्ग पर्यटनस्थळ म्हणून मान्यता दिलेली नाही.

मोरबे धरण नवी मुंबई महानगरपालिकेकडे सोपवले असून तेथे पर्यटनस्थळ विकसित करण्याबाबतचा नवी मुंबई महानगरपालिकेकडे प्रस्तावित आहे.

(२) नवी मुंबई महापालिकेस प्रारुप आराखडा व प्रस्ताव तयार केलेला नाही.

(३) मोरबे धरणाच्या प्रकल्पासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने १२०० हेक्टर्स जमीन संपादित केली असून बहुतांश जमीन बुडीताखाली व धरणाच्या पायामध्ये गेली आहे. तथापि, धरणाच्या खालील भागात शिल्लक असलेल्या १४० एकर जागेवर पर्यटनस्थळ विकसित करण्याचे नवी मुंबई महानगरपालिकेकडे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मोरबे येथे पर्यटनस्थळ विकसित करण्यासाठी अजूनही प्रारुप आराखडा व प्रस्ताव तयार न करण्याची कारणे कोणती ? याबाबत ठराविक कालमर्यादा निश्चित करुन प्रस्ताव सादर करण्यात येईल का ?

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25207 ....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हा जो प्रश्न आहे त्या संबंधात पर्यटन विभागाकडे अजूनपर्यंत काहीही प्रस्ताव आलेला नाही. खरे म्हणजे नवी मुंबई महानगरपालिकेचे हे स्वतःचे काम आहे. महापालिकेच्या जानेवारी 2007 च्या बैठकीमध्ये त्यांनी असे ठरविले होते की, 140 एकर मध्ये पर्यटन स्थळ विकसित करावयाची, त्या बैठकीमध्ये याबाबत चर्चा झाली होती. त्या बैठकीमध्ये याबाबत असा निर्णय घेतला गेला की, याबाबत सल्लागार नेमून एक पायलट प्रकल्प अहवाल मागवून घ्यावा. त्या ठिकाणी जलक्रीडा, बोटिंग, ॲम्युझमेंट पार्क वगैरे करण्याच्या दृष्टीने ही चर्चा झ ाली होती. परंतु हा महापालिकेचा स्वतःचा कार्यक्रम आहे. पर्यटन विभागाकडे असा प्रस्ताव अजूनपर्यंत आलेला नाही.

****

...... वायवाय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना स्थायी सेवा करण्यासाठी लोकसेवा आयोगाची परिक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य करण्याचा निर्णय**

**(10) * 27916 श्री. विक्रम काळे** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयात दहा वर्षापेक्षा जास्त सेवा बजावणाऱ्या अधिकाऱ्यांना स्थायी म्हणून सेवा करण्यासाठी लोकसेवा आयोगाची परिक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(3) नुकत्याच पदव्युत्तर झालेल्या डॉक्टरांसोबत 10 वर्षापेक्षा जास्त सेवा केलेल्या अधिकाऱ्यांना लोकसेवा आयोगाची परिक्षा द्यावी लागत असल्यामुळे बरेच अधिकारी येथील नोकरी सोडून परराज्यात जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, यावर शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (1) सेवा भरती नियमानुसार, शासकीय वैद्यकीय शिक्षण संस्थांमध्ये अधिव्याख्यात्यांची पदे 100% नामनिर्देशनाने भरण्यात येतात. जर अधिव्याख्याता हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे सेवेत आलेला नसेल तर तो महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे अर्ज करुन तेथील मुलाखतीद्वारे स्थायी सेवेत प्रवेश करु शकतो. याकरीता त्यांना कोणतीही लेखी परिक्षा द्यावी लागत नाही.
(2), (3) व (4) एकदा स्थायी सेवेत प्रवेश झाल्यावर पुढील पदोन्नतीसाठी ऐच्छिकरित्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा नियमित पदोन्नती असे दोन मार्ग त्या उमेदवारापुढे खुले असतात. या वस्तुस्थितीच्या प्रकाशात केवळ यामुळे अध्यापक नोकरी सोडून परराज्यात जातात असे म्हणणे संयुक्तिक नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या उत्तराने माझे समाधान झाले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, ज्यांची सेवा 10 वर्षे झालेली आहे असे एकूण किती वैद्यकीय अधिकारी आहेत ? आणि ज्यांची वैद्यकीय सेवा 10 वर्षे झाली आहे अशांना कायम स्वरूपी सेवेत, स्थायी स्वरूपी सेवेत स्वीकारावे असा जो सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे त्यानुसार या 10 वर्षे सेवा झालेल्यांना आपण स्वीकारणार आहात काय आणि असल्यास केव्हा स्वीकारणार आहात आणि नसेल तर त्यांना स्वीकारण्यात अडच्णी काय आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाला उत्तर देताना मी सांगू इच्छितो की, ज्यांची सेवा 10 वर्षे पूर्ण झालेली आहे असे 24 लोक आहेत. तसेच सुप्रीम कोर्टाच्या निर्णयासंबंधात सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यासंबंधात मी सांगू इच्छितो की, सुप्रीम कोर्टाच्या त्या ऑर्डर्सचे आम्ही पालन करू.

***

...... वायवाय 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भिवापूर, (जि. नागपूर) येथील मंजूर झालेल्या जुन्या लाभार्थ्यांना समाजकल्याण विभागांच्या योजनांचा लाभ मिळण्याबाबत**

**(11) * 26025 श्री.पांडुरंगफुंडकर, श्री.नितीनगडकरी, श्री.जगदीश गुप्ता** : सन्माननीय **ग्रामविकासमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) समाजकल्याण विभागाच्या सर्व योजनांच्या वाटपाची मंजूरी दरवर्षी दिनांक 31 मार्च पर्यंत घेणे बंधनकारक असल्यामुळे या योजनांचा निधी दिनांक 31 मार्च पर्यंत खर्च करुन लाभार्थ्यांची निवड करणे गरजेचे असते, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त निर्णयानुसार भिवापूर, जि. नागपूर येथील पंचायत समितीकडे आलेले सर्व अर्ज शिफारशींसह नागपूर जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे पाठविले, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, नागपूर जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण विभागाने निवड केलेल्या लाभार्थ्यांना वस्तुचे वाटप करावे असे आदेश दिनांक 29 मार्च, 2006 रोजी खंडविकास अधिकारी, भिवापूर, जि. नागपूर यांना दिले, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, खंडविकास अधिकारी, भिवापूर यांनी मंजूर झालेली यादी रद्द करुन साडे तीन महिन्यांनंतर नवीन वर्षात दुसरी यादी मंजूर करुन वस्तुचे वाटप करुन जुन्या मंजूर झालेल्या लाभार्थ्यांवर अन्याय केला, हे ही खरे आहे काय,
(5) असल्यास, जुन्या लाभार्थ्यांना समाजकल्याण विभागाच्या योजनांन्वये वस्तुचे वाटप करावे अशी विनंती मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी त्यांच्या दिनांक 27 डिसेंबर, 2006 रोजी क्र. विपने/मविप/834/2006 च्या पत्राद्वारे मा. समाजिक न्याय मंत्री महोदयांकडे केली, हे ही खरे आहे काय,
(6) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. रणजित कांबळे, श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता** : (1), (2) व (3) होय.
(4) समाज कल्याण विभागाने निवड केलेल्या लाभार्थ्यांना वस्तु वाटप करण्याचा कार्यक्रम सभापती समाज कल्याण यांचे सहमतीने ठरविण्यात येतो. समाज कल्याण समितीचे सभापती, जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती स्तरावरील पदाधिकारी यांनी मंजूर यादीतील काही लाभार्थ्यांचे नांवे समाज कल्याण समितीच्या मंजूरीने रद्द करुन नविन नावे समाविष्ट करण्यात आली आहे.
(5) होय.
(6) लाभार्थ्यांची निवड करण्याचे अधिकार तसेच लाभार्थी रद्द करणे किंवा लाभार्थ्यांच्या नावात बदल करणे इ.अधिकार समाजकल्याण समितीला आहेत. त्यानुसार समितीच्या निर्णयाप्रमाणे उचित कार्यवाही करण्यात आलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, समाजकल्याण विभागातर्फे लाभार्थ्यांना जे वाटप करावयाचे असते त्याची मुदत 31 मार्च पर्यंत असते म्हणजे 31 मार्चच्या आत त्याचे वाटप करावे लागते. या ठिकाणी नागपूर जिल्हा परिषदेतील भिवापूर पंचायत समितीच्या बीडीओ यांनी जिल्हा

...... वायवाय 4 ...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 26025 .....

परिषदेकडे काही लाभार्थ्यांची यादी पाठवून या यादीप्रमाणे वाटप व्हावे म्हणून 29 तारखेला यादी व पत्र पाठविले होते. मात्र नंतर ती यादी बदलली गेली आणि त्या यादीमध्ये काही नवीन नावे घुसवून त्यांना वाटप झाले आहे, ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, 28.3.2006 रोजी जी पहिली यादी दिली गेली होती त्यातील 8 ते 9 नावे बदलली हे खरे आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ती नावे बदलण्याचे कारण काय ? पंचायत समितीने जी यादी जिल्हा परिषदेकडे पाठविली होती ती यादी जिल्हा परिषदेमध्ये आल्यानंतर बदलली गेली आणि त्यात काही नावे काढून टाकून तेथे नवीन नावे घुसवून वाटप करण्यात आले तर ही जुनी नावे काढून नवीन नावे बदलण्याची कारणे काय आहेत ?

( यानंतर श्री. सरफरे .... झेडझेड 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26025...

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, दिनांक 25.6.2006 रोजी पहिल्या ठरावामध्ये बदल करुन दुसरा ठराव संमत करुन भिवापूर पंचायत समितीच्या बी.डी.ओ.मार्फत समाजकल्याण समितीकडे पाठविण्यात आला. सदरहू ठरावामध्ये नवीन आठ नावे बदलून पाठविण्यात आली. त्या नवीन लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 31 मार्च रोजी वर्ष संपते, त्यापूर्वी 29 मार्चला वाटप करावे असे जिल्हा परिषदेने आदेश दिले होते. परंतु 25 मार्च रोजी बैठक घेऊन जुनी नावे बदलून नवीन नावे समाविष्ट करुन तो ठराव तयार करण्यात आला. यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. आणि या भ्रष्टाचारामध्ये पंचायत समितीच्या बी.डी.ओ. चा सहभाग आहे. हे सर्व कारस्थान स्थानिक आमदारांच्या दबावाखाली झाले आहे. एकदा एक नाव निश्चित केल्यानंतर ते बदलून त्या जागेवर दुसऱ्याचे नाव घ्यावयाचे ही तुम्हाला गंमत वाटते काय? 31 मार्च हा शेवटचा दिवस असतांना मुदत वाढवून देण्याचा त्या अधिकाऱ्यांना काय अधिकार आहे? जिल्हा परिषदेने 28 तारखेला आदेश दिल्यानंतर 31 मार्चपूर्वी वाटप न करता साडे तीन महिन्यांनी वाटप केले. यामध्ये अनियमितता नाही काय? हे कायदेशीररित्या योग्य आहे काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ग्रामसभेमध्ये नावे ठरविण्याची पध्दत आहे. त्यानंतर पंचायत समितीमार्फत जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण समितीसमोर ती पाठविण्यात येतात. पाठविण्यात आलेल्या नावांना अंतिम मान्यता देण्याचा पूर्ण अधिकार समाज कल्याण समितीला आहे. दिनांक 28.3.2006 ला ठराव करुन दि.29.3.2006 ला समाज कल्याण समितीकडे यादी पाठविली. त्यानंतर दिनांक 5.6.2006 रोजी पूर्वीच्या यादीतील नावे वगळून पुन्हा नवीन यादी करुन पाठविण्यात आली.

श्री. नितीन गडकरी : जिल्हा परिषदेची मंजूरी कोणत्या यादीला होती?

श्री. रणजित कांबळे : जिल्हा परिषदेची मान्यता दोन्ही याद्यांना होती.

श्री. पांडुरंग फुंडकर : असे कसे चालेल?

श्री. रणजित कांबळे : यामध्ये नियमबाह्य कार्यवाही पंचायत समितीच्या स्तरावर न होता जिल्हा परिषदेच्या स्तरावर झाली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ग्रामसभेमध्ये ठराव करुन नावांची यादी पाठविली असतांना जिल्हा परिषदेच्या स्तरावर नावे कां वगळण्यात आली?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MHM/

ता.प्र.क्र. 26025...

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ग्रामसभेमध्ये तयार करण्यात आलेली जुनी व नवीन नावांची यादी पंचायत समितीमार्फत जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आली. ती नावे मंजूर करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण समितीला आहे. त्याप्रमाणे समाज कल्याण समितीमार्फत यादीतील नावांना अंतिम मान्यता दिली जाते. त्यानंतर पंचायत समितीमार्फत डिस्ट्रिब्युशन केले जाते, त्यापेक्षा काही केले जात नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ग्राम विकास विभागाचे मंत्री म्हणून आपण जिल्हा परिषदेने नियमबाह्य काम केल्याबद्दल आपण त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात?

श्री. रण्जित कांबळे : सभापती महोदय, 31 मार्चपूर्वी वाटप व्हावयास पाहिजे होते,परंतु ते झाले नाही. याचा अर्थ संबंधित समाज कल्याण अधिकाऱ्याचे हे काम असतांना त्याने ते नीटपणे केले नाही. 31 मार्चपर्यंत यादी पाठवून संबंधित लाभार्थींना वाटप करण्याची जबाबदारी समाज कल्याण अधिकाऱ्याची आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2025 (पुढे सुरू...

श्री.रणजित कांबळे (पुढे सुरू...

समाजकल्याण समितीसमोर निदर्शनास आणण्याची जबाबदारी ही समाजकल्याण अधिकाऱ्याची आहे. त्याबाबतची सखोल चौकशी करून यामध्ये जे कोणी दोषी ठरतील त्यांच्यावर एक महिन्याच्या आत कडक कारवाई करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करणार आहात. त्याचबरोबर ज्या लाभार्थींची नावे सुरुवातीला पाठविण्यात आली होती, त्यांना लाभ मिळालेला नाही, अशा लाभार्थींना लाभ मिळणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : त्यांना लाभ मिळालेला नाही त्यांनी पुन्हा अर्ज केला तर जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण समितीकडे तशी शिफारस करण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

**कळवा (जिल्हा ठाणे) येथील कोनपाडा येथील 5 वर्षाच्या मुलीचा विजेच्या खांबाला चिकटल्यामुळे झालेल्या मृत्यूबाबत**

**(12) * 28699 श्री. अनिल परब** : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून)मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कळवा (जिल्हा ठाणे) येथील कोनपाडा येथे राहणाऱ्या 5 वर्षे वयाच्या मुलीचा विजेच्या खांबाला चिकटल्यामुळे दिनांक 29 जानेवारी 2007 रोजी मृत्यू झाला हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व संबंधित ठेकेदार यांचेविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (1) हे खरे आहे,

सदरची घटना कोनपाडा येथे घडलेली नसून ती पौंडपाडा, कळवा (पूर्व) जिल्हा ठाणे येथे घडलेली आहे,

(2) होय,

(3) घटनास्थळी अनोळखी व्यक्तीने अनाधिकृतपणे वीजपुरवठा घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडच्या लोखंडी पोलच्या वाहीनीवरती वायरचा हुक टाकलेला होता. सदरचा हुक वाऱ्याने हालून तो लोखंडी पोलच्या ब्रॅकेटला लागला असता लोखंडी पोल विद्युत भारीत झाला व त्याचवेळी अपघातग्रस्त कु.नम्रता शरद देसले वय 5 वर्षे ही बालिका विद्युत भारीत पोलच्या सानिध्यात असल्याने तिला विजेचा धक्का बसला त्यामुळे तिचा मृत्यू झाला. म.रा.वि.कं. मर्या. च्या प्रचलित नियमाप्रमाणे श्रीमती शितल शरद देसले (मृत बालिकेची आई) यांना तातडीची मदत म्हणून रोख रुपये 10,000/- (अक्षरी दहा हजार फक्त) मदत दिनांक 31.1.2007 रोजी दिली आहे. या अपघाताच्या दुर्घटनेशी ठेकेदाराच्या संबंधित कोणतीही बाब नाही.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, अनोळखी व्यक्तीने अनधिकृतपणे वीजपुरवठा घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडच्या लोखंडी पोलच्या वाहिनीवरती वायरचा हुक टाकल्याने सदरचा हुक वाऱ्याने हालून तो लोखंडी पोलच्या ब्रॅकेटला लागला आणि पोल विद्युत भारीत झाला, त्यावेळेस ही मुलगी पोलच्या सानिध्यात आल्याने तिला विजेचा धक्का बसला आणि तिचा मत्यू झाल्याचे म्हटलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, वीज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 28699 ...

श्री.अनिल परब (पुढे सुरू...

चोरणारी अनोळखी व्यक्ती कोण होती, ती सापडलेली आहे काय, असल्यास तिच्यावर गुन्हा नोंदलेला आहे काय ? गुन्हा नोंदला गेला नसेल तर तिच्यावर वीज चोरी आणि सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणार आहे काय ? या निरागस मुलीचा काही दोष नसताना तिचा मृत्यू झालेला आहे. तिच्या कुटुंबियांना खास बाब म्हणून आर्थिक मदत देणार आहात काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभाती महोदय, ही वीज चोरणारी व्यक्ती कोण होती हे अजून निदर्शनास आलेले नसले तरी याबाबतची चौकशी इन्स्पेक्टर, इलेक्ट्रीक, ठाणे यांनी या संबंधात चौकशी करून अहवाल दिलेला आहे. आर्थिक मदत म्हणून या मुलीच्या कुटुंबियांना 10 हजार रुपये दिलेले आहेत. साधरणत: वीज मंडळाच्या चुकीमुळे किंवा हलगर्जीपणामुळे अशा घटना ज्यावेळेला घडतात त्यावेळेला नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी वीज कंपनीवर असते. तरी देखील पाच वर्षाची ती लहान मुलगी होती. जरी ही घटना कोणाकडूनही घडली असली तरी त्यांच्या कुटुंबियांना अतिरिक्त मदत करण्याच्या संदर्भात निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ही घटना ठाणे येथील कळवा-कोनपाडा येथे घडलेली आहे. वीज चोरी करणारी व्यक्ती सापडलेली नाही. ही व्यक्ती किती दिवसामध्ये सापडेल असा कयास आहे ? त्यासंबंधाने गुन्हा नोंदविलेला आहे काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : अशा प्रकारच्या घटना होतात त्यावेळेस तातडीने गुन्हा नोंदविला जातो. या प्रकरणामध्ये गुन्हा नोंदविलेला आहे. मुलगी भारीत पोलच्या सानिध्यात आल्यामुळे विजेचा धक्का बसून तिचा मृत्यू झालेला आहे. या अनोळखी व्यक्तीचा शोध पोलीस आणि मंडळाचे अधिकारी एकत्रित घेतील.

--

**सभापती** : आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

**पृशी**. : लेखी उत्तरे.

**मु.शी**.: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

सहसचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 2 एप्रिल 2007 रोजीची तारांकित प्रिश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**सभापती** : दिनांक 2 एप्रिल 2007 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची चादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. व मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

श्री.दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा मंत्री) : सभांपती महोदय, मी आपल्या अनुमतीने राज्य माहिती आयोगाचा प्रथम वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री.रविशेठ पाटील (पर्यावरण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा सन 2002-2003 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे

श्री. रामनाथ मोते ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा दहावा अहवाल सभागृहास सादर करतो.

**सभापती** : पंचायती राज समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. दि. 4.4.2007 रोजी श्रीरामपूर येथे सेवन्थ-डे इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये काम करणाऱ्या श्री. भाऊसाहेब पवार या हिंदू पती-पत्नीस ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती ख्रिश्चन धर्मगुरु व सदर शिक्षण संस्थेचे डायरेक्टर श्री. विजय खाजेकर यांनी केली असताना ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यास श्री. भाऊसाहेब पवार व त्यांच्या पत्नीने नकार दिल्याने त्यांना सदर संस्थेच्या पदाधिकारी व धर्मगुरु यांनी केलेली मारहाण, त्यांना कामाचे वेतन न देण्यात येणे, धर्मांतर केल्यास त्यांना आर्थिक फायदा होईल अशी दाखविण्यात आलेली आमिषे, सदर आमिषालाही बळी पडत नसल्याने त्यांचा करण्यात येत असलेला मानसिक छळ, दबावाने आपल्या आईवडिलांना धर्मांतर करण्याबाबत मारहाण, छळ, आर्थिक कोंडी करणाऱ्या उपरोक्त संस्थेचे एक संचालक व धर्मगुरु यांच्या विरोधी त्यांचा मुलगा श्री. किरण भाऊसाहेब पवार यांनी श्रीरामपूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली असताना सदर तक्रार अदखलपात्र गुन्हा अशी नोंद पोलिसांनी केली आहे. हिंदू धर्मियांना धर्मांतर करण्याची सक्ती केल्याने श्रीरामपूरमध्ये निर्माण झालेला संताप व चीड लक्षात घेता सदर संस्थेच्या एका संचालकाची व धर्मगुरु यांची चौकशी करुन तात्काळ कारवाई करण्याबाबत शासनाने निवेदन करावे. मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, धर्मांतर केले नाही तर नोकरीतून काढून टाकू अशी त्यांना धमकी दिलेली आहे. याबाबतीत शासनाने तातडीने लक्ष घालावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, याबाबत नोंद घेण्यात येत आहे.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. एका वादग्रस्त परंतु अतिशय गंभीर स्वरुपाच्या प्रकरणाकडे लक्ष वेधण्यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्ये कर्करोगाच्या शेवटच्या टप्प्यामध्ये मरणासन्न अवस्थेत असलेल्या एका मुलीवर बलात्कार झाल्याचे वृत्त काल वर्तमानपत्रातून तसेच काही टी.व्ही. वाहिन्यांवरुन प्रसारित झालेले आहे. त्यासंदर्भात शिवसेना महिला प्रमुखांच्या वतीने आंदोलन केलेले आहे. यापूर्वी देखील के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये, दिल्लीतील हॉस्पिटल्समध्ये, ससून हॉस्पिटलमध्ये परिचारिकांवर आणि रुग्णांवर अत्याचार झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. या घटनेच्या संदर्भात जे प्रश्न निर्माण झाले तसेच जे चित्रीकरण केले गेले त्यासंदर्भात मला दोन मागण्या या औचित्याच्या मुद्याव्दारे करावयाच्या आहेत. पहिली बाब अशी की, सदरहू प्रकरणी टाटा हॉस्पिटलबाबत सी.आय.डी. मार्फत, खासकरुन महिला अधिकाऱ्यामार्फत चौकशी करावी. कारण त्या मुलीशी बोलणे आवश्यक आहे. टाटा कॅन्सर हॉस्पिटल हे रेप्युटेड हॉस्पिटल आहे. तिसऱ्या आणि चौथ्या महिन्यापर्यंत मुलीचा गर्भ वाढत असल्याचे त्यांना कळत नाही, ही बाब गंभीर आहे. आज त्या मुलीचा गर्भपात करण्यात आला आहे. डी.एन.ए. टेस्टची मागणी केलेली होती. यासंदर्भात उच्च स्तरावरुन संवेदनशील पध्दतीने हे प्रकरण हाताळले जावे. या प्रकरणाच्या संदर्भात सनसनाटी पध्दतीने केलेले चित्रीकरण वाहिन्यांवरुन दाखविलेले आहे. वाहिन्यांचा हेतू चांगला असला तरी वाहिन्यांना समज द्यावयास पाहिजे की, महिलांवरील अत्याचाराच्या संदर्भात चित्रीकरण करताना ते चित्रीकरण सनसनाटी पध्दतीचे नसावे. यादृष्टीने मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

**सभापती** : माननीय गृह राज्यमंत्र्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी आणि याबाबत उच्चस्तरीय चौकशी कशी होईल हे पहावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, होय.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, याच विषयाच्या संदर्भात माझा औचित्याचा मुद्दा आहे. टाटा मेमोरियल हॉस्पिटल हे प्रतिष्ठित हॉस्पिटल आहे. या हॉस्पिटलच्या पूर्वेतिहासात अशी घटना त्या ठिकाणी घडलेली नाही. मुंबईच्या कोणत्याही हॉस्पिटलमध्ये अशी घटना यापूर्वी घडली नसावी असा माझा समज आहे. यामध्ये दोन पैलू आहेत. तेथील डॉक्टरने जे स्टेटमेंट केले ते चुकीचे आहे. आम्ही त्या मुलीला हिस्ट्री का विचारली नाही तर कल्चरच्या गोष्टीमुळे त्या मुलीची हिस्ट्री किंवा मासिक पाळी कधी आली याची विचारणा केली नाही असे चुकीचे आणि आक्षेपार्ह विधान डॉक्टरकडून केले गेले आहे. दुसरा मुद्दा असा की, ज्यावेळी एखादा रुग्ण ॲडमिट होतो त्यावेळी त्या कॅन्सरग्रस्त 15 वर्षाच्या मुलीची संपूर्ण हिस्ट्री घेतली जाणे आवश्यक होते.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

(डॉ. दीपक सावंत ...)

तशा प्रकारची दिरंगाई हॉस्पिटलकडून झालेली आहे. या प्रकरणाकडे पाहताना या मुलीवर झालेला अत्याचार आणि अन्य गोष्टी यांचा बॅलन्स ठेवून चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. कालच माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, या प्रकरणी दोन दिवसांमध्ये चौकशी होईल. त्यानुसार उद्या तरी या विषयाची माहिती सभागृहाला प्राप्त व्हावी अशी अपेक्षा आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : नोंद घेतलेली आहे.

--

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, औरंगाबाद महानगरपालिका प्रशासनाने शहरातील काही बांधकाम व्यवसायिकांना नियमबाह्य मान्यता दिल्याचे नुकतेच मार्च 2007 मध्ये शेवटच्या आठवडयात निदर्शनास आलेले आहे. बांधकाम व्यावसायिकांनी उत्पन्न कर वाचविण्यासाठी अशा प्रकल्पांना मान्यता देण्यात आलेली आहे. खरे पाहता सामान्य नागरिक नगररचना विभागात गेला तर सहाय्यक संचालकांसह इतर अधिका-यांचे दर्शन होण्यासाठी कांही महिने जावे लागतात असे असताना केवळ काही पालिकेच्या मान्यतेची पत्रे नागरिकांना काही मिनिटात घरपोच देण्यात येणे यासंदर्भात मी औचित्याचा मुद्दा देत आहे. या प्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालून कारवाई करावी.

--

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, प्रशासनातील दिरंगाई किती महाग पडते याकडे मी औचित्याच्या मुद्याद्वारे आपले लक्ष वेधित आहे. पदोन्नतीच्या दोन पदांमध्ये आरक्षण ठेवण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने वेळीच न केल्याने तसेच आरक्षण विषयक शासन धोरणानुसार एम.ईपी.एस. 9 (10) मध्ये आवश्यक दुरुस्ती न केल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बलदेव आडे प्रकरणात न्यू इंग्लिश हायस्कूल, नागपूरने केलेल्या अपिलात पदोन्नतीच्या दोन पदांमध्ये तांत्रिक कारणावरुन श्री. आडे यांना आरक्षण नाकारले. त्यामुळे पदोन्नतीस पात्र असलेले हजारो मागावर्गीय शिक्षक पदोन्नतीस वंचित होणे, नागपूर हायकोर्टाचा निकाल आधार मानून पदोन्नती मिळालेल्या शिक्षकांना पुन्हा

..2..

(श्री. कपिल पाटील...)

पदावनत करण्याची प्रक्रिया सुरु होणे, यामुळे मागासवर्गीय शिक्षकांमध्ये निर्माण झालेला असंतोष आणि संताप राज्य शासनाने दूर करुन मागासवर्गीय शिक्षकांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : नोंद घेतलेली आहे.

--

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एका महत्वाच्या विषयाकडे मी औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधित आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील प्रत्येक आमदाराला दोन रुम देण्याचे ठरलेले आहे. परंतु गेल्या सहा-सात महिन्यांपासून दोन्ही सभागृहातील 30 आमदार असे आहेत की, त्यांनी तीन-तीन रुम्स घेऊन ठेवलेले आहेत. त्यामुळे नव्याने निवडून आलेल्या आमदाराला केवळ एकच रुम उपलब्ध होत आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांना देखील एकच रुम मिळालेली आहे. ही बाब माननीय सभापतींच्या तीन वेळा निदर्शनास आणून दिलेली आहे. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना भेटून निर्णय घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले आहे. हे अधिवेशन उद्या संपत आहे. अजून या बाबतीत निर्णय झालेला नाही. काही आमदार हे एका रुममध्ये तर काही आमदार हे तीन-तीन रुम्समध्ये रहात आहेत. आता अधिवेशन चालू असल्यामुळे खेड्यापाडयातून अनेक कार्यकर्ते आमदारांना भेटावयास येत असतात. त्यामुळे ज्यांच्याकडे एक रुम आहे असे आमदार आणि त्यांना कामानिमित्त भेटावयास आलेली माणसे, त्यांचे कार्यकर्ते हे एकाच खोलीत रहातात. त्यामुळे त्यांची फार गैरसोय होत आहे. काही आमदारांनी तीन-तीन रुम्स अडकवून ठेवलेल्या आहेत. याबाबतीत लवकर निर्णय घ्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : ज्यांच्याकडे अतिरिक्त रुम्स आहेत त्यांना रुम परत करण्यासंबंधी पत्र गेले आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेला मुद्दा योग्य आहे. याबाबत कार्यवाही होईल.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मागील आठवड्यामध्ये मराठी भाषेच्या प्रस्तावावर चर्चा करताना टाटा स्कायच्या वाहिन्यांच्या बुकेमध्ये मराठी वाहिनी अनिवार्य करावी असा मुद्दा मी मांडला होता.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...........

"मी मराठी" ही वाहिनी टाटा स्काय आपल्या बुकेमध्ये घेत नाही. मेरिटवर असते तर चालले असते. आज केबल व्यवसायामध्ये सुध्दा लक्ष्मीदर्शन बरेच करावे लागते. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये जी मराठी चॅनेल्स आहेत ती स्वीकारली पाहिजेत. इतर वेगवेगळया भाषेतील चॅनेल्स आहेत, त्यामध्ये बंगाली, कानडी, उर्दू, जया टी.व्ही., महा टी.व्ही., पंजाबी, मल्याळम भाषेतील चॅनेल्स महाराष्ट्रामध्ये दाखविण्यास आमची हरकत नाही. परंतु मराठी चॅनेल्सचा समावेश टाटा स्कायने आपल्या बुकेमध्ये करावा अशी आमची मागणी आहे. त्या त्या राज्याच्या भाषेतील चॅनेल्स दाखविणे अनिवार्य असेल असे बंधन सरकारने घातले पाहिजे असा मुद्दा मी औचित्याच्या मुद्याद्वारे मांडतो.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे(गृह राज्यमंत्री) : शासनाने नोंद घेतली आहे.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, महाराष्ट्राचे जे माजी आमदार आहेत त्यांच्या विधवांना शासनाकडून कुटुंब निवृत्ती वेतन दिले जाते. या कुटुंब निवृत्ती वेतनात दिनांक 1.1.06 पासून वाढ करण्यात आली आहे. संबंधितांना हे वाढीव निवृत्ती वेतन अद्यापही प्राप्त झालेले नाही. बँक ऑफ इंडिया, आमगाव शाखेमधून मागील 6-7 महिन्यापासून वाढीव निवृत्ती वेतन देण्यात आलेले नाही याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

**उपसभापती** : ठीक आहे.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयात निकृष्ट दर्जाचा तांदूळ विविध कार्यकारी सहकारी खरेदी विक्री संघामार्फत पुरविला जात आहे. त्यामुळे तेथील जनतेची भावना प्रक्षुब्ध बनलेली आहे. असा तांदूळ वितरित करणे त्वरित बंद करावे. दोन आठवड्यापूर्वी गव्हाच्या संदर्भात औचित्याच्या मुद्याद्वारे सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी मुद्दा मांडला होता. तोच प्रकार सावंतवाडी तालुक्यामध्ये सावंतवाडी आणि मळेवाड येथे रेशन दुकानातून वितरित होणाऱ्या तांदळाबाबत सुरु आहे. हा तांदूळ जनावरे सुध्दा खायला तयार नाहीत, इतका निकृष्ट दर्जाचा तांदूळ आहे. या तांदळाचे वितरण त्वरित बंद करावे आणि चांगल्या प्रकारचा गहू व तांदूळ रेशन दुकानातून वितरित केला जावा अशी मी विनंती करतो. गहू आणि तांदूळ यांचे सॅम्पल मी आपल्याकडे पाठवितो.

-------------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य सर्वश्री ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गो-हे, डॉ.दीपक सावंत, मधुकर चव्हाण, नितीन गडकरी, विनोद तावडे, संजय केळकर, रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे,वि.प.स. यांनी "कर्करोगावरील उपचारासाठी टाटा रुग्णालयात ऑपरेशन थिएटरमध्ये उपचार सुरु असताना बेशुध्द अवस्थेतील अल्पवयीन मुलीवर वॉर्डबॉयनी केलेल्या बलात्काराबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने निवेदन करावे असे मी निर्देश देत आहे.

यानंतर श्री.परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी "दिनांक 3 एप्रिल, 2007 रोजी सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ला तालुक्याच्या शिरोडा येथील श्री.सत्यवान तेंडुलकर यांची पोलिसांनी तक्रार दाखल करुन घेण्यास दिलेला नकार"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने निवेदन करावे असे मी निर्देश देत आहे.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, पाशा पटेल,वि.प.स. यांनी "परभणी जिल्हयात संजय गांधी निराधार/आर्थिक दुर्बल अनुदान योजना, इंदिरा गांधी निराधार आणि भूमिहिन शेतमजूर महिला अनुदान योजना तसेच श्रवणबाळ योजना या तीन योजनांमध्ये 50 टक्केहून अधिक अपात्र व्यक्तींना या तीनही योजनांचा लाभ देण्यात आल्यामुळे गरीब व गरजू लोकांना योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने निवेदन करावे असे मी निर्देश देत आहे.

यानंतर श्री.श्रीकांत जोशी,वि.प.स. यांनी "औरंगाबाद महानगरपालिकेच्या आयुक्तांनी विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शिक्षण विभाग व सर्वशिक्षण अभियानांतर्गत अध्यायन-अध्यापन साहित्य अनुदान वाटपातून मनपाच्या 14 शाळांना संगणक खरेदीसाठी 7 लाख रुपयांचा निधी 2006 मध्ये उपलब्ध करुन दिलेला असतानाही विद्यार्थी संगणक प्रशिक्षणापासून वंचित राहिल्याबाबत" या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने निवेदन करावे असे मी निर्देश देत आहे.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, पाशा पटेल, वि.प.स. यांनी "दिनांक 16.1.2007 रोजी मौजे शिरडशहापूर, ता.औंढा, जि.हिंगोली येथील सारंग स्वामी देवस्थानच्या यात्रेप्रसंगी आयोजित केलेल्या मेळाव्यात शिरडशहापूरचे सरपंच, श्री विलास लूटे यांनी त्यांच्या साथीदारांसह धर्मपीठाची विटंबना केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विशय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने निवेदन करावे असे मी निर्देश देत आहे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ...

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "आदिवासी विकासासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद क्रमांक 275(1) मधील तरतुदीनुसार विविध योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून राज्याला कोटयावधी रुपयांचे केंद्रिय सहाय्य प्राप्त होत असूनही सदर निधी आदिवासींपर्यंत पोहचत नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. सदर सूचना 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र सूचनेच्या संदर्भात शासनाने निवदेन करावे.

---------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई शहरातील गृहनिर्माण संस्थांकडून इमारत कर वेळेवर भरुनही अतिरिक्त दंडाची रक्कम वसूल करणे.

**मु. शी.** : मुंबई शहरातील गृहनिर्माण संस्थांकडून इमारत कर वेळेवर भरुनही अतिरिक्त दंडाची रक्कम वसूल करणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे यांनी "मुंबई शहरातील गृहनिर्माण संस्थांकडून इमारत कर वेळेवर भरुनही अतिरिक्त दंडाची रक्कम वसूल करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी मी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 च्या कलम 197 नुसार मालमत्ता कराचा भरणा हा प्रत्येक सहा सहा महिन्यांच्या हप्त्याने अग्रीम स्वरुपात देय आहे. तसेच सदर अधिनियमाच्या कलम 200 च्या तरतुदीनुसार मालमत्ता कराचे देयक जारी केल्यापासून 15 दिवसांच्या आत मालमत्ता कराचा करदात्याने भरणा न केल्यास, मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 202 नुसार संबंधित करदात्यास नोटीस ऑफ डिमांड जारी करण्यात येत असते. अशा प्रकारचा नियम4 असतांना सह महापालिका आयुक्त संतिष भिडे यांनी सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थाना कोणतीही पूर्व सूचना न देता महापालिकेच्या 10 (ए) महाराष्ट्र एज्युकेशन (सेस) ॲक्ट, 1962 ची अंमलबजावणी करुन रहिवाश्यांवर अतिरिक्त दंडाची रक्कम लावून बिलाची रक्कम वसूल करण्याबाबत नोटीसा जारी करण्यात आलेल्या आहेत. दोन टर्मची नोटीस देऊन दंड आकारण्यात आलेला आहे. सभापती महोदय, ज्यांनी नियमित कर भरणा केलेला आहे अशा लोकांकडून दंड आकारणी केलेली आहे त्यामुळे यासंदर्भात ज्यांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत त्या परत घेतल्या जाणार आहेत काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, दर सहा महिन्यांनी नोटीस देण्याची पध्दत होती. जनरल बॉडीचा ठराव करुन यासंदर्भात होणारा जो काही खर्च आहे तो कमी करण्याच्या दृष्टीने एकदाच करदात्याने सहा-सहा महिन्याचे पैसे भरावे अशा प्रकारची नोटीस पोस्टाने पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. यातील नियमात अशी तरतूद आहे की, पहिल्यांदा कराची नोटीस म्हणजे 15 दिवसात कर भरला नाही तर आपण मागणीची नोटीस देत असतो. 3 महिन्यात कर भरला नाही तर आपण दंडाची नोटीस देत असतो. या ठिकाणी मी शासनाच्या वतीने आणि महानगरपालिकेच्या वतीने सांगू इच्छितो की, कुठल्याही प्रकारे 31 मार्च पर्यंत जे जे लोक कर भरतील त्यांना कुठलाही दंड आकारला जाणार नाही. ज्यांनी दंड अगोदरच भरला असेल अशांना तो परत करण्याच्या संदर्भात कार्यवाही केली जाईल.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदिवासी उपयोजना क्षेत्र्ातील कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देणे.

**मु. शी.** : आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके ( शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

... 5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आदिवासी क्षेत्रात ज्या कायम विनाअनुदानित शाळा आहेत त्यांना कायम अनुदान देण्याच्या संदर्भात आदिवासी विभागाचे प्रतिनिधीत्व करणारे अनेक आमदारांनी माननीय मुख्यमंत्रीमोदयांची भेट घेतली आणि महाराष्ट्र प्रदेश जनजाती सल्लागार परिषदेच्या 43 व्या बैठकीत 18.102005 रोजी झाली होती. या बैठकीत निर्णय झाला होता की, ज्या आदिवासी क्षेत्रातील उपयोजना क्षेत्रातील शाळा आहेत , ज्या शाळा कायम स्वरुपी विना अनुदानित चालणा-या या शाळांना अनुदान देण्याच्या बाबतीत निर्णय झालेला आहे. शिक्षण विभागाने तातडीने मंत्रीमंडळाच्या समितीसमारे अशा प्रकारचा निर्णय झालेला आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते........

हा निर्णय होऊन दोन वर्ष होत आहेत. असे असताना शिक्षण विभागाने हा विषय अद्यापपर्यंत मंत्रिमंडळापुढे ठेवलेला नाही. आदिवासी भागातील शैक्षणिक संस्थांवर जाणीवपूर्वक अन्याय करण्यात येत आहे असे मला वाटते. तेव्हा येत्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव आणण्यात येईल काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, आादिवासी उपयोजना क्षेत्रातील ज्या पात्र शाळा आहेत त्यांना अनुदान देण्याचा निर्णय झालेला आहे. परंतु काही शाळा निकषात बसत नसल्यामुळे त्यांना अनुदान देण्यात आलेले नाही. 247 प्राथमिक शाळांपैकी फक्त 23 शाळा पात्र आहेत तर, 116 उच्च माध्यमिक शाळांपैकी फक्त 14 शाळा पात्र ठरतात. परंतु या पैकी एकही शाळेस पाच वर्षे पूर्ण झालेली नाहीत. पाच वर्षे पूर्ण झालेल्या शाळांना 100 टक्के अनुदान दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या संदर्भातील प्रस्ताव निश्चितपणे मंत्रिमंडळासमोर आणण्यात येईल.

----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वांद्रे-कुर्ला संकुलातील जी ब्लॉकमधील भूखंड वाटपाबाबत एम.एम.आर.डी.ए.कडून व्यावसायिक कंपन्यांना देण्यात आलेले वाढीव चटईक्षेत्र.

**मु. शी.** : वांद्रे-कुर्ला संकुलातील जी ब्लॉकमधील भूखंड वाटपाबाबत एम.एम.आर.डी.ए.कडून व्यावसायिक कंपन्यांना देण्यात आलेले वाढीव चटईक्षेत्र याबाबत सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर वि. प. स.यांनी "वांद्रे-कुर्ला संकुलातील जी ब्लॉकमधील भूखंड वाटपाबाबत एम.एम.आर.डी.ए.कडून व्यावसायिक कंपन्यांना देण्यात आलेले वाढीव चटईक्षेत्र " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये मूळ एफ.एस.आय. लक्षात घेऊन त्यात दुप्पट वाढ करण्यात येणार आहे. त्यामुळे एम.एम.आर.डी.ए.ला प्रचंड उत्पन्न मिळणार आहे. तेव्हा यातील काही रक्कम बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्सच्या पायाभूत सुविधांसाठी खर्च करण्यात येणार आहे का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, एम.एम.आर.डी.ए.ला दोन ते चार एफ.एस.आय. देण्याचे धोरण आहे. परंतु अजून शासनाने मान्यता दिलेली नाही. या संदर्भात वैधानिक कार्यवाही केली जाते. या संदर्भात नियम 37 अन्वये सजेशन्स आणि ऑब्जेक्शन्स मागविली जातात त्यानंतर याबाबतीत निर्णय घेतला जाणार आहे. मिळणाऱ्या वाढीव पैशातून निश्चितप्रकारे पायाभूत सुविधांची काळजी शासनाकडून घेतली जाईल.

---------------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : मुंबईतील सायन प्रतिक्षानगर आणि दिंडोशी-मालाड येथील म्हाडाच्या सदनिकांचे बोगस वितरण झाल्याबाबत.....

**मु. शी**. : मुंबईतील सायन प्रतिक्षानगर आणि दिंडोशी-मालाड येथील म्हाडाच्या सदनिकांचे बोगस वितरण झाल्याबाबत. सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "मुंबईतील सायन प्रतिक्षानगर आणि दिंडोशी-मालाड येथील म्हाडाच्या सदनिकांचे बोगस वितरण झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबईतील सायन येथीन प्रतिक्षानगर तसेच दिंडोशी येथील म्हाडाच्या सदनिकांची एकूण 14 बोगस प्रकरणे उघडकीस आली आहेत. ज्यांना या सदनिकांचे वाटप करण्यात आले ते सदनिका ताब्यात घेण्यास गेले असता त्याठिकाणी बोगस लोक असल्याचे आढळून आहे. सभापती महोदय, उत्तरात म्हटले आहे की, "मुंबईतील सायन प्रतिक्षानगर तसेच दिंडोशी-मालाड येथील म्हाडाच्या सदनिकांची बोगस वितरणाची 14 प्रकरणे असल्याचे निदर्शनास आलेले नाही." तर पृष्ठ दोन वर नमूद करण्यात आले आहे की, "......... सदनिका वितरणाबाबतचे तीन आदेश बनावट असल्याचे उघडकीस आले...." तेव्हा पहिल्या पानावरील उत्तर बरोबर आहे की दुसऱ्या पानावरील उत्तर बरोबर आहे. पुढे असेही नमूद करण्यात आहे की, "....... त्या प्रकरणी संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत खेरवाडी पोलीस ठाणे यांना कळविण्यात आले आहे." तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे काय ? सभापती महोदय, अग्रवाल समितीला माहिती देण्यात आली नाही असा मी उल्लेख केला होता.त्या संदर्भात असे उत्तर देण्यात आले आहे की,"... तथापि, या संदर्भातील वस्तुस्थिती अशी आहे की, अग्रवाल समितीने म्हाडातील ज्या कर्मचाऱ्यांना मालकी तत्तवावर सेवा निवासस्थाने वितरीत करण्यात आली आहेत, त्यासंबंधीची माहिती समितीने मागितली होती. तथापि, त्यांचे वितरण संचालक, पणन यांच्या कार्यालयाकडून होत नसल्यामुळे ही माहिती संबंधित मिळकत व्यवस्थापक यांच्याकडून उपलब्ध होईल असे संचालक,पणन यांनी कळविले होते." मी या संदर्भात सांगू इच्छितो की, मी पणन हा शब्द वापरला नव्हता. माझे मंत्रिमहोदयांना प्रश्न आहेत की, अग्रवाल समितीला माहिती का देण्यात आली नाही ? बोगस प्रकरणा संदर्भात अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ? त्यांना सेवेतून बडतर्फ करणार आहात काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, जी वस्तुस्थिती आहे ती निवेदनात नमूद करण्यात आलेली आहे. सदनिकांच्या बोगस वितरणांसंबंधी तक्रार आल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या. परंतु पोलीस स्टेशनमध्ये सांगण्यात आले की, प्राथमिक चौकशी केल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात येईल.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हे बनावट प्रकरण कागदोपत्री सिध्द झाले आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी तीन सदनिकांचे वितरण केलेले आहे. त्यामध्ये पोलीस चौकशी काय करणार ? म्हाडा हा एक शासनाचा भाग आहे. चौकशी अधिकाऱ्याने बनावट प्रकरण असल्याचे मान्य केल्यामुळेच पोलिसांनी त्यांच्याविरुध्द कारवाई करावी असे सांगितलेले आहे. मग, याबाबतीत कारवाई करणार नाही, असे पोलीस आपल्याला सांगणार आहेत का ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, या प्रकरणाची वस्तुस्थिती पोलीस स्टेशनसमोर आणून दिलेली आहे. लेखी तक्रार केल्यानंतर व चौकशी झाल्यानंतर गुन्हा नोंदविण्याच्या बाबतीत आपण आणखी काय करु शकतो ? पोलिसांना आपण सांगितलेले आहे. हा कॉग्निजिबल ऑफेन्स आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, म्हाडाने तक्रार केल्यानंतर व यामध्ये म्हाडाच्या अधिकाऱ्याने लबाडी केल्यामुळे पोलिसांनी कारवाई करावी, असे आपण पोलिसांना सांगितले पाहिजे. त्यामुळे याबाबतीत पोलिसांनी आणखी चौकशी करण्याचा प्रश्नच येत नाही. प्रथमदर्शनी गुन्हयाची नोंद करुन संबंधित लोकांवर कारवाई होणे आवश्यक आहे. यामध्ये पोलीस आणखी काय चौकशी करणार ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, हे प्रकरण उघडकीस आलेले आहे. बोगस सदनिका वाटप करण्यासंबंधीचे पत्र माननीय मुख्यमंत्र्यांकडून आल्यानंतर चौकशी झालेली आहे. ते लक्षात आल्यानंतरच आपण तक्रार केलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : आपल्या विभागाने पोलिसांकडे तक्रार नोंदविली आहे काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : होय.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, भ्रष्टाचार लक्षात आल्यानंतर पोलिसांकडे तक्रार नोंदविली जाते व त्यानंतर पोलिसांमार्फत कलमान्वये कारवाई केली जाते. त्यानंतर याबाबतीत खातेनिहाय चौकशी अथवा निलंबनाचा विषय असतो.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, त्या लोकांनी पैसे भरलेले आहेत. त्यांनी बोगस ऑर्डर दिल्यामुळे चौकशी करणे आवश्यक होती. त्यामुळे याबाबतीत गुन्हा नोंदविला जाईल. तो आपण पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतरच नोंदविणार. (..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : पहिली गोष्ट म्हणजे, याठिकाणी गुन्हा नोंदविला आहे. त्याची चौकशी होऊन त्यानंतर ॲक्शन होते. परंतु हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश दिल्यानंतर चौकशी झालेली आहे. यामध्ये बनावट ऑर्डर दिली हे निष्पन्न झालेले आहे. त्यामुळे याप्रकरणी आपण आणखी वाट न पाहता, ताबडतोब बनावट ऑर्डर इश्यू करणा-यास 24 तासांच्या आत अटक करावी आणि पुढील कारवाई करावी.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, ठीक आहे.

-------------

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : तंत्रनिकेतन मजबुतीकरणासाठी मराठवाडयातील मागास भागासाठी शासनाने 50 लाख रुपये मंजूर करणे

**मु. शी.** : तंत्रनिकेतन मजबुतीकरणासाठी मराठवाडयातील मागास भागासाठी शासनाने 50 लाख रुपये मंजूर करणे याबाबत सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते, पाशा पटेल, श्री.प्रतापराव सोनवणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी ( उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते, पाशा पटेल, श्री.प्रतापराव सोनवणे, वि. प. स. यांनी "तंत्रनिकेतन मजबूतीकरणासाठी मराठवाडयातील मागासभागासाठी शासनाने 50 लाख रुपये मंजूर करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, याठिकाणी अतिशय विचित्र उत्तरे निवेदनामध्ये दिलेली आहेत. याठिकाणी आम्ही विचारलेल्या माहितीबाबत कुठल्याही प्रकारचे उत्तर आले नाही. याबाबतीत 50 लाख रुपयांचे ग्रँट मराठवाडात झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत घोषित करण्यात आले होते, ते पैसे 31 मार्चपर्यंत खर्च केले नसल्यामुळे लॅप्स झाले. याबाबतीतील निर्णय सप्टेंबरमध्ये झालेला असतानाही 31 मार्चपर्यंत पैशांचा विनियोग होत नाही, हे योग्य नाही. संचालकाच्या मर्जीनुसार सॉफ्टवेअर आणि कॉम्प्युटर घेऊ दिले नाही म्हणून हे सर्व झालेले आहे. तसेच, याठिकाणी 16 वर्ग असताना फक्त आठच क्लासरुम उपलब्ध आहेत. असे असतानाही याठिकाणी उत्तरात असे म्हटले आहे की, "सदर तंत्रनिकेतनाच्या इमारती या हेडाऊ समितीच्या आराखडयानुसार बांधलेल्या आहेत व तो आराखडा जवळपास इतर अंदाजित 15 तंत्रनिकेतनांमध्ये उपयोगात आणलेला आहे." मग, त्याठिकाणी 16 क्लासरुम आहेत की नाही ? तसेच, सार्वजनिक बांधकाम विभागाने अभिप्राय दिलेले असतानाही विद्यार्थ्यांना त्याच वसतिगृहात रहावे लागत आहे. असे असतानाही याठिकाणी उत्तर असे दिले आहे की, यासाठी पुढच्या अधिवेशनामध्ये बजेटमध्ये यासाठी तरतूद आहे. याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, लेखी निवेदनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी जी उत्तरे दिलेली आहेत, ती दुरुस्ती करुन घेण्यात येतील काय ? व याबाबतीत आम्हाला न्याय मिळवून देतील काय ?

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

मराठवाडयातील मागासभागासाठी शासनाने जे 50 लाख रुपये दिलेले आहेत ती रक्कम लॅप्स झालेली आहे. त्याची जबाबदारी कोणत्या अकार्यक्षम अधिकाऱ्यावर आहे ? माझी माहिती अशी आहे की, 30 तारखेला संचालकांच्यासमोर फाईल होती.पण फक्त मराठवाडयाचा विकास होऊ नये तो भाग मागासच रहावा या हेतूने त्यांनी त्या फाईलवर सही केली नाही त्यामुळे 50 लाख रुपये लॅप्स झाले. मला सन्माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की या संचालकांवर कडक कारवाई करणार का आणि हे उत्तर दुरुस्त करणार का ?

श्री. सुरेश शेटटी : सभापती महोदय, मराठवाडा पॅकेजमध्ये विदर्भासाठी 50 लाख रुपये मंजूर करण्यात आले होते. टेक्नीकल व पॉलीटेक्नीकल कॉलेजमध्ये नेटवर्कींगसाठी ही रक्कम मजूर करण्यात आली होती. त्या संदर्भात शासनाने 30.03.2007 रोजी जी.आर. काढला होता. हा जी.आर. उशीरा निघाल्यामुळे ते काम झाले नाही, ही गोष्ट खरी आहे. पुढील वर्षी बजेटमध्ये 50 लाख रुपयांची तरतूद करुन हे काम पूर्ण करुन घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये तरतूद असताना शासनाने जी.आर. उशीरा का काढला ? हा जी. आर. कोणी काढला ?

श्री. सुरेश शेट्टी :सभापती महोदय, हा जी.आर. कोणी काढला हे मला तपासून बघावे लागेल. हा पैसा लॅप्स झाला तर मराठवाडयामधील पॅकेजमध्ये समाविष्ट करुन हे काम पूर्ण करुन घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पुरवणी मागण्या येतात, विनियोजन बिल येते, त्यास आम्ही दहा मिनिटात मंजूरी देतो. परंतु हे कोणते टिकोजीराव अधिकारी आहेत ? पैसे लॅप्स झालेले आहेत, त्यामुळे त्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे.तरी या अधिका-यावर कारवाई करणार का ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मराठवाडा पॅकेजमध्ये 2006-07 मध्ये एकूण 25.5 कोटी रक्कम खर्च करण्यास मंजूरी देण्यात आली होती. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठासाठी 5 कोटी रुपये दिलेले होते. त्यातील 50 लाख रुपये लॅप्स झालेले आहेत. जी. आर. उशीरा आल्यामुळे ही रक्कम लॅप्स झाली आहे. ही रक्कम नवीन पॅकेजमध्ये समाविष्ट करुन काम पूर्ण करुन घेण्यात येईल.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे पैसे लॅप्स झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झ ालेले आहे. त्यामुळे शासन यासाठी दोषी अधिका-यावर कारवाई करणार आहे किंवा नाही ?

श्री. सुरेंश शेट्टी : सभापती महोदय या संदर्भात योग्य ती कारवाई करण्यात येईल.

**उपसभापती**: संबंधित अधिकाऱ्यांवर आपण काय कारवाई केलेली आहे, हे सभागृहाला नंतर कळवावे, असा मी या संदर्भात स्पष्ट आदेश देत आहे.

....................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

**पृ. शी.** : पिंपळगावराजा,जि. बुलढाणा येथील विद्यार्थ्यांची व्यवस्था गावापासून अडीच किं.मी. दूर असलेल्या शालांत परीक्षा केंद्रात करणे

**मु.शी.**: पिंपळगावराजा,जि. बुलढाणा येथील शालांत विद्यार्थ्यांची व्यवस्था गावापासून अडीच किं.मी. दूर असलेल्या परीक्षा केंद्रात करणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, पाशा पटेल,वि.स.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके ( शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, पाशा पटेल यांनी पिंपळगावराजा,जि. बुलढाणा येथील शालांत विद्यार्थ्यांची व्यवस्था गावापासून अडीच किं.मी. दूर असलेल्या परीक्षा केंद्रात करणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निवेदनात ज्या तक्रारी केलेल्या आहेत त्याचे स्वरुप काय आहे? त्या तक्रारींना शासनाकडून न्याय मिळेल काय ?

श्री. वसंत पुरके : सभापती महोदय, निवेदनामध्ये केलेल्या तक्रारींचे शंकानिरसन केलेले आहे. एकूण 26 वर्गखोल्यांपैकी 10 वर्गखोल्या विद्यार्थ्यांना बसण्यायोग्य होत्या. तेथील विद्यार्थ्यांची कोठल्याही प्रकारची गैरसोय झालेली नाही.

...............

यानंतर श्री. रोझेकर....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: गोरेगाव (पश्चिम) येथील राम मंदिर मार्गावरील 12 पुनर्वसन इमारतीतील सदनिकांचे बेकायदेशीरपणे वाटप करणे

**मु.शी.**: गोरेगाव (पश्चिम) येथील राम मंदिर मार्गावरील 12 पुनर्वसन इमारतीतील सदनिकांचे बेकायदेशीरपणे वाटप करणेबाबत सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि.प.स. यांनी " गोरेगाव (पश्चिम) येथील राम मंदिर मार्गावरील 12 पुनर्वसन इमारतीतील सदनिकांचे बेकायदेशीरपणे वाटप करणे "या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------------------

...2...........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एमएमआरडीएच्या एकूण 12 सदनिका वाटप करावयाच्या होत्या. त्यामध्ये अनधिकृतपणे काही लोक रहात होते. अनधिकृतपणे लोक त्या सदनिकांमध्ये कसे रहात होते, त्यांना कुणी परवानगी दिली होती, ते कोण लोक होते व संबंधितांवर कोणती कारवाई केली, विरोधी पक्षाने नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर त्यांना सदनिकेमधून बाहेर काढले काय, अशा पद्धतीने एमएमआरडीएच्या इमारतीमध्ये अनधिकृतपणे लोक रहात असतील तर त्यांना परवानगी देणारे अधिकारी कोण आहेत ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माणुसकीच्या दृष्टीकोनातून कुष्टरोग्यांना स्पार्क या संस्थेने या 12 सदनिकांमध्ये राहण्याची परवानगी तात्पुरत्या स्वरुपात दिली होती. आता या सर्व सदनिका व्हॅकेट केलेल्या आहेत. यासंदर्भात पोलीस केस दाखल करण्यात आली आहे आणि सर्व सदनिका आता एमएमआरडीएच्या ताब्यात आहेत. हे नक्की आहे की, सदनिकांची मालकी एमएमआरडीएची असतांना अनधिकृतपणे त्या ठिकाणी राहण्यासाठी काही लोकांना स्पार्क या संस्थैने परवानगी दिली. या बाबीची प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्या माध्यमातून चौकशी करु आणि स्पार्क संस्थेला ताकीद देण्यात येईल, तसेच एमएमआरडीएचे जे अधिकारी यास जबाबदार असतील त्यांच्यावर सुध्दा कायदेशीर कारवाई केली जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा विषय मी अनेक वेळा एमएमआरडीएच्या बैठकीत मांडला आहे. स्पार्क ही चारशेवीस संस्था आहे. या संस्थेने अनेक सदनिकांमध्ये बोगस माणसे भरली आहेत. सर्वेक्षण करण्यासाठी एमएमआरडीएने स्पार्क या संस्थेला नेमले आहे. या संस्थेने बोगस माणसे सदनिकांमध्ये भरली आहेत, असे मंत्री महोदयांनी देखील सांगितले आहे. त्यामुळे स्पार्क संस्थेवर कायदेशीर कारवाई करणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की, संबंधित संस्थेविरुध्द पोलीस केस दाखल करण्यात आली आहे. सदनिकांमध्ये अनधिकृतपणे ज्या लोकांना ठेवण्यात आले होते त्यांना बाहेर काढण्यात आले आहे. प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्या माध्यमातून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात येईल. निष्काळजीपणाला एमएमआरडीएचे जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करु. स्पार्क संस्थेने न विचारता, निष्काळजीपणे अशा पद्धतीने एमएमआरडीएच्या मालकीच्या सदनिका

..3.........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे............

दुस-या कुणाला तरी तात्पुरत्या स्वरुपात रहावयास देणे हे निश्चित चुकीचे आहे, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करु.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एमएमआरडीअे आणि स्पार्क या दोघांनी संगनमताने बारा सदनिका अवैधपणे रहावयास दिल्या आहेत आणि त्या विकल्या आहेत. मी जबाबदारीने असा आरोप करतो की, या बारा सदनिका विकल्या आहेत. गोरेगाव पोलीस स्टेशनच्या पोलीस निरिक्षकांनी एमएमआरडीअेकडे वारंवार याबाबतची विचारणा केली आहे व माहिती मागितली आहे पण ती माहिती एमएमआरडीअेच्या अधिका-यांकडून पुरविण्यात आली नाही. संबंधित पोलीस निरिक्षकाचे पत्र माझ्याकडे आहे. तेव्हा, गोरेगाव पोलीस स्टेशनच्या पोलीस निरिक्षकांनी लेखी पत्र पाठवून सुध्दा एमएमआरडीअेकडून स्पार्क या संस्थेची माहिती पुरविण्यात आली नाही, हे खरे आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, पोलीस स्टेशनकडून माहिती विचारली होती, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. मी सांगितले त्याप्रमाणे या प्रकरणी तीन प्रकारे कारवाई करण्यात येणार आहे. संबंधित संस्थेविरुध्द फौजदारी केस दाखल करण्यात आली आहे. जे अनधिकृतपणे रहात होते त्यांना बाहेर काढले आहे व सदनिका एमएमआरडीअेच्या ताब्यात ठेवण्यात आल्या आहेत. प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्या माध्यमातून जी चौकशी करण्यात येणार आहे त्यामध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी पोलीस निरिक्षकांना द्यावयाच्या माहितीबाबत जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्याचाही समावेश करण्यात येईल. सगळी चौकशी करु. तसेच, सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांनी सदनिका विकल्याबाबतची माहिती दिली त्याबाबत मी जबाबदारीने सांगतो की, सदनिका विकल्या गेल्या नव्हत्या तर तात्पुरत्या स्वरुपात रहावयास दिल्या होत्या. तरी सुध्दा ही गोष्ट गांभीर्याने घेऊन चौकशी केली जाईल आणि दोषीवर कारवाई केली जाईल.

--------------

यानंतर कुमारी जयश्री..........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : -मुंबईमध्ये ऑटोरिक्षा मालकांनी सुमारे निम्म्याहून अधिक ऑटोरिक्षा बेकायदेशीररित्या भाडयाने चालविण्याकरिता देणे

मु.शी. :-मुंबईमध्ये ऑटोरिक्षा मालकांनी सुमारे निम्म्याहून अधिक ऑटोरिक्षा बेकायदेशीररित्या भाडयाने चालविण्याकरिता देणे याबाबत सर्वश्री.मधुकर चव्हाण,विनोद तावडे,रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री.मधुकर चव्हाण,विनोद तावडे,रामनाथ मोते,वि.प.स.यांनी मुंबईमध्ये ऑटोरिक्षा मालकांनी सुमारे निम्म्याहून अधिक ऑटोरिक्षा बेकायदेशीररित्या भाडयाने चालविण्याकरिता देणे. या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सदर भ्रष्टाचार हे निवेदन आल्यामुळे बाहेर आलेला आहे, हे सत्य सांगितले गेले ते बरे केले. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, परवाना कायद्याच्या नियमाप्रमाणे माझा परवाना जर हरविला तर 100 रुपये भरुन मला दुसरा डुप्लिकेट परवाना मिळतो. सदर प्रकरणातील 8,413 लोकांनी आपला ओरिजनल परवाना हरवला आहे असे सांगून तेवढेच डुप्लिकेट 8,413 परवाने घेतले आणि आता त्या डूप्लिकेट आणि ओरिजनल अशा दोन्ही परवान्यांवर ऑटोरिक्षा चालू आहेत. माझा प्रश्न असा आहे की, या ऑटोरिक्षा आपण जप्त करणार आहात का ? यापुढे मुंबई या शहरामध्ये ऑटोरिक्षाला परवानगी देणार हा निर्णय काही मर्यादित कालावधीपुरती घेतला आहे की, कायमस्वरुपी घेतलेला आहे ?

श्री.धर्मराव बाबा आत्राम : सभापती महोदय, सदर प्रकरणी जे डुप्लिकेट परवाने सर्टिफाय करुन ओरिजनल परवानाधारकांना वितरीत करण्यात आलेले आहेत, त्यांच्यावर चौकशी चालू आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी चौकशी करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही कारण येथे निवेदनामध्ये एकूण 6895 दोषी वाहने आढळल्याचे मान्य केलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाने सांगावे की, त्यांच्या मते दोषी वाहन म्हणजे नेमके काय ?

श्री.धर्मराव बाबा आत्राम : एकूण दोषी वाहनांमध्ये पी.यु.सी. व इतर बाबी परिपूर्ण न करणारी जी वाहने आढळली अशा एकूण 6,895 दोषी वाहनधारकांकडून दंडदेखील वसूल करण्यात आलेला आहे. आपण सांगितल्याप्रमाणे बोगस परवाने मिळवून त्यावरही ऑटोरिक्षा चालविणा-यांची चौकशी करुन त्यांचे परवाने रद्द करण्याची कारवाई देखील लवकरात लवकर सुरु करण्यात येईल.

------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : - सरकारी गोदामातील 56 लाख रुपयांचा मका गायब होणे.

मु.शी. : सरकारी गोदामातील 56 लाख रुपयांचा मका गायब होणे याबाबत श्री.श्रीकांत जोशी,वि.प.स.यांनी दलेली नियम ९३ अन्वये सूचना.

श्री.सुनील तटकरे ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, श्री.श्रीकांत जोशी यांनी सरकारी गोदामातील 56 लाख रुपयांचा मका गायब होणे. या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : मराठवाडयातील कन्नड,सिल्लोड,जाफराबाद,मंढा हे मुख्य मका प्रवण क्षेत्र आहेत. या भागांमध्ये बाजार भावाप्रमाणे 56 लाखाचा मका सरकारी गोदामामधून गायब होणे. सरकारी गोदामामध्ये साठवणूक नीट न केल्यामुळे काय गोंधळ झाला आहे ? हे जाणून घेणे गरजेचे अत्यंत आहे. सरकारी गोदामामध्ये वर्षानुवर्ष इतकी भयंकर परिस्थिती आहे की, तेथील बहुतांश धान्य कोंबडया व उंदीर हेच खातांना दिसतात. याबाबत पुरवठा खाते काय करते ? याबाबत फक्त खालच्या अधिका-यावरच नेहमी कारवाई केली जाते, परंतु अतिरिक्त जिल्हाधिकारी ज्याच्या देखरेखीखाली हा कारभार सोपविलेला असतो त्याला मात्र शासनाकडून संरक्षण दिले जाते. यामध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी व पुरवठा खात्याचा काय रोल होता, याची चौकशी शासन करणार का ? महाराष्ट्रातील दुष्काळ प्रवण क्षेत्रामध्ये सायलॉज अशा पध्दतीचे सायंटिफिक स्टॉकिंग ची व्यवस्था करण्यात येणार का ? म्हणजे सरकारी गोदामातील धान्य सुरक्षित राहून कोंबडया व उंदरांच्या खाण्यापेक्षा माणसांना खाण्याकरिता उपयोगी पडेल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा या ठिकाणी मांडला तो अतिशय खरा मुद्दा आहे. राज्यामध्ये काही ठिकाणी सरकारी गोदाम नादुरुस्त अवस्थेत आहेत. यावर्षी शासनाने सरकारी गोडाऊन दुरुस्त करण्याकरिता एक कालबध्द कार्यक्रम आखलेला आहे. या कार्यक्रमांतर्गत मोठया प्रमाणावर राज्यातील नादुरुस्त गोडाऊन दुरुस्त करण्यात येतील. या कार्यक्रमामध्ये वेगवेगळया तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात येईल आणि त्या दृष्टीकोनातून आवश्यक असलेली सर्व कार्यवाही करण्यात येईल.

यान्नंतर श्री.बोरले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे .......

या प्रकरणाची योग्य ती देखरेख अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा अन्य अधिका-यांच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे, असा तिसरा प्रश्न विचारण्यात आला. अतिरिक्त जिल्हाधिका-यांकडून चौकशी करण्यात येईल आणि संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, कन्नड तहसीलमधून सर्वात जास्त म्हणजे 17 लाख 88 हजार रुपयांचा 2,385 क्विंटल मका गायब झाल्याचे उघडकीस आलेले आहे आणि शासनाने हे मान्य केलेले आहे. या प्रकरणी विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, विभागीय चौकशी कधी पूर्ण होणार आहे ? विभागीय चौकशी करण्यापूर्वी तेथील संबंधित तहसीलदार, नायब तहसीलदार, अव्वल कारकून निवेदनामध्ये जी नावे दिलेली आहेत त्या अधिका-यांना निलंबित करुन चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, निवेदनामध्ये नमूद करण्यात आलेले आहे की, या प्रकरणी उप विभागीय अधिका-यामार्फत चौकशी सुरु आहे.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, निवेदनातील शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "कन्नड येथील गोदामातील मक्याच्या तुटीबाबत उप विभागीय अधिकारी, सिल्लोड यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तहसीलदार, कन्नड, नायब तहसीलदार (पुरवठा), अव्वल कारकून (पुरवठा) व गोदाम रक्षक यांचे विरुध्द विभगीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे." शासनाला उप विभागीय अधिका-यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. निवेदनामध्ये ज्या अधिका-यांची नावे दिलेली आहेत त्यांना निलंबित करुन चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, निवेदनामध्ये नमूद करण्यात आलेले आहे की, उप विभागीय अधिकाऱ्यांचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उप विभागीय अधिका-यांची नेमणूक करण्यात आली होती. अहवाल उशिरा का प्राप्त झाला याची माहिती घेण्यात येईल. ज्या तहसीलदाराकडून वाजवी पेक्षा अतिरिक्त तूट दाखविण्यात आली आहे, त्यांना तात्काळ निलंबित करण्यात येईल.

---------

..2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सन 2005 च्या महापुरामुळे राज्यातील अकोला, अमरावती, बुलढाणा, भंडारदरा, सांगली व कोल्हापूर या जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या घरांची फेरबांधी व दुरुस्तीसाठी इंदिरा आवास योजनेतून अनुदान मंजूर करण्याबाबत.

**मु. शी.** : सन 2005 च्या महापुरामुळे राज्यातील अकोला, अमरावती, बुलढाणा, भंडारदरा, सांगली व कोल्हापूर या जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या घरांची फेरबांधी व दुरुस्तीसाठी इंदिरा आवास योजनेतून अनुदान मंजूर करण्याबाबत श्री जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील, प्रा.शरद पाटील यांनी सन 2005 च्या महापुरामुळे राज्यातील अकोला, अमरावती, बुलढाणा, भंडारदरा, सांगली व कोल्हापूर या जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या घरांची फेरबांधी व दुरुस्तीसाठी इंदिरा आवास योजनेतून अनुदान मंजूर करण्याबाबत या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



GRB/ SBT/ MHM/ प्रथम कु.खर्चे ........ 15:15

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनेला जे लेखी उत्तर दिलेले आहे त्याला माझा आक्षेप आहे. महापुरामुळे ज्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या घरांचे नुकसान झालेले आहे, त्यांच्या घरांची दुरुस्ती आणि पुर्नबांधनी करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्य शासनाच्या माध्यमातून केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे, त्या प्रस्तावाला अद्याप मान्यता मिळालेली नाही, यासंबंधी 93 ची सूचना देण्यात आलेली आहे. 93 च्या सूचनेला दिलेल्या निवेदनामध्ये महापुरामुळे ज्यांच्या घरांचे नुकसान झालेले आहे त्यांना कोणत्या त-हेने मदत केलेली आहे, याचा उल्लेख आहे. 93 च्या सूचनेला दिलेल्या निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "शासनाच्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या अशा नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या घरांच्या फेरबांधणी व दुरुस्तीसाठी इंदिरा आवास योजनेतून अनुदान देणे व घरे बांधून देणे याबाबतची कार्यवाही ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून करण्यात येते." त्याच्या आधीच्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "सदर पुनर्वसनासाठी शासनाकडे पुरेसा निधी उपलब्ध असून त्याबाबत केंद्र शासनाकडे निधीची मागणी करण्यात आलेली नाही." महापुरामुळे अकोला, अमरावती, बुलढाणा, भंडारदरा, सांगली व कोल्हापूर या जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील ज्या कुटुंबांच्या घरांचे नुकसान झालेले आहे त्या घरांची पुर्नबांधणी आणि दुरुस्तीसाठी केंद्र शासनाच्या सन 2004 च्या मार्गदर्शक सूचनेनुसार केंद्र शासनाकडून 75 टक्के आणि राज्य शासनाकडून 25 टक्के मदत देण्यासंबंधीचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेला आहे. याबाबतची माहिती माझ्याकडे आहे. राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव प्रलंबित असेल तर तो मंजूर करण्यासंदर्भात शासन प्रयत्न करणार आहे काय ?

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, आपण केंद्र शासनाकडे तशा प्रकारचा प्रस्ताव पाठविलेला आहे. अतिवृष्टीने बाधित झालेल्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्य सरकारतर्फे कालबध्द पध्दतीने कार्यवाही करण्यासाठी दिनांक 9 जानेवारी, 2006 रोजी धोरणात्मक निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला असला तरी राज्य सरकारकडे घरांची पुनर्बांधणी व पुनर्निर्माण करण्याच्या कामासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे. केंद्र सरकारकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर राज्य शासनाने स्वत:च्या अनुदानातून या घरबांधणीचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 अन्वये सूचना क्रमांक 11 वरील निवेदनाबाबत</u>

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नवी मुंबई वाशी येथील सेक्टर 30 अ मधील 57,180 चौ.मी. चे संपूर्ण क्षेत्र सिडकोने माहिती व तंत्रज्ञान उद्योगाच्या विकासासाठी सन 1997 पासून राखीव ठेवलेले आहे. यासाठी प्रथम 1.5 चटईक्षेत्र निर्देशांक देय केला होता, नंतर चटईक्षेत्र निर्देशांकात वाढ करुन 3 चटईक्षेत्र निर्देशांक देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. हे भूखंड विकताना सिडकोने असे कारण दिले आहे की, 1997 या वर्षी माहिती तंत्रज्ञान या उद्योगात मंदीची लाट आली म्हणून त्याचे आरक्षण बदलले गेले व वाणिज्य उद्देशासाठी ठेवण्यात आला. याबाबत मी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपणास एक पत्र दिले असून त्यात मी अशी विनंती केली आहे, हे निवेदन उद्या ठेवण्यात यावे. कृपया आपण माझी विनंती मान्य करावी.

**उपसभापती** : ठीक आहे, हे निवेदन उद्या ठेवण्यात येईल.

--------

.....3



PNG/ SBT/ MHM/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 93 अन्वये सूचना क्रमांक 12 वरील निवेदनाबाबत

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सभागृहात दुग्धविकास विभागाचे माननीय मंत्री उपस्थित नाहीत. या निवेदनावर उत्तर कोण देणार आहे ? लोकसत्ता वर्तमानपत्रात अशी बातमी आली आहे की, दुग्धविकास खात्यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार असून कोटयावधी रुपयांची जमीन बिल्डरला देण्यात आलेली आहे. याबाबत उत्तर देण्यासाठी आपण मंत्री महोदयांना सभागृहात बोलावून घ्यावे व आज या विषयावर चर्चा करावी अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : श्री.मधुकर चव्हाण यांनी नियम 93 अन्वये दिलेल्या 12 व्या सूचनेच्या संदर्भात पशुसंवर्धन व दुग्ध विकास मंत्री महोदयांना सभागृहात बोलावण्यात यावे.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....4

**पृ.शी.**: जालना येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची झालेली विटंबना.

**मु.शी.**: जालना येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची झालेली विटंबना या विषयाबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी "जालना येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची झालेली विटंबना" या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....5

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, दिनांक 10.4.2007 रोजी जालना येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची विटंबना करण्यात आली. मुंबईमध्ये मिनाताई ठाकरे यांच्या पुतळयाचीही विटंबना करण्यात आली. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत आहेत. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री माननीय श्री.आर.आर.पाटील अशा घोषणा करीत आहेत की, पुतळा रक्षणासाठी कार्यक्रम आखणार आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयात व शहरात ज्या ठिकाणी पुतळे आहेत त्यांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने नक्की कोणती उपाययोजना केलेली आहे ? अशा घटना घडू नयेत म्हणून समाजातील विविध घटकांनी व पोलिसांनी जबाबदारीने वागले पाहिजे. पोलीस व लोकांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शासनाची आहे. जालना येथे पोलिसांनी संयमाने परिस्थिती हाताळली असे दिसते. परंतु त्या प्रकरणामध्ये दोषी असलेल्या आरोपींवर कोणती कारवाई केली जाणार आहे ? पुतळयाचे संरक्षण व्हावे म्हणून नक्की कोणते मार्गदर्शन करणार आहे. त्यासाठी विविध विभागांना विश्वासात घेतले जाणार आहे का ?

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या पुतळ्यांच्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्या राज्यात एकंदरीत जे अधिकृत पुतळे आहेत म्हणजे जे शासनाची परवानगी घेऊन बसविण्यात आलेले आहेत त्याशिवाय असेही अनेक पुतळे आहेत की जे शासनाची परवानगी न घेता बसविलेले आहेत म्हणजेच अनधिकृतरित्या बसविलेले आहेत. अर्थात त्या सर्व पुतळ्यांना अधिकृत करून घेण्यात येणार आहे आणि ज्यांनी ते पुतळे बसविले आहेत त्या संस्था असतील, व्यक्ती असतील वा संघटना असतील त्यांच्यावर त्या पुतळ्यांची जबाबदारी टाकली जाणार आहे आणि त्याबद्दलचे नियम तयार करण्याबाबत शासन स्तरावर विचार चालू आहे.

***

...... 3एम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पेप्सी, मिरिंडा इ.शीतपेयांच्या सीलबंद कॅनमध्ये घोषित मापापेक्षा कमी शीतपेय आढळून येणे.

**मु.शी.** : पेप्सी, मिरिंडा इ.शीतपेयांच्या सीलबंद कॅनमध्ये घोषित मापापेक्षा कमी शीतपेय आढळून येणे याबाबत श्री. जयंत प्र.पाटील व प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

--

श्री. सुनील तटकरे (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, श्री.जयंत प्र.पाटील व प्रा.शरद पाटील यांनी "पेप्सी, मिरिंडा इ.शीतपेयांच्या सीलबंद कॅनमध्ये घोषित मापापेक्षा कमी शीतपेय आढळून येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..... 3एम 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 च्या सूचनेवरील (अनु.15) मा.अन्न,नागरी पुरवठा मंत्र्यांच्या निवेदनानंतर..)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या कंपनीवर शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली आहे ? आणि यावेळेस जेव्हा त्या कंपनीवर धाड टाकण्यात आली आणि त्यामध्ये कमी वजन आढळून आले होते तेव्हा त्यापूर्वी खात्यामार्फत या कंपनीची किती वेळा तपासणी झाली होती ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या निवेदनात म्हटल्याप्रमाणे वजन-मापे मानके (अुमलबजावणी) अधिनियम 1985 च्या कलम 33 सह, वजने व मापे मानके (आवेष्टित वस्तू) नियम 1977 च्या नियम 24, 25 च्या भंगाबद्दल त्यांच्यावर कारवाई सुरू आहे आणि या पूर्वी या कंपनीवर कोणतीही कारवाई झालेली नाही.

***

..... 3एम 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राहता (ता.शिर्डी,जि.अहमदनगर) येथे जत्रेतील मानपानावरून शिवसेना शहर अध्यक्षांचे घर जाळणे.

**मु.शी.** : राहता (ता.शिर्डी,जि.अहमदनगर) येथे जत्रेतील मानपानावरून शिवसेना शहर अध्यक्षांचे घर जाळणे याबाबत श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

--

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, श्री. अरविंद सावंत यांनी " राहता (ता.शिर्डी,जि.अहमदनगर) येथे जत्रेतील मानपानावरून शिवसेना शहर अध्यक्षांचे घर जाळणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..... 3एम 5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील (अनु.क्र.16) मा.गृहराज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी स्वत: काल राहता येथे जाऊन आलो आहे. ही घटना 4 तारखेला घडली आहे आणि आज 16 तारीख आहे. मधल्या 10-12 दिवसांमध्ये या प्रकरणातील एकाही आरोपीला पकडण्यात आलेले नाही. ज्यांना मारहाण झालेली आहे त्या श्री.राजेंद्र पठारे यांनी त्यांना मारहाण करणाऱ्यांची नावे पोलिसांना दिलेली आहेत पण तरीही अजून देखील त्या आरोपींना पोलिसांनी पकडलेले नाही. तेव्हा त्या आरोपींना केव्हा अटक केली जाणार आहे ? सभापती महोदय, माझ्याकडे तेथील सगळी छायाचित्रे आहेत. श्री. राजेंद्र पठारे यांचे सगळे घर जाळून टाकले आहे. त्यांची आई अजूनही तेथे राहते आहे आणि ती भयभीत अवस्थेत आहे आणि अजूनही तिला धमक्या दिल्या जात आहेत की, तुमच्या मुलाला जीवंत ठेवले जाणार नाही. सभापती महोदय, ही घटना घडून गेल्यानंतर आजपर्यंत तेथे कोणीही पालकमंत्री वा तेथील आमदार गेलेले नाहीत. त्यामुळे तेथील आमदारांचा या घटनेला पाठिंबा आहे असे तेथे बोलले जात आहे. इतकेच नाही तर त्यांच्या घरामध्ये माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांचे छायाचित्र आहे पण तेही तोडून मोडून टाकले आहे. म्हणून माझी या निमित्ताने विनंती आहे की, श्री.राजेंद्र पठारे यांचे संपूर्ण घर जाळून टाकण्यात आले आहे आणि ते कृत्य करणाऱ्या लोकांना राजकीय पाठिंबा असल्यामुळेच अद्यापी अटक करण्यात आलेली नाही, तेव्हा त्या आरोपींना आपण केव्हा पकडणार आहात ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, राहता येथील वीरभद्र देवाच्या यात्रेमधील मानाच्या काठीवरून दोन गटांमध्ये जी भांडणे झाली त्यातून हे मारहाणीचे प्रकार नंतर घडलेले आहेत. जत्रेच्या ठिकाणी जी भांडणे झाली ती त्यावेळेस तेथील मोठ्या लोकांनी मध्ये पडून मिटविली होती. पण नंतर दुसऱ्या दिवशी मारहाण वगैरेच्या घटना घडल्या आहेत. अशा एकंदर तीन घटना तेथे घडल्या आहेत. त्यापैकी पहिल्या घटनेतील 9 आरोपींना पकडले होते पण कोर्टाने त्यांना जामीन दिलेला आहे. मी आताच सांगितल्याप्रमाणे तेथे एकंदर 3 घटना झालेल्या आहेत. त्यात प्रथमत: श्री.सदाफळ यांना मारहाण झाली, त्यानंतर श्री.राजेंद्र पठारे यांचे घरावर हल्ला करून घर जाळण्यात आले आणि नंतर श्री.राजेंद्र पिपाडा यांच्या कार्यालयावर हल्ला करण्यात आला आणि मोडतोड करण्यात आली. या तीन घटनांपैकी पहिल्या घटनेतील 9 आरोपींना पकडण्यात आले

...... 3एम 6 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. म्हेत्रे .....

होते. आता सन्माननीय सदस्यांनी जी घटना सांगितली त्या प्रकरणातील आरोपींना अद्याप अटक झालेली नाही हे खरे आहे. तसेच माजी नगराध्यक्ष यांच्या कार्यालयावर हल्ला झाल्याबद्दलच्या प्रकरणी देखील कोणालाही अटक झालेली नाही. मात्र पहिल्या घटनेतील 9 जणांना पकडले असून त्यांना कोर्टाकडून जामीन मिळाला आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांकडून चुकीची माहिती रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मला येथे काही गोष्टी स्पष्ट करणे आवश्यक आहे. 3 तारखेला राहता येथे वीरभद्र देवाची यात्र होती आणि त्यावेळी मानपानावरून झालेल्या भांडणातून श्री.राजेंद्र पठारे यांना मारहाण केली गेली होती आणि त्यावेळेस तेथे तेथील आमदार श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हेही होते. नंतर त्यांच्या वर इतर लोकांच्या मध्यस्थीने भांडणे मिटविली गेली. परंतु नंतर दुसऱ्या दिवशी श्री.राजेंद्र पठारे यांच्या घरी 200 लोकांच्या जमावाने जाऊन श्री.सुनील सदाफळ यांनी त्याच्या आईला धमकी दिली. त्याच्या घरी गुप्ती आहे म्हणून सांगण्यात आले पण त्यांच्या घरी आज देखील गुप्ती वगैरे कोणतेही शस्त्र नाही. श्री.राजेंद्र पठारे यांच्या घरी जाऊन त्यांच्या आईला धमकी दिल्यानंतर श्री.सुनील सदाफळे गेला आणि 200 लोकांना घेऊन आला आणि त्याने पेट्रोल टाकून श्री.पठारे यांचे घर जाळून टाकले. त्यानंतर ते श्री.राजेंद्र पिपाडा यांच्या कार्यालयात गेले आणि तेथेही त्यांनी सामानाची मोडतोड केली. या दोन्ही ठिकाणच्या गुन्ह्यातील कलमे वेगळी लावल्याचे दाखविले आहे. कलम 1423, 147, 148, 149, 506 व 454 खाली ज्यांना अटक करण्यात आली होती तीच मंडळी घर जाळण्यामध्येही होती. पण त्यांना त्या प्रकरणी अटक केली गेली नाही. तेव्हा त्या 9 लोकांना आपण या प्रकरणी का सोडले ? त्यांच्यावर ही सारी कलमे लावून त्यांना अटक का केली नाही ?

( यानंतर श्री. सरफरे ..... 3एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, एकाच प्रकरणाशी संबंधित तीन वेगवेगळया घटना आहेत. यामध्ये गुन्हा क्र. 27/7, गुन्हा क्र. 28/7 व गुन्हा क्र. 29/7 आहे. यापैकी गुन्हा क्र.29/7 शी संबंधित 9 आरोपींना पकडण्यात आले आहे ते इतर गुन्हयांमध्ये समाविष्ट नव्हते. त्यामुळे याठिकाणी सांगण्यात आलेली कलमे बेलेबल असल्यामुळे त्यांना बेल मिळाला आहे.

(अडथळा)

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आरोपी कोण आहेत हे पोलिसांना माहीत आहे. असे असतांना त्यांना अटक करण्यामध्ये टाळाटाळ कां केली जात आहे?

(विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, फरारी आरोपींना पकडण्यासाठी 4 पथके तयार केली आहेत. त्या पथकाकडून योग्य दिशेने तपासणी होणार नाही असे जर आपणास वाटत असेल तर उच्च स्तरीय चौकशी करुन आरोपींना अटक करण्यात येईल.

(अडथळा)

**उपसभापती** : आता यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येईल...

(अडथळा)

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, त्या आरोपींना अटक करुन सी.आय.डी. मार्फत चौकशी कां करीत नाही? त्याठिक्राणी आजही गुन्हेगार फिरत आहेत. तर मग आपण त्याठिकाणी 356 कलम कां लावले नाही?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ज्या 9 आरोपींना अटक करण्यात आली त्यांचा त्या घटनेशी संबंध नव्हता म्हणून त्यांना जामीन देण्यात आला.

श्री. अरविंद सावंत : त्याठिक्राणी जमावाबरोबर सदाफळ सुध्दा होता. तो पिपाडा यांच्या घरी गेला असे सांगितले आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 3 पी.आय., 6 पी.एस.आय., आणि 50 पोलीस यांच्या 4 टीम तयार करण्यात येऊन सदाफळ यांस लवकरात लवकर अटक करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

(अडथळा)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : आपल्याला हे प्रकरण गंभीर वाटत नाही काय?...

**उपसभापती** : मी लक्षवेधी सूचना पुकारल्यानंतर आपण पुन्हा पुन्हा तेच प्रश्न कां विचारीत आहात? आपण विचारलेल्या प्रश्नाला आपणास अभिप्रेत असलेले उत्तर मंत्रिमहोदयांनी दिले पाहिजे काय?

(अडथळा)

श्री. संजय दत्त : सभापती महोदय,...

(मा.सदस्य श्री. अरविंद सावंत बसून बोलतात.)

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत मला "ए चूपरे" असे एकेरी बोलत आहेत. आम्ही त्यांच्याशी सन्मानाने बोलतो त्याप्रमाणे त्यांनी देखील आमच्याशी सन्मानाने बोलले पाहिजे. सभापती महोदय, मी आपणाकडे बघून बोलत होतो...

(अडथळा)

(सत्ताधारी पक्षाचे अनेक मा. सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलतात.)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत आपण सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांना उद्देशून एकेरी शब्द वापरला त्याबाबत आपण दिलगिरी व्यक्त कराल परंतु....

श्री.अरविंद सावंत : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना माननीय उपसभापती महोदयांनी बोलण्यासाठी परवानगी दिली असताना सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे घाईघाईने बोलण्याचा प्रयत्न करत होते म्हणून मी तसे म्हणालो.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : 'रामटेक'मधील लोकसभेची पोट निवडणूक आहे, अशा अविर्भावात बोलणे योग्य नाही.

श्री.दिवाकर रावते : 'रामटेक'ची निवडणूक नसली तरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गुंडगिरी कार्यकर्त्यांना या राज्यात मोकळे सोडलेले आहे काय ?

...अडथळा....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात.)

श्री.भास्कर जाधव : मंत्री महोदयांनी आपल्याला पाहिजे तसे उत्तर दिले पाहिजे, असा आग्रह धरणे योग्य नाही.

श्री.दिवाकर रावते : राज्यातील जनतेला न्याय मिळाला पाहिजे, या दृष्टीने तसे विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे...

...(अडथळा)...

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या निवेदनाच्या संदर्भात बोलण्यासाठी मी उभा राहिलो होतो. आपण एका निवेदनावर एक-दोन प्रश्न विचारण्यास परवानगी देता, याची कल्पना आहे. परंतु त्या संदर्भात न्याय मिळावा अशी अपेक्षा आहे. 93 ची सूचना देण्यामध्ये आमच्या प्रश्नाला योग्य उत्तर मिळावे अशी अपेक्षा असते. राहता शहरातील ही घटना आहे. त्या ठिकाणचे श्री.राधाकृष्ण पाटील आणि श्री.विखे-पाटील यांनी तेथील गुंड लोकांना पाठवून श्री.पठारे यांचे घर जाळले, त्याला मारझोड केली, जीवे मारण्याची धमकी दिली. ज्यांचे घर जाळले त्या घरातील माणसे ठसठसा रडत आहेत,, त्यांना संरक्षण मिळणे आवश्यक आहे. पोलीस अधिकारी श्री.सांडभोर हे त्या ठिकाणी उपस्थित होते, त्यांनी त्या ठिकाणच्या घटनेची नोंद घेतली नाही. कायदेशीर न्याय आहे, तो त्यांना मिळाला पाहिजे. सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

आरोपी कोणत्याही पक्षाचे असोत, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली पाहिजे. परंतु त्या ठिकाणी न्याय मिळत नाही. या गुन्हेगारांना मोकळे सोडलेले आहे. पीएसआय श्री.सांडभोर आरोपींना सांगतात की, तुम्ही अटकपूर्व जामीन घ्या. नंतर मी केस नोंदवितो. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, आरोपींवर 395 पासून सगळे गुन्हे दाखल केलेले आहे, त्या आरोपींची नावे दिलेली आहेत, त्यांना अजून अटक का केली नाही ? त्यांना केव्हा अटक करणार आहात ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, फिर्यादिने नोंद दिलेली आहे, त्याप्रमाणे त्या सगळयांवर कारवाई करण्यात येईल. त्यांना आता अटक कारण्यात आलेली नाही. त्यांना अटक करण्यासाठी 3 पी.आय. 6 पी.एस.आय. आणि 50 पोलीस यांच्या चार टीम तयार करण्यात आलेल्या आहेत. ते आरोपी कोणत्याही पक्षाचे असोत त्यांची गय केली जाणार नाही. त्यांना अटक करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : पी.एस.आय. हे आरोपींना अटक पूर्व जामीन मिळविण्यास सांगत होते. म्हणून आमची मागणी आहे की, ही चौकशी सीआयडीकडे सोपविणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेब आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे तेथील अधिकारी तसे वागले असतील तर त्या संबंधाने उच्च स्तरिय चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभागृहामध्ये लोकप्रतिधी जे सांगतात ते सत्य मानून त्याबाबतची चौकशी करण्याची पध्दती असते.

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ......

असेल, नसेल, करु, बघू असे उत्तर होऊ शकत नाही. या ठिकाणी जबाबदार सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, त्या ठिकाणी श्री. सांडभोर यांनी सांगितले की, कोर्टामध्ये जा, नंतर अटक करु. त्यांना अटकपूर्व जामीन मिळावा म्हणून असे केलेले आहे. त्यांना अटक होत नाही. ही राज्य करण्याची कोणती पध्दत आहे ?

श्री. दिवाकर रावते : त्या ठिकाणी स्थानिक आमदार दबाव आणतात म्हणून सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विचारल्याप्रमाणे हे प्रकरण सी.आय.डी. कडे चौकशीसाठी द्यावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन या सर्व प्रकरणाची सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांच्या संदर्भात माझ्या मुखातून जो एकेरी उल्लेख झाला तो एका भावनेपोटी झाला. त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, ते माझे मित्र आहेत.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील बंद पडलेल्या गिरणी मालकांकडून गिरणी कामगारांची मोठ्या प्रमाणावर होणारी फसवणूक

**मु. शी.** : मुंबईतील बंद पडलेल्या गिरणी मालकांकडून गिरणी कामगारांची मोठ्या प्रमाणावर होणारी फसवणूक यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, धनाजी साठे, सुधीर सावंत, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, केशवराव मानकर, अरविंद सावंत, मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, ॲड अनिल परब, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री परशुराम उपरकर, सुरेश जेथलिया, गोपीकिशन बाजोरिया, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई येथील स्टॅण्डर्ड, मोरारजी, पिरामल, मफतलाल, कमला, स्वान, रुबी, बॉम्बे डाईंग, कोहिनूर, एल्फिन्स्टन, न्यू हिंद व अपोलो इत्यादी 29 गिरण्या बंद पडल्या त्यावेळी गिरणी मालकांकडून गिरणी कामगारांची मोठ्याप्रमाणात फसवणूक करण्यात आली होती, त्याचप्रमाणे आताही गिरण्यांच्या जमीन विकास करतेवेळी गिरणी कामगारांना किमान 50 हजार घरांची आवश्यकता असताना या 29 गिरण्यांच्या विकासात या कामगारांना फक्त 8 हजार 680 घरे देण्यात येणार असल्याचे माहे मार्च,2007 च्या पहिल्या आठवड्यात आढळून येणे, यामुळे या गिरणी कामगारांची सतत फसवणूकच होत असणे, गिरणी कामगारांच्या घरासाठी जेमतेम 18 ते 20 एकर जागा देण्याचे निश्चित करण्यात येणे, यामुळे गिरणी कामगारांवर फार मोठा अन्याय होत असल्यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेला असंतोष व संतापाची भावना, सबब गिरणी कामगारांना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे 50 हजार घरांची पूर्तता करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

....3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, बऱ्याच वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित आहे आणि या प्रश्नाने उग्र रुप धारण केलेले आहे. या विषयावर सर्वपक्षीय सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. मी आपल्या माध्यमातून लोकाभिमूख शासनाला विनंती करतो की, याबाबतीत सकारात्मक भूमिका घेऊन शासनाने हा प्रश्न सोडविण्याबाबत पुढाकार घ्यावा. यासंदर्भात माझे दोन प्रश्न आहेत. त्या ठिकाणी डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीज न येता कमर्शियल कॉम्प्लेक्सेस आले तर त्या ठिकाणी एम्प्लायमेंटच्या रिझर्वेशनसाठी डी. सी. रुल्समध्ये तरतूद नाही. तशी तरतूद शासन डी.सी.रुल्समध्ये प्रोव्हाईड करणार काय ? सर्वांना माहीत आहे की, येथील सर्व कामगारांचे हाल झालेले आहेत. त्यांच्या औषधोपचारासाठी त्यांना राज्य कामागार विम्याचे कार्ड देण्यात येईल काय ? त्याचबरोबर त्यांना रेशनिंगच्या बाबतीत बी.पी.एल.चा लाभ देण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ज्या बंद पडलेल्या टेक्स्टाईल मिलचा पुनर्विकास करीत असतो आणि ज्या ठिकाणी डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीज आहेत किंवा रिलोकेट झालेल्या आहेत त्याच ठिकाणी नोकरीच्या संदर्भात स्किल अपग्रेड करुन त्यांना नोकरीमध्ये घ्यावे अशी तरतूद सध्याच्या कायद्यामध्ये आहे. परंतु त्या ठिकाणी जर कमर्शियल कॉम्प्लेक्स झाले तरी नोकरी मिळावी अशी अपेक्षा सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे. या संदर्भात डी. सी. रुल्स, 1958 मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात शासनाकडून जरुर पॉझिटिव्ह विचार ठेवण्यात येईल आणि त्या ठिकाणी कमर्शियल कॉम्प्लेक्स उभे राहिले तरी कामगारांच्या मुलांना नोकरी मिळावी म्हणून डी.सी.रुल्स, 1958 मध्ये काही सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातून विचार करण्यात येईल जेणेकरुन त्यांना नोकऱ्या मिळणे सोयीचे होईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न इ.एस.आय.एस. चे कार्ड मिळतील काय यासंदर्भात विचारलेला आहे. याबाबत सुध्दा सहानुभूतीने विचार करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी बी.पी.एल.च्या संदर्भात विचारले. त्यांचे उत्पन्न दरमहा 590 रुपये असावे अशी बी.पी.एल.ची अट आहे. त्यामुळे ही बाब तपासून पाहण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी या लक्षवेधी सूचनेमध्ये गिरणी कामगारांना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे 50 हजार घरांची पूर्तता



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई याबाबत स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे. त्यासंदर्भात निवेदनामध्ये असे उत्तर दिले आहे की, त्या ठिकाणी जी जागा उपलब्ध होणार आहे त्या जागेला जरी 4 इतका चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध करुन तरी 10 हजार कामगारांनाच घरे मिळतील.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी..)

माझा प्रश्न असा आहे की, गिरण्यांच्या जमिनीवरील ज्या चाळी आहेत त्यामध्ये वर्षानुवर्षे राहात असलेली कुटुंबे, मग ती कुटुंबे गिरणी कामगार असतील वा नसतील, त्यांना मोफत घरे दिली जाणार आहेत काय ? मुंबईमध्ये आलेल्या आणि अनधिकृतपणे राहाणा-या 1995 पर्यन्तच्या लोकांना 225 चौ.फूटाची मोफत घरे बांधून देण्यासाठी वेळोवेळी नियमात बदल केले जातात. असे असताना गिरण्यांच्या चाळीतील सर्वच्या सर्व कुटुंबियांना मोफत घरे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत काय ?

श्री. राजेश टोपे : ज्या गिरण्यांच्या बाबतीत पुनर्विकासाचा प्रस्ताव झालेला आहे त्या गिरण्यांच्या चाळींच्या संदर्भात मोफत घरे देण्याच्या बाबतीत नियम 2001मधील नियम 58 मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, म्हाडाला जी जमीन दिलेली आहे त्या जमिनीवर म्हाडाने कामगारांसाठी घरे न बांधता उच्च उत्पन्न गटासाठी घरे बांधलेली आहे. ही जमीन गिरणी कामगारांच्या घरासाठी वापरलेली आहे असे निवेदनात म्हटलेले आहे. तेव्हा म्हाडाने आतापर्यन्त किती गिरणी कामगारांना घरे दिलेली आहेत ? तसेच ज्या 24 गिरण्यांच्या विकासाचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे त्यापैकी 23 गिरण्यांनी गिरणी कामगारांसाठी एक इंच देखील जमीन दिलेली नाही, हे खरे आहे काय ? राज्य शासनाने यासंदर्भात एक जी.आर. काढलेला आहे. या जी.आर.नुसार विकासांतर्गत उपलब्ध होणा-या निधीवर नियंत्रण ठेवण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. त्या समितीच्या अध्यक्षांनी नंतर राजीनामा दिला. माझा प्रश्न असा आहे की, राज्य शासनाच्या वेळकाढू धोरणामुळे गेल्या 6 वर्षामध्ये एकाही कामगाराला अथवा कामगाराच्या मुलाला नोकरी देण्यात आलेली नाही, हेही खरे आहे काय ?

श्री. राजेश टोपे : म्हाडाने एचआयजीसाठी बांधकाम केले होते. 2001मध्ये नियम 58 अस्तित आल्यानंतर जी काही जमीन म्हाडाला दिली जाणार आहे. त्यातील 50 टक्के जमिनीवर गृहनिर्माण संस्था व्हाव्यात आणि जास्तीत जास्त घरे व्हावीत हा शासनाचा उद्देश आहे. लोकांना जास्तीत जास्त घरे उपलब्ध व्हावीत यासाठी म्हाडाला 1.33 एफएसआय ऐवजी 4 एफएसआय देण्यात आलेला आहे. हा एफएसआय गिरणी कामगारांसाठी वापरावा अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : निवेदनामध्ये गिरणी कामगारांसाठी योजना केली आहे असे नमूद केलेले आहे. मंत्री महोदय असे म्हणतात की, या पुढे त्यांच्यासाठी घरे होणार आहेत. उत्तरामध्ये विसंगती दिसते. म्हणून मंत्री महोदयांचे नेमके उत्तर काय आहे ?

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दोन प्रश्न आणखी विचारले त्याचीही माहिती द्यावी. योजना विकसित केली का करणार आहात?

श्री.राजेश टोपे : मी याठिकाणी सांगितले की, एचआयजीकरिता योजना केली होती. आता नियम जो आला आहे त्या अनुषंगाने काय तरतुदी आहेत याची मी माहिती दिलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी प्रश्न उपस्थित केला त्या अनुषंगाने 50 टक्के जागा ही गिरण्यातील कामगारांच्या गृहनिर्माणासाठी वापरली जाते. 1991 च्या मूळ नियम 58 अन्वये विकास झालेल्या मिलच्या प्रस्तावात म्हाडास प्राप्त झालेल्या 24287.08 चौ.मी.क्षेत्राच्या जमिनीवर म्हाडाने गृहनिर्माण योजना विकसित केली आहे असे निवेदनामध्ये म्हटले आहे. काय योजना विकसित केली हे सांगावे. उपलब्ध गिरणी कामगारांच्या गृहनिर्माण योजनेतील सदनिकांची किंमत काय निश्चित केली आहे हे सांगावे. ही घरे बांधून गिरणी कामगारांनाच विकणार आहात असे यामधून ध्वनित होते. विकणार म्हणजे नक्की किंमत काय ठरविली आहे? निवेदनामध्ये पुढे म्हटले आहे की, उपरोक्त गिरणी कामगार गृहनिर्माणाखालील सदनिकांच्या किंमतीसाठी व त्यांचे वितरणासाठी कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी मुख्य सचिवांचे अध्यक्षतेखाली वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक समिती नियुक्त केली आहे. या योजनेमध्ये एकूण कामगारांसाठी किती सदनिका बांधल्या जाणार आहेत? त्यापैकी कामगारांना किती सदनिका वितरित होणार आहेत? विक्रीची किंमत काय असणार आहे? आज जे कामगार चाळीत राहतात त्यांना 225 चौ.फुटाची सदनिका दिली जाणार आहे त्या सदनिकांची संख्या किती?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, 1991 चा जो नियम होता त्या अनुषंगाने ज्या गिरण्यांनी पुनर्विकासाचे प्रस्ताव दाखल केले होते त्या अनुषंगाने निवेदनामध्ये माहिती दिलेली आहे. 24287 चौ.मी.जागा विकसित केली आहे ती 1991 च्या नियमाप्रमाणे केलेली आहे. 1991 च्या तरतुदीमध्ये 33/33/33 प्रमाणात विकास करीत असताना त्यात गिरणी कामगारांच्या संदर्भातील उल्लेख नव्हता.

श्री.दिवाकर रावते : 24287.08 चौ.मी.जमीन जी गृहनिर्माणासाठी विकसित केली त्यामध्ये गिरणी कामगारांसाठी किती घरे बांधली? किती कामगारांना घरे दिली?

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : 1991 च्या नियमामध्ये गिरणी कामगारांना घरे देण्याची तरतूद नव्हती. म्हाडाला 33 टक्के, महानगरपालिकेला 33 टक्के व विकासकाला 33 टक्के जागेचे वाटप व्हावयाचे होते त्यामध्ये कामगारांना घरे बांधून द्यावीत अशा पध्दतीची तरतूद नव्हती. त्यामुळे म्हाडाने विकसित केलेल्या जमिनीवर एचआयजी व एलआयजीसाठी योजना करण्यात आली आहे. अधिकृत सदनिकांची संख्या किती आहे त्याची माहिती मी पटलावर ठेवीन.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सुधारणा करावयाची आहे का असे मंत्रीमहोदयांना विचारले असता त्यांनी "नाही" म्हणून सांगितले. गिरण्यातील कामगारांच्या गृहनिर्माणासाठी योजना विकसित केली आहे असे स्पष्ट म्हटले आहे. जी घरे बांधली, त्यातील किती घरे कामगारांसाठी दिली? मंत्रीमहोदयांनी आता उत्तर देताना म्हटले आहे की, घरे बांधली परंतु कामगारांसाठी नाही. यामध्ये सुधारणा करावयाची आहे का?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी अतिशय योग्य असे उत्तर दिले आहे. योजनेचे दोन भाग केले पाहिजेत. एक योजना 1991 सालची होती. 58 चा नियम 1991 साली मंजूर केला होता. त्या योजनेमध्ये जे स्ट्रक्चर आहे ते तसेच ठेवले तर त्यामध्ये मिल मालकांचा अधिक फायदा व्हायचा.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .....

त्यामध्ये सर्व जागेची मोजणी केली तर जास्त जागा आपल्याला द्यावी लागेल म्हणून मिल मालक भिंत न पाडता भिंतीच्या आतमध्ये कामे करीत होती. 91 च्या नियमाखाली जी जमीन उपलब्ध होती ती विकसीत केली आणि एचआयजी किंवा वरच्या उत्पन्न गटातील लोकांसाठी म्हाडाने घरे बांधली आणि ती विकली. त्यानंतर नवीन नियम करण्यात आला व नव्या नियमाप्रमाणे जमिनी कमी प्रमाणात मिळायला लागल्या व त्यात सुध्दा दोन भाग करण्यात आले. त्या ठिकाणी ज्या चाळी होत्या, गिरण्यांमध्ये काम करणारे जे लोक त्या चाळींमध्ये राहत होते त्यांना तेथेच 225 चौ. फुटांची घरे बांधून देण्यात यावीत परंतु या लोकांची घरे न बांधता दुस-यांसाठीच त्या ठिकाणी घरे बांधली जाऊ लागली. हा प्रकार लक्षात आल्यानंतर जोपर्यंत चाळीतील लोकांसाठी घरे बांधली जाणार नाहीत तोपर्यंत त्यांना ऑक्यूपेशन सर्टीफिकेट व कंम्पलीशन सर्टीफिकेट देण्यात येऊ नये अशी तरतूद करण्यात आली होती. त्यामुळे रि-डेव्हलपमेंटचा प्रस्ताव शासनाकडून महानगर पालिकेला पाठविला गेला. यामुळे चाळीत राहणा-या लोकांची व्यवस्था होईल. परंतु जे कामगार चाळीमध्ये राहत नव्हते त्यांच्यासाठी सरकार घर बांधून देणार आहे की, नाही हा प्रश्न निर्माण झाला होता. याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, म्हाडाला जी जमीन उपलब्ध होईल त्याच्या निम्मी जमीन कामगारांना घरे बांधण्यासाठी व निम्मी जमीन ट्रान्झीट कॅम्पसाठी देण्यात येईल व त्यासाठी 4 टक्के एफएसआय जागा उपलब्ध करुन देण्यात येईल. या योजनेमध्ये 10 हजार घरे कामगारांसाठी उपलब्ध होतील आणि तेवढीच घरे ट्रान्झीट कॅम्पसाठी उपलब्ध होईल. या घरांची किंमत ठरवण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली असून या समितीमध्ये कामगार संघटनेचे प्रतिनधी राहणार आहेत. ही समिती घरांच्या संदर्भात किंमत ठरवले तसेच कोणत्या कामगारांना आधी घरे द्यावयाची याची प्रायोरिटी ही समिती ठरविणार आहे. ही घरे ना नफा ना तोटा तत्वावर देण्यात येईल. ही घरे घेण्यासाठी कामगाराना संबसीडी द्यावयाची आवश्यकता आहे काय हे पाहिले जाईल. ज्या गिरण्या ताब्यात आलेल्या आहेत त्यावर 10 हजार घरे बांधण्यात येतीलच तसेच यापुढील काळात ज्या गिरण्या आमच्या ताब्यात येणार आहेत त्या गिरण्यांच्या जमिनीवर सुध्दा घरे बांधण्यात येतील. तेथे जास्तीत जास्त कामगारांना घरे उपलब्ध करुन देण्यात येतील परंतु सर्वच कामगारांना घरे उपलब्ध करुन देण्यात येतील अशी मी खात्री देऊ शकत नाही.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय मुख्यमंत्री महोदयांनी कामगारांच्या घरासाठी सबसीडी देण्याचा उल्लेख केलेला आहे. बांधकामाच्या संदर्भात शासन अनेक प्रकारचे कर लावत असते शासनाने जर या करामध्ये सूट दिली तर घरांच्या किमती कमी होऊ शकतील पर्यायाने कामगारांना स्वस्तात घरे उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळे यासंदर्भात विचार केला जाईल काय?

श्री. विलासराव देशमुख : कामगारांना परवडेल अशा सबसीडाईज्ड रेटवर घरे उपलब्ध करण्याचा विचार केला जाईल.

यानंतर श्री. पुरी......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, लेखी निवेदनातील उत्तरात परिच्छेद क्रमांक 3 मध्ये गिरणीच्या जागेवर जे काही मॉल्स्, कारखाने किंवा इतर जी काही सेंटर्स् उभी आहेत, त्यामध्ये गिरणी कामगारांच्या मुलांना संधी दिली जाईल व नोकरीमध्ये त्यांना सामावून घेतले आहे, असे म्हटले आहे. याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, आत्तापर्यंत आपण किती गिरणी कामगारांच्या मुलांना मॉल्स्मध्ये किंवा अन्य उभ्या असलेल्या ॲक्टीविटीजमध्ये नोकरीत सामावून घेतले आहे ? याबाबतचे उत्तर माननीय मंत्री महोदय देतील काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी विचारलेल्या प्रश्नाच्यावेळीच मी सांगितले आहे की, याबाबतीत डीसीआर 58 मध्ये मिल मालकाने, मिल स्थलांतरित केली वा डायव्हर्सिफाईड इंडस्ट्री स्थापन केली तर त्यामध्ये आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेल्या कामगारांना किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला नोकरी देण्यात येईल अशी तरतूद आहे. परंतु मिल मालकाने मिलच्या जागेवर मॉल बांधला असेल तर त्यामध्ये कामगारांना किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तींना नोकरी देण्याबाबत तरतूद नाही. अशी तरतूद विकास नियम 58 (7) (बी) मध्ये असावी याबाबत या नियमांमध्ये सुधारणा करण्याचा विचार करण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, दुर्दैवाने कामगारांचे निधन झाले तर त्यांच्या वारसांना जागा देणार, असे सांगण्यात आले. परंतु मोरारजी मिल, भारतमाता सिनेमासमोर याठिकाणी नियमांप्रमाणे गिरणी कागारांसाठी घरे बांधलेली नाहीत. त्यामुळे याबाबतीत आपण चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करणार का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, वारसाहक्काची बाब तपासून पाहण्यात येईल. तसेच, एखादा पुनर्विकासाचा प्रस्ताव मंजूर करत असताना किंवा प्लॅन करताना कामगारांसाठी त्याठिकाणी नियोजन केले आहे किंवा नाही याबाबतची तपासणी करुनच अशा प्रस्तावाला मंजुरी दिली जाते. परंतु अशा पध्दतीची घटना परत घडणार नाही याची मी ग्वाही देतो.

------

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींचा मागासलेपणा विचारात घेता त्यांचा समतोल विकास साधण्यासाठी शासनाने केलेली स्वतंत्र वर्गवारी

**मु. शी.** : राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींचा मागासलेपणा विचारात घेता त्यांचा समतोल विकास साधण्यासाठी शासनाने केलेली स्वतंत्र वर्गवारी यासंबंधी सर्वश्री धोंडीराम राठोड, संजय दत्त, श्रीमती.फौजीया खान, सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, उल्हास पवार, प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.धोंडिराम राठोड ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील विमुक्त व भटक्या जमातींचा मागासलेपणा विचारात घेऊन त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी या प्रवर्गाचा समतोल विकास साधण्यासाठी शासनाने विमुक्त भटक्या जमातींची केलेली स्वतंत्र वर्गवारी, सन 1961 पासून या प्रवर्गास दिलेले आरक्षण, सन 2004 मध्ये विमुक्त व भटक्या जमातींना तसेच विशेष मागास प्रवर्ग यांना पदोन्नतीत राखीव जागांमध्ये 13 टक्के दिलेले आरक्षण, मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेमध्ये दिनांक 9 मार्च, 2007 रोजी निर्णय देतांना मा.उच्च न्यायालयाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व इतर मागास वर्गियांना सन 2004 च्या अधिनियमानुसार पदोन्नतीसाठी दिलेली अनुमती, तथापि विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्ग यांना पदोन्नतीच्या जागा भरण्यास दिलेली स्थगिती, न्यायालयात सुनावणीच्या वेळी विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्ग यांची शासनाने योग्य ती माहिती व आकडेवारी सादर न केल्याने या प्रवर्गातील अधिकाऱ्यांना आरक्षण द्यावे किंवा कसे याबाबत कुठल्याही प्रकारचे निष्कर्ष न्यायालयाने न काढणे, असे असतांनाही या प्रवर्गास प्रलंबित असलेल्या याचिकेचा अंतिम निकाल लागेपर्यंत पदोन्नती न देण्याचे न्यायालयाचे

..3.....



SSP/ MHM/ MHM/ KGS/ SBT/ पूर्वी श्री.जुन्नरे... 16:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडिराम राठोड...

आदेश, सन 2004 च्या अधिनियमानुसार वर्ग-1 वा त्यावरील पदांकरिता मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक 9 मार्च, 2007 रोजीच्या आदेशान्वये काढलेल्या शासन निर्णयामध्ये त्याबाबतचा कुठलाही स्वयंस्पष्ट उल्लेख नसणे व त्यामुळे विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्ग उमेदवारांच्या पदोन्नतीबाबत सर्वच स्तरावर निर्माण झालेल्या गोंधळामुळे या प्रवर्गातील अधिकारी यांच्यावर होत असलेला अन्याय, त्यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, मा.उच्च न्यायालयात योग्य तो अर्ज दाखल करुन याबाबतचे झालेले आदेश रद्द करण्यासाठी यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि याबाबत शासनाची भूमिका."

श्री.राजेश टोपे ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडिराम राठोड : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. विमुक्त जाती व भटक्या आणि विशेष मागासवर्ग प्रवर्गातील लोकांवर अन्याय करणारा हा प्रश्न असल्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी याला न्याय मिळवून द्यावा, ही विनंती. सभापती महोदय, या समाजाची पार्श्वभूमी थोडक्यात अशी आहे. इंग्रज राजवटीमध्ये सैन्याला खुश्कीच्या मार्गाने बैलाच्या पाठीवर अन्नधान्य पुरवणाऱ्या बंजारा समाजाला इंग्रजांनी 1924 मध्ये गुन्हेगारी जमात ठरविले. स्वातंत्र्यांनंतर 1949 मध्ये भारत सरकारने या समाजाला माजी गुन्हेगारी जमात म्हणून संबोधले. त्यानंतर 1952 मध्ये मध्ये जवाहरलालजी नेहरु यांनी सोलापूर येथील सभेत बंजारा समाजासह 14 जातीला विमुक्त जातीचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. 1960 मध्ये महाराष्ट्र शासनाने श्री.थाडे यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट नेमला या समितीच्या अहवालाप्रमाणे 1961 मध्ये महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतरावजी चव्हाण साहेब आणि हरितक्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक साहेब यांनी विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या लोकांना 4 टक्के शैक्षणिक आरक्षण देण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला. 1963 मध्ये नियुक्त केलेल्या देशमुख समितीने दिलेल्या अहवालानुसार 1965 मध्ये सेवा भरतीसाठी आरक्षण देण्यात आले. 1974 मध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या लोकांना वर्ग 1 च्या अधिकाऱ्यांपर्यंत पदोन्नतीसाठी आरक्षण देण्याचा क्रांतीकारक निर्णय घेतला.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड...

सन 2004 मध्ये वि.जा. भ.ज. व मागास प्रवर्गाच्या सर्व रिक्त जागा पदोन्नतीने भरण्याबाबत शासनाने निर्णय घेतला. त्या विरुध्द माननीय उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेचा निकाल 9 मार्च 2007 रोजी लागला असून त्यात खुला प्रवर्ग 67 टक्के, अनुसुचित जाती 13 टक्के आणि अनुसुचित जमाती 7 टकके असे 87 वरची टक्के बंदी न्यायालयाने उठविली आहे. केवळ वि.जा.भ.ज च्या 13 टक्के पदोन्नती वरची बंदी न्यायालयाने मात्र कायम ठेवली आहे. न्यायालयाने असे नमूद केले आहे की, "Hence, we have no doubt that enough material has not been placed before this court to conclude in favour of the State that the caste which are included in VJNT and special backward category are specially, economically and educationally backward and that they are not adequately represented..." मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात असे म्हटले आहे की, आवश्यक ती सर्व माहिती शासनाने कोर्टापुढे सादर केली होती. त्यानंतर कोर्टाने असा निकाल दिला की, जी माहिती आवश्यक होती ती शासनाने कोर्टापुढे दिलेली नाही. वास्तविक शासनाकडे 1)थाडे समिती 2) कालेलकर समिती 3) देखमुख समिती 4) खत्री समिती आणि 5) मंडल आयोगाची सर्व माहिती महाराष्ट्र शासनाकडे उपलब्ध असताना शपथ पत्राद्वारे ती माहिती न्यायालयात दाखल करण्यात आली नाही म्हणून न्यायालयाने अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे.सभापती महोदय मला या ठिकाणी प्रश्न विचारावयाचा आहे की,शासनाकडे असलेली माहिती न्यायालयात सादर करण्यात आली नाही त्यामुळे ही बंदी उठली नाही हे खरे आहे का ? आता शासन न्यायालयाकडे योग्य तो अर्ज दाखल करुन शासनाकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती कोर्टापुढे सादर करणार आहे का ? ज्या अधिकाऱ्यांनी ही माहिती न्यायालयास दिली नाही त्या अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र शासन कठोर कार्यवाही करणार आहे का ? असे माझे तीन स्पेसिफिक प्रश्न आहेत. या ठिकाणी उपस्थित असलेले माननीय मुख्यमंत्री जे वि.जा व भ.ज चे यांना मला विचारावयाचे आहे की, आता थोडया दिवसांपूर्वी वि.जा व भ.ज. ला क्रिमी लेयरची अट लावली आहे. आता पदोन्नतीवरील बंदी उठत नाही . कालांतराने वि.जा. व भ.ज. च्या सर्व सवलती काढून घेण्याचा शासनाचा विचार आहे काय? सन्माननीय मुख्यमंत्री महोदय आम्हास न्याय मिळवून देणार काय असा माझा प्रश्न आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड यांनी 4 -5 प्रश्न या ठिकाणी उपस्थित केले आहेत. 1960 पासून आतापर्यंत चार समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये थाडे समिती, डायरेक्टरेट ऑफ सोशल वेलफेअर, OSD, आदिवासी विभाग, या चार समित्यांची जी काही माहिती आहे ती सर्व माहिती ॲफिडेव्हियेट करुन राज्य शासनाच्या वतीने दाखल केली हाती किंवा माहिती दिली होती. त्यामुळे "माहिती दिली नाही" असे या ठिकाणी सांगण्यात आले ते खरे नाही. सभापती महोदय मला कृपया बोलण्याची संधी द्यावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कोर्टाने स्पष्ट शब्दात असे म्हटले आहे की, जी माहिती कोर्टात उपलब्ध होण्याची आवश्यकता होती, ती माहिती सादर झालेली नाही. त्यांनी कोर्टाचा निर्णय वाचून दाखविला त्यानंतर शासनाकडे कोणकोणत्या आयोगाची माहिती आहे ती त्यांनी सांगितली.

यानंतर श्री. रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

माझा यावर हरकतीचा मुद्दा असा आहे की, कोर्टाने जो काही निर्णय घेतला तो असत्य आहे की शासनाने चूकीची माहिती कोर्टाला सादर केली म्हणून असे घडले आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सभागृहाची जी पध्दत आहे ती माझ्या माहितीप्रमाणे अशी आहे की, सर्वांचे प्रश्न व शंका ऐकल्याशिवाय किंबहूना अगदी शेवटच्या माणसाच्या शंका व प्रश्न कळल्याशिवाय मंत्री आपले उत्तर देण्यास सुरुवात करीत नाहीत आणि एकदा मंत्रि महोदय उत्तर देण्याकरिता उभे राहिले की त्यांना उत्तर देऊ द्यावे. म्हणजे सर्वांना प्रश्न व त्याला दिलेली उत्तरे समजतील. ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत त्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिल्याशिवाय उत्तराचे भाषण पूर्ण करण्याची इच्छा नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धोंडिराम राठोड यांनी काही मुद्दे मांडले व याविषयीच्या अनेक समित्यांची माहिती डिटेलमध्ये दिली. ही सर्व माहिती शासनाने यापूर्वीच उपलब्ध करुन दिलेली आहे. या सर्व समितीच्या माध्यमातून म्हणजे अगदी खत्री समिती पर्यन्तच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत. सभापती महोदय, कोर्टाने कसा निर्णय घेतला, कोर्टाचा यावरील निष्कर्ष काय आहे, कोर्टाचे काम याबाबत कसे झाले आहे, याबाबतीत सभागृहात चर्चा होणे बरोबर नाही, असे मला वाटते. प्रामुख्याने बॅकवर्डनेसची व्याख्या किंवा त्यांचा सर्व्हे केला गेला व कोणती जात कोणत्या प्रवर्गात येते याची माहिती यामध्ये दिलेली आहे. या संदर्भात सुध्दा कोर्टाचा प्रश्न होता. या ठिकाणी व्ही.जे.एन.टी.च्या वतीने मला वाटते की, औरंगाबादच्या काही व्यक्तींच्या वतीने त्या व्यक्ति पार्टी असल्यामुळे त्यांनी आपला "से " कोर्टापुढे सादर केला होता. याबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, शासनाने 1966 पासून अशा पध्दतीने सेवाभरतीमध्ये नव्याने सर्व टप्प्यांवर व्ही.जे.एन.टी.करिता आरक्षण लागू केलेले आहे. शासनाची यामध्ये अशीच भूमिका आहे की, सदर आरक्षण व्ही.जे.एन.टी.करिता फक्त प्रमोशनपुरतेच मर्यादित नसावे तर सर्व टप्प्यांवर असावे. शासनाने यापूर्वी अशी माहिती दिली होती की, विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन कुठल्याही परिस्थितीत याबाबत कोर्टामध्ये रिव्हयू पिटीशन दाखल करण्याच्या दृष्टीकोनातून शासन प्रयत्नशील आहे. व्ही.जे.एन.टी. या प्रवर्गाला अनेक वर्षापासून चालू असलेल्या सवलती तशाच राहाव्यात अशीच शासनाची स्पष्ट भूमिका आहे.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, या कोर्टाच्या निर्णयातून घटनात्मक वैधतेलाच आव्हान देण्यात आलेले आहे. घटनेमध्ये आरक्षणासंबंधी जे घटनात्मक कलम आहे ते आरक्षण पद्धत लागू होण्याच्या वेळी आले आहे. महाराष्ट्र सरकारच्या वकिलांनी घटनात्मक कलम म्हणून या कलमाच्या आधारे किंवा ज्या कलमाच्या आधारे हे आरक्षण दिले आहे ती कलमे कोर्टाच्या निदर्शनास आणलेली नाहीत. कोर्टाने असे म्हटले आहे की, "Whereas benefit of Article 16(4A) cannot be extended to VJNT and Special Backward category candidates." हे बरोबर आहे. शेडयुल 4 हे एस.सी./ एस.टी. साठी आहे, हे मला मान्य आहे. परंतु आर्टिकल 15/4 मध्ये असे म्हटले आहे की, "Nothing in this Article or in clause (2) of Article 29 shall prevent the State from making any special provision for the advancement of any socially and educationally backward classes of citizens or for the Schedule Castes and Schedule Tribes. The powers conferred on the state under Art.15(4) are very wide, vast and varied and are not regulated by any other provisions of the Constitution. म्हणून माझी सरकारला अशी विनंती आहे की, घटनेच्या या कलमामध्ये एवढे क्लियर कट सांगितलेले असतांना देखील सरकारी वकिलांनी ही बाब कोर्टाच्या निदर्शनास का आणून दिली नाही ? श्री.नागराज व इतर विरुध्द केंद्र शासन या प्रकरणी कोर्टाने असे म्हटले आहे की, "The State Government has not placed enough material on record to indicate the survey carried out by it. Hence, we have no doubt that enough material has not been placed before this court to conclude in favour of the State that the caste which are included in VJNT and special backward category are specially, economically, and educationally backward and they are not adequately represented in State service."

सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की, हायकोर्टाचे एवढे क्लियरकट जजमेंट आलेले आहे. यामध्ये घटनात्मक वैधतेलाच एकप्रकारे आव्हान देण्यात आलेले आहे. सदर उच्च न्यायालयाचा निर्णय आता फक्त प्रमोशनपुरताच मर्यादित राहिलेला नाही. शासनाने असे सांगितले

..3..........

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे.........

आहे की, शासनातर्फे रिव्हयू ॲप्लिकेशन सबमिट करण्यात येईल. कोर्टाचा निकाल दिनांक 7 मार्च,2007 रोजी लागला आहे. निकाल लागल्यानंतर 30 दिवसाच्या आत रिव्हयू ॲप्लिकेशन सबमिट करावा लागतो. त्यामुळे कोर्टात रिव्हयू ॲप्लीकेशन सादर करण्याची 30 दिवसांची मुदत आज संपली आहे. याबाबत विधी व न्याय विभागाने वकिलाचे मत मागितलेले आहे का ?

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे...........

शासन सरकारी वकिलांच्या मतावर चालणार असेल तर विधि व न्याय विभागाची आवश्यकता आहे काय ? सरकारी वकिलाचे उत्तर मागवून सगळा कायदा तपासून पाहू शकता. परंतु या अधिका-यांनी जाणुनबुजून उशीर केला आहे. हे सर्व विदिन टाईम करणे आवश्यक आहे. परंतु तसे केलेले नाही. ही सर्व माहिती कोणत्या कोर्टात सादर करणार आहात ? सर्वोच्च न्यायालयात की उच्च न्यायालयात सादर करणार आहात ? आणि कसा न्याय देणार आहात हा खरा प्रश्न आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी शासनाने भूमिका स्पष्ट केली आहे. सन्माननीय सदस्यांनी रिव्हयू ॲप्लिकेशन 30 दिवसात सादर होणे गरजेचे होते, असा कायदेशीर मुद्दा उपस्थित केला आहे. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, डिले कन्सिडर करता येतो. रिव्हयू ॲप्लिकेशनबाबत शासनाची भूमिका स्पष्ट आहे, गरज असेल तर सर्वोच्च न्यायालयात अपीलमध्ये जाऊ व व्हीजेएनटी संदर्भात कोर्टाकडून आलेली स्थगिती उठविण्यासंदर्भात शासनाच्या वतीने जे जे काही प्रयत्न करण्याची आवश्यकता असेल ती आवश्यकता निश्चितपणे शासनाकडून पूर्ण केली जाईल.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, सन 2003-2004 मध्ये विधानमंडळामध्ये चर्चा होऊनही मंत्रिमंडळाची उपसमिती सन 2005 मध्ये स्थापन झाली. या विलंबाची कारणे काय ? ऑक्टोबर 2005 ला उपसमिती झालेली असतांना एक वर्षानंतर म्हणून 7 नोव्हेंबर 2007 रोजी त्या समितीची बैठक झाली. बैठकीस झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत ? शासनाने चार आठवडयांच्या आत अर्जदाराने उपस्थित केलेल्या मुद्यांवर शपथपत्र द्यावे, असा 15 मार्च रोजी न्यायालयाने निदेश दिला आहे. आज एप्रिल महिन्याची 16 तारीख आहे, जवळ जवळ एक महिना संपलेला आहे. तेव्हा यासंदर्भात शासनाने शपथ पत्र दिले आहे काय ? निवेदनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये एसएलपी क्रमांक 4984/2007 दाखल केला आहे. त्यावर माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये दिनांक 15/3/2007 रोजी सुनावणी होऊन, शासनास चार आठवडयांच्या आत अर्जदाराने उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत शपथपत्र सादर करण्यास सांगितले आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये याबाबत शासनातर्फे प्रतिज्ञापत्र सादर

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे........

करण्याची कार्यवाही सध्या अंतीम टप्प्यात आहे." हा अंतीम टप्पा संपला आहे काय ? यासंदर्भात शासनाने शपथ पत्र दिले आहे काय ? दिले असेल तर काय दिले ? दिले नसेल तर कोणत्या मुद्यांवर देणार आहे, जर रिव्हयू ॲप्लिकेशन सबमिट केला नसेंल तर किती दिवसात दाखल होणार आहे ? कारण "delay can be considered".. सन 2003 चे प्रकरण सन 2007 मध्ये देखील सुरु आहे. त्यामुळे न्याय द्यायचा असेल तर द्यावा, द्यायचा नसेल तर स्पष्ट नाही म्हणून सांगा. कारण "justice delayed is justice denied." तेव्हा, येत्या आठ दिवसात रिव्हयू ॲप्लिकेशन करणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी मला वाटते दोन विषयावरील लक्षवेधी सूचना क्लब केल्या असल्यामुळे गोंधळ होत आहे. ओबीसी साठी उपसमिती स्थापन केली होती व त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्या, ॲड उषा दराडे यांनी केला आहे. व्हीजेएनटी आणि ओबीसी असे दोन विषय त्यांनी मिक्स केले आहेत.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

दोन्ही विषयावरील उत्तरे मी येथे देतो. ओबीसींच्या संदर्भात मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्यात आली होती. ओबीसींना सर्व टप्प्यांवर आरक्षण असावे, असेच या उपसमितीच्या अहवालामध्ये म्हटले आहे. सन्माननीय सदस्य, श्री.सुधाकर गणगणे यांनी हा मुद्दा उपथित केला आहे. त्यामुळे जी उपसमिती नेमण्यात आली होती त्या समितीचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. ओबीसी संवर्गाला व्हीजेएनटीसारखे सर्व टप्प्यांवर आरक्षण असावे, असे उपसमितीचे मत आहे. परंतु, आता हे सगळेच सध्या कोर्टामध्ये असल्याने व व्हीजेएनटी आणि एसबीसीचे प्रकरण कोर्टामध्ये प्रलंबित असल्यामुळे ओबीसींच्या संदर्भातील निर्णय आपल्याला घेता आला नाही. रिव्हयू पिटिशन संदर्भात सांगू इच्छितो की, दिनांक 9/4/2007 रोजी शपथ पत्र दाखल करण्यात आले आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, यामध्ये प्रश्न असा आहे की, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावतो आहे. एस.टी., ओबीसी किंवा व्हीजेएनटी असो, शासनातील काही झारीचे शुक्राचार्य अशी मेख मारुन ठेवतात की वर्षानुवर्ष प्रकरण प्रलंबित रहावे आणि संबंधितांना प्रमोशन, आरक्षण मिळू नये.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड ..........

कोर्टाच्या जज्जमेंटमध्ये स्पेसिफिक असे म्हटलेले आहे की, "we have no doubt that enough material is not placed before this court." लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये शासनाने असे म्हटलेले आहे की, आम्ही चांगला युक्तीवाद केलेला आहे. "this material has not been placed" याचा अर्थ शासनाची अनास्था आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, ज्या अधिका-याने ही मेख मारुन ठेवली आहे त्या अधिका-यावर शासन कडक कारवाई करणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, अशा पद्धतीने जर जाणीवपूर्वक अशा गोष्टी केल्या असतील तर चौकशी करुन संबंधितांवर कारवाई केली जाईल. व्ही.जे.एन.टी., एस.बी.सी., ओ.बी.सी. प्रवर्गाला सर्व स्तरावर आरक्षण असावे, यासाठी शासन सर्व स्तरावर प्रयत्न करीत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महत्वपूर्ण अशी ही केस आहे. लक्षवेधी सूचनेला दिलेल्या निवेदनावरुन असे लक्षात आलेले आहे की, घटना तज्ज्ञ वकील नेमण्यात आला नव्हता. माझा प्रश्न असा आहे की, शासन एक्सपर्ट घटना तज्ज्ञ वकिलाची नेमणूक करणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभपती महोदय, होय.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : तारापूर, ता.पालघर, जि.ठाणे येथील अणू ऊर्जा प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत.

**मु.शी.** : तारापूर, ता.पालघर, जि.ठाणे येथील अणू ऊर्जा प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"तारापूर, ता.पालघर, जि.ठाणे येथील अणू ऊर्जा प्रकल्पामुळे बाधित झालेल्या 1250 प्रकल्पग्रस्तांना दिनांक 26 जानेवारी, 2007 पर्यंत घरांचे वाटप न होणे, तारापूर अणू ऊर्जा प्रकल्प क्र.3 व 4 ची उभारणी करण्यासाठी पालघर तालुक्यातील मौजे अक्करपट्टी व पोफरण ही दोन गावे विस्तापित होऊन या गावातील 1250 कुटुंबांचे मौजे दहिसर येथील 98 हेक्टर जागेवर पुनर्वसन करण्यात येणे, नवीन गावठाणातील भूखंडावर 300 चौ.फू. क्षेत्रफळ असलेली पक्की घरे बांधण्यासाठी शासनाने मे.स्ट्युप कन्सल्टंट यांची नेमणूक करणे, दिनांक 2 ऑक्टोबर, 2006 पर्यंत 400 घरांचे आणि दिनांक 26 जानेवारी, 2007 पर्यंत उर्वरित 850 घरांचे वाटप करावे असे असतानाही बांधकाम साहित्याच्या किंमतीत अचानक झालेल्या वाढीचे कारण पुढे करुन कंत्राटदाराने या कालावधीत घरांचे बांधकामे पूर्ण न करणे, दिनांक 14 फेब्रुवारी, 2007 रोजी याबाबत मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र पुनर्वसन प्राधिकरणाची मंत्रालयात झ ाालेल्या बैठकीतही याबाबत ठोस निर्णय न झाल्यामुळे या प्रकल्पग्रस्तांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, अणु ऊर्जा प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना नवीन गावठाणातील पक्की घरे त्वरीत मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची भूमिका."

..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

..4.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तारापूर, ता.पालघर, जि.ठाणे येथील अणू ऊर्जा प्रकल्पामुळे अक्करपट्टी व पोफरण ही दोन गावे विस्थापित झालेली आहेत. अक्करपट्टी व पोफरण या दोन गावातील 1250 कुटुंबांचे पुनर्वसन झाले पाहिजे. या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने जवळपास 98 हेक्टर जमीन संपादन केलेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 11.2.2005 रोजी दिलेल्या निर्देशानुसार तारापूर अणू ऊर्जा प्रकल्पाच्या टप्पा 3 व 4 मधील प्रकल्पग्रस्तांना 1250 घरे बांधून देण्याचा कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतला आहे." पुढे लक्षवेधी सूचनेला दिलेल्या निवेदनातील तक्ता क्र.3 मध्ये असे म्हटलेले आहे की, "घर पूर्णत्वाचे दाखले मिळालेल्या परंतु ताबा न घेतलेल्या घरांची संख्या 426 असून, बांधकाम पुर्ण न झालेल्या घरांची संख्या 294 एवढी आहे." म्हणजे अद्याप जवळपास 700 ते 725 लोकांना घरे मिळालेली नाहीत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, 426 लोकांनी घरांचा ताबा न घेण्याची कारणे काय आहेत, आता पर्यंत 720 घरांचे वाटप झालेले नाही ते केव्हा होणार आहे आणि ज्या प्रकल्पग्रस्तांना घरे मिळावयास पाहिजे होती ती त्यांना का मिळाली नाहीत ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, तारापूर अणू ऊर्जा प्रकल्प हा भारत सरकारचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून जे प्रकल्पग्रस्त झालेले आहेत त्यांचे योग्य ते पुनर्वसन करण्याची जबाबदारी भारत सरकारची आहे. महाराष्ट्र शासन फक्त त्यावर नियंत्रण ठेवत आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या निदेशाप्रमाणे पुनर्वसनाचे काम सुरु आहे किंवा नाही हे बघण्याचे काम महाराष्ट्र शासन करीत आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे 1250 प्रकल्पग्रस्तांच्या घरांचे बांधकाम करीत असतांना मधल्या काळामध्ये सिमेंटचे, लोखंडाचे भाव वाढल्यामुळे आणि वाळूचा शॉर्टेज आल्यामुळे ठेकेदारांनी मुदत आणि किंमत वाढवून मिळावी, असे शासनाला आणि कंपनीला सांगितले होते. ठेकेदारांना किंमत वाढवून देण्यात आलेली आहे. विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे ताबा न घेतलेल्या घरांची संख्या 426 आहे.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुढे सुरु ......

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, 426 घरांचे बांधकाम पूर्ण झालेले असून सर्व संबंधितांना घरे ताब्यात घेण्याच्या सूचना शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या आहेत. उर्वरित 294 घराच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने कोर्टामध्ये रिट याचिका दाखल केलेली आहे. थोडा उशीर झालेला आहे, तरी उर्वरित घराचे काम पूर्ण करुन देण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या उर्वरित 294 घराच्या बाबतीत अशी अडचण आहे की, कॉन्ट्रक्टरचे दर वाढल्यामुळे तो बांधकाम करायला तयार नाही. त्यामुळे हे काम अडलेले आहे, याबाबतीत निर्णय घेतला पाहिजे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, बांधकाम साहित्याच्या किंमतीत असाधारण वाढ झाल्यामुळे 2 कोटी 3 लाख 32 हजार रुपये शासनाने कॉन्ट्रक्टरला मंजूर केलेले आहेत. कॉन्ट्रक्टर काम करायला तयार नाही ही बाब खरी नाही. वाढीव दर मंजूर केल्यामुळे काम करण्यात कोणतीही अडचण नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तेथील लोकांना पावसाळयापूर्वी ही घरे देण्यात येतील का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, शासनाच्या वतीने प्रयत्न सुरु आहेत. जून महिन्यापूर्वी घरे ताब्यात देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. याबाबत कोर्टामध्ये ॲफेडेव्हीट दाखल केलेले आहे असून मे अखेर पर्यत मुदतवाढ मिळाली आहे. पावसाळयापूर्वी ही घरे ताब्यात देण्याची कार्यवाही करण्याचे प्रयत्न करण्यात येतील.

-------------

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : इतर मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची होणारी उपेक्षा.

**मु.शी.** : इतर मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची होणारी उपेक्षा या संबंधी सर्वश्री.सुधाकर गणगणे, संजय दत्त, मुझफ्फर हुसेन, धोंडीराम राठोड, पांडुरंग फुंडकर, वसंतराव खोटरे, व्हि.यु. डायगव्हाणे, बी. टी. देशमुख, जयंत पाटील, जी.एल. अैनापूरे, कपिल पाटील, श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती उषाताई दराडे, श्री. जितेंद्र आव्हाड वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुधाकर गणगणे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामान्य प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"राज्यात इतर मागासवर्गीय प्रवर्गातील शासकीय कर्मचारी व अधिकारी यांची शासकीय सेवेत एकोणीस टक्के संख्या असून त्यांना इतर मागासवर्गीय प्रवर्गाच्या आधारे शासकीय सेवेत घेण्यात येणे, मात्र त्यांना उक्त प्रवर्गाच्या आधारे शासकीय नोकरीत पदोन्नती देण्यात न येणे, शासनाने दिनांक २५ मे, २००४ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार व शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार या बाबींवर उपसमिती नियुक्त होवून सदर उपसमितीने एकोणीस टक्के इतर मागासवर्गीय शासकीय कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत पदोन्नती देण्याची शिफारस करुन देखील सदर शिफारशीचा शासनाने अद्यापही विचार न करणे, याबाबत शासनाने इतर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची केलेली उपेक्षा व त्यामुळे या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांत निर्माण झालेला प्रचंड असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व शासनाची भूमिका."

श्री.राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, राज्यातील 52 टक्के ओ.बी.सी. समाजाच्या आरक्षणासंदर्भात मी 7 वेळा लक्षवेधी सूचनेवर चर्चा केलेली आहे. मागच्या वेळी माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिले होते. त्यानुसार शासनाने परिपत्रक काढून याबाबत निर्णय घेण्यासाठी उपसमिती नियुक्त केली होती. या समितीचा मी सदस्य होतो. या समितीने 19 टक्के ओ.बी.सी. कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत पदोन्नती देण्याची शिफारस केलेली होती, हा निर्णय होऊन दीड वर्ष होऊन गेले आहे, तरीही या शिफारशींचा शासनाने विचार केलेला नाही. मंत्रिमंडळाने अद्यापपर्यंत त्याचा निर्णय घेतलेला नाही. ही गोष्ट स्पष्ट आहे की, अनुसूचित जाती जमाती, इतर मागासवर्गीय, भटक्या विमुक्त जाती जमाती, विशेष मागास प्रवर्ग यांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. त्यासंबंधी कोर्टात याचिका दाखल झालेली आहे. हा प्रश्न बऱ्याच वर्षापासून प्रलंबीत आहे. शासन यावर किती दिवसात निर्णय घेणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, उपसमितीच्या बैठकीमध्ये इतर मागासवर्गीय प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याची शिफारस करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, हया शिफारसी शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत. सदर शिफारशीच्या अनुसरुन मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव विधी व न्याय विभागामार्फत सादर केला होता. 2004 च्या अधिनियमातील तरतूदींना व मागासवर्गीय प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांना सर्व टप्पयावरील पदोन्नतीस आरक्षण लागू करण्याबाबतच्या दिनांक 25.5.2004 च्या शासन निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिलेले आहेत. ही याचिका न्यायालयात प्रलंबीत आहे. सदर याचिकेमध्ये संविधानातील अनुच्छेद 16(4) नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी पदोन्नतीमध्ये आरक्षणाची तरतूद केलेली आहे. संविधानाच्या अनुच्छेद 16 (4 ए) मध्ये सुधारणा केलेली असून पदोन्नतीमध्ये आरक्षण ठरविण्यात आलेले आहे. परंतु इतर मागासवर्गीयांच्या पदोन्नतीसंदर्भात केंद्र सरकारच्या कायद्यात उल्लेख नाही. यामुळे महाराष्ट्र शासनाला असलेल्या अधिकाराचा वापर करुन आरक्षण ठेवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. परंतु सध्या मुळ याचिकेवर अद्यापपर्यंत निर्णय झालेला नाही, सदर प्रकरण अद्यापही न्यायप्रविष्ट आहे. आरक्षण देण्याच्या बाबतीत शासनाची भूमिका स्पष्ट आहे. सन्माननीय

.....4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे .....

सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांनी यापूर्वी हा प्रश्न उपस्थित केल्यानंतर मी 2-3 वेळेला उत्तर दिलेले आहे. त्यांच्या विनंतीवरुन समिती गठीत करण्यात आली आहे. त्यावेळीही शासनाची भूमिका मी मांडली होती. याबाबत मी सांगू इच्छितो की, न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर इतर मागासवर्गीयांना पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर आरक्षण देण्यात येईल.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गेली दीड वर्षे ओबीसींचा हा विषय प्रत्येक अधिवेशनामध्ये येतो आहे आणि प्रत्येक वेळेस शासन एक महिना, दीड महिन्यात याबाबत निर्णय करू असे उत्तर देऊन हा विषय टाळला जातो आहे. खरे म्हणजे या पूर्वीची आणि ही लक्षवेधी सूचना वेगळी वेगळी आहे. या निवेदनामध्ये आपण सांगितले आहे की, उच्च न्यायालयाने 9.3.2007 रोजी "..खुला प्रवर्ग व मागासप्रवर्गांपैकी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या पदोन्नत्या सुरू ठेवण्यास सहमती दिली व तसेच मूळ याचिका क्रमांक 8452/2004 अंतिम निकाली निघेपर्यंत विमुक्त जाती भटक्या जमाती व विमाप्र या प्रवर्गातून होणाऱ्या पदोन्नतीस स्थगिती देऊनर त्यांची पदे रिक्त ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच सदर मूळ याचिकेवर अद्याप पर्यंत अंतिम निर्णय झ ालेला नाही. ..." सभापती महोदय, यामध्ये कोठेच ओबीसींचा उल्लेख नाही. तर मग उच्च न्यायालयाचे प्रकरण कशासाठी समोर आणले आहे ? यामध्ये ओबीसीचा उल्लेख नसताना ओबीसीची पदोन्नती वगैरे रोखून ठेवण्याचे कारण काय आहे ? गेली दीड वर्षे 51 टक्के ओबीसींचा प्रश्न शासनाने जो प्रलंबित ठेवला आहे तो ठेवण्याचे कारण काय आहे ? तेव्हा आता तरी याबाबत गांभीर्याने विचार करून येत्या 15 दिवसात याबाबत निर्णय आपण निश्चितपणे घेणार आहात का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी याबाबतची शासनाची भूमिका स्पष्टपणे मांडत असताना मी सांगतले आहे की, ओबीसींना सर्वच टप्प्यांवर आरक्षण असावे ही शासनाची भूमिका राहिलेली आहे. या ठिकाणी .... ( अनेक सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात ... अडथळा .... ) कोर्टामध्ये ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपल्या निवेदनामध्ये देखील सांगितले आहे की, कोर्टाच्या आदेशामध्ये ओबीसींचा कोठेही उल्लेख नाही तर मग आपण त्यांना का रोखून ठेवले आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मागील वेळी ॲडव्होकेट जनरल श्री.देशमुख तसेच अतिरिक्त मुख्य सचिव, सा.प्र.विभाग तसेच सन्माननीय सदस्य श्री.गणगणे इत्यादी सगळे आम्ही या विषयावर चर्चेला बसलो होतो. सन्माननीय सदस्य श्री.गणगणे यांना हा सगळा प्रश्न माहीत आहे. तेव्हा मी एवढेच सांगेन की, विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या बाबतीत निर्णय संपल्यानतर ....

...... 3झेड 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अडथळा .... शासनाची ओबीसींच्या बाबतीत भूमिका अगदी स्पष्ट आहे आणि शासन निश्चितपणे त्यांच्याबाबत निर्णय घेईल. ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विमुक्त जाती व भटक्या जमातीशी याचा काहीही संबंध नाही. केवळ हा ओबीसींचाच प्रश्न आहे. आणि कोर्टाने देखील आपल्या निर्णयामध्ये ओबीसींचा उल्लेख केलेला नाही. तेव्हा ओबीसीचा आणि त्या निर्णयाचा काहीही संबंध नाही. ....

( काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा .... )

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, ओबीसींबाबत निर्णय घेण्यात यावा ....

( अडथळा )

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मला वाटते या प्रकरणावर मागेसुद्धा मी सांगितले होते, माननीय विरोधी पक्षनेत्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी माझे बोलणे ऐकून घ्यावे. यामध्ये घटनेत 16-4-अ हा विषय आहे, आर्टिकल 4 वाटल्यास मी आपल्याला वाचून दाखवू शकतो. पण आता मी एवढेच सांगेन की, या ठिकाणी अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठीच प्रमोशनमध्ये आरक्षण असावे अशी तरतूद आहे. तेव्हा घटनेमध्ये जरी काहीही असले आणि ओबीसीचा विषय नसला तरी केंद्राचा विषय केंद्रात राहील, पण राज्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक सर्व टप्प्यांवर ओबीसींसाठी आरक्षण असावे अशीच भूमिका आपण नेहमी घेतलेली आहे. आर्टिकलमध्ये तशी तरतूद नसली तरी एससी, एसटी तसेच एसबीसी असेल वा ओबीसी असेल त्यांना भरतीमध्ये तसेच प्रमोशनमध्ये देखील आरक्षण असावे असे आमचे मत आहे आणि त्या दृष्टीकोनातून मला आपल्या सर्वांच्या माहितीसाठी एवढेच सांगावेसे वाटते की, या ठिकाणी जो काही निर्णय हायकोर्टाने 9 मार्च 2007 ला दिलेला आहे त्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रमाणेच ओबीसींना 87 टक्के प्रमोशन्स चालू ठेवावे आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि एसबीसी यांच्या 2 टक्केला स्थगिती दिलेली आहे. परंतु त्यांच्या जागा भरू नयेत एवढेच सांगितले आहे. याचा अर्थ हायकोर्टाचे मत निगेटीव नाही.

( यानंतर श्री. सरफरे .... 4ए 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे..

शासन पूर्णपणे प्रयत्न करील. आणि यामध्ये एस.बी.सी. आणि व्ही.जे.एन.टी. चे आरक्षण अबाधित राहील. व्ही.जे.एन.टी. ला आरक्षण दिले होते त्यावर स्थगिती आली असल्यामुळे नव्याने ओ.बी.सी. मध्ये आरक्षण ठेवले तर न्यायालयाचा अवमान होईल. याकरिता याठिकाणी ॲडव्होकेट जनरल यांना बोलाविण्यात आले हेते व त्यांचा सल्ला घेण्यात आला होता. सर्वांचा सल्ला घेऊन याबाबत चर्चा करण्यात आली. म्हणून माझी स्पष्ट भूमिका आहे की, ओ.बी.सी. ना सर्व टप्प्यांवर आरक्षण देण्याची राज्य शासनाची निश्चितपणे कायम भूमिका राहील. त्यासाठी जे लागेल ते करण्यासाठी शासन नेहमी तयार आहे.

(अडथळा)

(दोन्ही बाजूकडील मा. सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये भटक्या विमुक्त जमातीचा उल्लेख आहे, परंतु ओ.बी.सी. चा उल्लेख नाही.

(अडथळा)

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाच्या पृष्ठ क्र. 2 वर म्हटले आहे की, "आरक्षणाची तरतूद एखाद्या प्रवर्गासाठी करताना त्या प्रवर्गाचा आर्थिक व सामाजिक मागासलेपणा तसेच प्रवर्गाचे शासन सेवेतील प्रमाण अपुरे आहे, हे सिध्द करण्याची जबाबदारी शासनाची राहील".परंतु शासनाने कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट करतांना काहीही म्हटलेले नाही. . शासन आर्थिक व सामाजिक मागासलेपणासंबंधी माहिती देत नाही, सेवेतील कर्मचाऱ्यांच्या संख्येबाबत माहिती सादर करीत नाही. असे असतांना निवेदनामध्ये दिलेले उत्तर खरे आहे की कोर्टाने दिलेला निर्णय खरा आहे?

(अडथळा)

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, विधी व न्याय विभागाने जो सल्ला दिला आहे तो आपणास वाचून दाखवितो.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये ओ.बी.सी. संबंधी कोणताही उल्लेख नाही...

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी दिलेल्या उत्तरामध्ये कोणतीही चूक झालेली नाही. परंतु माननीय सदस्यांना हवे तसे उत्तर मंत्रिमहोदय देऊ शकत नाहीत. मी आपणास विधी व न्याय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MHM/

श्री. राजेश टोपे...

विभागाचे चार ओळीचे ओपिनियन वाचून दाखवितो. सभापती महोदय, घटनेमध्ये जे सांगितले आहे त्या घटनेच्या वर कुणीही नाही, आपले सभागृह सुध्दा नाही. घटनेतील तरतुदीप्रमाणे केंद्र सरकारमध्ये ओ.बी.सी. करिता रिक्रुटमेंट आणि प्रमोशनमध्ये कुठेही आरक्षण नाही तरीसुध्दा ते आरक्षण देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. आणि म्हणून मी आपणास हे ओपिनियन वाचून दाखवितो. "Reservation in the matter of promotion can be provided only in respect of Scheduled Castes and Scheduled Tribes in view of clause 4A of Article 16 of the Constitution. There appears to be no enabling provision under the Constitution enabling the State Government to provide reservation in the matter of promotion in favour of backward classes other than Scheduled Castes and Scheduled Tribes.

However, as the provisions of the said act and the Government Resolution dated 25-5-2004 has already been challenged in the High Court it would be desirable to await the final decision in the matter. If any decision in the matter of providing reservation in favour of OBC is to be taken, it could be taken after the decision of the High Court." हायकोर्टाचा निर्णय झाल्यानंतर याठिकाणी घेण्यात यावे. म्हणून मला स्पष्ट सांगावयाचे आहे की, सामान्य प्रशासन विभागाचा मंत्री म्हणून मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे. तरी सुध्दा कुणाला जाणीवपूर्वक राजकारण करावयाचे असेल तर मला माहीत नाही...

(अडथळा)

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**उपसभापती** : आता यानंतर पुढची लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सरकार ओ.बी.सीं.च्याबाबतीत निर्णय करत नाही, ओबीसींवर अन्याय करत आहे. याबाबत सरकारचा निषेध करून आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बर्हिर्गमन करतात.)

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

**पृ. शी.** : बृहन्मुंबई मुंबई महानगरपालिकेमध्ये माध्यमिक शाळांमध्ये नाममात्र मानधनावर शिक्षकांच्या झालेल्या नियुक्त्या.

**मु. शी.** : बृहन्मुंबई मुंबई महानगरपालिकेमध्ये माध्यमिक शाळांमध्ये नाममात्र मानधनावर शिक्षकांच्या झालेल्या नियुक्त्या, यासंबंधी सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील, संजय दत्त, जितेंद्र आव्हाड ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.कपिल पाटील ( मुंबई शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बृहन्मुंबई महानगरपालिका संचालित माध्यमिक शाळांमध्ये रिक्त होणाऱ्या पदांवर गेल्या चार-पाच वर्षात सन फार्मा या खाजगी संस्थेमार्फत नाममात्र मानधनावर 80 शिक्षकांच्या नियुक्त्या होणे, या शिक्षकांना अद्याप सेवेत सामावून घेण्यात न येणे, सलग दोन ते तीन वर्षे सेवा करुनही त्यांना कोणतीही सेवा शाश्वती न मिळणे, शिक्षण सेवक म्हणूनही त्यांना मान्यता न मिळणे, केवळ पंधराशे रुपये प्रतिमहा वेतनावर सदर शिक्षक वर्षानुवर्षे राबत असणे, सन फार्मा आणि महापालिकेतील अधिकारी यांनी संगनमताने या शिक्षकांची घोर फसवणूक व पिळवणूक करणे, एकाच शाळेत शिकवित असलेल्या शिक्षकांना विषम वेतन मिळत असल्याने बेकायदेशीर व्यवस्था निर्माण होणे, त्यामुळे या शिक्षकांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संताप, याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना, केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे ( नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, उत्तरामध्ये वस्तुस्थिती मान्य केलेली आहे. 80 शिक्षकांची फसवणूक झालेली आहे, ही वस्तुस्थिती शासनाने एका बाजूला मान्य केलेली आहे. त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला उत्तर देताना एका स्वयंसेवी संस्थेमार्फत हे शिक्षक नेमलेले आहेत, असे सांगून प्रशासन हात झटकायला मोकळे झालेले आहे. शिक्षकांची पदे रिकामी आहेत म्हणून अतिशय कमी वेतनावर शिक्षक सेवकांपेक्षाही कमी वेतनावर त्यांना नेमलेले आहे. पालिका प्रशासनाने नियम मोडीत काढले आणि 80 शिक्षकांना स्वयंसेवी संस्थेमार्फत नेमले होते त्यांना आता काढून टाकलेले आहे. या 80 शिक्षकांना आपण संरक्षण देणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, त्या ठिकाणचे सगळे शिक्षक हे हिंदी, उर्दू या विषयाचे आहेत. जवळजवळ शिक्षकांच्या 155 जागा रिक्त होत्या. हिंदी आणि ऊर्दूचे शिक्षक मिळत नव्हते. हिंदी माध्यमाच्या आणि उर्दू माध्यमाच्या बाबतीत महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने अशी अट टाकली होती की, हिंदी माध्यम आणि उर्दू माध्यम असले तरी 10 वीला मराठीचा पेपर 100 मार्काचा असला पाहिजे, अशी अट होती. दुसरी अट होती की, एमएससीआयटी परीक्षा पास असले पाहिजे. या दोन अटीमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये तेवढया प्रमाणत शिक्षक मिळत नव्हते. जागा रिक्त होत्या, म्हणून महानगरपालिकेने स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून काही शिक्षकांची सुविधा उपलब्ध करून त्या ठिकाणी शिक्षण देण्याचे, शिकविण्याचे काम केलेले आहे. त्या 80 शिक्षकांना थेट सेवेमध्ये घ्यावे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. परंतु रिक्रुटमेंट रूलमध्ये तसेच शिक्षक सेवक रिक्रुटमेंट रूलमध्ये शिक्षकांना परीक्षा पास होणे, ओरल परीक्षा पास होणे अभिप्रेत आहे. महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने या दोन्ही अटी काढून टाकलेल्या आहेत. 10 वीला 100 मार्कस कंपल्सरी आहेत ही अट काढून टाकलेली आहे. इन सर्व्हीस 100 मार्गाचा पेपर पास करावा अशी नवीन अट घातलेली आहे. त्यामुळे शिक्षक उपलब्ध होतील. त्यानुसार वैध पध्दतीने शिक्षकांची भरती होईल त्यामध्ये या शिक्षकांना भरती करून घेण्याचे काम केले जाईल.

श्री.कपिल पाटील : शासनाने मान्य केले की, त्यावेळेस शिक्षक मिळत नव्हते म्हणून स्वयंसेवी संस्थेमार्फत शिक्षकांची नेमणूक केली. याचाच अर्थ शिक्षक मिळात होते. याचाच अर्थ असा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.कपिल पाटील (पुढे सुरू....

की, आपल्याला पदे भरायची नव्हती, पैसे खर्च करायचे नव्हते. काही स्वयंसेवी संथांना हाताशी धरून चार वर्षे प्रशासनाने त्या शिक्षकांना राबवून घेतले. या शिक्षकांनी सगळे विषय शिकविलेले आहेत, त्याबाबतची यादी मी सादर करतो. त्यांना नोकरीमध्ये सामावून घेणार नसाल तर ती त्यांची फसवणूक आहे. असा प्रकार सगळ्या महाराष्ट्रभर चालू आहे...

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

हा प्रकार ताबडतोबीने बंद झाला पाहिजे. यामध्ये शिक्षकांची फसवणूक करण्यात येत आहे. एका बाजूला शिक्षक भरावयाचे नाहीत आणि दुसरीकडे 1500 रुपये देऊन परस्पर वासलात लावण्याची चूक प्रशासनाने केलेली आहे. यादृष्टीकोनातून पालिका प्रशासनाला शासन ताकीद देणार काय ? त्या सगळ्या शिक्षकांना ते जर पात्रतेचे निकष पूर्ण करीत असतील तर सेवेत नियमित करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मधल्या काळामध्ये यासंदर्भात सुप्रीम कोर्टाचा सुध्दा निर्णय झालेला आहे की, कोणत्याही परिस्थितीमध्ये भरतीची जी विहित पध्दत आहे मग नोकर भरती असेल किंवा शिक्षक भरती असेल, ती भरती विहित पध्दतीने पार पाडली पाहिजे. त्या ठिकाणी हे शिक्षक सर्व्हिस देत होते परंतु ते एन.जी.ओ.च्या माध्यमातून सर्व्हिस देत होते. विहित पध्दतीच्या माध्यमातून त्यांच्याबाबतीत सहानुभूती दाखविली जाईल तसेच त्यांना प्राधान्य सुध्दा दिले जाईल अशा पध्दतीच्या सूचना महानगरपालिकेच्या प्रश्नासनाला निश्चितपणे देऊ आणि त्यांचा सहानूभूतीपूर्वक विचार करु.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अर्जुनी-मोरगाव (जि. गोंदिया) तालुक्यातील परिसरात गारांसह झालेल्या वादळी पावसाने घरांची तसेच पिकांची झालेली हानी

**मु. शी.** : अर्जुनी-मोरगाव (जि. गोंदिया) तालुक्यातील परिसरात गारांसह झालेल्या वादळी पावसाने घरांची तसेच पिकांची झालेली हानी यासंबंधी सर्वश्री राजेंद्र जैन, गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड, वसंत पवार, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

----

**लक्षवेधी सूचना क्रमांक 8 बाबत**

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अन्न व नागरी पुरवठा विभागाशी संबंधित आहे. यामध्ये माझ्या विशेष सहाय्य विभागाच्या बाबतीत फक्त छोटासा उल्लेख आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईचा कचरा ठाण्याच्या हद्दीत आणून टाकला जात असल्याने निर्माण होणाऱ्या दुर्गंधीने व रोगराईने ठाण्यातील रहिवाशी हैराण होणे

**मु. शी.** : मुंबईचा कचरा ठाण्याच्या हद्दीत आणून टाकला जात असल्याने निर्माण होणाऱ्या दुर्गंधीने व रोगराईने ठाण्यातील रहिवाशी हैराण होणे यासंबंधी सर्वश्री धनाजी साठे, संजय दत्त, सय्यद जामा, सुरेशदादा देशमुख, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ. शी.** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षकांना मिळणारे अपुरे वेतन

**मु. शी.** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षकांना मिळणारे अपुरे वेतन याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□ीय सदस्य श्री. रामनाथ मोते यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

" कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षकांना अपुरे वेतन, वेतननिश्चिती न करणे, वरिष्ठ व निवडश्रेणी न देणे इत्यादी संबंधी सभागृहात विशेष उल्लेख मांडू इच्छितो"

सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने माध्यमिक शाळा सुरु आहेत. या महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रश्न मी या विशेष उल्लेखाव्दारे मांडत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासकीय नियमाप्रमाणे वेतन व भत्ते अनुज्ञेय आहेत. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना शासकीय नियमाप्रमाणे वेतन व अन्य सुविधा, भत्ते मिळत नव्हते. वारंवार विनंती करुनही त्यांच्या मागण्यांची पूर्तता न झाल्यामुळे या सगळ्या शिक्षकांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मुंबई उच्च न्यायालयाने या याचिकेच्या संदर्भात जो निर्णय दिला त्या निर्णयानुसार सन 2001 पासून त्यांना पाचवा वेतन आयोग व नवीन वेतनश्रेणी लागू झाली. परंतु त्यांची मागील सेवा गृहीत न धरता, वेतननिश्चिती न करता, त्यांना मूळ वेतनश्रेणी लागू केल्यामुळे त्या शिक्षकांचे फार मोठ्या प्रमाणात

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

नुकसान झालेले आहे. त्याचप्रमाणे शासकीय कर्मचारी तसेच अन्य संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा 50 टक्के महागाई भत्ता त्यांच्या मूळ वेतनामध्ये समाविष्ट करण्यात आला परंतु कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांचा 50 टक्के महागाई भत्ता त्यांच्या मूळ वेतनामध्ये मर्ज केलेला नाही. यासंदर्भात तातडीने कार्यवाही व्हावी म्हणून मी हा विशेष उल्लेख या ठिकाणी करीत आहे.

---

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 16:50

**पृ.शी.** : महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळातील मागासवर्गीय कर्मचा-यांचा अनुशेष भरणे

**मु.शी.** : महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळातील मागासवर्गीय कर्मचा-यांचा अनुशेष भरणे याबाबत श्री. विनोद तावडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विनोद तावडे ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळातील मागासवर्गीय कर्मचा-यांचा अनुशेष, आरक्षण, रोस्टर व सेवा ज्येष्ठता यादी नुसार नेमणुका न करता 11 क्षेत्र अधिका-यांना शासकीय निकष न लावता उपप्रादेशिक अधिकारी या पदाचा तात्पुरता कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. यामुळे या मंडळातील मागासवर्गीय कर्मचा-यांवर सदर मंडळातील उच्च अधिका-यांकडून अन्याय होत आहे. सदर मंडळातील मागासवर्गीय कर्मचा-यांच्या नियमित पदोन्नत्या 1998 पासून देण्यात आलेल्या नाहीत. शासकीय नियमाचे उल्लंघन करुन खुल्या वर्गातील कर्मचा-यांना पदोननती दिल्याचे निदर्शास आलेले आहे. या मंडळातील मागासवर्गीय कर्मचा-यांवर होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात सेंटर फॉर सोशो-इकॉनॉमी डेव्हलपमेंट फॉर एस.सी./एस.टी. या संस्थेचे अध्यक्ष मिलिंद कांबळे यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिलेला आहे. या मागासवर्गीय कर्मचा-यांवर होत असलेल्या अन्यायामुळे प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम झाल्यामुळे सामान्य जनतेला प्रदुषणाच्या समस्येला सामोरे जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हा मागासवर्गीय कर्मचा-यांमधील असंतोष लक्षात घेता या संदर्भात शासनाने त्वरित चौकशी करुन योग्यती कार्यवाही करण्याची मागणी या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे."

---

...2..

**पृ.शी.** : संगमेश्वर येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाचे अपूर्ण काम ताबडतोबीने पूर्ण करणे

**मु.शी.** : संगमेश्वर येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाचे अपूर्ण काम ताबडतोबीने पूर्ण करणे याबाबत श्री. संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"दिनांक 11 मार्च, 1989 रोजी भूमिपूजन करण्यात आलेल्या संगमेश्वर येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाला 18 वर्षे पूर्ण होऊनही त्याचे काम अद्यापपर्यन्त अपूर्ण आहे. सदर स्मारकाच्या खिडक्यांच्या काचा फोडून व दरवाजांच्या कड्या तोडून आत अनैतिक प्रकार सुरु असणे, निधीअभावी स्मारकाचे काम अपर्णू असणे, अर्धवट स्थितीतील कामाचे बरुज ढासळणे, खिडक्यांच्या चौकशी सडून जाणे, अपूर्ण कामाला वेली जाळयांनी वेढणे अशी दुरवस्था तेथे निर्माण झालेली आहे. संभाजीप्रेमीं तेथील परिसराची साफसफाई करतात. सततच्या पाठपुराव्यानंतर स्मारकासाठी निधी मंजूर देखील झाला . परंतु ठेकेदारांनी कामाचा दर्जा न राखल्यामुळे आजूबाजूचा परिसर अस्वच्छ राहिलेला आहे. मध्यंतरीच्या कालावधीत दारुडे, बेवडे स्मारकाचा उपयोग बार सारखा करीत आहेत. सदर स्मारक हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने व परिसराचा विकास करण्याच्या दृष्टीने पुढे कोणतेही प्रयत्न झाले नसल्याने सदर स्मारक दुर्लक्षित राहिलेले आहे. सदर स्मारकाचा उपयोग प्रेमी युगुलांनी लॉजसारख करुन काचा फोडून खिडकीतून प्रवेश करुन दरवाजांच्या कड्या तोडल्या आहेत. सध्या स्मारकामध्ये काचा, सिगारेटची थोटके, गुटख्याची पाकिटे, अन्य कामाची पाकिटे, चॉकलेटस्चे कागद इत्यादी कचरा साचला असून सदर स्मारकाची स्वच्छता करुन तेथील अनैतिक प्रकार ताबडतोब थांबले नाहीत तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संभाजीप्रेमींनी दिला आहे. शासनाने सदर स्मारकाचे पावित्र्य राखण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी अशी सूचना मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास करीत आहे.

--

...3..



MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 16:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबई-आग्रा महामार्गावरील गोंदे ते पिंपळगाव रस्त्याचे काम अद्याप सुरु न होणे

**मु.शी.** : मुंबई-आग्रा महामार्गावरील गोंदे ते पिंपळगाव रस्त्याचे काम अद्याप सुरु न होणे याबाबत श्री. प्रताप सोनवणे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**सभापती** : माननीय सदस्य श्री.प्रताप सोनवणे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रताप सोनवणे (नाशिक विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

मुंबई-नाशिक-धुळे या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम तीन टप्प्यात सुरु आहे. त्यातील वडपे ते गोंदे या टप्प्याचे काम सुरु आहे. तसेच पिंपळगाव बसवन्त या सर्वात व्यस्त भागातील रस्त्याचे काम अद्यापपर्यन्त सुरु झालेले नाही. यामुळे येथे बॉटलनेक होऊन वाहतूककोडी व दुर्घटनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्ता निर्माण झाली आहे. सदरचा प्रकार हा नियोजनाच्या अभावी घडत आहे आणि शासन यासंदर्भात निर्णय का करु शकत नाही हा जनसामान्यांना पडलेला प्रश्न आहे. यासंबंधीची माहिती मिळते ती अशी की, या मधल्या टप्प्याचे काम चौपदरी ऐवजी सहा पदरी करण्याचा बदल जुन्या प्रस्तावात करण्यात आलेला आहे. या प्रस्तावित बदलामुळे या कामाचे एस्टिमेट 660 कोटीपर्यन्त वाढले असून यामध्ये 200 कोटींची आर्थिक व्हायबिलिटी गॅप तयार होणार असून यामुळे काम करणा-या एजन्सीला नुकसान होईल असा त्यांचा दावा आहे.. सदर 200 कोटीची व्हायबिलिटी गॅप शासनाने भरुन दिल्या शिवाय सदर रस्त्याचे काम होऊ शकत नाही. अशा परिस्थितीत शासनाने गांभीर्याने या विषयात लक्ष घालावे आणि 200 कोटीची व्यवस्था राज्य शासन, नाशिक महानगरपालिका तसेच केंद्र शासनाची काही मदत मिळणार असेल तर ती मिळवून तातडीने या रस्त्याचे काम पूर्ण करावे आणि शासनाला हे शक्य नसेल तर जुन्या प्रस्तावाप्रमाणे या भागाचेही चौपदरीकरण त्वरित करुन मिळाले तरी चालेल अशी जनसामान्यांची भावना आहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यांप्रकरणी आर्थिक व्हायबिलिटी लक्षात घेऊन शासनाने निर्णय घेणे आवश्यक आहे. सहापदरी काम होणार असेल तर चांगलेच आहे. परंतु सहापदरी प्रस्ताव आर्थिक व्हायबिलिटीच्या अभावी वर्षानुवर्षे रखडत राहाणार असेल तर चौपदरी रस्ता करुन या रस्त्याचे काम मार्गी लावावे अशी त्या परिसरातील नागरिकांची मागणी आहे हे मी या विशेष उल्लेखाद्वारे आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

--

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मु.जामसंडे तरवाडी, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील श्री.मोहन धुरी या इसमाने केलेल्या आत्महत्येची चौकशी होणेबाबत.

मु.शी. : मु.जामसंडे तरवाडी, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील श्री.मोहन धुरी या इसमाने केलेल्या आत्महत्येची चौकशी होणेबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

श्री.मोहन धुरी, वय वर्षे 56 हा श्री.भानुदास दुधवडकर, मु.जामसंडे तरवाडी, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग यांच्या दारुच्या धंद्यावर कामाला होता. श्री.भानुदास दुधवडकर हे मोहन धुरी यांना जिवघेणी मारहाण करीत असत. अशाच मारहाणीचा प्रकार दि.13.10.2006 रोजी घडला. मार वाचविण्यासाठी श्री.धुरी हे वाडातर पुलापासून धावत असताना श्री.दुधवडकर यांनी मारण्यासाठी पाठलाग केला असता पुलावरुन खाली 50 फूट खोल पाण्यात पडला. या घटनेला श्री.दुधवडकर हे जबाबदार असून त्यांनी देवगड पोलिसात तक्रार तीन दिवसांनी केली. धुरी यांना वाचविण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला नाही. श्री.धुरी यांना आत्महत्या करण्यास श्री.दुधवडकर यांनी भाग पाडून त्यांच्या मृतदेहाची विल्हेवाट लावली आहे अशी तक्रार त्यांचे चुलत भाऊ श्री.भास्कर धुरी यांनी पोलिसात केली आहे. पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी श्री.मोहन धुरी हा जिवंत असल्याचे मयताच्या भावाला दि.5.1.2007 रोजी लेखी कळविले आहे. असे असल्यास श्री.मोहन धुरी ह्यांना गेल्या वर्षभरात तपास करुन त्यांच्या नातेवाईकांकडे का सोपविण्यात आले नाही? श्री.मोहन धुरी यांच्या मृत्यूची सखोल तपासणी गुन्हा अन्वेषण शाखेकडून करण्यात यावी.

सभापती महोदय, असाच प्रकार मालवण पोटनिवडणुकीच्या दरम्यान झाला होता. श्री.रमेश गोवेकर हे गायब झाल्यानंतर पोलिसांनी अशाच प्रकारचे ॲफिडेव्हीट केले. श्री.रमेश गोवेकर याला काही काळानंतर पाहिल्याबद्दलचे ॲफिडेव्हीट सिंधुदुर्ग जिल्हयातील पोलिसांनी सादर केले. सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस विभागाशी संबंधित ही दुसरी घटना घडलेली आहे. या घटनेमध्ये शासनाने त्वरित लक्ष घालावे अशी मी विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

-----------

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कल्याण येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करणे.
मु.शी. : कल्याण येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करणेबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

गेल्या अनेक वर्षापासून कल्याण येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्यात यावे अशी जनतेकडून मागणी होत आहे. या मागणीच्या अनुषंगाने वेळोवेळी विद्यार्थ्यांनी आंदोलने केली आहेत. मात्र शासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याने लोकक्षोभ वाढत गेला आहे. कल्याण येथील केंद्राच्या स्थापनेमुळे कल्याण शहर तसेच ग्रामीण व अंबरनाथ, मुरबाड, शहापूर, टिटवाळा, डोंबिवली, भिवंडी, कर्जत, कसारा येथील विद्यार्थ्यांची चांगली सोय होऊ शकेल असे असताना कल्याण येथे उपकेंद्र स्थापन करण्याबाबत प्रत्यक्षात कोणती कार्यवाही शासनाने केलेली नाही. याबाबत कासवाच्या चालीने होत असलेल्या कार्यवाहीबाबत जनतेत असंतोष पसरलेला आहे. या अत्यंत संवेदनशील विषयावर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी विशेष उल्लेख सादर करीत आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SGB/ MHM/ KGS/ 16:55

**पृ.शी./मु.शी. :लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.**

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मराठवाडयातील जायकवाडी हे मोठे धरण सलग तिसऱ्यांदा पावसामुळे भरलेले असतानाही उजव्या व डाव्या कालव्याची दुरुस्ती न केल्यामुळे लाभक्षेत्रातील 75 टक्के जमिनीस पाणी उपलब्ध न होणे" या विषयावरील श्री.श्रीकांत जोशी व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिनांक 17 मार्च, 2007 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार उपप्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

अ धि क  मा हि ती

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी)

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक सायंकाळी 5.30 वाजता पुन: भरेल.

**(4.58 ते 5.30 पर्यंत मध्यंतर)**

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: तत्कालीन माननीय गृहराज्यमंत्री यांनी जाणीवपूर्वक असत्य व सभागृहाची दिशाभूल करणारी दिलेली माहिती.

**मु.शी.**: तत्कालीन माननीय गृहराज्यमंत्री यांनी जाणीवपूर्वक असत्य व सभागृहाची दिशाभूल करणारी दिलेली माहिती याबाबतचा विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेणे व अहवालास अनुलक्षून प्रस्ताव.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ( समिती प्रमुख ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने ,"तत्कालीन माननीय गृहराज्यमंत्री यांनी जाणीवपूर्वक असत्य व सभागृहाची दिशाभूल करणारी दिलेली माहिती." या विषयावरील विशेष हक्काच्या प्रश्नाबाबत विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेण्यात यावा असा प्रस्ताव मांडतो.

( **प्रेस** : कृपया सोबतचे भाषण छापावे.)

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी विशेष हक्क समितीचा सदस्य आहे, परंतु मला या बैठकीचे एकही पत्र मिळालेले नाही. याचे कारण काय असावे याची मला माहिती नाही. यापूर्वी सुध्दा मी ही बाब रेकॉर्डवर आणलेली आहे आणि आता पुन्हा उद्‌धृत करीत आहे.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, याठिकाणी समितीच्या कामकाजाबद्दल प्रश्न उपस्थित झालेला आहे. ही गोष्ट खरी आहे की, ही समिती सभागृहाची फार महत्वाची समिती आहे. आम्ही वारंवार आग्रह धरतो की, सभागृहातील कामकाज नियमाप्रमाणे चालले पाहिजे. एवढया मोठया सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी दिलेला हा हक्कभंगाचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावावर या समितीमध्ये विचार विनियम करण्यासाठी सन्माननीय सदस्य आहेत, त्यांना समितीचे निमंत्रण दिले जाणे आवश्यक आहे. परंतु याठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे समितीचे सदस्य असतानाही त्यांना बैठकीस बोलावले नाही. त्यामुळे ही सॅन्कटीटी आहे का ? त्यामुळे जोपर्यंत आपण या प्रकाराची चौकशी करीत नाही तोपर्यंत पुढे जाणे योग्य होणार नाही, असे मला वाटते. या समितीचा अहवाल आपण मागवा आणि याठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जी तक्रार केली आहे, ती गंभीर असून ती आपण तपासून पहावी. या प्रस्तावाचे काय करावयाचे किंवा हा प्रस्ताव सभागृहापुढे मांडावयाचा की नाही, हे आपण पहावे. अशाप्रकारे जर कामकाज गुंडाळले जाणार असेल तर हक्कभंग प्रस्तावाला काही अर्थ राहणार नाही. त्यामुळे आपण हे सर्व तपासून याबाबतीत निर्णय घ्यावा,अशी माझी विनंती आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, दि.19 सप्टेंबर, 2005 ला समितीची बैठक झालेली आहे, त्यावेळी मी सदस्य नव्हतो. त्यानंतर दि.7 नोव्हेंबर, 2006 रोजी समितीची बैठक झालेली आहे व त्यानंतर दि.21 नोव्हेंबर, 2006 रोजी समितीची बैठक झालेली आहे. जर अहवाल इतका महत्वाचा होता तर या दोन बैठकांमध्येच हा अहवाल कसा काय उरकला गेला ? हा देखील प्रश्नच आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत हे या समितीवर जाण्यापूर्वी मी या समितीचा सदस्य होतो. या प्रस्तावाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्याकडून फक्त माहिती मागवावी अशाप्रकारचा निर्णय त्यावेळी झाला होता. त्यानंतरच्या पुढच्या बैठकीच्यावेळी मी उपस्थित नव्हतो. त्यानंतरच्या बैठकीमध्ये डॉ.दीपक सावंत यांना दोनदाच बोलावण्यात आले. मी, डॉ.दीपक सावंत किंवा आमच्या पक्षाचे इतर सन्माननीय सदस्यांना ज्या ज्यावेळी समितीच्या बैठकांचे निमंत्रण येत असते त्या त्या समितीच्या बैठकांना आम्ही न चुकता

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

हजर राहत असतो. परंतु याठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना बैठकांना का बोलाविण्यात आले नाही, हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे याबाबतचा खुलासा सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी केला तर बरे होईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व या सदनाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विधान परिषद विशेष हक्कभंग समितीच्या कामकाजासंदर्भात प्रश्न उपस्थित केला. या समितीने कशा पध्दतीने कामकाज केले, याबाबत मी त्यांना माहिती देण्याचा प्रयत्न करणार आहे. या समितीच्या 6 बैठका झाल्या. प्रत्येक बैठकीमध्ये कशा पध्दतीने कामकाज झाले किंवा काय निर्णय घेण्यात आले त्याबाबतची एकंदरीत सभासदांची हजेरी या सर्व बाबी अहवालाच्या पुस्तकात नमूद करण्यात आल्या आहेत. दिनांक 20 जुलै,2004 रोजी समितीची पहिली बैठक झाली. त्या बैठकीमध्ये मी स्वत: हजर होतो, तसेच सन्माननीय सदस्य श्री.सुरेश भालेराव, सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर व सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार असे चार सन्माननीय सदस्य हजर होते. या समितीचा कोरम किमान 3 सदस्यांचा आहे. तीन सन्माननीय सदस्य हजर राहिले तरच समितीचे कामकाज सुरु होऊ शकते. अशाप्रकारची तरतूद असल्याकारणाने समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये जे कामकाज झाले, त्यामध्ये प्रामुख्याने सकृतदर्शनी हा विशेषाधिकार भंगाचा विषय होत असल्याचा निर्णय येऊन त्यांच्याकडून 15 दिवसांच्या आत लेखी निवेदन मागविण्याचा निर्णय घेण्यात येईल. या बैठकीला सन्माननीय सदस्यांच्या व्यतिरिक्त विधानमंडळ सचिवालयातील श्री.दिलीप चोघले, अतिरिक्त सचिव, श्री.उमेश खडकीकर, सह सचिव व श्री.सुधीर वळवी, समिती अधिकारी हे अधिकारी हजर होते.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

दुसरी बैठक 20 मे 2005 रोजी झाली . त्या बैठकीस मी स्वत: हजर होतो,सन्माननीय सदस्य सर्वश्री. अब्दुल सत्तार, व्ही. यू. डायगव्हाणे व श्रीमती संजीवनी रायकर हजर होते. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार हे या समितीचे सदस्य होते परंतु काही कारणामुळे ते बैठकीमध्ये हजर राहू शकले नाही. या बैठकीमध्ये 4 सदस्य हजर असल्यामुळे, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्याकडून 27 ते 2005 पर्यंत लेखी खुलासा मागविण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. या बैठकीमध्ये देखील विधान मंडळाचे संबंधित अधिकारी हजर होते.

तिसरी बैठक 19 सप्टेंबर 2005 रोजी घेण्यात आली होती. या बैठकीमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री सुधाकर गणगणे, व्ही. यू. डायगव्हाणे,एन.पी हिराणी, रणजितसिंह मोहिते-पाटील, जगदीश गुप्ता व श्रीमती संजीवनी रायकर असे एकूण 7 सदस्यांपैकी 5 सदस्य हजर होते. या समितीमध्ये संबंधित अधिकारी उपस्थित होते. समितीने या ठिकाणी प्रस्तुत प्रकरणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी लेखी निवेदन सादर करण्यासाठी 10 ऑक्टोबर 2005 पर्यंत अंतिम संधी देण्यात यावी, असा निर्णय घेतला होता.

चौथी बैठक 7 नोव्हेंबर 2006 रोजी घेण्यात आली होती. त्या बैठकीस मी स्वत:व सन्माननीय सदस्य श्री. दिपक सावंत यांनी उल्लेख केल्याप्रमाणे हजर होते.सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू डायगव्हाणे हजर होते. मात्र कोरम नसल्यामुळे सदर बैठक स्थगित करण्यात आली होती. "गणपूर्ती अभावी बैठक स्थगित करण्यात आली " असा शेरा मारला गेला.

पाचवी बैठक 29 नोव्हेंबर 2006 रोजी घेण्यात आली होती. या बाठकीस मी स्वत: सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू. डायगव्हाणे, रणजितसिंह मोहिते-पाटील उपस्थित होते. या समितीस 3 सदस्यांच्या कोरमची आवश्यकता असल्यामुळे ही बैठक झाली. या समितीने सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या लेखी निवेदनावर विचार विनिमय केला आणि विशेषाधिकार भंग होत नाही, असा अहवाल सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सहावी बैठक 13 डिसेंबर 2006 रोजी घेण्यात आली. या बैठकीस मी स्वत: तसेच सन्माननीय सदस्य श्री. सुधाकार गणगणे,एन.पी. हिराणी इत्यादी सदस्य हजर होते. या बैठकीमध्ये समितीने सदर प्रकरणी प्रारुप अहवालावर विचार विनिमय केला व संमत करण्यात आला. हा

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी ........

संमत केलेला अहवाल सभागृहासमोर 13 डिसेंबर 2006 रोजी सादर करण्यात आला व त्याच्या प्रती सदस्यांना वितरित करण्यात आल्या होत्या.

श्री. दिपक सावंत : सभापती महोदय, या संबंधात आपण बारकाईने बधितले तर आपल्या लक्षात येईल की, 19 सप्टेंबर रोजी एक बैठक घेण्यात आली होती. त्या नंतर एक वर्षाने म्हणजे 7 नोव्हेंबर 2006 रोजी बैठक घेण्यात आली . या मधील कालावधीत बैठक घेण्यात आली नाही. त्यानंतर लगेच 21 नोंव्हेंबर 2006 रोजी बैठक घेण्यात आली. म्हणजे माझ्या माहितीप्रमाणे आणि मला जोपर्यंत स्मरते त्या प्रमाणे मी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना लिफट जवळ सांगितले होते की, बैठकीचे आमंत्रण पत्र येत नाही, आपण याची नोंद घ्यावी. तरी देखील त्यानंतर मला पत्र आले नाही. सभापती महोदय, आपण कृपया या गोष्टीची नोंद घ्यावी. मला बैठकीचे आमंत्रण पत्र न येण्याचे कारण काय आहे याची चौकशी व्हावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, समितीने सभागृहासमोर ठेवलेला जो अहवाल आहे तो सत्यावर आधारीत नाही, या संदर्भात योग्य ती छाननी झाली नाही, असे माझे मत आहे. मी जी कागदपत्रे दिलेली आहेत, ती पुरावा सिध्द करणारी आहेत. दोन आदिवासींचा तुरुंगामध्ये छळ केला होता त्या संदर्भात मी लक्षवेधीची सूचना दिलेली होती. त्या लक्षवेधीस जे उत्तर देण्यात आले होते ते योग्य नव्हते. रुग्णाने औषधी द्रव्य प्यायले असे सांगण्यात आले. परंतु त्यांना जखम कशी झाली, हे द्रव्य कोठून आणण्यात आले, पोलीस स्टेशन किती लांब आहे, तेथे चालत जाणे शक्य नव्हते का, याबाबत मी सर्व माहिती दिली होती.

यानंतर श्री. रोझेकर...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

मला वाटते समितीचे अध्यक्ष सन्माननीय श्री.गुरुनाथ कुलकर्णी वकील असल्यामुळे त्यांना ते इतके आत्मसात होईल आणि हा हक्कभंग नक्की होईल. निश्चित प्रकारे खून झाला आहे. मला उत्तर देण्यास उशीर झाला याचे कारण पुरावा गोळा करण्यासाठी वेळ लागला. माहितीच्या अधिकारान्वये पुरावा गोळा करणे, अधिका-यांनी पुरावे नाकारणे अशी यासंदर्भात परिस्थिती निर्माण झाली होती. आणि याच्या चौकशी अहवालची छाननी होईल. एस.पी.च्या संदर्भात चौकशी झाली. मला वाटते त्याला सलाम मारणा-या एका कनिष्ट अधिका-याकडून चौकशी झाली आणि मग ते हॉटेलमध्ये बसले...वगैरे सगळे त्यामध्ये होते, परंतु तो विषय नाही. दोन आदिवासींच्या खूनानंतर बँक अकाऊंटमध्ये 4 लाख भरुन आई-वडिलांना गायब केले, तक्रार व्हायला नको म्हणून. मला कळले नाही की हक्कभंग समितीपुढे प्रकरणाची छाननी कशी झाली. हक्कभंग मान्य झाल्यानंतर संबंधित सदस्य या सभागृहाचे आहेत की नाही, त्यांच्याबद्दल तो लागू होतो की नाही, हा भाग सभापतींच्या अख-त्यारितील आहे. परंतु, एवढे सगळे पुरावे सादर करुन, मारहाण झाली आहे हे सिद्ध करुन, पोस्ट मार्टेम अहवाल मला मिळण्याकरिता तीन महिने डॉक्टरांनी लावले, देणारच नाही असे सांगितले, आमच्या एका जिल्हा प्रमुखावर खटला भरला गेला होता. त्या एस.पी.कडून. श्री.संजय राठोड हे खालच्या सदनाचे सदस्य आहेत त्यांनी यासंबंधीची फाईल चाळण्यासाठी घेतली होती म्हणून त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला. मला एक कळत नाही की, कोणत्या पद्धतीने पुराव्यांची छाननी होते ? काय म्हणणे आहे ते मांडण्याकरिता किमान एकदा तरी मला साक्षीसाठी बोलाविणे आवश्यक होते. अशी पद्धत आहे की नाही, ज्या सन्माननीय सदस्यांनी हक्कभंग दाखल केला, त्यांना साक्षीसाठी बोलाविले जाते की नाही, हे मला माहित नाही. परंतु, या प्रकरणात मला बोलाविले नाही. हा जो निर्णय घेतला गेला आहे हा संबंधित अधिका-याला आणि ज्यांच्या संदर्भात मांडला गेला होता त्या मंत्र्यांना वाचविण्यासाठी घेतला गेला असावा, असे वाटावयास लागले आहे. मी छातीवर हात ठेवून सांगतो की, मी दिलेले पुरावे शंभर टक्के खून झाला आहे हे सिद्ध करणारे असतांना सुध्दा, अशा प्रकारे नागरीकांना संरक्षण देण्याकरिता आम्ही सदनामध्ये लक्षवेधी मांडत असतो. एखाद्या अधिका-याला वाचविण्याकरिता जर एखाद्या मंत्र्यांनी चुकीचे उत्तर दिले असेल किंवा अधिका-याने मंत्र्यांना असे तोंडघशी

श्री.दिवाकर रावते..........

पाडण्याकरिता एखादे चुकीच उत्तर दिले असेल तर किमान त्या अधिका-यावर कारवाई झाली पाहिजे आणि तशा प्रकारचे निर्देश देण्यात आले होते. मी माझी फाईल पुन्हा शोधतो. मला लेखी पत्र दिले आहे की, त्या अधिका-यावर निश्चित कारवाई केली जाईल. ज्यांनी असत्य माहिती मंत्र्याच्या मार्फत या सदनाला दिली त्याच्यावर कारवाई करतो अशा प्रकारचे लेखी उत्तर माझ याकडे आहे, ते मी शोधतो आणि ते मी आणीन. आणि ते आणून सदनापुढे ठेवल्यासनंतर या अहवालावर सभापतींना काय विचार करायचा तो जरुर करावा. माझे अजून तीन हक्कभंग आपल्याकडे आले आहेत. परंतु मला निर्णय मिळत नाही, काय झाले ? हक्कभंग समितीकडे पाठविण्याकरिता योग्य आहे की नाही, का आपण ते फेटाळले ? कारण ते इतके गंभीर आहेत. हा वेगळया प्रकारचा हक्कभंग होता, मंत्र्यांकडून अधिका-यांनी दिलेली चुकीची माहिती माझ्याकडे आली म्हणून हक्कभंग होता. परंतु हे हक्कभंग सभापतींवर बेछूट आरोप करणारे लेख छापून आले त्यासंदर्भातील आहेत आणि अजूनही त्यासंदर्भात आपल्याकडून मला काही कळत नाही. आणखी माझे दोन हक्कभंग आहेत. हे अधिवेशन संपत आले आहे, मी लेखी पत्र दिले आहे. यापुढे हक्कभंग दाखल करावयाचा की नाही असा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला आहे. अशा प्रकारचे कामकाज पाहून मी अत्यंत खेदाने नमूद करतो की, आण पुन्हा यासंदर्भात छाननी झाली तरी विश्वासाने सांगतो की, माझा हक्कभंग लागू होतो यापेक्षाही दोन गरीब आदिवासींचा खून झाला आहे आणि अधिका-यांमार्फत लपविला जात आहे, हे सत्य आहे, हे पुन्हा सांगतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, भारतीय घटनेमध्ये प्रिन्सिपल ऑफ नॅचरल जस्टिस आहे. या हक्कभंग प्रकरणान्वये मी काही गोंष्टी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मी देखील परवा एक हक्कभंग सूचना दाखल केली आहे. किती दिवसात त्याचा निर्णय लागणार आहे, हक्कभंग सूचना स्वीकारली की नाही, किती दिवसात सन्माननीय सदस्यांना याबाबतचे उत्तर दिले पाहिजे, याबाबतचे काही नियम नाहीत, बंधन नाही. माझी विनंती आहे की, आपण सार्वभौम सभागृहाचे सभापती म्हणून ज्या अधिवेशनात हक्कभंग दिला असेल त्याच अधिवेशनात त्यावरील निर्णय द्यावा, शेवटी हे आपले अधिकार आहेत. या समितीचे कामकाज कसे चालावे, यासंदर्भात माझे मित्र, लर्नेड ॲडव्होकेट, श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना विनंती करतो की, ते स्वत: ॲडव्होकेट आहेत. अधिका-यांना बोलावून त्यांचे साक्षीपुरावे घेणे गरजेचे होते.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी......

या सभागृहात दोन आदिवासींच्या मृत्यूच्या संदर्भात टाकलेला हक्कभंग प्रस्ताव होता. आपण या सभागृहाच्या विशेष हक्कभंग समितीचे अध्यक्ष आहात. या प्रकरणासंदर्भातील हक्कभंग समितीच्या बैठकीमध्ये ज्यांच्या विरुध्द तक्रार केली गेली आणि ज्यांनी तक्रार केली अशा दोघांना बोलाविण्यात आले होते का ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना बोलाविण्यात आले होते का ? एकंदरीत या सर्व प्रकरणामध्ये दिलेला निर्णय हा प्रिन्सीपल ऑफ नॅचरल जस्टीसला धरुन देण्यात आलेला नाही. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी हे या समितीचे अध्यक्ष आहेत, त्यांच्याविषयी अथवा त्यांच्या निर्णयाविषयी या सभागृहात अनुचित असे बोलणे हे निश्चितपणे या सभागृहाच्या प्रथा आणि परंपरा यांना शोभेसे होणार नाही. या संदर्भामध्ये आपण प्रिन्सीपल ऑफ नॅचरल जस्टीस म्हणून आपण एक स्वत: देखील चांगले ॲडव्होकेट असल्यामुळे या प्रकरणामध्ये दोन्ही फिर्यादी व आरोपी अशा दोन्ही पक्षांना समोरासमोर बोलावून काही गोष्टी तपासून घ्यावयाला पाहिजे होत्या. आपण फक्त लिखित उत्तरांवर,खुलाश्यांवर,पत्रावरच डिपेंड राहिलात. गृहविभागातून म्हणजे ब्यूरोक्रसीमधून जे खुलासे पत्राच्या स्वरुपात येत होते त्यावरच विसंबून आपण या संपूर्ण प्रकरणाचा निकाल लावलात, तरी देखील आपल्या निर्णयाचा मी पुरेपूर सन्मान राखतो. आपल्यासारख्या संवेदनशील राज्यकर्त्यांने की ज्याला घटनादेखील समजते, ज्याला लोकशाहीबद्दल आदर आहे, कायद्याबद्दल सन्मान आहे अशा नेत्याने पुन्हा एकदा माननीय सभापतींना विनंती करावी व पुन्हा एकदा या प्रकरणासंदर्भातील सर्व साक्षीपुरावे,कागदपत्रे घ्यावे आणि न्यायमूर्तीच्या भूमिकेमध्ये याप्रकरणाबाबत निर्णय द्यावा,आपल्या निर्णयाबद्दल आम्हा सर्वांना नितांत आदर आहे आणि तो आदर वाढला पाहिजे असाच निर्णय आपण घेणार अशी आम्हाला अपेक्षा आहे. या प्रकरणामध्ये काही गोष्टींचे लॅप्सेस आढळतील उदा. डॉ.दीपक सावंत यांना बैठकीचे इंटिमेशन न देणे वगैरे. मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी आपण पुन्हा या प्रकरणाच्या खोलात जाऊन तपासणी करावी व आपल्या सद्सद्विवेकबुध्दीला पटेल तो अहवाल आपण या प्रकरणाबाबत द्यावा आम्ही सर्व तो अहवाल मान्य करावयाला तयार आहोत. या प्रकरणाची पुन्हा एकदा खोलात जाऊन चौकशी करुन आठ दिवसांमध्ये निर्णय जाहीर करावा, अशी मी आपल्याला विनंती करतो.

----------

4K - 2

16-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 4K - 2

JPK/ SBT/ KGS 17:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सन्माननीय सदस्य सर्वश्री.दिवाकर रावते, नितीन गडकरी यांनी या विशेष हक्कभंग समितीच्या संदर्भामध्ये ज्या सूचना केलेल्या आहेत, त्यावर मी असे सांगू इच्छितो की, ज्यावेळी एखादे प्रकरण विशेष हक्कभंग समितीकडे येते त्यावेळी त्यामध्ये दोन कंडिशन्स असतात. एक म्हणजे असे कुठले प्रकरण की ज्यामध्ये या सभागृहाचा अवमान होत असेल, असे जर या सभागृहातील सदस्यांना वाटले तर ते सदस्य या प्रकरणाबाबत विशेष हक्कभंगाचा प्रस्ताव मांडू शकतात आणि मग ते प्रकरण विशेष हक्कभंग समितीसमोर चर्चेकरिता येते. दुसरी जी कंडिशन आहे ती म्हणजे एखाद्या ठिकाणी एखाद्या प्रकरणामध्ये या सभागृहातील सदस्यांचा किंवा या सभागृहातील प्रथा व परंपरांचा अपमान होत असेल त्यावेळी याबाबत विशेष हक्कभंगाचा प्रस्ताव होऊ शकतो व याबाबत या सभागृहातील सदस्यांनी माननीय सभापतींना जाणीव करुन दिली जाते की यामध्ये काहीतरी सब्स्टन्स आहे. सभापती देखील आपल्या अधिकारामध्ये याबाबत विशेषहक्कभंग झाला याची दखल घेऊ शकतात आणि मग सदर प्रकरण विशेष हक्कभंग समितीकडे जाऊ शकते. मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, ज्याचा उल्लेख मघाशीच या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दीपक सावंत यांनी केला त्यांनी असे म्हटले की, एक वर्ष या समितीची बैठक का होत नाही. सदर प्रकरणांतर्गत आम्हाला पूर्ण माहिती मिळणे बाकी होते त्यामुळे या समितीची बैठक होण्यास विलंब लागला होता. या प्रकरणांतर्गत ज्यांच्यावर आक्षेप घेतला गेला ते तत्कालीन गृहराज्यमंत्री श्री.कृपाशंकर सिंह यांनी याबाबत संबंधित विभागांना पत्र पाठवून खुलासा मागविला, समितीनेही याबाबत सर्व खुलासा मागविला या ठिकाणी पोलिसांचे कामही मर्यादित नसून या प्रकरणांतर्गत सी.आय.डी चौकशी लावण्यात आली आणि त्याचा अहवाल सुध्दा माननीय उपमुख्यमंत्री जे आपले गृह खाते सांभाळतात त्यांच्याकडून आलेला आहे.

यानंतर श्री.बोरले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी ..........

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले होते की, मी परदेशामध्ये जात आहे. समितीचे कामकाज कशामुळे अडले ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्याकडून अपेक्षित वेळेमध्ये खुलासा यावयास पाहिजे होता. हा प्रस्ताव सभागृहामध्ये आणून वेळोवेळी या प्रकरणी मुदत वाढविण्याची परवानगी घेण्यात आलेली आहे आणि सभागृहाने समितीला मुदत वाढीची परवानगी दिलेली आहे. दिनांक 16 डिसेंबर, 2005, 16 एप्रिल, 2005, 21 जुलै, 2005, 15 डिसेंबर, 2005, 21 एप्रिल, 2006 आणि 21 जुलै, 2006 रोजी सभागृहाने या प्रकरणी मुदतवाढ दिलेली आहे.

**उपसभापती** : सभागृहामध्ये या विषयावर बरीचशी चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे विशेष हक्कभंग समितीच्या समिती प्रमुखांची भूमिका न्यायाधिशांची आहे. समिती प्रमुख म्हणून आपण जो अहवाल द्याल, निर्णय द्याल तो निश्चितपणे मान्य केला जाईल. परंतु या विषयावर सभागृहात एकमत दिसत नाही. म्हणून मी आपल्याला अशी विनंती करतो की, या विषयी आपण सन्माननीय सदस्यांची पुन्हा एखादी बैठक घ्यावी. त्या बैठकीमध्ये या विषयावर विस्तृत चर्चा करुन सभागृहाला अहवाल सादर करण्यात यावा. आता सर्व सन्माननीय सदस्यांच्या परवानगीने आपण हा विषय येथेच संपवू आणि पुढील विषय चर्चेला घेऊ.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपण दिलेले निदेश समितीला मान्य आहेत.

---------

..2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे विनियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. LXXIII OF 2005.**
**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA OWNERSHIP FLATS (REGULATION OF THE PROMOTION OF CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER ) ACT,1963.)**

(विधेयक व खंड 4 ची सुधारणा विचारात घेण्यात यावी असा प्रश्न पुन्हा प्रस्तुत करण्यात आला.)

**उपसभापती** : महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबतचे सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक-73 वर बोलण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते ऑन लेग आहेत. त्यांनी आपले विचार मांडावेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी अजून आपली उपसूचना मांडलेली नाही.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, मी माझी उपसूचना मांडलेली आहे.

**उपसभापती** : महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबतचे सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक-73 वर बोलण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते ऑन लेग आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सुरुवातील या विधेयकावर माझे विचार मांडलेले आहे आणि त्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी स्टॅम्प डयुटी संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेण्याचे मान्य केलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भात घोषणा केली नाही, हा महत्वाचा भाग आहे. जी उपसूचना मांडण्यात आलेली आहे ती कायद्याला धरुन नाही. ती उपसूचना सन्माननीय सदस्यांना मागे घ्यावी लागेल. कारण सन्माननीय सदस्यांनी मांडलेली उपसूचना हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाविरुध्द आहे.

..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हे सभागृह सार्वभौम आहे. कायदा करण्याचा सभागृहाला अधिकार आहे. सभागृहाने मंजूर केलेली दुरुस्ती जर कायद्याला धरुन नसेल तर त्याला कोर्टामध्ये चॅलेंज करता येते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी चुकीचे बोलत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे ऑर्ग्युमेंट आपण ऐकून घ्यावे.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी जी दुरुस्ती मांडली आहे त्यामध्ये त्यांचे म्हणणे असे आहे की, ही सुधारणा उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द कशी आहे हे सांगण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे उभे आहेत. तुम्ही एखादी दुरुस्ती मांडली तर ती "Contempt of Court" होते. आता हे तुम्हाला न ऐकता कसे काय कळाले ? याच्यावर हायकोर्टाचा निर्णय काय झालेला आहे ? ही जी सूचना आहे ती कोर्ट निर्णयाविरुध्द असल्याने "Contempt of Court" होत आहे, त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे म्हणणे तुम्हाला ऐकावे लागेल, लोकशाहीच्या दृष्टीने ते बरोबर आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे एक Dynamic Advocate आहेत, त्यांनी तसे वागावे. मी त्यांना सांगू इच्छितो की, या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी जी दुरुस्ती सूचविलेली आहे ती हायकोर्टाच्या निर्णयाच्या विरोधात आहे, तसे केले तर तो न्यायालयाचा अवमान होईल. काही दिवसापूर्वी सभागृहात याबाबत विषय निघाला होता. सन्माननीय मंत्री महोदय श्री.दिलीप वळसे पाटील यांचा याबाबत वाद निर्माण झाला होता. यामध्ये अशी चर्चा झाली होती की, हायकोर्टाचा निर्णय सभागृहावर बंधनकारक आहे की नाही ? याचा निर्णय झालेला आहे. माननीय सभापतींनी याबाबत उत्तर दिलेले आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या प्रश्नाचे उत्तर मला दिले पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे मुद्दे एवढे जोरदार आहेत की नाही हे मला माहिती नाही, तरीही त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, त्यांना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे म्हणणे ऐकूण घ्यावे. श्री.दिवाकर रावते यांचे मुद्दे खोडण्यासाठी मी श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना काही मुद्दे देऊ शकतो. सभापती महोदय, आपली लोकशाही चार पायावर उभी आहे. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायव्यवस्था, प्रसार माध्यमे (प्रेस) असे चार खांब आहेत. प्रत्येकाचे क्षेत्र घटनेने ठरविले असून कोणालाही एकमेकावर आक्षेप घेता येत नाही. काही दिवसापूर्वी माननीय पंतप्रधानाच्या उपस्थितीत सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश काय बोलले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

आहेत, हे वाचले असेल तर सन्माननीय सदस्यांच्या लक्षात येईल. तसेच केशवानंद भारती यांच्या केसमध्ये "Salient feature of the Constitution" आपण बदलू शकलो नाही. याबाबत सर्वोच्च न्यायालयात वाद झालेला आहे. Who is supreme? Whether Parliament is supreme or Supreme Court is supreme? मला यावर वाद करावयाचा नाही. सभागृहाच्या निर्णयास न्यायालयामध्ये चॅलेंज करता येते का ?, यासंबंधी वाद निर्माण झाला होता, हे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

Shri Gurunath Kulkarni: Any thing said and done on the floor of the House does not amount to contempt of court.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माननीय श्री.सोमनाथ चटर्जी हे लोकसभेचे अध्यक्ष असून 28-30 वर्षे त्यांना पार्लमेंटच्या कामाचा अनुभव आहे. निःपक्षपातीपणे काम करणारे ते व्यक्ती आहेत. त्यांनी काय विधान केले आहे हे लक्षात घेतले पाहिजे, एवढाच माझा मुद्दा आहे,

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, काही संसद सदस्यांना लोकसभेच्या अध्यक्षांनी एका प्रकरणामध्ये निलंबीत केले होते. त्या प्रकरणी सभापतींनी घेतलेल्या निर्णयास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते, त्यावेळी लोकसभेच्या सभापतींना न्यायालयाकडून आलेली नोटीस त्यांनी स्वीकारली नाही, त्यावर सुनावणी झाली. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला होता की, सदस्यांच्या निलंबनाबाबत लोकसभा अध्यक्षांनी घेतलेला निर्णय योग्य असून त्यांना सदस्यांना निलंबित करण्याचे अधिकार आहेत. न्यायालयाने सभागृहाच्या निर्णयात हस्तक्षेप केला नव्हता. त्यानंतरच त्याची अंमलबजावणी झाली. परंतु या वादामध्ये मी पडू इच्छित नाही.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, विधानसभेच्या अध्यक्षांना जेव्हा उच्च न्यायालयात पाचारण करण्यात आले होते तेव्हा आपल्यासह सर्व पक्षाच्या सदस्यांनी एकमताने निर्णय घेतला होता की, त्यांनी उच्च न्यायालयात जायचे नाही व नोटीसीला उत्तर द्यावयाचे नाही.

**The DEPUTY CHAIRMAN** : Let us start the debate.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी जी सुधारणा मांडलेली आहे, ही या सदनामध्ये विचारात घेतली जावी किंवा नाही? त्यांनी उपसूचना मांडली असेल तर त्यावर आम्हाला बोलण्याचा अधिकार आहे. हाच अधिकार सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना वापरावयाची इच्छा असेल तर त्यांना कोणत्या कायद्याने तुम्ही थांबवित आहात ? सभागृहामध्ये सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाचा निर्णय बाजूला ठेवावा. सभागृहामध्ये पीठासीन अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम आहे. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयाचे अनेक निर्णय आपण बदलले आहेत आणि कधी कधी आम्ही त्याचा सन्मान करतो. शिक्षकांच्या प्रश्नाच्या बाबतीतही सभागृहात हायकोर्टाचा निर्णय बदलला आहे. याबाबत माझी विनंती आहे की, श्री.दिवाकर रावते यांचे काय म्हणणे आहे, ते आपण समजून घ्यावे.

**The DEPUTY CHAIRMAN**: I will give my decision after I listen Hon, Member Shri Rawate.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, खरे म्हणजे हे विधेयक लवकर मंजूर व्हावे ही आमची प्रामाणिक इच्छा आहे. या विधेयकाद्वारे शासनाला जे करावेसे वाटते आहे त्या संदर्भात मी मुंबईचा महापौर असताना 8 जानेवारी 1992 रोजी महापालिकेच्या सभागृहामध्ये मुंबईच्या संबंधितांची एक बैठक घेतली होती. या बैठकीला फ्लॅट ओनर्स असोसिएशनचे प्रतिनिधी, वास्तुशास्त्र असोसिएशनचे प्रतिनिधी, बिल्डर्स असोसिएशनचे प्रतिनिधी होते तसेच महापालिकेच्या विविध समित्यांचे अध्यक्ष आणि प्रशसनातील सर्व अधिकारी व नगरसेवक, गटनेते इत्यादी मंडळी उपस्थित होती आणि त्यांच्यासमोर हा पूर्ण विषय मी मांडला होता. या विधेयकावरील माझे पूर्ण भाषण आपण ऐकले असेल वा वाचले असेल तर आपल्याला समजून येईल की, 1992 साली मी त्या बैठकीत मांडलेल्या मतांमध्ये आणि आजच्या माझ्या मतांमध्ये काहीही फरक नाही. किंबहुना या विधेयकापेक्षा माझे मत जास्त आहे. त्यावेळेस देखील मी सांगितले होते की, मुंबईमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या माध्यमातून ज्या अनेक इमारती उभ्या राहिलेल्या आहेत परंतु विकासकाने निर्माण केलेल्या परिस्थितीमुळे त्या अडचणीमध्ये आल्या आहेत. त्यातील सर्व गाळेधारकांना पैसे खर्च करून तेथे रहावे लागते पण त्यांना ऑक्युपेशन प्रमाणपत्र मिळत नाही, कर आकारणी वा कर भरणा व्यवस्थित करता येऊ शकत नाही. हे सर्व विषय माझ्या आताच्या भाषणामध्येही आलेले आहेत आणि त्यावेळी केलेल्या भाषणामध्येही होते. तेव्हा या विचारांचा मी त्यावेळेपासून आहे. त्याचा पाठपुरावा या विधेयकाच्या निमित्ताने होत असेल, पण त्यातील उणीवा, त्यातील योग्यता, त्यातून निर्माण झालेली परिस्थिती येथे सांगणे माझे काम आहे. सभापती महोदय, तसे पाहू गेल्यास या विधेयकामध्ये त्रुटी भरपूर आहेत. त्या सांगावयाच्या झाल्या तर Deemed to be conveyance, हे झाल्यानंतर ज्या इमारतीमध्ये रहावयाचे त्यासाठी आवश्यक असलेले ऑक्युपेशन सर्टिफिकेट, पाण्याचे कनेक्शन इत्यादी गोष्टी आहेत त्या मिळणार नाहीत असे नाही. ते सारे महापालिकेच्या डीसी रूल्समधून मिळणारच आहेत. तेव्हा लाखो भाडेकरूंच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा हा प्रश्न आहे की, ज्या जमिनीवर इमारत उभी आहे ती जमीन त्यांच्या, त्यांच्या सोसायटीच्या मालकीची करणे, हा यातील मुख्य विषय आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 4ओ 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

या संदर्भातील कायदे आज पूर्णपणे अस्तित्वात आहेत. ते सांगावयाचे म्हटले तर त्याकरिता तीन तास लागतील. यामध्ये एकंदर 5 कायदे समाविष्ट आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने सहकारी सोसायटी कायदा, मुद्रांक शुल्क कायदा, रजिस्ट्रेशनचा कायदा, रेंट कंट्रोलचा कायदा इत्यादी कायदे या विधेयकामध्ये यावयास पाहिजेत. त्यासंदर्भात निश्चित असे निर्देश असले पाहिजेत. आमची सुध्दा प्रामाणिक इच्छा आहे की, या विधेयकामध्ये असलेल्या त्रुटी आम्ही अशासकीय विधेयक आणून त्या दाखवून देऊ आणि त्या भरुन काढण्याचा प्रयत्न करु. मुळात हा कायदा अस्तित्वात असतांना सुध्दा सरकारला एकत्रित कायदा करण्याची इच्छा होत असेल तर आनंद आहे. आणि हे करीत असतांना डीम टू कन्व्हेअंस यामध्ये माल प्रॅक्टिसेस होतील त्यावर नियंत्रण आले पाहिजे. आणि म्हणून जी उपसूचना आली आहे ती योग्य आहे कां? सहकार कायद्यांतर्गत नियम करुन देखील सोसायटीला डीम टू कन्व्हेअंस करण्याचा अधिकार देता येईल कां? एखाद्याची जमीन दुसऱ्याच्या नावावर करण्याचा अधिकार आपण महसूल अधिकाऱ्यांना दिलेला आहे त्या संदर्भात एक-दोन गोष्टी सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे. याठिकाणी मुद्रांक शुल्काच्या संदर्भातील कोर्टाचा आलेला निर्णय आपणास वाचून दाखवितो. "Whether a Stamp Duty is payable at the date of the agreement or the date when occupation certificate is granted? The Bombay Stamp Act (60 of 1958) Sch. I, Art. 25 Explanation ॿ agreement of sale of flat executed by parties on 9th September 1992 ॿ Possession of flat not transferred till grant of No Objection Certificate from Income Tax Authority ॿ "NOC granted on 30th May 1977 ॿ Petitioners acquired vested right in flat and its possession only on grant of NOC- Petitioners would be liable to pay stamp duty at rate prevalent on 30th May 1997 and not on date of agreement of sale of flat (Kishore K. Shahani Vs. State of Maharashtra.)"

महाराष्ट्र स्टँप डयुटी ॲक्ट अन्वयें हा अधिकार रजिस्ट्रार ऑफ स्टँप डयुटीकडे आहे. Whether Stamp Authority are bound to give fresh hearing and give proper reasoning for orders? यामध्ये ॲथॉरिटी सांगण्यात आली आहे, त्यामध्ये हियरींग हा शब्द महत्वाचा आहे या विधेयकामधील तरतुदीनुसार आर.डी.सी.ने हियरींग करावयाचे आहे. त्यांनी हियरींग केल्यानंतर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

जर ते मला स्वत:ला पटले नाही तर समोरच्या बाजूने अपिल कुणाकडे करावयाचे? याकरिता आपल्याकडे ॲथॉरिटी नाही . व त्याबाबत आपण याठिकाणी सांगितले नाही. आम्हाला त्यामध्ये तरतूद दिसत नसल्यामुळे त्यासाठी आम्ही वेगळे अशासकीय विधेयक आणू. त्याकरिता पुढील अधिवेशनामध्ये अशासकीय विधेयक आणून सरकारला विचारु की, ही ॲपिलेट ॲथॉरिटी कोण आहे? यामध्ये ॲथॉरिटीचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे मुंबई शहरामधील मोठ मोठया सोसायटया हियरींगकरिता कुणाकडे जाणार? त्यांना कुठेतरी न्याय द्यावा लागेल. त्यामध्ये एकाच्या बाजूने न्याय होईल तर दुसऱ्याच्या बाजूने विरोध होईल. आणि मग अपिलाकरीता त्यांनी कुठे जायचे? "Bombay Stamp (Determination of True Market value of property) Rules, 1981 Fresh Hearing - R - 3 (1) - Valuation of documents - Show cause notices - Subsequently order passed, before production of concerned documents - Supreme Court judgement submitted by party brushed aside without assigning reasons. HELD, valuation done prior to production of concerned documents is not proper. Fresh hearing to be given to concerned parties after receipt of all documents and decision to be with proper reasons and in particular, dealing with judgements of Supreme Court. Subhadevo Ramakant Loiya Vs. State of Maharashtra through its Secretary, 2002(4) Bom. C.R. (N.B.) 466 .

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू.....

याचा अर्थ स्पष्ट आहे की, त्यावेळेला ट्रान्फर प्रॉपर्टीमधील स्टॅम्प डयुटीच्याबाबतीत तक्रार आहे ती पहावी लागेल. त्याचा अर्थ स्पष्ट आहे. त्या ऑथरिटीला स्टॅम्प डयुटीसंबंधीचा अधिकार नाही. त्याबाबतीत कोण पहाणार आहे ? अशाप्रकारचा कोणताही स्टॅम्प डयुटीसंबंधात निर्णय नाही. जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार आहे, स्टॅम्प ऑफीसला हा अधिकार आहे, स्टॅम्प डयुटीचे व्हॅल्युएशन करण्याचा अधिकार सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशाप्रमाणे राहील. स्टॅम्प डयुटीच्या संबधात महसूल अधिकाऱ्यांनी हिअरींग घ्यावे अशाप्रकारचा निर्णय आलेला आहे. यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितले त्याप्रमाणे ॲक्युपेशन सर्टिफिकेट दिले नाही तर पाण्याचे चार्जस कमर्शियल रेटने भरावे लागतात. सगळे कर द्यावे लागतात. कोर्टाचा एक निर्णय आलेला आहे, त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "Whether the Municipal Commissioner has discretionary power to grant any permission which is contrary to the Development Control Regulation to allow to use compulsory open space adjoining to the flat or in the front of the flat into the garden? Since Section 46 enjoins upon him the duty to have due regard to the provisions of a plan, it would also not be permissible to him to regularise any structure which would be in violation of any provision of the development Control Regulations for Greater Mumbai, 1991 as existing on the date when he passes an order of regularisation. This decision was given by Justice Rebello and Justice S.R. Sathe- Sky Anchorage CHS Vs. Municipal Corpn. of Gr. Mumbai in W.P. No.1304 of 2004" ज्या इमारतीचे ॲक्युपेशन झालेले नाही, त्या इमारतीचे डेव्हलपमेंट रूलप्रमाणे काम झालेले नाही त्या संदर्भातील अधिकार महानगरपालिकेच्या आयुक्तांना दिलेला आहे काय ? त्याबाबतीत निर्णय काय होणार आहे ? या ठिकाणी जी उपसूचना मांडलेली ाहे, त्याप्रमाणे त्यांना हा अधिकार प्राप्त होईल काय ? डीम्ड टू बी कन्व्हेयन्स असे करीत असताना स्टॅम्प डयुटीचे एक्झम्प्शन कोण देणार ? माझ्याकडे एक सायटेशन आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "Originally Stamp Duty was payable at the time of taking

2....

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू....

possession of property but it was found that many flats owners were mislead and more than one agreement was entered in respect of one flat. The flat owner has no document for title and therefore no legal rights and title is created in his favour. Even if the building is not constructed or even if possession is not given, he gets title to the flat.

(a) A conveyance on sale (b) Every instrument (c) Every decree or final order of any Civil Court (d) Every order made by the H.C. under section 394 of the Companies Act, 1956 (I to 1956) in respect of amalgamation of companies.

By which property, whether moveable or immovable or any estate or interest in any property is transferred to or vested in any other person itner vivos and which is not otherwise specifically provided for by Schedule I.

Effect of 1985 and 1993 amendment: The effect of the amendments is that the scope of the definition is very much widened,. Now conveyance includes as mentioned above.

Agreement of sale is now covered by the definition of conveyance. Consent decree whereby property is conveyed is also heldto be a conveyance (State of Maharashtra Vs. M.S. Builders (Pcvt.) Ltd. 1992 (1) Bom. C.R. 568."

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

याचा अर्थ असा की, मी फ्लॅट ओनर आहे म्हणजे माझ्या नावे कन्व्हेयंस आहे, असे हा निर्णय सांगतो. असे असेल तर यामध्ये डिम्‌ड टू बी कंव्हेयंस हा विषय यामध्ये आहे काय ? तसे असेल तर मला या ॲग्रिमेंटनेच कंव्हेयंसचा अधिकार मिळालेला आहे. माझे असे म्हणणे आहे की, I am a flat owner. I have every right. दुसरे असे की, कायद्याप्रमाणे 24 वर्षात कंव्हेयंस दिले नाही तर It is deemed to be conveyanced. माझ्याकडे ओनरशीपचे डॉक्युमेंट आहेत. Stamp authority is the final authority to declare the conveyance. मी दोन चार रेफरंसेस दिलेले आहेत. असे जर असेल तर आपण दिलेली जी उपसूचना आहे त्यानुसार त्यांना हे अधिकार आहेत काय ? हा महत्वाचा विषय आहे. "Deemed to be Conveyanced" याचा अर्थ स्टॅम्प ॲक्ट प्रमाणे कोणत्याही प्रॉपर्टीच्या बाबतीत स्टॅम्प ड्युटी भरल्याशिवाय कंव्हेयंस होत नाही. याचे वेगवेगळे आस्पेक्ट आहेत. एखादा भूखंड असेल, एखादी इमारत असेल, त्याचे व्हॅल्यूएशन करावयाचे असेल, रेंट ॲक्टमध्ये येणाऱ्या इमारती असतील, त्यांचे व्हॅल्यूएशन करावयाचे असेल, अपार्टमेंट ॲक्ट प्रमाणे असलेली इमारत असेल, बंचेस ऑफ सोसायटी असेल, त्यांचे व्हॅल्यूएशन करुन त्यांना कंव्हेयंस कसे देणार आहात ? यामध्ये वेगवेगळे विषय गुंतलेले आहेत. माझे असे म्हणणे आहे की, हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टाचे जे काही निर्णय आहेत त्यानुसार ही बाब सरळसरळ स्टॅम्प ऑफीसशी जोडलेली आहे. ही बाब महसूल अधिकाऱ्यांशी जुळलेली आहे. त्यासंदर्भात अपील करण्याची सक्षम ॲथॉरिटी हे जिल्हाधिकारी आहेत. या ठिकाणी आपण आर.डी.सी. असे म्हटले आहे. जर आर.डी.सी. आणि आमच्यामध्ये काही डिस्प्यूट निर्माण झाला तर आम्ही कोणाकडे अपील करावयाचे ? ते यामध्ये नाही. ते दुरुस्त करता येईल. जॉईन्ट रजिस्ट्रार, को-ऑपरेशन यांना याबाबत अधिकार नाहीत. या ठिकाणी डी.डी.आर. च्या संदर्भातील उपसूचना मांडलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जी उपसूचना दिलेली आहे ती या कायद्यामध्ये बसत असेल तर माझे काही म्हणणे नाही. मी माननीय सभापती महोदयांना विनंती करतो की, आपण हे पहावे आणि निर्णय द्यावा. माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी दिलेली उपसूचना अशीच मान्य झाली तर या विधेयकाच्या माध्यमातून पुढे जाण्याची जी गती घेतली आहे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS

श्री. दिवाकर रावते .....

त्यावर परिणाम होईल. हे बिल या सभागृहात येण्यासाठी दोन वर्षे लागली आणि आता आपण हे बिल मंजूर करुन घेण्याच्या परिस्थितीमध्ये आहोत. आपण ही उपसूचना मंजूर केली तर पुन्हा हे बिल विधानसभेकडे पाठवावे लागणार आहे. ही उपसूचना या ठिकाणी व्हॅलिड होईल असे मला वाटत नाही. या उपसूचनेच्या निमित्ताने सांगावयाचे झाले तर, सन्माननीय सदस्यांनी एकाच ओळीची उपसूचना मांडली. या उपसूचनेच्या बाबतीत जी ॲथॉरिटी आहे ती नक्की काय काम करील ? त्यांचे कायदेशीर अधिकार काय असतील ? ते कशा प्रकारे काम करतील ? एखाद्या इमारतीमधील स्टॅम्प ड्युटीचे व्हेरिफिकेशन कसे करतील ?

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 18:30

(श्री. दिवाकर रावते ....)

स्टॅम्प डयुटी भरली नसेल तर काय करणार ? या बाबतीत सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांच्याकडून मार्गदर्शन होऊ शकले नाही. मला या ठिकाणी हायकोर्टाचे आणि सुप्रीम कोर्टाचे सर्व रेफरन्स वाचून दाखवावे लागतील. ते सर्व रेफरन्स मी वाचले तर सन्माननीय सदस्यांनी दिलेली उपसूचना समर्थनीय ठरणार नाही. संसद आणि सुप्रीम कोर्ट अशा प्रकारचा हा विषय नाही. मुळामध्ये कायदेशीरपणे कन्व्हेअन्स केले पाहिजे नाही तर दंड आणि शिक्षेची तरतूद आहे. ती देखील या बिलामध्ये आलेली आहे. कायद्यामध्ये अनेक गोष्टी अस्तित्वात आहेत. त्या सर्व एकत्रितपणे आणायला पाहिजे होत्या. घटनेच्या अनुच्छेद 14 आणि 21 नुसार हे जे निर्णय आलेले आहेत त्यांचा आदर करायला पाहिजे. कोर्ट हे नेहमी घटनेनुसार निर्णय देते. तुमच्या आमच्या मतानुसार कोर्ट निर्णय देत नाही. कोर्टाच्या निर्णयाला घटनेचे अधिष्ठान असते. सभापती महोदय, हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टाचे रेफरन्सेस आपण काळजीपूर्वक बघितल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी आपली उपसूचना मागे घेणे श्रेयस्कर ठरेल असे माझे मत आहे. कायद्याने निर्णायक असे निर्माण झालेले मत खोडून काढण्याच्या बाबतीत उद्या कोणी कोर्टात गेले तर आपण करीत असलेला कायदा अयोग्य ठरेल आणि मग या सदनामध्ये प्रस्तुत कायद्या विषयी चर्चा झाली होती की नाही असा प्रश्न निर्माण होईल. हे होता कामा नये. हे विधेयक दोन वर्षांनी आलेले आहे. या बिलाच्या बाबतीत ज्या काही त्रुटी असतील त्या संदर्भात ऑर्डिनन्स काढण्यात येईल असा शब्द माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेला आहे. अन्यथा पुढच्या अधिवेशनामध्ये अशासकीय विधेयक आणून शासनाला सूचना कराव्या लागतील. माझी सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांना विनंती आहे की, त्यांनी आपली उपसूचना मागे घेणे रास्त ठरेल जेणेकरुन या बिलाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळेल. यासंदर्भात मी महापौर असताना देखील माझे मत मांडलेले होते. मी त्यावेळीही या विषयावर ठाम होतो आणि आजही आहे. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून पुनश्च एकदा सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी आपली उपसूचना मागे घ्यावी. धन्यवाद.

---

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपल्या परवानगीने मी या बिलाच्या संदर्भात उपसूचनेच्या अनुषंगाने काही एक दोन सूचना करु इच्छिते.

या बिलाच्या पान क्रमांक 3वर असे नमूद केलेले आहे की, "(4) The Competent Authority, on receiving such application, within reasonable time and in any case not later that six months after making such enquiry as deemed necessary..." जर सहा महिन्यामध्ये इन्क्वायरी झाली नाही तर काय ? हे या संदर्भात समोर येत नाही. तसेच या बिलामध्ये "डिम्ड कन्वेअन्स" असा शब्द प्रयोग का करण्यात आलेला आहे हे काही मला कळत नाही. बिलाच्या पृ.क्र. 5 वर असे नमूद केलेले आहे की, "(5)....the certificate issued by the Competent Authority along with the unilateral instrument of conveyance, the Sub-Registrar or the concerned appropriate Registration Officer shall, notwithstanding anything contained in the Registration Act, 1908, issue summons to the promoter to show cause why such unilateral instrument should not be registered as 'deemed conveyance'...." यामध्ये क्लॅरिटी असणे आवश्यक आहे. ही क्लॅरिटी नसेल तर प्रमोटर्सच्या विरुध्दचे कोणतेही प्रकरण कोर्टामध्ये टिकणार नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.......

म्हणून आपण यामधून ॲप्लिकन्टला काही देतो का? यामध्ये संदिग्धता दिसून येते. एकाच प्रकरणात मला स्वत:ला असे वाटते की, ॲप्लिकन्टला काही मिळू शकणार नाही. सेक्शन 13 ई मध्ये म्हटले आहे की,"No suit, prosecution or any other legal proceedings shall lie against and Competent Authority in respect of anything which is in good faith done or purported to be done by him under this Act." याठिकाणी माझे म्हणणे असे आहे की, आपण Indemnity for acts done in good faith असे म्हटले असले तरी सुध्दा आपण जास्त व्हास्ट पावर देत आहात. गूड फेथमध्ये आपण हे करीत असतो. जी ॲथॉरिटी नेमत आहात त्यांना आपण जास्त अधिकार देत आहात. सेक्शन 13 सी मध्ये म्हटले आहे की, "All proceedings before a Competent Authority shall be deemed to be the judicial proceedings for the purposes of sections 193 and 228 of the Indian Penal Code." बिल आल्यापासून मी आय.पी.सी.चे कलम 193 व 228 वारंवार वाचते आहे. या कलमामध्ये कुठेही प्रमोटरविरुध्द इन्ग्रिडिएन्ट प्रूव्ह होत नाही. त्याने अशाप्रकारे स्वत: ॲप्लिकन्टच्या फेव्हरमध्ये ॲप्लिकेशन दिलेले नाही. आय.पी.सी.च्या कलम 193 व 228 मध्ये तसे कुठेही नाही. कुठल्याही अर्थाने दोन्ही सेक्शन लागू होणार नाहीत. या सगळ्या प्रोसिडिंगमध्ये आपण पाहिले तर ॲप्लिकन्टनेच अर्ज द्यायचा, त्यानेच कोर्ट फी भरायची आहे. स्टॅम्प डयुटी काय असणार आहे याचा शासन विचार करणार आहे. प्रमोटर्सनी काय करायचे हे कुठेही म्हटलेले नाही. जेव्हा आम्ही दिवाणी दावे दाखल करतो तेव्हा suit is decreed with or without cost. ज्याची लायबिलिटी असेल त्याने कॉस्ट भरावी. ॲप्लिकन्टची काही चूक नाही. प्रमोटरने जबाबदारी टाळल्याबद्दल त्याला काहीतरी शिक्षा व्हायला पाहिजे. आय.पी.सी.च्या कलम 193 व 228 ची इन्ग्रिडिएन्ट कुठल्याही फौजदारी कोर्टात सिध्द होऊ शकणार नाही. I don't know, यामध्ये कुठेही कॉम्पेन्सेटरी कॉस्ट का नाही? यामध्ये आपण ॲप्लिकन्टला काही देणार आहोत की नाही? आपण काही न्याय देऊ शकतो का? मला वाटते, यामध्ये परसेप्शन आहे. यातून ॲप्लिकन्टला काही मिळणार नाही असे माझे मत आहे एवढे बोलून मी माझे विचार पूर्ण करते.

----------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी जी बिलाला सूचना दिलेली आहे ती त्यांनी मागे घ्यावी एवढीच विनंती करायला मी उभा आहे.

सभापती महोदय, जमीन महसूल विभागाची आहे, ती जमीन सोसायटीच्या नावे हस्तांतर होते, ती जमीन महसूल विभागाच्या ताब्यात असावी की सहकार विभागाच्या ताब्यात असावी हा नंतरचा विषय आहे. तो विषय अध्यादेशाद्वारे सोडविता येऊ शकतो. ज्यावेळी विधिमंडळाचे कामकाज सुरु असते त्यावेळी जनता मोठ्या अपेक्षेने या सभागृहाकडे पहात असते. त्यामुळे गेल्या दोन वर्षाच्या काळात हे विधेयक विधानसभेत पारित होऊनही या सभागृहात येऊ शकले नाही. आता चर्चेला आलेले आहे परंतु पारित झालेले नाही. सूचना मान्य झाली तर पुन्हा हे विधेयक विधानसभेत जाईल. योगायोगाने शासनाच्या मनात असो वा नसो, आज युएलसीचा कायदा रद्द करण्याचा प्रस्ताव सभागृहासमोर येणार आहे. खरे काय, खोटे काय बाजूला ठेवले तरी युएलसी कायदा रद्द करण्याची बिल्डरांची मागणी आहे अशी लोकांमध्ये चर्चा आहे. या बिलाला दिलेली सुधारणा मान्य झाली तर हे बिल खालच्या सभागृहात जाऊन पुन्हा या सभागृहात येण्याचा प्रवास सोपा नाही. त्यामुळे या सभागृहात सूचना मान्य झाली तर उद्या विधानभेत हे विधेयक मान्य होईलच याची खात्री नाही. हे बिल या सभागृहापुढे आल्यापासून आठवड्याभरात काय धावपळ चालू आहे हे आम्ही पहात आहोत. कोणी धमकी दिली, कोणती प्रेम दिले आहे. एकाच दिवसात युएलसी कायदा रद्द करण्यासाठी शासनाला घाई झालेली दिसते. परंतु कन्व्हेयन्स देण्यासाठी चालढकल चालली आहे असे मत तयार झाले आहे. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी सूचना मांडण्यामागे त्यांचा हेतू अतिशय चांगला असेल परंतु या गोष्टी एकाच वेळी होत असताना याचे परिणाम काय होतील?

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

अनावश्यक नसेल तर सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी सुधारणा केल्यामुळे हे बील लांबले असे कोणी म्हणता कामा नये असे मला वाटत. या बिलाच्या संदर्भात गृहनिर्माण संस्थाच्या अनेक बैठका व मेळावे होत असून या बिलाच्या संदर्भात बाहेर खूप चर्चा होत आहे. परसेप्शन हा लाखो लोकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. त्यामुळे या बिलाच्या संदर्भात माझी सूचना आहे की, या बिलाला सत्ताधारी पक्षानेच अमेंडमेंट दिलेली आहे ती आताच न करता आपल्याला केव्हाही अध्यादेश काढून ती करता येऊ शकते. कन्वहेअन्सचे बील यावे यांसदर्भात मध्यमवर्गीयांच्या मनात कित्येक वर्षापासूनची अपेक्षा आहे. परंतु आपल्या एका विभागाला असे वाटते की, या बिलाच्या संदर्भातील अधिकार आपल्याकडे असले पाहिजे तर दुस-या विभागाला वाटते की, या बिलाच्या संदर्भातील अधिकार आपल्याकडे असले पाहिजेत. या बिलाकडे जनता अपेक्षेने पहात आहे. त्यामुळे या बिलाच्या संदर्भात माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी ज्या सुधारणा सूचविलेल्या आहेत त्या त्यांनी मागे घेतल्या तर जनतेला त्यांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या सारख्या वाटतील.

श्री. विलासराव देशमुख ( मुख्यमंत्री ): सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या बिलाच्या संदर्भात भावना व्यक्त केल्या आहेत की, या बिलामुळे जनतेच्या मनात संभ्रम निर्माण झालेला आहे. सरकार काही तरी करुन हे बील पारीत करण्यास टाळाटाळ करीत आहे, परंतु यासंदर्भातील कोठलीही शंका आपण आपल्या मनात आपण ठेवू नये, तसेच जनता सुध्दा या संदर्भातील कोठलीही शंका आपल्या मनात ठेवणार नाही. या बिलाला एकूण दोन सुधारणा सूचविलेल्या आहेत त्या दोन्ही सुधारणा सभागृहाने स्विकाराव्यात अशी विनंती करतो. कोऑपरेटीव्ह सोसायटयांना आपल्याला सक्षम अधिकारी नेमावयाचा आहे. हा सक्षम अधिकारी डीडीआर असला पाहिजे. सोसायटयाचे रजिस्ट्रेशन, सोसायटयांचे काम योग्य पध्दतीने चालते की, मेंबरशिप योग्य पध्दतीने दिली की नाही नाही हे आरडीसी बघू शकत नाही. ही सुधारणा सूचविण्यात आली तेव्हा तिच्या पाठीमागे काही हेतू आहेत. केवळ पुणे विभागात काय चालू आहे एवढया पुरता हा विषय मर्यादीत नाही. महाराष्ट्रातील जेवढया को-ऑपरेटीव्ह सोसायटया आहेत त्यांचे रजिस्ट्रेशन डीडीआर करीत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री. विलासराव देशमुख.....

असतो. मेंबरशीप योग्य पध्दतीने आणि त्यांच्या बैठका व्यवस्थीतपणे झाल्या की, नाही, कोरम बरोबर होता की, नाही या सगळयांचे नियंत्रण डीडीआरकडे देण्याच्या संदर्भात सुधारणा सूचविण्यात आलेली आहे. हे बील विधानसभेने मान्य केलेले आहे. या बिलाच्या संदर्भातील सुधारणा येथून पास झाल्यानंतर हे बील विधानसभेत जाणार आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे बील जसेच्या तसे मंजूर करावे अशी आमची विनंती आहे.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या बिलाच्या संदर्भात खालच्या सभागृहात चर्चा होऊन हे बील मंजूर झालेले आहे. या बिलाला केवळ दोनच सुधारणा सूचविण्यात आलेल्या आहेत. खालच्या सभागृहाने कोठलाही अडथळा न आणता हे बील मंजूर केलेले आहे. येथून हे बील मंजूर झाल्यानंतर ते खालच्या सभागृहात सुध्दा मंजूर होणार आहे. त्यामुळे हे बील मंजूर करण्यात आपण सहकार्य करावे अशी विनंती आहे. खालच्या सभागृहात हे बील पास होण्याच्या बाबतीत सुध्दा आपले सहकार्य आम्हाला लागणारच आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे बील येथून मंजूर झाल्यानंतर खालच्या सभागृहात हे बील उद्याच मंजूर होणार असेल तर आमची त्याला काही हरकत राहणार नाही.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या बिलाच्या संदर्भात आमचा हेतू स्पष्ट आहे. हे बील अनेक वर्षापासून दुर्दैवाने रेंगाळलेले होते. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी हे बील मंजूर व्हावे यासाठी फार परीश्रम घेतलेले आहेत याची मला कल्पना आहे. म्हणून या बिलाच्या संदर्भात मी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांच्या नावाचा मुद्दाम उल्लेख केलेला आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख.......

त्यांच्या भावनांबद्दल मला माहिती आहे. तेव्हा माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी ही सुधारणा मंजूर करावी. येथे सुधारणा मंजूर झाल्यानंतर हे विधेयक पुन्हा विधानसभेत मान्यतेसाठी जाणार, तेथे हे विधेयक मंजूर होणार नाही आणि पुन्हा हे विधेयक पुढे ढकलले जाणार अशी सन्माननीय सदस्यांची शंका आहे, परंतु असे काही होणार नाही. कारण उद्याच विधानसभेमध्ये हे विधेयक आम्ही संमत करण्यासाठी मांडणार आहोत व त्यासाठी आम्हाला समोरच्या सदस्यांच्या सहकार्याची गरज आहे.....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांच्या नावाचा उल्लेख केला. या विधेयकाच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांच्यात एक संवाद झाला होता त्यामध्ये स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन, कन्व्हेन्स इत्यादी गोष्टींबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना आश्वासन दिले होते. तेव्हा या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला तर बरे होईल.

श्री.विलासराव देशमुख : या विधेयकात दोन सुधारणा करण्यात आलेल्या आहेत तेवढ्याच पुरते बोलावे असे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले म्हणून मी तेवढ्याच पुरते बोललो. या विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी स्टॅम्प ड्युटी किती आकारणार, रजिस्ट्रेशन वगैरे बाबतीत काही शंका उपस्थित केल्या. त्या संदर्भात सांगू इच्छितो की, जर एखाद्याने 1976 साली फ्लॅट घेतला असेल आणि त्या फ्लॅटचे कन्व्हेयन्स झाले नसेल तर त्यास आजच्या बाजार भावाने स्टॅम्प ड्युटी आकारली तर ती इमारत विकल्यावर सुध्दा किंमत येणार नाही इतकी स्टॅम्प ड्युटी भरावी लागेल. तेव्हा अशी परिस्थिती उद्‌भवणार नाही याची काळजी घेण्यात येईल. आपण कायदा करतो त्यावेळी आपल्याला रुल्स देखील करावे लागतात.. कारण कायद्यामध्ये सर्व बाबी आणता येत नाहीत. कायद्यामध्ये फक्त मुख्य हेतू असतो. त्यामुळे आपल्याला नियमावली तयार करावी लागते. सबऑर्डीनेट लेजिस्लेशन समिती नियमावली तयार करते. तेव्हा आपण वरील सर्व गोष्टींची काळजी घेणार आहोत. आपण कॉम्पीटन्ट ऑथॉरिटी नेमलेली आहे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख.......

तिला दिवाणी न्यायालयाप्रमाणे अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे मंत्र्यांकडे, आयुक्तांकडे जावे लागणार नाही. जर बिल्डरने कन्व्हेयन्स देण्यास टाळाटाळ केली तर त्यास दंडाची तसेच कारागृहाची शिक्षा प्रस्तावित केलेली आहे. तसेच त्यास पाच वर्षे ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात येईल अशी कठोर शिक्षा सुनावली आहे. सर्वसामान्य लोकांना परवडेल अशा स्वरुपात स्टॅम्प ड्युटीचे कोष्टक तयार करणार आहोत. सर्वसामान्य लोकांना परवडेल अशा स्वरुपाचे टॅक्सेशन असणार आहे. या माध्यमातून लोकांकडून पैसे वसूल करणे असा सरकारचा हेतू नाही. घराची शाश्वती नाही, घराचे रेकॉर्ड नाही अशा लोकांना आधार देणारे हे विधेयक आहे. स्टॅम्प ड्युटी भरल्याशिवाय कन्व्हेयन्स होणार नाही. म्हणून स्टॅम्प ड्युटी घ्यावी लागणार आहे. स्टॅम्प ड्युटी किती आकारावी याचे एक कोष्टक करणार आहोत. यामध्ये देखील पारदर्शकता राहील, डिस्क्रिशन राहणार नाही. एखादे घर अमूक अमूक एवढ्या किंमतीला असेल तर त्यासाठी अमूक अमूक इतकी स्टॅम्प ड्युटी भरावी लागणार आहे असे कोष्टक तयार करण्यात येईल. त्यामुळे कोणाचीही फसवणूक होणार नाही. राज्यात एकूण साधारणत: 55 हजार को.ऑप.सोसायट्या आहेत. त्यातील 27हजार सोसायट्या या मुंबई शहरातील आहेत. त्यांचा कन्व्हेन्स झालेला नाही. त्यादृष्टीने हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांकडून मला आणखी एका गोष्टीचा खुलासा पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या कदाचित लक्षात असेल की, आपली महाराष्ट्र हौसिंग बोर्डा बरोबर चर्चा झाली होती. त्यावेळी श्री.खोब्रागडे हे व्हाईस प्रेसिडेंट होते. त्या बैठकीत सांगण्यात आले होते की, सहा महिन्यांच्या आत कन्व्हेयन्स पूर्ण करु.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

याठिकाणी अद्यापी कन्व्हेन्स झाला नाही. त्यानंतर अकृषिक कराची नोटीस मिळत होती. ही पार्श्वभूमी फार महत्वाची आहे. 50-55 वर्षांची जुनी हौसिंग बोर्डाची इमारत असेल, रिक्लेम्ड लॅण्ड असेल तर त्यावर अकृषिक कर लावला जातो. यामुळे खरोखरच कामगारांचे आयुष्य उद्ध्वस्त होणार आहे. याबाबतीतील महत्वाचा मुद्दा त्यादिवशी मी मांडला होता व याबाबतची नोंदही सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी घेतली होती. त्यामुळे यासंदर्भात हौसिंग बोर्डाच्या किंवा अन्य जून्या ज्या इमारती आहेत, त्या बाबतीत अकृषिक कराचा परत बोजा येणार नाही, यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा केलातर बरे होईल.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी जी सूचना केली आहे त्यासंबंची नोंद आम्ही कालच घेतली आहे व त्यासंदर्भातील योग्य त्या सूचनाही अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड 4, सुधारल्याप्रमाणे विधेयकाचा भाग झाला.

खंड 5 व 6 विधेयकाचे भाग झाले.

**<u>सन 1963 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 45 याच्या कलम 13 ची सुधारणा</u>.**

**सभापती** : खंड 7 ला सन्माननीय सदस्य सर्वश्री उल्हास पवार व सुधाकर गणगणे यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांच्यापैकी कोणाही एकाने ती मांडावी.

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

पृष्ठ क्रमांक 4 वर, ओळ क्रमांक 7 व 8 मधील "पोट-कलम (3) मध्ये," या मजकुराने सुरु होणाऱ्या व "हा मजकूर दाखल करण्यात येईल" या मजकुराने संपणा-या मजुकराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा-

(..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

"पोट-कलम (3) मध्ये "एका वर्षापर्यंत वाढविता येईल" या मजकुराने सुरु होणाऱ्या आणि "या दोन्ही शिक्षा होतील" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :-

"सहा महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दहा हजार रुपयापेक्षा कमी नसेल परंतु पन्नास हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील,"

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड 7, सुधारल्याप्रमाणे विधेयकाचा भाग झाला.

खंड 8, विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रितमकुमार शेगावकर : अध्यक्ष महाराज, सन 2005 चे वि.स.वि. क्र.73 चे विधेयक (सुधारणा केल्याप्रमाणे) संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2005 चे वि.स.वि. क्र. 73 (सुधारणा केल्याप्रमाणे) संमत झालेले आहे.

..................



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: संसदेने मंजूर केलेला नागरी जमीन ( कमाल मर्यादा व विनियमन ) निरसन अधिनयम 1999 राज्यासाठी अंगिकृत करणे.

**मु.शी.**: संसदेने मंजूर केलेला नागरी जमीन ( कमाल मर्यादा व विनियमन ) निरसन अधिनयम 1999 राज्यासाठी अंगिकृत करणे या विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांचा ठराव.

श्री. विलासराव देशमुख ( मुख्यमंत्री ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील ठराव मांडतो :-

" **ज्याअर्थी**, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 252 च्या खंड (1) अनुसार, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक 5 ऑक्टोबर, 1971 रोजी आणि महाराष्ट्र विधानपरिषदेने दिनांक 7 ऑक्टोबर, 1971 रोजी, नागरी स्थावर मालमत्तेवर कमाल मर्यादा लादणे आणि कमाल मर्यादेहून अधिक असणाऱ्या अशा मालमत्तेचे संपादन आणि त्याच्याशी संबंधित किंवा सहाय्यभूत व तदनुषंगिक सर्व बाबी यांचे संसदेच्या अधिनियमाद्वारे महाराष्ट्र राज्यात विनियमन करण्यात यावे असा ठराव केलेला होता;

**आणि ज्याअर्थी**, संसदेने त्यानंतर नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, 1976 (1976 चा केंद्रीय अधिनियम क्रमांक 33) अधिनियमित केलेला होता;

**आणि ज्याअर्थी**, संविधानाच्या अनुच्छेद 252(2) अन्वये, हरयाणा व पंजाब राज्याच्या विधानमंडळांच्या सभागृहांनी, त्या राज्यांना लागू असलेला नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, 1976, संसदेत कायदा करुन निरसित करण्यात यावा, असा ठराव केला होता; व त्याच्या परिणामी, संसदेने नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) निरसन अधिनियम, 1999 (1999 चा अधिनियम क्रमांक 15) अधिनियमित केलेला आहे;

**आणि ज्याअर्थी**, नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) निरसन अधिनियम, 1999 च्या कलम 1 पोट-कलम (2) मध्ये अशी तरतूद आहे की, जे राज्य, संविधानाच्या अनुच्छेद 252 च्या खंड (2) अन्वये, याबाबतीत ठराव मंजूर करुन, उक्त अधिनियमाचा अंगीकार करील त्या अन्य राज्याला उक्त अधिनियम लागू होईल;

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख....

**आणि ज्याअर्थी**, महाराष्ट्र शासनाचे असे मत आहे की, नागरी क्षेत्रातील जमीन गृह निर्माणाकरिता उपलब्ध व्हावी या दृष्टीने महाराष्ट्र राज्याला लागू असलेला नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, 1976 हा निरसित करणे आवश्यक आहे;

**त्याअर्थी**, आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 252, खंड(2) अनुसार, महाराष्ट्र विधानसभा याद्वारे, संसदेने मंजूर केलेला नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) निरसन अधिनियम, 1999 या राज्यासाठी अंगीकृत करण्यात यावा, असा ठराव करीत आहे. "

ठराव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 106 अन्वयेच्या ठरावाबाबत**

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी नियम 106 अन्वये जो ठराव मांडलेला आहे त्यावर आता चर्चा होणार आहे का ?

**सभापती** : सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी जो ठराव मांडलेला आहे त्या वर पुढच्या अधिवेशनात सविस्तर चर्चा करता येईल.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, मी नियम 106 जो ठराव सभागृहासमोर मांडलेला आहे त्यावर सन्माननीय सदस्यांना चर्चा करावयाची असेल तर चर्चेस शासनाची तयारी आहे.

यानंतर श्री. रोझेकर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडलेला ठराव हा पार्लमेंटमध्ये जो कायदा मंजूर झाला त्या अनुषंगाने आहे. जो ठराव मांडण्यात आला आहे तो विचारार्थ आहे, त्याबाबत सभागृहात चर्चा झाली पाहिजे व त्यासाठी उद्या वेळ ठेवावी. ही चर्चा उद्याच्या उद्या ठेवावी, अशा प्रकारे पेंडिंग ठेवणे बरोबर नाही.

**सभापती** : उद्याच्या दिवसाच्या कामकाजामध्ये कसा वेळ देता येईल ते मी पाहतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उद्या यासंदर्भात चर्चा होऊ शकणार नाही. फार्स करण्यापेक्षा शरणागतीने आजच हा ठराव मंजूर करणे बरे. कारण, अजून अनेक प्रस्तावांवर चर्चा व्हायची आहे. मराठवाडा सिंचनासंदर्भात काय होणार आहे, माहीत नाही ? जर हा एवढा महत्वाचा ठराव होता तर मग तो शेवटच्या दिवशी सभागृहात का मांडण्यात आला ? हा लॅण्ड सिलिंगसारख्या महत्वाच्या विषयावरील ठराव आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांची भूमिका चांगली आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, यासंदर्भात चर्चा करायची असेल तर करावी. ही भूमिका आम्हालाही मान्य आहे. पण चर्चा कधी करणार ?

**सभापती** : उद्याच्या दिवसाच्या कामकाजामध्ये वेळ ठरविणे शक्य आहे का ते मी बघतो. शक्य नसेल तर पुढच्या अधिवेशनात चर्चा ठेऊ.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी जो ठराव मांडला आहे त्याबाबत उद्या सभागृहात चर्चा होऊ शकणार नाही. त्यामुळे पुढच्या अधिवेशनामध्ये या ठरावावर सविस्तर चर्चा व्हावी, सांगोपांग विचार व्हावा.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जो ठराव सभागृहात मांडला आहे त्यावर विचारविनिमय होण्याची आवश्यकता आहे. त्यासंदर्भात आम्हाला आमच्या पक्षाशी, पक्षश्रेष्ठींशी बोलले पाहिजे, त्यांचे मत घेतले पाहिजे. त्यामुळे या संदर्भातील चर्चा पुढच्या अधिवेशनात ठेवावी.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्याला शक्य असेल तर उद्याच्या उद्या या चर्चेसाठी वेळ देता आला तर बघा. नाही तर मुख्यमंत्र्यांनी ठराव मांडला आणि आपण अर्धवट सोडून दिला, हे बरोबर होणार नाही.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी असे करतो की, या अनुषंगाने उद्यापर्यन्त वेळ उपलब्ध होण्याची शक्यता आहे काय ते बघतो अन्यथा पुढच्या अधिवेशनामध्ये पहिल्या दिवशी यासंबंधी चर्चा ठेऊ.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी सगळयांच्या वतीने विनंती करतो की, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी ठराव मांडण्यापूर्वी हा ठराव पुढच्या अधिवेशनात मांडावा असे जर आपण म्हटले असते तर बरे झाले असते. आता त्यांनी तो मांडला आहे, रेकॉर्डवर आला आहे, त्यामुळे त्याची अंमलबजावणी होऊ शकते. ज्या सूचना असतील त्या विचारात घेण्यासाठी या चर्चेसाठी एक तास द्यावा, दोन तास द्यावेत परंतु उद्या वेळ द्यावा. कारण आज हा ठराव मांडला असेल तर त्याबाबतची अंमलबजावणी सुरु होईल आणि मग त्यानंतर आपल्या चर्चेला काही अर्थ उरणार नाही. त्यामुळे उद्या वेळ दिला पाहिजे. अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर चर्चेला काय अर्थ आहे ?

**सभापती** : सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी हा ठराव येथे मांडला आहे. या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यासाठी आपल्याला आज किंवा उद्या वेळ मिळण्याची शक्यता कमी आहे त्यामुळे पुढच्या अधिवेधनात यावर चर्चा करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या बाबतची अंमलबजावणी झाली आहे. आता चर्चेला काही अर्थ राहिला नाही.

**सभापती** : जोपर्यन्त ठराव पारीत होत नाही तोपर्यन्त अंमलबजावणीचा संबंध काय ?

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, अर्बन लॅण्ड सिलिंग ॲक्ट रद्द करावा यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी मला वाटते सहा महिन्यापूर्वी एक बैठक आपल्या दालनात बोलाविली होती. या बैठकीला सर्व पक्षाच्या सन्माननीय नेत्यांना सुध्दा आमंत्रित केले होते. त्या ठिकाणी या सर्व सन्माननीय नेत्यांचे मत जाणून माझ्या माहितीप्रमाणे हा कायदा ॲबॉलिश करण्यासाठी आला आहे तो त्या अनुषंगानेच आलेला आहे. त्यामुळे काही सन्माननीय सदस्यांनी जी भूमिका मांडली की आमच्या नेत्यांना याबाबत विचारणा करावी लागेल, तशी ती आपल्याला जरुर करता येईल, परंतु यासंबंधीची चर्चा यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांच्या चेंबरमध्ये झालेली आहे.

यानंतर कुमारी जयश्री.........

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अशा प्रकारची जर सन्माननीय सदस्य उत्तर देत असतील तर मला असे सांगावे लागेल की, माननीय मुख्यमंत्र्यांचे चेंबर हे काही चर्चा करण्याचा भाग नाही तर माननीय मुख्यमंत्र्यांच्या चेंबरमध्ये आपण त्यांना चर्चेच्या वेळेची विचारणा करावयाची असते.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आपण आताच सांगितल्याप्रमाणे जोपर्यंत सदर विधेयक पारित होणार नाही तोपर्यंत याची इंप्लिमेंटेशन होणार नाही.

**सभापती** : ज्यावेळी सदर विधेयकावरील चर्चा पूर्ण होऊन माननीय मुख्यमंत्री त्या चर्चेस उत्तर देतील त्यानंतरच ते विधेयक पारित होऊन त्याच्या अंमलबजावणीस सुरुवात होईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, असे असेल तर मग आमची काहीही हरकत नाही.

**सभापती** : विरोधी पक्षातर्फे विजेच्या भारनियमनासंबंधी चर्चा मागितली होती, त्या चर्चेला मी नियम 97 अनव्ये अनुमती देत आहे.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील शहरी व ग्रामीण भागात मोठया प्रमाणात होत असलेले विजेचे भारनियमन.

**मु.शी.**: राज्यातील शहरी व ग्रामीण भागात मोठया प्रमाणात होत असलेले विजेचे भारनियमन याबाबत सर्वश्री.पांडुरंग फुंडकर,मधुकर सरपोतदार,नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, सय्यद पाशा पटेल, मधुकर चव्हाण केशवराव मानकर, प्रकाश शेंडगे, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रसताव मांडता येणार नाही. सूचना देणारे माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 97 अन्वये पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

" राज्यातील शहरी व ग्रामीण भागात मोठया प्रमाणात होत असलेले विजेचे भारनियमन व त्यामुळे राज्यात निर्माण झालेला विजेचा प्रचंड तुटवडा शेती व उद्योग व्यवसायाचे मोठया प्रमाणावर होत असलेले नुकसान,मोठे उद्योग व कारखाने बंद पडण्याची निर्माण झालेली परिस्थित्,रुग्णालयात विजेअभावी होत असलेली गैरसोय,परिणामी, रुग्णांचे होत असलेले हाल,विहिरीत पाणी असून देखील अजूनदेखील वीज पंप चालू नसल्यामुळे पिकांना पाणी देता न येणे, त्यामुळे शेतातील उभी पिके वाळून जाणे,वीज समस्येमुळे आम जनता आक्रमक होत असून त्याचे राज्यभर तीव्र पडसाद उमटणे,त्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, अनेक ठिकाणी वीजमंडळाच्या कार्यालयावर हल्ले होणे, ठिकठिकाणी झालेल्या उद्रेकांच्या घटनांचा आम जनजीवनावर परिणाम होऊन त्यामुळे होणारे अतोनात नुकसान, दोन वर्षापूर्वी आठ खाजगी प्रकल्पांशी केलेला सामंजस्य करार,परंतु वीज नियामक आयोगाच्या परवानगीशिवाय वीजमंडळाला कुठल्याही कंपनीकडून कायदेशीररित्या वीज खरेदी करता न येणे,त्यातच ठिकठिकाणी विजेची बंद पडलेली संयत्रे, राज्यातील वीज कपातीचे संकट नजीकच्या कालखंडात सुटण्याची शक्यता नसणे,त्यामुळे हवालदिल झालेली जनता."

महाराष्ट्रातील सगळयात पेटलेला प्रश्न जर कोणता असेल तर तो हा विजेचा प्रश्न आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

महाराष्ट्रातील हे सरकार किती अकार्यक्षम आणि अयशस्वी झालेले आहे याचा वीजसंकट हा सर्वात मोठा पुरावा आहे. सात वर्षापूर्वी महाराष्ट्रामध्ये लोकशाही आघाडीचे सरकार आले या सरकारने पूर्वीपासून जे करार झालेले होते त्यापैकी अनेक करार रद्द केले अशा रीतीने या राज्याची वाट लावण्याचा विडा लोकशाही आघाडीच्या सरकारने उचललेला आहे. भारतामध्ये प्रथम क्रमांकावर असलेले महाराष्ट्र राज्य आज सहाव्या क्रमांकावर आहे. या राज्यातील उद्योग राज्याच्या बाहेर चालले आहेत त्यामुळे बेरोजगारांच्या संख्येत वाढ होत आहे. शेतक-यांनी विहिरीकरिता व विद्युत पंपाकरिता कर्ज घेतले व व्याजाच्या ओझ्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. या राज्याचे ऊर्जामंत्री हे शिक्षणमंत्री देखील आहेत. पण या राज्याच्या दोन पिढयांचे जीवन उध्वस्त करण्याचे पाप त्यांनी आपल्या माथ्यावर घेतलेले आहे. ऐन परीक्षेच्या काळामध्ये ग्रामीण भागामध्ये 16 तास लोडशेडींग त्यांनी केलेले आहे, अशा प्रकारे ऐन परीक्षेच्या काळामध्ये विद्यार्थ्यांचे अभ्यासासाठी होणारे हाल बघता त्यांचे जीवन या सरकारने उध्वस्त केलेले आहे. या राज्यातील उद्योग राज्याच्या बाहेर चालले आहेत त्यामुळे तरुण मुले बेराजगार होत आहेत, कर्जाच्या ओझ्यापायी शेतकरी आत्महत्या करीत आहेत. विद्यार्थ्यांचे भविषय उध्वस्त करण्याचे काम या सरकारने केलेले आहे. राज्यात विजेची टंचाई आहे, मला कळत नाही की, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार सात वर्षापासून सत्तेवर आहे व तेव्हापासून या सरकारचा संसार चालू आहे, पण आतापर्यंत त्यांना लाडू व साखर वाटण्याची संधी मिळाली नाही, यात आमचा काय दोष आहे ?

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .........

खरे म्हणजे यांचा संसार "तुझे माझे जमेना आणि तुझ्या वाचून करमेना" असा सुरु आहे. शासनाचे एका गोष्टीवर मात्र एकमत आहे आणि ते म्हणजे राज्याला लुटण्याचे काम. राज्यातील महत्वाच्या प्रश्नांकडे शासनाचे अतिशय दुर्लक्ष झालेले आहे. राज्यामध्ये एकूण 15,400 मेगावॅट विजेची मागणी आहे. परंतु प्रत्यक्षात 6,800 मेगावॅट विजेचा शॉर्टेज आहे. राज्यामध्ये 15 ते 16 तास लोडशेडींग सुरु आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, राज्यातील तीन-चार घटक शासनाचे खूपच अभिनंदन करीत आहेत. हे मी बाहेर सुध्दा सांगतो. तीन-चार क्षेत्रामध्ये महाराष्ट्र सरकारने अभूतपूर्व असे काम केलेले आहे. मी तुम्हाला महाराष्ट्र दूषण पुरस्कार जाहीर केलेला आहे. खरे म्हणजे आपण सभागृहामध्ये ही चर्चा मेणबत्त्या लावून केली असती तर जास्त संयुक्तिक झाले असते. चार क्षेत्रामध्ये महाराष्ट्र शासनाने अभूतपूर्ण असे काम केलेले आहे आणि ते इतिहासामध्ये लिहिले गेले आहे. त्या चार गोष्टी म्हणजे, इन्व्हर्टर, जनरेटर, हेल्मेट आणि मेणब्त्या. तुमचा जिल्हयाजिल्हयात सत्कार झाला पाहिजे. आपल्या राज्यामध्ये सध्या इन्वहर्टरचा धंदा खूप जोरात सुरु आहे. या चार क्षेत्रातील लोकांनी कसा पैसा कमविला यासंदर्भात महाराष्ट्र टाईम्स् या वर्तमानपत्रामध्ये बातमी आली होती. ती बातमी मी वाचलेली आहे. राज्य सरकारने मागच्या 7 वर्षामध्ये वीज निर्मितीकरिता काय प्रयत्न केले ? या राज्याचे वीज मंडळाचे अध्यक्ष श्री.विनय बन्सल यांनी एन्रॉनच्या केसमध्ये मुंबई हायकोर्टामध्ये ॲफिडेव्हीट सादर केले होते, त्या ॲफिडेव्हीटमध्ये त्यांनी असे सांगितले होते की, महाराष्ट्रात वीज सरप्लस आहे. आम्हाला वीज विकत घेण्याची गरज नाही. त्यांनी मुंबई हायकोर्टामध्ये अशा प्रकारचे खोटे ॲफिडेव्हीट करुन महाराष्ट्रातील जनतेची आणि मुंबई हायकोर्टाची दिशाभूल करण्याचे काम केलेले आहे. एन्रॉन योग्य का अयोग्य या विषयावर मी बोलणार नाही. गव्हाचा तुटवडा निर्माण झाला तर आपण ऑस्ट्रेलियावरुन गव्हाची आयात करु शकतो. साखरेचा तुटवडा निर्माण झाला तर आपण ब्राझीलवरुन साखरेची आयात करु शकतो. आपल्याला डाळी, तांदूळ इतर ठिकाणावरुन आणता येतील. परंतु वीज कशी काणता येईल ? वीज आणता येत नाही. अंधेरी रात में दिया तेरे हाथ में. विजेच्या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा होत आहे. दोन दिवसामध्ये वीज कोठूनही आणता येत नाही. मला माफ करा. आपल्या राज्याच्या हसतमुख ऊर्जा मंत्र्यांवर आता जनतेचा विश्वास राहिलेला

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .........

नाही. एन्रॉन इतक्या दिवसामध्ये सुरु होईल, असे सांगितले जाते. तुम्ही लोकांना किती चुकीची माहिती देता. खरोखर वीज येणार काय, कॅबिनेटच्या किती सब कमिटया झाल्या, Where there is a will, there is a way. Where the is no will, there is only discussions, surveys, seminars, committees, and sub-committees and all. तुम्ही वीज निर्मितीसाठी काहीही प्रयत्न केलेले नाहीत. परंतु साहेबांकडे मिटींग आहे म्हणून मंत्रालयातील अधिका-यांची धावपळ सुरु असते. मागच्या 7 वर्षामध्ये वीज निर्मिती का झाली नाही ? संपूर्ण महाराष्ट्र राज्य अंधाराच्या खाईमध्ये लोटले गेले आहे. माननीय ऊर्जा मंत्र्यांनी आम्हाला सभागृहामध्ये आनंदाने सांगितले की, महाराष्ट्र सरकारने वीज निर्मितीचे 13,600 कोटी रुपयांचे करार केलेले आहेत. त्यावेळी सर्वांनी टाळया वाजविल्या. कोठे गेले प्रकल्प, किती लोक प्रकल्प सुरु करण्यासाठी आले, किती लोकांनी वीज निर्मितीचे काम सुरु केले, किती लोकांनी वीज निर्मितीसाठी गुंतवणूक केली, किती लोकांबरोबर ॲग्रीमेंट झाले, किती लोकांच्या जमिनींचे भू-संपादन करण्यात आले ? माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेटची सब-कमिटी स्थापन करुन याबाबत युद्ध पातळीवर निर्णय घेण्याची आवश्यकता होती. परंतु तसे काही झाले नाही. मंत्रालयातील अधिका-यांच्या भरवशावर तुम्ही राहाता. पण मंत्रालयातील अधिका-यांनी तुमची वाट लावली आहे.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार )**

श्री.नितीन गडकरी .....

तुमच्याबद्दल आदर होता, परंतु तुमच्या अवतीभोवती जे अधिकारी आहेत ते झारीतील शुक्राचार्य म्हणून बसलेले आहेत. अधिकाऱ्यांचे ऐकल्यामुळे माननीय मंत्री श्री.अजित पवार यांच्याही शिव्या खाण्याची वेळ कॅबीनेटमध्ये तुमच्यावर आलेली आहे. म्हणजे बाहेरचे व घरचेही तुम्हाला शिव्या देतात. तुमचे रस्त्यावर फिरणेही मुश्कील झाले आहेच परंतु तुमच्यापेक्षा आम्हाला फिरणे मुश्कील झ ाले आहे. माझ्या घरी नोटीस आलेली आहे की, विजेकरिता आमच्या भागातील लोक माझ्या घरासमोर निदर्शने करणार आहेत. तसे पाहिले तर यात माझा काही संबंध नाही. परंतु त्यांचेही एका दृष्टीने बरोबर आहे कारण मी त्यांच्या भागातील आमदार आहे. आता आमच्याच मतदारसंघात माननीय उर्जामंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांच्या पुण्याईने आमचा मुर्दाबाद सुरु झालेला आहे, कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे ? या सात वर्षामध्ये शासनाने विजनिर्मितीकरिता जे प्रयत्न केले आहेत त्यातून प्रत्यक्ष कोठे विजनिर्मिती झाली आहे ? 4-4 वर्षे काम सुरु आहे. खरे म्हणजे मी याचा उल्लेख करु नये पण सांगतो, युतीचे शासन असताना मुंबईच्या उड्डाणपुलाच्या बांधणीमध्ये व एक्सप्रेस हायवे बांधणीमध्ये आम्ही एक नियम केला होता. एक दिवस अगोदर काम करा एक लाख रुपये कॉन्ट्रक्टरला बक्षीस मिळेल आणि एक दिवस उशीरा काम केले तर दीड लाख रुपये दंड होईल. त्यावेळी 48 लोकांनी 4000 कोटींची कामे केली होती. सध्या माननीय उर्जा मंत्र्यांच्या भोवती मंत्रालयातील उपसचिव, कक्ष अधिकारी जमा झालेले आहेत, ते तुमचे विरोधक आहेत हे आपण लक्षात ठेवावे. त्यांच्या सल्ल्याने जो मंत्री वागतो त्याची अवस्था वाईट होते. मी तुम्हाला असत्य सांगत नाही. ते फक्त सर, सर, सर असे म्हणतात आणि कॉन्स्टेबल सॅल्युट मारतात. मंत्री एवढयातच खुश आहेत की, माझ्या रेस्ट हाऊसच्या चादरी स्वच्छ आहेत की नाहीत ? चहा आला की नाही ? याच्यावरच अर्ध्या मंत्र्यांचे काम चालू आहे. उर्जा मंत्री महोदयांना मिसगाईड करण्यात आलेले आहे. विजेकरिता इरादापत्र काय झाले आहे ? किती लोकांशी करार केले आहेत ? माझ्या माहितीप्रमाणे 8 खाजगी कंपन्याबरोबर करार केले. महा-जेनकोने करार केला, रिलायन्स एनर्जी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

4000 मेगावॅट, टाटा पॉवर 1000 वॅट अशा प्रकारे दोघांनाही एकच प्लॉट देऊ टाकला आहे. काय सरकार आहे ? तेथे जागेकरिता भांडणे सुरु झालेली आहेत, जसे कौरव पांडवांचे युध्द सुरु आहे, एकच प्लॉट दोघांना अलॉट केलेला आहे. आता रिलायन्सची जागा काढून टाटाला दिली आहे, हा मधला मार्ग काढला आहे. याबाबत पुढे काय झाले हे माहिती नाही.

सभापती महोदय, रिलायन्स एनर्जी 4000 मेगावॅट, टाटा पॉवर 1000 मेगावॅट, इस्सार पॉवर 15000 मेगावॅट, जिंदाल ग्रूप 1000 मेगावॅट, जीएमआर एनर्जी 1000 मेगावॅट, स्पेक्ट्रम टेक्नॉलॉजी 500 मेगावॅट, जीएएमआर 1000 मेगावॅट असे 12500 मेगावॅटचे तुम्ही करार केलेले आहेत. त्यातील जीएएमआर व स्पेक्ट्रम टेक्नॉलॉजी यांनी अद्यापपावेतो डी.पी.आर.एस. तयार केलेला नाही त्यामुळे हे दोन्ही प्रकल्प बारगळल्यात जमा आहेत. त्यांना टरकॅमायसिनची कॅपसूल तुम्ही दिली आहे. माझ्र यासमोर अंधार दिसत आहे. मी विरोधी पक्षाचा असलो तरी प्रार्थना करतो की, हे राज्य पुढे गेले पाहिजे. राज्याचा विकास झाला पाहिजे. राज्याचा विकास करावयाचा असेल तर उद्योगांकरिता चार गोष्टीची आवश्यकता आहे, वीज, पाणी, रस्ते व दळणवळणाची साधने. दुसरीकडे शेतीचा विकास करावयाचा असेल तर पाणी व वीज पाहिजे, हे नसेल तर या राज्याची प्रगती कशी होणार ? जाणता राजा, शेतकऱ्याचा मसिहा यांना आम्ही रोज वर्तमानपत्रात वाचतो व चॅनलवर पाहतो, त्यांचे क्रिकेट सुरु आहे. मंत्री महोदय श्री.दिलीप वळसे पाटील यांची मी माफी मागतो व सांगतो की, जाणता राजा क्रीकेट खेळत आहेत, लोक अंधारात बोंबा मारत आहेत आणि शेतकरी आत्महत्या करीत आहेत, काय अवस्था आहे ? कशाला दिल्लीत बसता तुम्ही ? मोठमोठया नेत्यांची कॅबिनेट सब कमिटी एनरॉनच्या विषयावर बसविली जाते, काय झाले त्याचे ? किती वर्ष या कमिटया चालणार ? केव्हा एनरॉनचा गॅस येणार ? केव्हा वीज मिळणार ? काय करीत आहात तुम्ही ? उमरेडला गोळीबार झाला, आज अमरावती पूर्ण बंद आहे. वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या घरावर लोक मोर्चे घेऊन चालले आहेत, आता अधिकारी सुटले असून आमच्या घरावर मोर्चे येत आहेत, त्यामुळे आम्हाला रस्त्याने फिरणे मुस्कील झाले आहे, अशी सर्व गंभीर परिस्थिती आहे, असे यक्ष प्रश्न माझ्यासमोर आहेत. याबाबत माझी आपल्याला विनंती आहे की, उर्जा मंत्रिमहोदयांनी मेहेरबानी करुन आम्हाला मुंगेरीलाल के हसीन सपने दाखवू नयेत कारण त्यात काही खरे नाही.

नंतर श्री.सुंबरे.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

सभापती महोदय, या विषयावर मी येथे सातव्यांदा-आठव्यांदा बोलतो आहे. यापूर्वी दर अधिवेशनामध्ये या विषयावर झालेल्या चर्चेच्या दरम्यान मी तुम्हाला काही चांगल्या सूचनाही केल्या होत्या आणि त्यामुळे मला आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. रावते 'सरकारचे ॲडव्होकेट' म्हणू लागले. प्रत्येक वेळी आपण पाहतो की, वीज निर्मितीच्या बाबतीत परफॉर्मन्स काय आहे ? तर काहीही नाही. मला हे कळत नाही की, आपण हे सारे काम टर्न की बेसिसवर का देत नाही ? तुम्ही या पद्धतीने काम करीत नसल्याने असे होते की, अगदी खिळ्यापासून काहीही खरेदी करायची झाली तर डायरेक्टरपासून मंत्र्यांपर्यंत संमती घ्यावी लागते. तेव्हा हे सारे टाळायचे असेल आणि वेगाने निश्चित मुदतीत काम व्हावयाचे असेल तर टर्न की बेसिसवर आपण सगळे प्रकल्प करण्यास द्या आणि त्यांना सांगा की, अमुक एक मुदतीमध्ये काम झाले पाहिजे, ते झाले नाही तर प्रत्येक दिवसामागे तुला अमुक इतका दंड द्यावा लागेल. आपले कोराडी, खापरखेडा येथील प्रकल्प आपणास वाढवावयाचे आहेत ना ? तेथे तर आपल्याकडे सगळ्या सोयी-सुविधा आहेत, पाणी आहे, कोळसा वगैरे सारे काही आहे. पण तरीही प्रकल्प पूर्ण होण्यास, काम पूर्ण होण्यास किती वेळ लागतो आहे. तेव्हा अशी कामे करून घेताना तुम्ही वेळेची अट टाकली पाहिजे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, जेवढे जास्त डायरेक्टर, जेवढे जास्त टेक्निकल डायरेक्टर्स, जेवढे जास्त चीफ इंजिनिअर्स, जेवढे जास्त कन्सल्टंटस् तेवढी कामात दिरंगाई होणार. कारण हे सगळे मिळून काम करणार म्हटले म्हणजे त्यातील एकही काम करणार नाही उलट एकमेकांच्या कामात काडी घालण्याचेच काम ते करीत राहतात. आणि कोठलाही पॉवर प्रोजेक्ट टेंडरने होणार आहे का ? एखाद्या व्यक्तीने चार हजार कोटी रूपयांची गुंतवणूक केली आणि त्याला उद्या आपण सांगितले की, आम्ही तुझी पॉवर विकत घेत नाही. तर मग त्याने केलेल्या चार हजार कोटीच्या गुंतवणुकीचे त्याने काय करायचे ? असे झाले तर उद्या कोण आपल्याकडे गुंतवणूक करण्यास येणार आहे ? तेव्हा कोणताही पॉवर प्रोजेक्ट हा टेंडरने येऊ शकत नाही, हे आपल्या अधिकाऱ्यांनाही माहिती आहे पण ते तुम्हाला असे स्पष्टपणे सांगू शकत नाहीत. त्यासाठी तुम्ही कॅबिनेटची सबकमिटी करून निर्णय घेतले पाहिजेत. गरज असेल तर, तुमच्यामध्ये हिंमत नसेल तर आमच्या सारख्यांना तुम्ही बोलावू शकता, बाहेरच्या लोकांना बोलावू शकता. शेवटी राज्य पुढे गेले पाहिजे. तेव्हा येथून पुढे कोणताही पॉवर प्रोजेक्ट हा टेंडर काढून येत नाही, येऊ शकत नाही हे आपण निश्चित

...... 5बी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ...

लक्षात घ्या. आता तर नवीन विजेचा ॲक्ट झाला आहे. मंत्री महोदय आमच्यावर नाराज झाले. म्हणाले रिलायन्सने तुम्हाला 4.16 रूपये भावाने वीज दिली, आम्हालाही त्या भावाने मिळाली पाहिजे. पण रिलायन्सने सांगितले तुम्ही पुढील एप्रिलमध्ये करार केला तर आम्ही ती 5.16 रूपयांनी देऊ. शेवटी हा धंदा आहे आणि त्यासाठी त्यांनी देखील व्याजाने पैसे घेतलेले असतात. त्यामुळे ते त्यातून काही जास्त घेणारच. आता तर नवीन पॉवर ॲक्ट आलेला आहे त्यानुसार कोणीही प्रकल्प घेऊ शकतो आणि वीज विकू शकतो. आता या पुढे तुम्हाला स्पर्धेतूनच वीज घ्यायची असेल तर तुम्हाला जनरेशन वेगाने केले पाहिजे, त्यासाठी टर्न की बेसिसवर काम दिले गेले पाहिजे, त्यासाठी निर्णय न करणे, निर्णय घेणे आणि निर्णय घेणाऱ्यांच्या मागे चौकशी लावणे ही जी आपली पद्धत आहे ती बाजूला ठेवली पाहिजे. पण आज या शिवाय आपण काहीच करीत नाही. आपण यासाठीच खरे तर महाजनको निर्माण केले पण त्यांनी महाराष्ट्र अंधारात लोटला. तुम्ही बजेट प्रस्तुत केले. तुम्ही आम्हाला बॅगा दिल्या तेव्हाच आम्ही तुम्हाला सांगितले की, आम्हाला कंदील आणि टॉर्च देखील द्या. म्हणजे आम्ही आमच्या गावांमध्ये फिरू शकू. खेड्यातील परिस्थिती आज तर अत्यंत वाईट आहे. मी आपल्याला उदाहरण सांगतो. माझ्याकडे मी एक डेरी काढली आहे. त्या डेरीमध्ये साडेबारा हजार लीटर दूध येते. खरे तर इतके दूध येत असताना डेरी फायद्यात असली पाहिजे. पण ती डेरी आता घाट्यामध्ये आहे. कारण वीज नसल्याने सारे डिझेलवर करावे लागते. त्यामुळे दीड लाख रूपये दररोज खर्च आहे. कोल्ड स्टोरेज चालवायचे तर तेही डिझेलवर चालवावे लागते आणि तसे होत असेल तर घाट्याशिवाय दुसरे काय होणार आहे? आता लोक सांगतात की, वीज कनेक्शन देत नाहीत. पण वीजच नाही तर कनेक्शन काय देणार ? देऊन उपयोग तरी काय आहे ? वीज नसेल तर पाणी कसे काय देणार ? मग शेती कोरडीच ठेवायची का ? कोरडवाहू शेती असेल तर आपल्याकडे हे चालते का ? एकरी तीन क्विंटल कापसाचे उत्पादन आहे आणि कापसाला भाव 4500 रूपये मिळतो आहे आणि खर्च हा चार हजार रूपयांवर झाला तर तो शेतकरी कोठून पोट भरणार ? पाणी असल्याशिवाय शेती करता येत नाही आणि पंपासाठी कर्ज काढले तरी तुम्ही पंपाला वीज देत नाही. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... 5सी 1 ..

श्री. नितीन गडकरी...

छत्तीसगड राज्यामध्ये तेथील शेतकऱ्यांना फोनवरुन तुमच्या पंपाला आठ दिवसात विजेचे कनेक्शन मिळेल असे सांगितले जाते. गुजरात राज्यामध्ये सुध्दा हीच स्थिती आहे. आणि आपल्याकडे विजेचे कनेक्शन मिळायला सहा-सहा वर्षे लागतात. आम्ही शेतकऱ्यांना शेतामध्ये ऊस लावण्याकरिता सांगितले. त्याप्रमाणे शेतकऱ्यांनी शेतामध्ये ऊस लावला. परंतु पाण्याचे काय? त्यासाठी पाणी कसे व कोठून घ्यायचे? याबाबत त्यांना काय सांगायचे? आम्ही सांगितले की, इथेनॉल बेस डिझेल इंजिन लावून पंप चालवा. इथेनॉल बेस डिझेल 21 रुपये लिटरने मिळते, आणि डिझेल 40 रुपये लिटरने मिळते. तेव्हा इथेनॉल बेस डिझेल इंजिन बसविले तर शेतकऱ्याला तात्काळ फायदा होईल. सोलार एनर्जी आणि विंड मिल यांचे कोॲलिशन करुन आपण तीन ते चार पंप चालवू शकता. अशाप्रकारचा एक नवीन प्रयोग करीत असतांना आपण त्यामध्ये शेतकऱ्यांना सबसिडी द्या. आपण या गोष्टी करीत नसल्यामुळे सामान्य माणसांनी जीवन कसे जगायचे? आज ग्रामीण भागातील सामान्य शेतकऱ्याची काय अवस्था आहे? मी एका सार्वजनिक सभेमध्ये भाषण करण्याकरिता गेलो होतो. त्याठिक्‌ाणी जनरेटरवर लाईट चालविली जात असल्यामुळे मी स्टेजवर भाषण देण्याकरिता उभा राहिलो.परंतु मला भाषण सुचत नव्हते. जनरेटरच्या आवाजामुळे मला भाषण सुचत नव्हते. जोपर्यंत जनरेटरचा हा ऑर्केस्ट्रा थांबत नाही तोपर्यंत राजकीय सभेमध्ये आपल्याला भाषण सुचत नाही अशी माझी स्थिती आहे. एखाद्या ऑर्केस्ट्रामध्ये तबला, पेटी, व्हायोलीन, गिटार वाजल्याशिवाय गायकाच्या तोंडातून शब्द निघत नाहीत. याठिक्‌ाणी माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख व माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांचा ऑर्केस्ट्रा रंगात येत नाही तोपर्यंत भाषण सुचत नाही.

सभापती महोदय, मी परवाच्या दिवशी मुलुंड येथे एका बक्षिस समारंभासाठी गेलो होतो. मी स्टेजवर गेलो त्यावेळी सभागृहामधील लाईट गेल्याबरोबर बोंबाबोंब सुरु झाली. हे मी आपल्याला संध्याकाळचे सांगत नाही तर ती दुपारची वेळ होती. याठिकाणी आपण कशासाठी लाईट लावली? आपल्याला याठिकाणी खऱ्या अर्थाने मेणबत्तीवर चर्चा केली पाहिजे. रात्रीचे दहा वाजेपर्यंत लाईट नसते. आणि रात्री 12 वाजल्यानंतर फुल व्होल्टेज असते ही कसली योजना आहे? ज्यावेळी आपल्याला उजेडात काम करावयाचे असते त्यावेळी लाईट नसते, आणि अंधारात काम करीत असतांना आपले व्होल्टेज वाढते. जे तुमच्या मनामध्ये आहे ते माझ्या बोलण्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. रात्री 12 वाजल्यानंतर व्होल्टेज वाढविण्याची आपली ही सवय आपण बदलणार आहात की नाही? आज राज्यातील शेतकरी दु:खी आहे, विद्यार्थी दु:खी आहे, सामान्य माणूस दु:खी आहे. राज्यातील उद्योग बाहेर चालले आहेत, तरुण माणसे बेरोजगार होत चालले आहेत. आपण गेल्या सात वर्षात काय काय घोषणा केल्या? आज तुमच्या ठिकाणी ऊर्जा मंत्री म्हणून दुसरे कुणी असते तर माझे भाषण माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांच्यापेक्षा दहा पटीने जास्त झाले असते. परंतु मला वाटते की, आपण प्रामाणिकपणे काम करीत आहात. यानिमित्ताने मला असे वाटते की, मंत्रिमहोदय आपल्या अवतीभोवती जे झारीतील शुक्राचार्य आहेत, सेक्रेटरी आहेत यांचे आपण ऐकाल तर सत्यानाश होईल. ते जे सांगतील त्याच्या विरुध्द निर्णय घ्या. त्यांनी करा म्हटले तर तुम्ही करु नका, आणि त्यांनी करु नका म्हटले तर करा. म्हणजे चमत्कार निर्माण होईल व तुमचे प्रश्न सुटतील. हे राज्य आपले आहे. आपण निवडून आलेले आहात. आपण म्हणाल त्याप्रमाणे राज्य चालले पाहिजे. आपल्याला हाकलायचा अधिकार जनतेचा आहे. We are policy maker, they are executor परंतु याठिकाणी उलटे झाले आहे. ते पॉलिसी बनवितात आणि हे बदल्या आणि ट्रान्सफरचे काम करतात. आपण नेहमी छत्रपती शाहू महाराजांचे, महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव घेऊन बोलता. माननीय सदस्य श्री. गणगणे साहेब आपण ओ.बी.सी. बद्दल बोलता. महाराष्ट्रामध्ये पंप कुणाचे बंद आहेत? आत्महत्त्या करणारे शेतकरी कोण आहेत? विदर्भामध्ये 32 टक्के शेतकरी शेडयुल्ड कास्ट व 63 टक्के शेतकरी ओ.बी.सी. चे आहेत. त्यांचे कुणीही वाली नाहीत. त्यांना आपण एकेक लाख रुपये देण्यास तयार नाही. आणि वर त्याची मानसिक स्थिती बिघडली म्हणून लेख लिहिता. दारुच्या अतिसेवनाने आत्महत्त्या करु लागले म्हणून लेख लिहिता.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरू...

सभापती महोदय, एक गोष्ट करा, माननीय श्री. पवार साहेबांना क्रिकेट बोर्डाचा राजीनामा द्यायला सांगा. रोज टी.व्ही.वर सचिव तेंडुलकर, युवराज सिंग यांच्याबाबतची वक्तव्ये येत असतात. श्री.पवार साहेबांना "जाणता राजा, मसिहा " असे म्हटले जाते. परंतु त्यांना क्रिकेट शिवाय दुसरे काही करण्यास वेळच नाही. सन्माननीय सदस्य गुरूनाथ कुलकर्णी यांना सांगावयाचे आहे की रोज टी.व्ही वर "आज तेंदुलकर ने क्या कहा, युवराज सिंग ने क्या कहा, उसने माफी मांगी क्या ? " या शिवाय दुसरे काही सुचतच नाही. वर्तमानपत्रातही आणि टीव्हीवर रोज "जहॉ जहॉ पैर पडे संतन के वहाँ वहाँ हुआ बंटाधार." अशी परिस्थिती झालेली आहे. ते कृषी मंत्री झ ााल्यानंतर महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या व्हायला लागल्या, क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष झाले त्या ठिकाणीही त्यांना अपयश आले. सभापती महोदय, कऱ्हाडमध्ये खोट्या नोटा तयार करण्याचा कारखाना सापडला. त्यामध्ये राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते पकडले गेले. निवडणुकीमध्ये लक्ष्मीदर्शन केले जाते. एरांडोलमध्ये काय झाले ? माहीत आहे. तरीही लोक आपल्यालाच मते देतात. त्याचबरोबर रामटेकमध्ये पैशाचा महापूर आला. हा राजकारणाचा विषय नाही. परंतु वीज नाही, लोडशेडींग होते, शेतकरी सकाळी उठल्याबरोबर आपल्या नावाने ओरडत असतात. तरीही निवडणुकीमध्ये लोक आपल्याला मते देतात. महाराष्ट्राची अक्षरश: आपण वाट लावलेली आहे. आपण खाजगी कंपनीबरोबर करार केलेले आहेत. महाजनको 250 मे.वॅ. प्रकल्प मार्च 2007 पर्यन्त पूर्ण करणार, पारस 250 मे.वॅ. प्रकल्प एप्रिल 2007 मध्ये पूर्ण होणार, घाटघर 250 मे.वॅ.चा प्रकल्प जुलै 2007 पर्यन्त पूर्ण होणार, उरण 700 मे.वॅ.चा प्रकल्प मार्च 2009 पर्यन्त पूर्ण करणार, परळी 250 मे.वॅ.प्रकल्प एप्रिल 2009 पर्यन्त पूर्ण करणार, असे 2011 पर्यन्त 8540 मे.वॅ. वीज निर्माण होणार असे नियोजन आहे. परंतु दर वर्षी 10 ते 12 टक्के विजेची मागणी वाढते आहे. म्हणजे दरवर्षी 2 हजार मे.वॅ. विजेची मागणी वाढणार आहे. या वाढीची तुलना केली तर तुम्ही आजही जागे झालेला नाही. दरवर्षी 2 हजार मे.वॅ.वीजेची मागणी आहे, तसेच पाच वर्षामध्ये 10 हजार मे.वॅ. विजेची मागणी वाढणार आहे आणि आताची तूट 7000 मे.वॅ. आहे. म्हणजे एकूण 17000 मे.वॅ. वीज कशी उपलब्ध करणार अहात ? हा खरा प्रश्न आहे. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये हा काळाकुट्ट दिवस आहे. आज बिहारमध्ये 8 तासाचे लोडशेडींग केले

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरू.....

जाते, उत्तर प्रदेशमध्ये 7 तासाचे लोडशेडींग केले जाते. आम्ही तिकडे जातो, तेव्हा आम्हाला ती राज्ये किती मागसालेली आहेत, असे वाटत असे. परंतु आता बिहार, उत्तर प्रदेश राज्यांपेक्षाही महाराष्ट्रमध्ये विजेची गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. उमरेडमध्ये विजेच्या संबंधात मोर्चा काढला आणि निवेदन दिले तर त्यांच्यावर पोलिसांनी गोळीबार केला. त्या ठिकाणी एका मुलीचे लग्न मोडले. ती मुलगी ब्युटी पार्लरमध्ये नोकरीला होती.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

तिचा काही संबंध नाही तरी तिला पकडले आणि आत घातले. तिच्या विरुध्द केस घातली. तिच्या होणाऱ्या नवऱ्याने सांगितले की, तुझ्यावर केस झाली आहे त्यामुळे मी तुझ्याशी लग्न करणार नाही. दुसरीकडे एम.टी.एन.एल. मधील मुलगा चौथ्या मजल्यावर होता. त्याला गोळी मारली. त्या ठिकाणी दणादण झोडपून काढले. कळमेश्वर येथे लाठीमार केला. वरुड येथे लाठीमार केला. अमरावतीलाही तेच सुरु आहे. लोकांनी यांचे दंडुके खाणे सुरु आहे. लोकांनी कसे जगावयाचे ? यानंतर एकच कार्यक्रम केला पाहिजे. कॉंग्रेस पक्षाचे तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे आमदार ज्या ठिकाणी राहतात त्यांच्या घरावर मेणबत्ती आणि कंदील मोर्चा नेऊन त्यांचे बाहेर फिरणे बंद केले पाहिजे. तुम्ही वीज द्या, सरकारवर दबाव आणा नाही, तर तुम्हाला बाहेर फिरु देणार नाही असे आंदोलन लोकांनी करण्याची गरज निर्माण झाली आहे. माननीय मंत्रिमहोदयांचे कोणी ऐकत नाही. आम्ही वर्तमानपत्रात वाचले की, कॅबिनेटमध्ये माननीय मंत्रिमहोदयांना असे म्हटले गेले की, तुमच्यामुळे अशी वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे. एखादा स्वाभीमानी मंत्री असता तर त्याने सांगितले असते की, दादा, मी हा मंत्रिपदाचा राजीनामा देतो. आपण राजीनामा दिला नाही. तुम्हाला जमत नसेल तर राजीनामा तरी द्या. ही परिस्थिती बदलण्याची ताकद आपल्यात नाही. आपण दिलेली आश्वासने फोल ठरली. विजेची निर्मिती झाली नाही. उद्योग बंद पडले. मुले बेरोजगार झाली. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेच्या काळात केलेल्या लोडशेडिंगमुळे आपण एक पिढी बरबाद केली. तिकडे लाल दिव्याच्या गाडीची काय परिस्थिती आहे ? मलबार हिलवर लाल दिव्याची गाडी ढकलावी लागते. या ठिकाणी टाय लावणारे आर. पी. आय. चे माननीय मंत्रिमहोदय श्री. प्रीतमकुमार शेगावकर आहेत. त्यांच्यापूर्वी श्री. दयानंद मस्के हे राज्यमंत्री होते. त्यावेळी मी विरोधी पक्ष नेता होतो. त्यावेळी मलबार हिलवर त्यांची गाडी पुढे आणि माझी गाडी मागे होती. चढावावर त्यांची गाडी बंद पडली. माननीय मंत्रिमहोदय श्री. मस्के साहेबांना खाली उतरावे लागले. मी त्यांना विचारले की, मस्के साहेब, काय झाले ? ते म्हणाले की, काय सरकार आहे ? गाडी सुध्दा अशी दिली आहे. एक तर घर देत नाहीत आणि गाडी मिळाली तर बाहेरगावी पेट्रोलपंपावर पेट्रोल देत नाहीत, अशी अवस्था आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, माझी विनंती आहे. या चर्चेच्या निमित्ताने माननीय ऊर्जा मंत्र्यांनी कमीतकमी या वर्षभरामध्ये हे लोड शेडिंग कमी करण्यासाठी बाहेरच्या राज्यातून किती वीज आणणार याबाबतीत काही तरी सांगावे. माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे साहेबांच्या शब्दावर आता आमचा विश्वास राहिलेला नाही. आपण वीज निर्मितीचा तीन वर्षाचा युध्द पातळीवर, तारीखवार कार्यक्रम जाहीर करावा. आपण त्याचे मॉनिटरींग करावे आणि अमूक तारखेला हा प्रकल्प सुरु होईल असे सांगावे. आपण जर हे करणार नसाल तर राजीनामा देऊन बाजूला व्हावे. महाराष्ट्राला कशाला अडकवून ठेवता. कमीतकमी हे तरी करुन दाखवावे. गेली सात वर्षे आपण केलेली भाषणे आम्ही ऐकली, आपण केलेल्या सूचना आम्ही ऐकल्या, आपण सांगितलेले करार ऐकले. आपण सांगितलेले करार ऐकून सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी टाळ्या वाजविल्या. त्यांना वाटले की, आपण वीज आणणार. त्यांचा भ्रमनिरास झाला. काँग्रेस पक्षाचे लोक म्हणतात की, हे खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. काँग्रेस पक्षाचे लोक विजेबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला बोलतात. दुसऱ्यावर टीका करतात. राष्ट्रवादी काँग्रेसचे लोक सुध्दा आपल्याला बोलतात. याबाबतीत ठोस निर्णय माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावा अशी मी विनंती करतो. गेल्या सात वर्षात सांगितल्याप्रमाणे ते वागले नाहीत. त्याप्रमाणे परिणाम दिसले नाहीत अशा माननीय मंत्रिमहोदयांचा मी तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतो. त्यांच्याबद्दल अतिशय नाराजी व्यक्त करतो. मित्र या नात्याने मी त्यांना विनंती करतो की, आपल्याला जमत नसेल तर आपल्या पदाचा राजीनामा द्यावा आणि बाजूला व्हावे. अशा परिस्थितीमध्ये आपण या पदावर राहणे योग्य नाही. अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज आपण सकाळी 10.00 वाजल्या पासून कामकाज करीत आहोत. मला वाटते आता आपण थांबू.

**तालिका सभापती (श्री उल्हास पवार)** : आजच्या कामकाजपत्रिकेवर नियम 260 अन्वयेचे दोन प्रस्ताव आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सभागृहाची बैठक उद्या सकाळी लवकर ठेवावी आणि आता अर्धा-तास चर्चा घ्याव्यात, अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती** : अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत...

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या विषयाकडे मी आपले आणि सभागृहाचे लक्ष वेधित आहे. आता मी फोन करण्यासाठी बाहेर गेलो होतो. आपल्या विधिमंडळ सचिवालयाच्या इमारतीसमोर जे बेबॉर्न स्टेडियम आहे त्या ठिकाणी दिवसा जसा उजेड असतो त्या प्रमाणे विद्युत प्रकाश झोतांचा वापर करुन खेळाचा तमाशा सुरु केलेला आहे. या ठिकाणी विजेसंबंधी आपण पोटतिडिकेने चर्चा करीत असताना बाहेर विजेच्या प्रकाश झोतामध्ये खेळ सुरु आहे. माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये लक्ष घालून हा विजेचा अनिर्बंध वापर थांबवावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

**तालिका सभापती** : आजच्या कामकाजपत्रिमध्ये दाखविण्यात आलेले नियम 260 अन्वयेचे प्रस्ताव उद्या घेण्यात येतील. त्यामधील सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावाचे, त्यांनी माननीय सभापतींशी केलेल्या चर्चेनुसार, अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये रुपांतर करण्यात आलेले आहे. अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. आजची विजेच्या संदर्भात अपूर्ण राहिलेली चर्चा उद्या घेण्यात येईल.

उद्या मंगळवार, दिनांक 17.4.2007 रोजी सकाळी 9.45 ते 11.15 पर्यन्त सभागृहाची विशेष बैठक होईल. सदरहू बैठकीत विजेच्या भारनियमनाच्या संदर्भात चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर सकाळी 11.30 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 17 एप्रिल 2007 रोजी सकाळी 9.45 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 7 वाजून 43 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 17 एप्रिल 2007च्या सकाळी 9.45 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही